७२७

म. ग्रं. सं. ठाणे.

विषय भू. प्र.

REFBK-0026322

12 MAR 1994

12 MAR 1994

8 MAR 1995

31 JAN 1996

७२८

२६३२२

२५।२।९७


MAR

# माझा गाव, माझा मुलुख

मधु मंगेश कर्णिक

REFBK-0026322

मॅजेस्टिक प्रकाशन



माझा गाव, माझा मुलूख

आवृत्ती पहिली : २१ डिसेंबर, १९९०
( ६४ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन, रत्नागिरी )

© सौ. शुभा कर्णिक
४०१,/एक्स १८, मार्व्हल
शास्त्रीनगर, चार बंगला
अंधेरी ( पश्चिम ), मुंबई–४०० ०५८

प्रकाशक
अशोक केशव कोठावळे
मॅजेस्टिक प्रकाशन
२१६, प्रसाद चेंबर्स
गिरगाव, मुंबई ४०० ००४

मुद्रक
रवींद्र केशव कोठावळे
ॐ मुद्रणालय
२५० अ, शनिवार पेठ
पुणे–४११ ०३०

मुखपृष्ठ व आतील रेखाचित्रे : बाळ ठाकूर

मूल्य : साठ रुपये

कै. नाथ पै
यांच्या स्मृतीस—
कोंकणची माती आणि माणसे
यांवर त्यांनी उमाळ्याने प्रेम केले.



# भ्रमंतीपूर्वी

एकाच लहानशा भूप्रदेशावर वर्षानुवर्षे विविध प्रकारचे लेखन करणारे लेखक आपल्याकडे, मराठीत तरी फारसे नाहीत. याला सन्माननीय अपवाद एका श्री ना. पेंडशांचा. आपल्या कादंबऱ्यांसाठी त्याना आज घडीलाही कोंकणाचा ' आधार ' वाटतो. लेखकाला जन्मभर बांधून ठेवील, असा समृद्ध भू-प्रदेश मुळात त्याच्या संचितामध्ये असावा लागतो; आणि त्यावर जन्मभर लिहीत राहण्यासाठी, लेखक त्यात तनामनाने गुंतावा लागतो—

कोंकण ही माझी जन्मभूमी ही भूमी माझ्यामधल्या लेखकाला साहित्य-निर्मितीसाठी सुरुवातीपासूनच खुणावीत आली आहे आजवर मी अनेक कथा-कादंबऱ्या कोंकणच्या पार्श्वभूमीवर लिहिल्या. तेथील माणसे, निसर्ग, प्राणीजीवन यानी मला सतत विषय पुरवले. लिहिण्याची प्रेरणा दिली.

' माझा गाव, माझा मुलूख ' ही लेखमालाही मी त्याच प्रेरणेतून लिहिली. मुळात ती श्री रमेश व श्री प्रमोद भोगटे यांच्या ' भरारी ' मासिकातून ' दशावताराच्या मालवणी मुलखात ' या शीर्षकाने प्रसिद्ध झाली. मालवणी मुलखावर एवढ्या कथा-कादंबऱ्या लिहूनही माझे समाधान होत नव्हते. त्यावर एखादे स्वतंत्र असे स्थलचित्रणात्मक पुस्तक लिहावे, ही माझी ओढ होती अनेकाना अनेक कारणानी आपल्या गावी, आपल्या मुलखात वरचेवर जाता येत नाही अशा कोंकणी गावचेड्या वाचकाना या पुस्तकाद्वारे घटकाभर तरी गावी जाऊन आल्याचा प्रत्यय येईल असे मला वाटते. शिवाय कोंकणात जे वाचक कधी गेले नाहीत, त्यानाही या पुस्तकातून कोंकणच्या एका भागाचा परिचय होईल

कोंकणातील ही सारी गावे फार फार रमणीय आहेत. मला तर ती जगातल्या कोणत्याही सुंदर ठिकाणापेक्षा अधिक सुंदर वाटतात !

ही गावे, तेथील माणसे, समाजजीवन, हे सारे मला जसे दिसले, तसे मी लिहिले आहे. माझे व्यक्तिगत अनुभवही त्यांत आहेत. याहून वेगळे चित्र कुणाला आढळणे शक्य आहे ठिकठिकाणची ' माहिती 'सुद्धा परिपूर्ण असेलच, असे नाही. माझ्या कॅमेऱ्यातून जसे दिसले, तसे नि तेवढेच मी टिपले आहे. त्याहूनही अधिक काही कॅमेऱ्याबाहेर राहिले असणे शक्य आहे माझ्या भ्रमतीमध्ये मी घेतलेली चित्रे, एवढ्याचपुरते या चित्राकडे पाहावे व त्यांचा आस्वाद घ्यावा.

माझ्या या मुलुखात भ्रमती करताना माझे अनेक मित्र माझ्याबरोबर भटकले मला नसलेली कितीतरी माहिती त्यांच्याकडून मिळाली. अरविंद म्हापणकर, प्रकाश कुशे, अना काबळी ( मालवण ), डॉ. वसंत सावंत,






तुकाराम नाईक, हरिहर आठलेकर विद्याधर भागवत ( सावंतवाडी ), आ. द. राणे ( माणगाव ), दि. मो. दुधगावकर, सी. श्री. उपाध्ये ( वालावल ), दादा ठाकूर, बाळ गुरव ( आचरे ), माधव कदम, सुरेश कोदे, उदय पंडित ( कणकवली ), महेश केळुस्कर ( रत्नागिरी ) आणि अन्य या सर्वांचा मी ऋणी आहे.

हे पुस्तक लिहिताना मला अपार आनंद मिळाला, तो वाचकांना काही प्रमाणात मिळाला तरी मला पुरेसे आहे—

**—मधु मंगेश कर्णिक**



## परिक्रमा


१. पाचूचा गाव : करूळ / १
२. सह्याद्रीच्या पायथ्याचा फोंडा घाट / ११
३. समृद्ध आणि रसिक कणकवली / २०
४. कणकवलीचे नागडेबुवा ! / २८
५. श्री रामेश्वर; श्री कुणकेश्वर / ३४
६. हापूस आंब्याचे गाव : देवगड / ४२
७. कोंकण किनाऱ्यावरील जिब्राल्टर : विजयदुर्ग / ४९
८. आरती प्रभूंच्या कवितेतील 'कुडाळ' / ५६
९. पाषाणसौंदर्याची गावे / ६३
१०. सावंतवाडी, नव्हे सुंदरवाडी / ६७
११. अंतरीचा ज्ञानदिवा : बांदे / ७४
१२. तलावात रूप पाहणारे धामापूर / ८१
१३. मिजास मालवणची ! / ८९
१४. निसर्गरमणीय मसुरे / ९७
१५. वाळूत वसलेले आणि फसलेले देवबाग १०४




१६. कर्लीच्या खाडीकाठाने / ११०
१७. तेंडोली ते बागलाची राई / ११६
१८. वेंगुर्ल्याच्या वाटेवर— / १२२
१९. वेंग मारून उरले ते वेंगुर्ले! / १२९
२०. किरणांच्या पाण्याचे स्वप्न!
आरोंदे, रेडी, तेरेखोल / १३६
२१. हिरवीगार आंबोली / १४१
२२. असा हा मालवणी मुलूख! / १४६
२३. मालवणी माणूस— / १५७
२४. आणि बाईमाणूस! / १६५
२५. माझ्या मुलखाचे ऋतुचक्र / १७१
२६. आम्ही आणि मासे! / १८०
२७. दहिकाले आणि दशावतार / १८६
२८. गौरीगणपतीचे दिवस / १९१
२९. आंब्या-फणसाचे दिवस / १९७



# पाचूचा गाव : करूळ

कणकवली-फोंडाघाट डमररस्त्यावर वसलेला माझा करूळ हा गाव कोंकणातील एक सुंदर खेडे आहे. प्रत्येकाला आपला जन्म झाला तो
१. गाव उल्लेखनीय वाटत असतो, त्या अर्थाने करूळचा उल्लेख मा करणार नाही. समुद्रकिनारा, नारळी पोफळीच्या बागा, हिरवेगार डोंगर अथवा संथ वाहणारी नदी ज्या गावाला शेजार करतात, तो गाव कसाही असला तरी सुंदर बनतो. करूळला यांपैकी काहीही नाही तरीही माझा हा गाव देखणा आहे. हा गाव तिन्ही बाजूनी विस्तीर्ण माळ नि चौथ्या बाजूला तसाच विस्तीर्ण भातमळा अंगाखांद्यावर घेऊन वसलेला आहे मृग नक्षत्र लागले आणि पावसाळा थोडा जून झाला की या मळ्यात असंख्य जोते नि माणसे भातपेरणीसाठी वावरू लागतात आणि आठ-पंधरा दिवसात मळा हिरवा पोपटी बनतो. जसजसा पावसाळा स्थिरावतो, तसतसे या मळ्याचे सौंदर्य वाढू लागते. चव्हाट्यावरच्या पिंपळापासून डामऱ्याच्या राईपर्यंत पसरलेला तो अथांग-हिरवा सागर वाऱ्यावर हेलावू लागतो, त्याच्या हिरव्या लाटा दृष्टीचे पारणे फेडतात आश्विनाची चाहूल लागली की एकेक कुणगा सोनेरी बनू लागतो दसरा दिवाळीच्या दरम्यान हा हां म्हणता हिरव्याचे हळदीवे बनते. हिरव्या शालूची सोनेरी चमकदार पैठणी होते. त्या देवाघरच्या सोनसळी वस्त्राला मत्त सुगंध जडतो. भाताच्या दुधाने टचटचलेल्या लोंब्यांचा तो उन्मादक सुवास वाऱ्याच्या झुळकाबरोबर आपल्या नाकपुड्यात शिरला की कस्तुरी केवड्याची मिजास डावी ठरते. त्यातच शरद ऋतूमधील सोनेरी उन्हे आपले गारूड पसरतात आणि माझा गाव त्या एका भातमळ्याने श्रीमंत दिसू लागतो. देखणा बनतो

गावाच्या पूर्व पश्चिम-दक्षिणेला पसरलेले माळसुद्धा तसेच. पावसाळ्यात हिरवाळलेले आणि उन्हाळ्यात चमकदार पिंगट गवताने, 'करड' आणि 'पयाण यानी भरलेले. आमणीच्या माळावरून सह्याद्री चित्रात रेखाटावा तसा दिसतो उत्तरेला गगनगडापासून दक्षिणेला घोटगीच्या घाटापर्यंतच्या सह्याद्रीच्या रांगा न्याहाळाव्या माझ्या गावच्या आमणीच्या माळावरून आणि हे माळ निरखावे फोंडाघाटच्या माथ्यावरील दाजीपूरच्या खिडीतून ! तिथून तळकोंकणातला माळावरचा माझा गाव

तळहातावर ठेवलेल्या हिरव्या पाचूसारखा उठून दिसतो अफाट पसरलेल्या माळावर मध्येच हिरवळ दिसावी तसा!

या चिमुकल्या गावाने मला भरभरून दिले. ऋतुचक्राचे सारे फेरे मी या माझ्या गावात बालपणापासून नजरेत साठवले. मान्सूनचे वारे झाडांना कसे मुळापासून हलवतात आणि आषाढातला पाऊस कौलारांवर कसा ताशा वाजवतो ते मी इथेच अनुभवले. माघातले जमिनींना भेगा पाडणारे 'तडे' वारे आणि वैशाखातले रणरणीत ऊन मला इथेच भेटले. पौषातल्या थंडीबरोबर आंब्या-काजूंना येणारा मोहर नि फणसावर फुटणाऱ्या 'कुवऱ्या', मृगाबरोबर कोरड्या जमिनीतून वर तरारणारे कंदमुळांचे लसलसते लालुस कोंब, ज्येष्ठातल्या पहिल्या पावसाबरोबर मळ्यात बेडकांनी सुरू केलेले खर्जातील रुद्रावर्तन! रात्री काजव्यांनी झगमगणारी झाडे, भाद्रपदात शांत झालेल्या नदीव्हाळाच्या निवळशंख कोंडी, मस्तावलेल्या बैलांनी, शिंगांनी वारुळे फोडीत दिलेल्या डरकाळ्या, घेतलेल्या झुंजी, वारुळावर फुललेली शुभ्रचितळी अळंबी! सळसळत्या सर्पांची वळणे, त्यांच्या हालचालींचा वक्र दिमाख, आकाशातून झेपावत येणारे गरुड पक्षी आणि आमणीच्या माळावर पिसारा फुलवून नाचणारे मोर, कवड्यांची कुट्टरघुम आणि साळुंक्याची गाणी, कोकिळेचे पंचम आणि ढोलीतल्या हिरव्या राघ्यांच्या लाल चोची, भारद्वाजाचे पंख आणि पिकल्या फळांना भिडणाऱ्या रानपाखरांचे डंख.

सारे सारे मी या माझ्या गावात पाहिले. निसर्ग, पशू, पक्षी, माती, दगड, गुरे आणि ढोरे! जास्वंदी करवंदींना खेळीमेळीने दोन्ही कडेना वागवणाऱ्या पाणदी, रानातून, मळ्यातून गावाकडे धावत येणाऱ्या निरुंद पायवाटा, खोल चिंचोळ्या विहिरी, रामेश्वराच्या पुरातन देवालयाभोवतालची तेवढीच पुरातन, गूढ गहनभासणारी देवराई, त्या देवराईतील उंच-उंच सात्विणावरील गांधीलमाश्यांची प्रचंड मोहळे, मधाची पोळी, उंच उंच फांद्यांवर बसून गंभीर घुमुत्कार करणारे हुप्पे, लाल तोंडाच्या खोडकर माकडांची पलटण— भर दुपारच्या निवांत वेळी चीत्कारणाऱ्या घाऱ्या, हे सारे मी डोळे भरून पाहिले.

करूळच्या माळावर बालपणी गलोल घेऊन पाखरे मारत हिंडलो, तरुणपणी बंदूक खांद्यावर घेऊन वणवण भटकलो. उडत्या ससावर आणि पळत्या भेकरांवर बार टाकले, रानात पारधीसाठी जाऊन, हाके घालून उठवलेल्या रानडुकरांना जमीनदोस्त केले. कवडे, ल्हावे यासारखे चपळ पक्षी चार नंबरने, एअरगनने टिपले. कुणाच्या घरात शिरलेला दुखावलेला नाग बंदुकीने मारला.

शिकारीचा शौक मनमुराद भागवला. मग दुर्बीण घेऊन पक्षीनिरीक्षणात रमलो. सह्याद्रीमध्ये पेटलेले वणवे दुर्बिणीतून न्याहाळले. दूरचे मोरांचे थवे भिंगातून जवळ आणले. हे सारे करूळ गावातच—

गणपतीच्या दहा दिवसात बेंबीच्या देठापासून आरत्या म्हटल्या. 'येई हो विठ्ठले' म्हणताना सूर टिपेला भिडला. 'सत्राणे उड्डाणे' म्हणताना गणपतीलाही कापरे भरले असेल! मग नवरात्रामध्ये रामेश्वराच्या देवळात 'जागर' करीत रात्री गाजवल्या. जाता-येताना कुणाच्या काकड्या तर कुणाचे निबूड वेलांवरून अदृश्य केले! भजनाचे 'मांड' गाजवले. 'अलकापुरी पुण्यभूमी पवित्र' म्हणत टाळ-मृदंगाच्या गजरात तल्लीन झालो. गणपतीच्या शाळेत रेखणी केली. भिंतीवर सुरेख चित्रे रंगवली. मूर्ती बनवल्या.

शिमग्यात होळीच्या माडावर रंग खेळलो. रोंबटात नाचलो. दशावतार पाहिले. शंकासुराच्या विनोदाने बेजार होईपर्यंत हसलो. शबय् शबय् करीत घरोघर हिंडलो. शिमग्याचे निशाण खांद्यावर घेतले. रामेश्वराच्या देवळातील कौल प्रसाद पाहिले. बारापाचाचे जाबसाल ऐकले. देवदेवस्की आणि अगारे-धुपारे, अवसर आणि खाव, ढोल ताशे, मोरपिसे, सनईचे सूर- महारानी पोटावर घेऊन वाजवलेले ढोल.

करूळच्याच शाळेत धुळाक्षरे गिरवली. उडगेपणा करीत करीत चार अक्षरे शिकलो. मोडकमास्तर भेटले नसते तर गुरामागे राखणा होऊन लंगोटीतच वावरलो असतो. पण करूळला मोडकमास्तर आणि कणकवलीला साळवीमास्तर भेटले आणि पुस्तकांची गोडी लागली वाचावेसे वाटू लागले. लिहावेसे वाटू लागले. लिहायला लागलो आणि जन्मल्यापासून पाहिलेला गावाचा सारा देखावा फेर धरून भोवती उभा राहिला. माझ्यावर लिही, म्हणू लागला

गावाच्या दक्षिणेला पुरातन गावतळे. गावातून मधोमध जाणारा हमरस्ता. गावात विपुल पाणी, हे सारे पाहून अठराव्या शतकात आमच्या कर्णिक पूर्वजांनी हा मूळचा बेचिराख गाव नव्याने वसवला. त्याआधी या गावात राणे घराणे नांदत होते. त्या घराण्यातल्या सती गेलेल्या साध्वींच्या समाध्या.. (त्याला गावकरी 'थडगी' असे गैरसमजुतीने म्हणतात.) सतीच्या माळावर, तळ्याजवळ, चिरेखाणीजवळ आजही आढळतात. पश्चिमेला गर्द देवराईमध्ये श्रीरामेश्वराचे फारच पुरातन देऊळ. त्यातील स्वयंभू पिंडी. गाभाऱ्यासमोर देखणा, डौलदार नंदी. ग्रामदेवतेचे पाच खांब, त्यांना भरजरी वस्त्रे, लखलखीत मुखवटे, जरीपटक्याचे रेशमी निशाण देवराईत आणखी पाच देवळे. पावणाई, गांगो, भीमेश्वर, भावई, राईबाहेर तळ्याच्या काठावर श्री ब्राह्मण, चव्हाट्यावर 'महापुरुष'. या महापुरुषाचा पुराणपुरुष एक जुनाट पिंपळ होता. शेजारी तेवढाच जुना वटवृक्ष. पारंब्यांवर आम्हा पोरासोरांना लोंबकळव-णारा. दहा-पधरा वर्षांपूर्वी त्यातील पिंपळ एका वादळात जमिनीला भिडला त्याचा पार ओकाबोका दिसत होता. पण गावकऱ्यांनी एक अश्वत्थाचे चिमणे रोप तेथे आणून लावले आणि आज ते नव्या नव्हाळीने तरारले आहे चव्हाट्याला त्याची

सोबत घेऊन गेलेले नाथचे अनेक मित्र गावाच्या नव्याने परिचयाचे झाले जयवंत दळवी, माधव गडकरी, प्रा. पुष्पा भावे, अनंत भावे, रत्नाकर मतकरी, रणजित देसाई, माधवी देसाई, किरण ठाकूर, बाळ सामंत, सुभाष भेंडे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, माधव मनोहर, डॉ भा शं. मणगे, ज्ञानेश्वर नाडकर्णी, रवींद्र पिंगे, आत्माराम सावंत, जयवंत साळगावकर, विजया राजाध्यक्ष, मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष, अशोक चिटणीस यासारखे अनेक साहित्यिक करूळला येऊन गेले माझ्या कौलारू घरातला पाहुणचार स्वीकारून गेले. त्या सर्वांना करूळची आठवण आहे गावकरीही अभिमानाने सांगतात, ‘ आमच्या करूळला अधूनमधून छोटे साहित्य संमेलन भरते. ’

या साहित्य संमेलनाचा लाभ करूळच्या ‘ नाथ पै ज्ञानप्रबोधिनीला ’ हमखास मिळतो शिवाय कणकवली, फोंडाघाट या मोठ्या गावानाही. करूळला आलेले साहित्यिक अनायासे कणकवली–फोंड्याला लाभतात माझ्या गावात राजकारणी मंडळी आली नसेल एवढी साहित्यिक मंडळी येऊन गेली आहे.

नारायण तानवड्याच्या किंवा शशी शेट्येच्या दुकानावर एस. टी ची वाट पाहात बसलेले गावकरी सहजपणे आपसात बोलतात. हल्ली मधुभाईबरोबर जयवंत दळवी आणि माधवराव गडकरी इले नाय ! ते इले की गाव कसो भरलेलो दिसता–’

‘ माझे हे स्नेही आले की गाव भरलेला दिसतो ’ असे आपुलकीने गावकऱ्यानी का म्हणावे ? त्याला कारणेही तशीच आहेत. माणूस केवळ नावाने मोठा असून चालत नाही त्याची कृतीही मोठी असली पाहिजे. कोंकणी माणूस वागण्या–बोलण्यात कितीही तिरकस, फटकळ, काटेरी वाटला तरी त्याच्या अंतरातला रसाळपणा, तो जेव्हा एखाद्यावर जिवापासून प्रेम करतो, तेव्हाच कळतो. असे दुर्मिळ प्रेम करण्यापूर्वी कोंकणी माणूस आधी समोरच्याची चांगली पारख करतो. त्याच्या कसोटीला उतरलेला माणूस मग त्याच्या गळ्यातला ताईत बनतो.

करूळला हायस्कूल झाले, पण करजे गावची नदीपलीकडील मुले शाळेचा लाभ घेऊ शकत नव्हती. मधली साकेडीची नदी पावसाळा-उन्हाळा तुडुंब असायची. नदीवर पूल व्हायला हवा होता, गावकरी धडपड करीत होते. पण त्यांचे सरकार-दरबारी ऐकतो कोण ? स्थानिक आमदार-खासदाराना असली कामे कुठे महत्त्वाची वाटतात ? तेव्हा गावकऱ्यानी माधव गडकऱ्यांच्या एका भेटीत आपली अडचण त्याच्यासमोर मांडली. जणू साकडेच घातले. गडकरी एवढे मोठे संपादक, गावकऱ्यांना त्यांचा आधार वाटला. त्या वेळचे मुख्यमंत्री बॅरिस्टर अंतुले यांची व गडकऱ्याची एकदा कुठल्याशा निमित्ताने भेट झाली तेव्हा गडकऱ्यानी त्याच्याकडे विषय काढला. तुमचे सरकार आमच्या साकेडीचा एक मामुली पूल बांधू शकत नाही. शाळेत मुले येणार कशी ?

बॅ. अतुले तात्काळ म्हणाले, ' असे का म्हणता ? तुम्ही म्हणता तो पूल मजूर झाला म्हणून समजा ! ' आणि सरकारी यंत्रणेची चक्रे वेगाने फिरली आणि चार महिन्याच्या आत साकेडी-कारजे नदीवरचा ' बेली ब्रिज ' उभा राहिला ! आमच्या शाळेतल्या विद्यार्थ्यांची, पचक्रोशीतल्या ग्रामस्थाची मोठी सोय झाली ! तीच गोष्ट फोंडाघाट-डामरे या रस्त्याची गडकऱ्यानी आपल्यासोबत आमच्या डामऱ्याच्या भालचद्रभाऊ सावतांना थेट मुख्यमत्री वसंतदादा पाटलापर्यंत नेले आणि तोही रस्ता चमत्कार व्हावा तसा गावकऱ्याच्या पदरात पडला.

माधव गडकऱ्यांना माझी पचक्रोशी ' आमचे गाववाले ' म्हणतात ते त्यानी केलेल्या या कामगिरीमुळे जयवत दळवींनी तर माझ्या भाविक वृत्तीच्या गावाच्या हृदयालाच हात घातला ! आपल्या घराच्या गच्चीवर योगायोगाने वाढलेले ' वट-पिंपळ औदुबरा 'चे दुर्मिळ रोप ( जेथे देवाची, दत्तमहाराजाची वसती असते, असे भाविक मानतात ) आपल्या हाताने आणून त्यानी करूळच्या शाळेस वृक्षदान म्हणून दिले. ( सोबत शाळेला रोख हजार रुपये ! ) हे रोप आम्ही तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी याच्या शुभहस्ते ऐन पानगळीच्या मोसमात म्हणजे १८ जानेवारीला नाथच्या पुण्यतिथीला जमिनीत रोवले ! आता तो देववृक्ष असा देखणा बनला आहे, असा तरारला आहे की पाहात राहावे. देवाचे दुर्मिळ झाड देणाऱ्या दळवींना गावकरी कसे विसरतील ?

आमच्या हायस्कूलचा सुनील गोगटे एसएससीला मराठी विषयात सर्व महाराष्ट्र राज्यात पहिला आला, तेव्हा त्याला कुणीतरी विचारले, ' तुझा भाषाविषय करूळ-सारख्या ठिकाणी इतका चागला कसा बनला ? ' सुनीलने उत्तर दिले, ' आमच्या शाळेत आलेल्या साहित्यिकामुळे माझी वाचनाची, भाषाविषयाची गोडी वाढली !

या गावात लहानाचा मोठा होत मी साहित्यिक झालो, आणि माझे साहित्यिक मत्र गावी येऊ लागले. त्याची नि माझ्या गावाचीही मग मैत्री जुळली.

मधलीवाडी, फोपेवाडी आणि सुतारवाडी अशा तीन चिमुकल्या वाड्यामध्ये गाव विभागलेला आहे. शिवाय हरिजनवाडी. इथले हरिजन पूर्वीचाच हिंदू धर्म जपून आहेत. सगळीकडे बौद्ध धर्माची लाट आली पण इथल्या मोन्या, बहादूर, येसनाक यानी ती जुमानली नाही.

माझ्या ' भाकरी आणि फूल ' कादंबरीमधल्या महारवाड्याची पार्श्वभूमी इथलीच. एका ' भाकरी आणि फूल ' पुरतीच ही गोष्ट मर्यादित राहिलेली नाही. मी लिहायला लागलो आणि या माझ्या गावाने माझ्यावर असख्य विषयांची अक्षरशः उधळण केली ! ' कोंकणी गऽ वस्ती 'पासून ' कातळ 'पर्यंत मी कोंकणावर लिहिले. त्या प्रत्येक पुस्तकामध्ये माझा गाव उमटला आहे. तेथली माणसे, तेथला निसर्ग, तिथल्या चालीरीती हे सारे प्रकट झाले आहे.

आमच्या कर्णिक, खोत घराण्यातीलच कितीतरी व्यक्तिरेखा माझ्या लेखनासाठी मला आयत्या सापडल्या ! खुद्द माझे वडील, माझी आईही तर घरचीच. पण माझे चुलते, माझे भाऊबंद, होनी आजी. शेजारच्या गावातल्या व्यक्ती आणि वल्ली .. माझ्या गावातले-नमुने ! त्यानी घडविलेल्या हकीकती, त्याची चरित्रे, त्यांचे राग आणि लोभ सारे काही मला आयते सापडले.

' कोंकणी ग वस्ती 'मधील सावळाराम म्हाडेश्वर, लहू चांभार, कृष्णा महार, दशावतारी शानू परुळेकर, रोजेलिन किरिस्तावीण, आनदी गावतीण, सावकार गोपाळ भोरपी, पोट्या बामण, शरीराची धनुकली झालेला येशा खोत, बावल्या गुरव, पलटणवाला, शकर आयरे, पेडणेकरीण अशी कितीतरी पात्रे.

तळ्यावरील पुराणा आंबा, माळावरचा सावीण, मार्गावरील वडाची झाडे, हुमरटच्या बळणातील आवळी, फोंड्याला जाताना लागणारी देवाची पाच झाडे. ही झाड-झाडावळ मी माणसासारखी न्याहाळली.

जुन्या नळ्यांच्या मराठी शाळेत शिकवून गेलेले मोडकमास्तर, राणेमास्तर, पाटीलमास्तर मला आजही विसरता येत नाहीत. तिवऱ्याचे दर्भासारखे वाळलेले बाबा भटजी आजही खरखरीत स्वरात मत्र म्हणताना मला दिसतात. गावातली नाटकांत, दशावतारात, भजनी मडळात रमणारी मडळी तर माझ्या पुस्तकातून नित्य वावरतात. गावातले हेवेदावे, भाडणे, भानगडी यातूनही इरसाल नमुने मला मिळतात. तर ' कृपाछत्र ' कथेतील मोराचे पिल्लू पाळणारा आबा सुतार या गावच्या तळ्याच्या बाधावर मला भेटतो. जोगशेट तानवड्याचे चहाचे हॉटेल म्हणजे कितीतरी ' गजाली 'चे जन्मस्थान ! माझ्या ' गावाकडच्या गजाली इथेच जन्मल्या. ' तोरण ' कथासंग्रहातले शेतकरी सारे माझ्या गावातले आणि पचक्रोशीतले

माझ्या करूळ गावाएवढीच इथली पचक्रोशीही मला सतत काही ना काही देत असते. करूळ गावाभोवती पाच गावाची माडावळ आहे. डामरे, तिवरे, कोंडये, साकेडी आणि हुमरट या पाच गावांच्या हद्दी एकमेकाना भिडलेल्या. करूळच्या रामेश्वराचे आणि डामऱ्याच्या देवी अनुभवानीचे नाते बहीण-भावाचे ! दर तीन वर्षांनी भाऊ बहिणीला माघारपणाला घेऊन येतो बहीण-भाऊ गळयात गळा घालून रडतात हा सोहळा पाहताना भाविकरीही गहिंवरतात...

या पाच-सहा खेड्यांची फार एकजूट आहे. जणू एकाच झाडाला सहा फाद्या फुटाव्या तशी ही गावे एकमुखाने बोलतात, एकमुखाने चालतात. गावाचा सगळा गाडा एका ग्रामदेवतेच्या नावाने चालत असतो. एकविसाव्या शतकाच्या उबरठ्यावर असलेल्या जगातील ही माझी पचक्रोशी गावचे रामेश्वर, गांगो, अनुभवानी आणि माऊली यांच्या कौलाशिवाय कोणतीही गोष्ट करत नाही ! शेतीच्या कामासाठीही

गावच्या देवाचा कौल प्रसाद आणि घरात आजारीपणा आला तरी प्रथम गावच्या देवळात जाऊन गाऱ्हाणे करायचे. लग्नाची सोयरीकसुद्धा देवाला सांगून करायची नि मुंबईवाल्या चाकरमान्याची 'रखवाली'सुद्धा त्यालाच साकडे घालून निश्चित राहायचे! कोंकणात सर्वच गावात गावगाडा हा ग्रामदेवतेच्या कृपाकटाक्षाने चालतो, पण माझ्या पंचक्रोशीमध्ये त्याला अधिकच महत्त्व आहे. ही श्रद्धा असो वा अंधश्रद्धा; पण गावगाड्याच्या वंगणासारखा तिचा उपयोग होतो. 'रामेश्वराच्या घंटेखाली उभा राहून सत्य बोल!' असे आवाहन करताच खोटे बोलण्याची कुणाची हिंमत आजवर झालेली नाही. आणि 'रामेश्वरा, तूच बघून घे' म्हटल्यानंतर गावातल्या कुणा पाप्यापातक्याच्या काळजाचा ठोका चुकल्यावाचून राहात नाही.

गाव हळूहळू पण लक्षात येईल अशा गतीने बदलतो आहे. एकेकाळी माझा गाव फार गरीब होता. श्रीमंत म्हणता येतील अशी खोत मंडळीही गरीबच होती. त्यांच्यापाशी पूर्वापार चालत असलेली खोती व जमिनी होत्या. जमिनी कुळे करीत आणि खंड खोतांना मिळे. पण या गावच्या खोतांनी अमलबजावणी कधी केली नाही, की कसला अधिकार गाजवला नाही. गाव म्हणजे देवाची लेकरे आहेत आणि आपण त्याचे विश्वस्त आहोत, हीच अण्णा कर्णिकांपासून मंगेशदादापर्यंत आणि आणि मनोहर तात्यापर्यंत भावना राहिली. काही खोत खाऊनपिऊन सुखी होते एवढेच. बाकीचे गरीबच होते. मग कूळकायदा आला. खोती लयाला गेली. जमिनी कुळांच्या मालकीच्या झाल्या. कुळे आता स्वतःच्या जमिनी कसू लागली. त्यांच्या नांगरांना नवे बळ चढले. त्यांना मालकीहक्काचे सातबाराच्या उताऱ्याचे अधिष्ठान होते. मग खोत मुंबई–पुण्याला, कणकवली–कुडाळला नोकऱ्या शोधू लागले. गावकऱ्यांचीही मुले शिकून हुशार होऊ लागली. त्यांचा पैसा गावी येऊ लागला. हळूहळू गाव बाराही महिने पेजपाणी सुखाने खाऊ लागला. उतला नाही, मातला नाही. त्याची रामेश्वरावरची, महापुरुषावरची श्रद्धा अढळ राहिली. आणि एके दिवशी गावात एक मोठा कांच कारखाना उभा राहिला. खरे तर त्याची मुहूर्तमेढ रोवायला मीच कारणीभूत होतो. मला वाटले होते, गावकऱ्यांच्या रोजदारीचा प्रश्न सुटला की सगळे नंदनवन निर्माण होईल. पण कारखाना झाला आणि गावचे रूपच बदलले!

गावातील सर्व गरजू तरुणांना, बायकांना नोकऱ्या मिळाल्या. पंचक्रोशीमध्येही कुणी बेकार राहिले नाही. कुणाच्या तरी घरची मजुरीची कामे करणारे लोक क्वॉलिटी कंट्रोल, प्रॉडक्शन, बोनस, डिपार्टमेंट, फिडर, बॅच हाऊस, वर्कशॉप, मेन्टेनन्स, पहिली शिफ्ट, लास्ट शिफ्ट असे शब्द सहज उच्चारू लागले. गावात खूप पैसे येऊ लागले. कारखान्यातली कामे हुशारीने करू लागले. खासगी खाणावळी झाल्या. दुकानाचा उदीम वाढला. रिकामी घरे भाड्याला लागली. दरमहा दोन लाखांचे

किमान पगारवाढप होऊ लागले. त्यातील तीस-चाळीस हज्जार एका करूळ गावच्या पंचक्रोशीमध्ये बिनबोभाट येऊ लागले. मुंबईवाल्या चा[redacted]मान्यांवरील भार कमी झाला.

पण कारखान्याने आपल्याबरोबर आपली नवी हवासुद्धा आणली बारा गावचे पाणी प्यालेले कामगार कारखान्यात आले. बिहार, उत्तर प्रदेशापासून तामीळनाडू-पर्यंतचा कामगार, सुपरवायझर करूळ गावी जमला त्यांची युनियन, त्यांचे हेवेदावे, त्यांची भांडणे, त्यांची व्यसने हे सारे गावात नव्याने आले. मटका आणि दारू गावाला दुरून माहीत होती. आता खुद्द कारखान्याच्या परिसरात त्यांचा प्रादुर्भाव झाला सात तारखेला पगार झाला की, मुंबईला कामगारवस्तीत दिसते तसे दृश्य दिसू लागले दारू पिऊन केलेल्या मारामाऱ्या, बायका–मुलींवरून होणारी भांडणे, सारे सारे आले बदफैली व्यवहार.

पण एक गोष्ट चांगली आहे. कारखान्याच्या परिसरातल्या गैरगोष्टी फक्त तेथवरच राहिल्या आहेत. मैलभर अंतरावरचा माझा गाव अद्यापि त्या वातावरणाला सर्वस्वी बळी पडलेला नाही. कारखान्यातलं प्रदूषित वातावरण गावाबाहेरच राहावे, यासाठी सरपंचाची नित्य धडपड चालू आहे, गावात सोसायटी, नळयोजना, गोबर गॅस, सौर विद्युत योजना, डेअरी, सारे काही या नव्या तडफदार सरपंचाने आणले आहे. गाव आपला तोल सांभाळून आहे.

मला या माझ्या गावाने खूप दिले. अनुभव दिले शिकवणूक दिली. धडे दिले. माणसे दाखवली. माणसातला देव आणि सैतान दाखवले उपकार फेडावे हेही शिकवले उपकार विसरले जातात हेही दाखवले देवावरचा विश्वास उडेल, पण माणसावरचा वाढेल अशी उदाहरणे मी इथे पाहिली. अंतरातली श्रद्धा बळकट होईल असे अनुभव घेतले.

हा माझा वेडावाकडा तरीही मला सुंदर वाटणारा गाव. माझे चिऱ्याचे, मातीचे, कौलारू घर– माझे झाडाझुडपांनी वेढलेले अंगण, तेथील पक्ष्यांची गाणी माझ्या आई-वडिलांनी लावलेली आणि मी वाढवलेली झाडे आणि माझ्यावर प्रेम करणारी येथील माणसे —

माझी नाळ या गावात, याच घराच्या एका कोपऱ्यात पुरलेली आहे कितीही जन्म आले गेले तरी हा माझा गावच पुन्हा पुन्हा माझ्या वाट्याला यावा, हीच माझी उत्कट इच्छा आहे.

# सह्याद्रीच्या पायथ्याचा फोंडा घाट

२. मालवणी मुलुखात खुष्कीच्या मार्गाने घाटावरून किंवा मुंबई–गोवा मार्गे राजापूर–खारेपाटणावरून तसेच समुद्रमार्गे विजयदुर्ग किंवा देवगड या बंदरातून प्रवेश करता येतो. उरलेली आचरा, मालवण नि वेंगुर्ला ही बंदरे आता नावापुरतीच उरली आहेत. या बंदरात गेली कित्येक वर्षे बोट उभी रहात नाही.

घाटावरून येताना दोन महत्त्वाचे नि थेट शिवाजीच्या काळाच्या आधीपासून कोकणी–घाटी उतारूनी रहदारी केलेले घाट पार करावे लागतात. त्यातला एक फोंडा घाट, दुसरा आंबोली घाट. फोंडा घाट हा मालवणी मुलखाला कोल्हापूर–निपाणी या घाटावरील शहरांना जोडतो नि आंबोली बेळगावला. अगदी अलीकडे बावडा घाट सुद्धा सुरू झाला आहे; पण तिकडून यायचे झाले तरी फोंडा चुकत नाही.

कोल्हापूरला एसटीत बसलो की अडीचतीन तासात राधानगरीचा तलाव नि दाजीपूरचे गवा अभयारण्य मागे टाकून आपण फोंडा घाटाच्या खिंडीत येऊन उभे राहतो नि समोर एकादा अतिभव्य चित्रपट उलगडावा तसे तळकोंकण पसरलेले दिसू लागते. दक्षिणोत्तर ऐसपैस पसरलेला नि समोर अरबी समुद्राला भिडलेला हा डोळ्यात न मावणारा प्रदेश म्हणजेच दरोबस्त मालवणी मुलूख. फोंडा घाटाच्या माथ्यावरून जो मुलूख नजरेत भरतो तोच मालवणी मुलूख असेही कुणी म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण या दोन अडीच हजार फूट उंचीच्या सह्याद्रीच्या शिखरावरून आपणास उजवीकडे थेट खारेपाटणपर्यंत नजर टाकता येते नि डावीकडे कुडाळ-वेंगुर्ल्याकडील धूसर कोंकणपट्टी आपण साध्या डोळ्यांनी पाहू शकतो. कणकवलीच्या पूर्वेकडील भिरवंड्याचे शुभ्र चर्च नि नुकतेच बांधलेले श्रीरामेश्वर मंदिरही हवामान स्वच्छ असले तर तिथून दिसू शकते, पण त्यातूनही नजरेत भरतो तो पश्चिमेकडील अथांग अरबी समुद्र! मार्च–एप्रिल महिन्याचे निरभ्र उन्हाचे दिवस असावेत नि दाजीपूरच्या खिंडीतल्या या कड्याच्या टोकांवरून पाहावे— पश्चिम क्षितिजाच्या कडेला भिडलेली समुद्ररेखा उन्हात झगमगताना दिसते! सह्याद्रीच्या या शिखरावरून सरळ रेषेने मधील अंतर निदान पंचवीसतीस मैलांचे तरी असावे! पण दरम्यानची निरुंद

कोंकणपट्टी ओलांडून आपली नजर देवगड–आचऱ्याचा तो समुद्र स्पष्टपणे पाहू शकते. मी अनेकदा या ठिकाणी उभा राहून समुद्रदर्शनाची शोभा न्याहाळली आहे. असेच समुद्रदर्शन आंबोली घाटांतूनही घडते. तिथून वेंगुर्ले–निवती बंदरापल्याडचा समुद्र पाहता येतो आकाशात ढग असले तर त्याची सावली खालच्या तळकोंकणावरून सरकतानाही दिसते जरा उजवीकडे पाहिले तर लोन्याचे नवीन धरण दृष्टीस पडते

खरोखर, दाजीपूर–फोंडा घाटच्या पूर्वेकडील माथा म्हणजे एक रमणीय पर्यटन स्थळ होऊ शकेल. इथून दिसणारे ' उगवाई 'चे शिखर, थंडगार हवा, दाट झाडी, हाकेच्या अंतरावरील गव्यांचे अभयारण्य, तेथील गर्द झाडीतून हळूच बाहेर येऊन चरणारे हत्तीसारख्या रानरेड्यांचे–गव्यांचे कळप–भेकरी, रानडुकरे नि सांबर क्वचित् नजरेला पडणारे वाघ नि बिबळे . राधानगरी तलावाच्या कॅचमेंट एरियातील ' टेल वॉटर्स 'चे बारमाही डोह नि त्यात पडलेली सह्याद्रीच्या लहान-मोठ्या शिखरांची प्रतिबिंबे.. किती म्हणून निसर्गसौंदर्य पाहावे ?

या निवांत ठिकाणी ' हॉलिडे कॅंप ' झाला तर हौशी पर्यटकांची नुसती रीघ लागेल, पण, आपल्याकडे ' योजकस्तत्र दुर्लभ ' हेच खरे !

फोंडाघाटातील नऊ मैलाची वेडीवाकडी वळणे पार करीत खाली उतरताना, माथ्यावर सह्याद्रीचे कडे नि त्यावरील कारवीचे जंगल सारखे सोबत करीत असते. घाट ब्रिटिशांनी बांधून काढला. पण त्याआधी शिवाजीच्या नि त्याही आधीच्या मुसलमानी राजवटीत तो गुरा-माणसांच्या वर्दळीने गजबजलेला असे. घाटी भाषेत ' फोंडा ' म्हणजे बैराण. या घाटात पाणी नाही की वस्तीलायक जागा नाही. बेलाग कडे नि खुरटे कारवीचे रान. म्हणून त्याला ' फोंडा ' म्हणू लागले. घाटातून रहदारी व्हायची ती प्रायः घाटवळांची. ते बैलाच्या पाठीवर गोणी घालून कोल्हापूर–निपाणीहून कोंकणात उतरायचे. गोणीतून मिरची, तंबाखू, कांदे, गूळ ढेपी, कडधान्ये असा घाटी माल. तो खाली कोंकणात विकायचा नि जाताना त्याच गोणी मिठाने भरून न्यायच्या. हा उदीमी शिरस्ता. मग बैलगाड्या आल्या. त्यांचे घुंगूर घाटातल्या वळणातून वाजू लागले. गाडीवानांनी म्हटलेले अभंग सह्याद्रीचे कडे ऐकू लागले. मग मोटारी आल्या नि फोंडा घाट नावापुरताच फोंडा राहिला. मोटारींचे कर्णे नि इंजिनांची घरघर यांचा गोंगाट तिथे होऊ लागला

पूर्वी फोंडा घाट कोंकणातून वर चढल्यानंतर लगेच कोल्हापूरचा संस्थानी मुलूख लागे. ब्रिटिश हद्दीतून संस्थानी हद्दीत जायचे, म्हणजे एका देशातून परदेशात जावे असेच सरकारी अंमलदार मानीत. सीमा ओलांडताना ' दस्तुरी ' चे नाके असायचे. तिथे सर्व्हिस मोटारी थांबायच्या मग संस्थानी हद्दीतल्या दुसऱ्या मोटारीतून प्रवास सुरू होई. सामानाची अदलाबदल होई — हा प्रकार थेट चाळीस पंचेचाळीस साला-पर्यंत चालू होता. मग कोंकणातील सर्व्हिस गाड्या ' दस्तुरी ' ला न थांबता थेट

कोल्हापूरला जाऊ लागल्या. त्याकाळी फोंडाघाटाच्या टोकावरील दाजीपूरला दस्तुरीच म्हणत

या दस्तुरीच्या आजूबाजूला राखीव जगल असे. त्या काळी सह्याद्रीची शिखरे आतासारखी उघडी बोडकी नव्हती. तिथे गर्द झाडी असे. निवळाचे पाणी, काट्याचा डग. अशी शिकारीचे ठिकाणे.

तळ कोंकण प्रांतात देवांच्या नावाने शिकार करण्याचा प्रघात प्राचीन काळापासून चालत आलेला. ढोल ताशे घेऊन सारे गावकरी रानडुकराच्या शिकारीला बाहेर पडतात नि ग्रामदेवतेच्या नावाने ' पारध ' करतात ! या देवाच्या वार्षिक पारधीसाठी कोंकणातील कित्येक गावचे गावकरी याच घाटातल्या रानात किंवा डंगात शिरतात नि मला मोठा ' बारकीचा ' ( म्हणजे ज्याला न्यायला बारा गडी लागतात असा ! ) रानडुकर वा मेरू ( अक्कडबाज शिंगाचा सांबर ) मारून मजबूत बाशावर त्याला उलटा टांगून वाजत गाजत घेऊन जातात ! फोंडा घाटातले जगल म्हणजे पूर्वीच्या काळी अशा देव पारधीसाठी सोन्यासारखे ठिकाण—

आता चोरटी जगलतोड एवढी सुरू झाली आहे की, तेथील रानजनावरे सह्याद्री पार करून पलीकडे अभयारण्यात जाऊन दडून बसू लागली आहेत नि साधी पिसय सुद्धा नजरेला पडणे मुश्कील झाले आहे; शिवाय वन्यप्राणी सरक्षणाचा कायदाही आहे. या घाटात अलीकडे शिकारीचा मांड कोणी मांडीत नाही.

फोंडा घाट उतरून आपण खाली आलो की लगेच फोंड्याची बाजारपेठ लागते. त्याआधी वर ' उगवाई ' च्या शिखरापाशी उगम पावलेली छोटी झरी आता ' उगवाई ' नदी बनून आपल्या स्वागताला येते. कवी वसत सावंत हे फोंड्याचेच. त्यानी आपल्या कवितासंग्रहाचे नावच ठेवले आहे ' उगवाई. ' ' उगवाई ' च्या कळसाला प्रातःकाळी फुटणाऱ्या लालभडक सूर्यबिंबाचे मोठे हृद्य दर्शन वसंत सावतानी या आपल्या सुंदर कवितेत घडवले आहे. याच उगवाई नदीवरचा चिमुकला पूल ओलांडला, की उजवीकडे थोडा आत झाडापेडात वसलेला इग्रजाच्या काळातला पुरातन बैठा डाकबगला. साधासुधा पण प्रशस्त आणि घरदाज. प्रथम तो नजरेत भरतच नाही प्रयत्नाने शोधून काढावा लागतो काही वर्षांपूर्वी मुबईचे माझे काही साहित्यिक मित्र माझ्या गावी करूळला आले होते. जयवंत दळवी, बाळ सामंत, माधव गडकरी, सुभाष भेंडे नि ज्ञानेश्वर नाडकर्णी. त्यांची राहायची व्यवस्था इथे केली होती या डाकबगल्यावर ही सारी पाहुणे मडळी एवढी खूष झाली की पुसू नये.

फोंड्याच्या बाजारपेठेची ख्याती सोमवारच्या आठवडा बाजारासाठी तळकोंकणात हा बाजार महत्त्वाचा रविवारी सायकाळपासून घाटावरचे विड्याच्या पानाचे असंख्य ट्रक्स तिथे पानांचे करडे घेऊन येतात नि फोंड्याच्या या पानबाजारातून उभ्या

मालवणी मुलखाला खायच्या पानाचा पुरवठा होतो. पानबाजाराबरोबर ही पेठ गुराच्या बाजारासाठी प्रसिद्ध. बरघाटाची मुरगूड राधानगरी, सोळांकुर भागातील जातिवंत जनावरे कोंकणच्या शेतकऱ्याच्या खरेदीसाठी उभी असतात ती फोंड्याच्या बाजारात–मिरगाला घाटी धनगर घोंगड्या–कांबळ्याचा ढीग याच बाजारपेठेत माडतात. घाट नि कोंकण याच्या देवाण–घेवाणीचा सुरेख मेळ म्हणजे फोंड्याचा बाजार पण मला फोंडा बाजारपेठ अधिक आवडते ती तिथल्या बाजी धनगरासाठी.

फोंडाघाटचा मध सुप्रसिद्ध. घाटातल्या कारवीचा कडवट उग्र वास असलेला हा मध खरोखरच विलक्षण स्वादिष्ट असतो. माझ्यासाठी या मधाचे शिसे–म्हणजे काचेची आरली बाटली–घेऊन या बाजारात बाजी धनगर माझी वाट बघत असायचा—काळ्याभोर शिसवी वर्णाचा नि सागवानी अंगकाठीचा हा उंचापुरा धनगर, पिकलेले म्हातारपण आकाशाला टांगून सह्याद्रीचे कडे पालथे घालीत अस्सल मध आपल्या बुधल्यात गोळा करतो नि नेमका सोमवारचा बाजार पकडून फोंड्यात उतरतो. माझी–त्याची ओळख फार जुनी. दरदामाची घासाघीस न करता तो म्हणेल तेवढी रक्कम निमूटपणे काढून देणारा मुंबैवाला 'साहेब' म्हणून तो मला ओळखतो. कमरेला चांदीचा वळकट करगोटा नि लंगोटीबाहेर लप लप करणारे कुल्ले दाखवीत तो खांद्यावरची घोंगडी नि हातातली उंच काठी सावरीत उभी बाजारपेठ धुंडाळतो. मी दिसलो नाही की निराशपणे जवळचा मध कुणाला तरी विकून टाकतो

कधीतरी चुकून येणारा मी त्याला दर आठवड्याला तेथे कसा भेटणार ? पण फोंड्यातले माझे मित्र मला सांगतात, 'बाजी धनगर तुमची नेहमी चौकशी करतो, मोटारवाले करूळकरसाहेब कधी येणार म्हणून—'

फोंड्याची बाजारपेठ सोडून आपण कणकवलीच्या दिशेने निघालो की दोन मैलावर एक तिठा लागतो. इथून एक रस्ता वाघेरी–तोंडवलीमार्गे नादगावला जाऊन मुंबई–गोवा रस्त्याला भिडतो नि तिथून थेट विजयदुर्ग-देवगड बंदरांना पोहचणारे फाटे त्याला फुटतात. वाटेत तोंडवली गावी रस्त्यावर एक नितांत दत्तगुरूचे स्थान आहे. पण त्या देवस्थानातील दत्तमहाराजापेक्षा मला आवडतो तो तिथला बालकवींच्याच कवितेत भेटणारा, 'पाय सोडुनी जळात बसलेला' पुरातन औदुंबर नि त्याच्या पायथ्याच्या 'जळावर गोड काळिमा' पसरलेला चिमुकला डोह !

या एका दृश्यासाठी तोंडवली–नादगाव रस्त्याने जाण्याचा मोह मला आवरत नाही.

लोरे आणि कासार्डे ही दोन गावे इथून जवळ. दोन्ही गावे आपापल्या खास कारणासाठी माझ्या स्मरणात राहिलेली. 'लोरे गावचा चाळा' हा उभ्या कोंकण-पट्टीत प्रसिद्ध. देवचारासारखे हे भीतिदायक, उग्र देवस्थान. कोपले तर ज्वाला-

मुखीचा अवतार धारण करते, असे भाविकजन म्हणतात ! या 'चाळ्या' ला पूर्वी जिवंत रेडा बळी द्यायचे ! रेडा बळी देण्याचा इथला हा प्रकार चाळीस वर्षांपूर्वी मी प्रत्यक्ष नजरेने पाहिलेला. यापुढे लोरेगाव म्हटले की मला तेथील देवस्थानापेक्षा तेथे पाहिलेली एका गरीब, मुक्या जनावराची, पाढऱ्या चाफ्याच्या नि लाल जास्वंदीच्या फुलांच्या माळा घालून, ढोल–ताशाच्या गजरात वाडीवाडीवरून निघालेली ती मिरवणूक नजरेसमोर दिसू लागते. मध्यरात्री तेथील देवस्थानाच्या 'परळ' या सखलवट भागात, पेटलेल्या पलित्याच्या भीषण उजेडात आजूबाजूला जमलेल्या शेकडो माणसाकडे केविलवाण्या मुद्रेने पहात ओरडणाऱ्या त्या बांधलेल्या रेड्याची मरण–नजर मला आठवते नि मग ढोलाच्या गजरात एकच घाव घालून त्याचे रक्ताच्या थारोळ्यात पडलेले मुडके दिसू लागते नि आजही अंगावर सर्रकन शहारा येतो !

लोऱ्याचा माझा मॅट्रिकमधला वर्गमित्र श्रीधर बापू तोरसकर याने मला हा प्रकार पाहायला मुद्दाम आपल्या गावी नेले होते.

अलीकडेच ही प्रथा कायद्यानेच बंद झाली असे कळते. आता नारळ बळी देतात !

लोऱ्याच्या जरा पलिकडे कासार्डे इनामदार पित्रे यांचा हा गाव. इथून बावडा जहागीर जवळ. शिवकालीन सरदार नि लष्कर यांची रहदारी या भूमीवर झालेली. मला मात्र आठवतात त्या तेथील सिलिका बाळूच्या खोल खोल खाणी. आणि त्या खाणीत पाणी साठून बनलेले नि गुलाबी, शुभ्र सिलिकाच्या ढिगांचे बिलोरी प्रतिबिंब आरशासारखे दाखवणारे अतिशय नयनरम्य डोह !

हे रमणीय सौंदर्य पाहण्यासाठी तरी एकदा कासार्ड्याच्या या सिलिका खाणींना पाय लावलेच पाहिजेत. हां, मात्र वर्षाच्या बाराही महिन्यांत तुम्हाला ही प्रतिबिंबाची गुलाबी आरास दिसायची नाही. खाणी दिवाळीनतर सुरू होतात, त्या दरम्यान पावसाळ्यात तुडुंब झालेले डोह पाहण्यासाठी नोव्हेंबर–डिसेंबरातच तिथे जायला हवे. एकदा का खाणीतले पाणी उपसून सिलिका वर येऊ लागली की फक्त शुभ्र पिठाचे शुष्क डोंगर तेवढे पहावे ! अर्थात त्याचेही एक आगळे सौंदर्य आहेच. विशेषत पौर्णिमेच्या रात्री ते डोळ्यात साठवावे !

लोरे–कासार्डे फोंडा हा भाग म्हणजे वलाटपट्टी कोंकणात समुद्राकडील भाग हा 'खलाटी' चा समुद्रकिनारा सोडून पंधरावीस मैल पूर्वेला गेले की लागते ती वलाटपट्टी. ती थेट सह्याद्रीला भिडते. एवढ्याशा पचवीसतीस मैल रुंदीच्या या मालवणी मुलखातील या खलाटी–वलाटीमध्ये किती फरक ! खाणे–पिणे, सवयी, पीक–पिकावळी नि निसर्गसुद्धा एकमेकापासून किती भिन्न ! 'वलाटी' च्या वरकस मातीत कुळीथ, नाचणी, वरी नि भात ही पिके निघतील. क्वचित उन्हाळी भात 'वायगण' उपजेल, काजूच्या झाडावळी आहेत, पण आंबे बहुतेक रायवळच.

माड–पोफळी औषधालाच सापडतील. बेढले माड हवे तेवढे. ते बाझोटे, फक्त शोभेच्या शानळ्यासाठी उपयोगाचे. वलाटीला समुद्राची ताजी मासळी दुर्मिळ; म्हणून इथल्या बायका गोड्या पाण्यातली ' साची ' मासळी राखतात. मळवे, खरचे, काडय, शेतके, ठिगूर ही नदीतली रुचकर मासळी वलाटीचा माणूस आवडीने खाईल. जोडीला सुकी मासळी. पावसाळ्यात इतर मालाबरोबर तिचीही बेगमी तो करील. याच्या जेवणात मासळीपेक्षा कोंबडीची सागोती अधिक. ' वडे–सागोती ' चा मान खलाटी-पेक्षा वलाटीला अधिक. इथल्या जेवणात सोलकढी आढळेलच असे नाही; कालवणातही खोबरे फार आढळणार नाही. वलाटीचा शेतकरी भात–कुळथाची पिठी नि तोंडी लावायला सुका बागडा किंवा दोडी मिळाल्यावर तृप्त असतो. तो नाचणीची भाकरी ' न्हेरीला ' खाणार

' खलाटी 'ला सगळाच प्रकार वेगळा खलाटपट्टी तशी फार चोखंदळ. खाण्या-पिण्यात तशी बोलण्याचालण्यात. समुद्रकिनाऱ्याचे नि फडफडणाऱ्या रापणीतल्या ताज्या मासळीचे सान्निध्य, माड–पोफळीची, रातांब्याची, कलमी आंब्याची सोबत. समुद्राची कानावर सतत येणारी ' गाज 'नि भंडाऱ्याच्या हातची नुकतीच माडावरून उतरलेली ' माडी ' त्याच्या जेवणात भाताचा ढीग नि मासळीचे झणझणीत आंबट तिखट तिरफळे, खोबरे घातलेले कालवण. खोबरेल तेलात तळलेल्या ताज्या बांग-ड्याचा किंवा इसवणीचा तुकडा. शेवटी सोलकढी. तो ' साच्या ' मासळीला चुकूनसुद्धा हात लावणार नाही खलाटकराच्या बोलण्यातही थोडा अधिक गोडवा. नाकातले हेल काढून बोललेले शब्द. वलाटीच्या ' हकडे थकडे ' ऐवजी ' हयसर–थयसर ' आणि ' मी ' ऐवजी ' मिया ! ' वलाटीचा माणूस भजनात रमेल तसाच खलाटीचाही; पण त्याला नाटकाच्या पदाची नि पेटीच्या सुरांची अधिक आवड ! भरीला पार्सेकर, चेंदवणकर, मोचेमाडकरांचे दशावतार

खलाटीचा माणूस नाचणीची भाकरी सुक्या ' गोलम्या बरोबर जन्मात खाणार नाही. त्याला तांदळाची पांढरी शुभ्र, लुसलुशीत भाकरीच हवी नि बरोबर वालीची नाहीतर लाल माठाची भाजी. कोवळ्या वाली नि वायगण, ही खलाटीचीच मिरास. खलाटीच्या बायका माथ्यावर सुरंगी-अबोलीचा वळेसर माळल्याशिवाय बाहेर पडणार नाहीत कसले ना कसले तरी फूल हे तिथल्या बायकांना केसांत हवेच !

त्यामानाने वलाटी रुक्ष, खेडवळ. आपले सागवन, ऐन, नाणे नि किंदळी सांभाळ-णारी.. वरकस भरडी जमिनीत उखळ दुडा, तास या नांगरटी करीत भात–नाचणीची फक्त पावसाळी पिके घेणारी, दारातले फणस नि रायवळ आंबे एवढ्याच फळांची श्रीमंती मिरवणारी वलाटीच्या बायकाना फुलाचा एकूण सोस कमीच. खारेपाटणपासून खाली दक्षिणेकडे जाताना मुंबई–गोवा राजरस्त्याच्या पूर्वेकडील वरकस, डोंगराळ पट्टी ही वलाटपट्टी म्हणता येईल. मालवणी मुलखातल्या खाड्यांनी

जिथे खाऱ्या पाण्याची चूळ फेकून गोडे पाणी तोंडात घेतले, तिथपासून पूर्वेकडील वलाटी सुरू झाली, असेही म्हटले तरी चालेल.

कासार्डी–लोरे इथून पलिकडे नवा वैभववाडी तालुका–पूर्वी हा भाग कोल्हापूर जिल्ह्याला जोडलेला होता. पण सर्व दृष्टींनी त्यांचे नाते मालवणी मुलुखाशी. बोलीभाषा, खाणे–पिणे, पाहुणे-रावळे सगळे मालवणी मुलुखातीलच इथून जरा पुढे घाट ओलांडून गेले की गगनगडावर संत गगनगिरी महाराजांचे पुण्यप्रद वास्तव्य असते; पण तो भाग घाटावरचा.

लोऱ्याहून येताना एक वहाळ लागतो. त्याचे नाव 'मोना व्हाळ!' मोना म्हणजे मुका. या वहाळाला, पावसाळ्यात जोराचा हौर येतो, एरवी कोंकणातील प्रत्येक नदी–व्हाळाचा हौरात आरडाओरडाच अधिक! पाण्याला खळखळाटच फार; पण या वहाळाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याला कितीही मोठा हौर येवो, त्याचे पाणी वाजत नाही, की गाजत नाही. असा लहान मुलाच्या स्वभावाचा ओढा मी तरी कोंकणात पाहिलेला नाही

लोऱ्याहून पुन्हा कणकवलीच्या रस्त्याला लागले की डामरे गावचे विस्तीर्ण 'भाकर' लागते. 'भाकर' म्हणजे विरळ झुडपानी नि दगडधोंड्यानी भरलेला विस्तीर्ण माळ. पण भाकरात मध्येच एके ठिकाणी लहानशी पण घनगर्द राई उभी असलेली दिसते. हे डामऱ्याचे 'पाच झाडाचे' देवस्थान! शेकडो वर्षांपासून रस्त्याच्या कडेला उभी असलेली ही प्रचंड हेळ्याची झाडे आता देवस्वरूप बनली आहेत. तशाच सावंत-वाडीहून बांद्याला लागतात त्या 'सात जांभळी!' झाडांना देवाचे रूप देण्याची प्रथा या मालवणी मुलुखातच असावी इथल्या जागृत देवस्थानाचा दाखला पटलेल्या भाविकांनी या हेळ्याच्या झाडांना पाळणे, घंटा, लाकडी हात–पाय लटकवलेले आहेत इथून जाणारी येणारी प्रत्येक मोटारगाडी आणि लॉरी न चुकता इथे पाचदहा पैशाचे नाणे टाकणार, नारळ फोडणार नि उदबत्ती लावणार.

ही 'पाच झाडे' मागे टाकून आपण जरा पुढे गेलो की माझा गाव—

मु. पो. करूळ—

करूळ गावच्या माळावर उभे राहिले की 'नाथ पै वनराई'च्या क्षेत्रावरून जरा पूर्वेकडे नजर टाकावी, सह्याद्रीचे निळे रूप असे काही दृष्टीत भरते की तिथून डोळे बाजूला करू नयेत. चित्रात मांडून ठेवावा, तसा अवघा सह्याद्री इथून दिसतो. उत्तरेला गगनबावडा, साळवा इथल्या पर्वतराजीपासून दक्षिणेला थेट घोटगे घाटा-पर्यंतचा आकाशाला भिडलेला सह्याद्रीचा विस्तीर्ण पट्टा निळ्या रंगात नखशिखान्त माखून इथे तुमच्या पुढ्यात उभा राहतो. रात्रीच्या वेळी फोंडाघाटातून उतरणाऱ्या मोटारींचे झगमगीत दिवे पाहणे ही तर मोठीच मौज!

या माळरानावरून थोडे पुढे वाळक्याची घाटी उतरून गेले की आंबी फोंड्यात

भेटलेली ' उगवाई ' नदी इथे खोल दऱ्यातून वहात नागमोडी वळणे घेत पुढे सरकताना दिसते. साकेडी, नागवे, जानवली करीत ती पुढे कणकवलीपर्यंत जाते नि पलिकडे वरवड्याजवळ गड नदीला मिळते. या नदीवरील साकवावरून पुढे गेले की कर्जे–नि त्याच अर्ध्याकिच्च्या रस्त्याने पुढे गेले की हरकूळ, नाटळ, भिरवंडे ही डोंगरपट्ट्यातील अस्सल बलाटीची गावे ! या गावातून असंख्य मराठा तरुण ब्रिटिशांच्या काळापासून सैन्यात गेले नि त्यानी मर्दुमकी गाजविली. घराघरातून पलटणवाले आढळतील. अलिकडे पोलिसातही बरीच मंडळी शिरली आहे. जात्याच शूर माणसाची ही गावे बंदुकीला परवाना असो वा नसो, ती काडतुशीची असो वा तिची नळी गावच्या सुताराने ठोकलेली असो, ती खांद्यावर टाकून सह्याद्रीच्या मोवळात' एकेकट्याने जाऊन रानडुक्कर मारणारे बरकदाज इथे एके काळी फार होऊन गेले. रानडुकराची सागोती, कांदाखोबरे न घालता नुसत्या गरम मसाल्यावर कशी स्वादिष्ट राधावी, हे इकडच्या पट्ट्यातल्या सुगरिणींना उत्तम ठाऊक असते मुंबईवाल्या चाकरमान्यासाठी किंवा पलटणवाल्यासाठी धुरी देऊन ही सागोती सहासहा महिने कशी टिकवून ठेवायची, याचेही एक अद्‌भुत शास्त्र इकडच्या रांधपिणींना अवगत असते

[illegible]मा असला सागोती चाखली आहे. टिन्ड कॅन्ड फूडपेक्षा हा प्रकार ताजा व रुचकर वाटतो, हे निःसंशय !

सह्याद्रीच्या पायथ्याला भिडून येणारा फोंडा–कनेडी रस्ता इथेच कणकवली–नरडवे रस्त्याला मिळतो. सह्याद्रीची शिखरे अगदी अंगावर आल्यासारखी डोळ्याना भिडू लागतात ती इथूनच नाटळनतर डामरी रस्ता दुर्मिळ होऊन लाल–पादऱ्या मातीची धूळभरली वाट सुरू होते. एक फाटा नरडवे, घोटगे, दिगवळे या थेट सह्याद्रीच्या उरावरच्या गावी जातो; तर दुसरा कुंभवडे–जांभवडे या कुडाळ तालुक्याला भिडणाऱ्या गावांना वाटेल ' शिवडाव ' या गावी नदीकाठी एक सुरेख मठ आहे. दादामहाराज नाडकर्णी या पूज्य पुरुषाच्या वास्तव्याने पुनीत झालेले हे निवात स्थळ.

दिगवळ्याच्या राजणवाडीला मी गेलो होतो. मी लिहिलेली ' पिठाची गिरण ' ही कथा याच परिसरात घडते. एखाद्या राजणासारखीच ही चहू बाजूनी डोंगरानी वेढलेली वस्ती आहे. गावाच्या माथ्याला शिवकालीन भैरवगड. माघी पौर्णिमेला इथे लख्ख चादण्यात जत्रा भरते. राजणवाडीतून भैरवगडचा मानकरी गुरव अगात संचार होताच, भर मध्यरात्री गडाची उभी चढण चढून गडावर दाखल होतो.

माघी पौर्णिमेच्या टिपूर चादण्यात नि हुडहुडी भरणाऱ्या थडीत भैरवगडाचे कातळी शिल्प स्थिर उभे असते, शिवकालीन इतिहासाच्या आठवणी जपीत. भैरवगडापाशी उगम पावलेली ' गड नदी खाली ओसंडत येते नि कुंभवड्या–जांभ-

[illegible]

कणकवली मार्गाने निघावे. वाटेवरचा कळसुली हा मोठा रमणीय गाव. सधन, सुपीक, गर्द झाडापेडांनी वेढलेला, विपुल पाणी असलेला. या गावाच्या एका टेकाडावर एक पुरातन हरडीचे एकाकी झाड रस्त्याच्या कडेला उभे आहे. तिथून क्षणभर मागे वळून नजर टाकावी. सह्याद्रीची दुरावलेली शिखरे पाठीमागे नि पुढे एक नितांतसुंदर खोरे. हिरव्या झाडीने, पोपटी कुरणानी नि ठेंगण्या टेकड्यानी त्याला शोभा आणलेली. या टेकाडावर जो आपले घर बांधील, त्याला अन्नपाणी काही नको ! समोरची निसर्गशोभा जरी तो पहात राहिला तरी त्याला भूकतहान कधी लागू नये.

हा हां म्हणता धुळीचे लोट उठवीत आपली गाडी हळवल सोडून कणकवलीच्या हद्दीशी येते. ' आर्यादुर्गे 'चे उंचावरचे देऊळ डावीकडे ठेवून आपण ' गड नदी 'च्या पुलावर येतो. गड नदीच्या काठी वसलेली कणकवली...

कणकवली ऊर्फ कनकावती ऊर्फ कनकवल्ली !

करूळएवढच माझ याही गावावर प्रेम आहे, जणू ही माझी दुसरी जन्मभूमीच !

# समृद्ध आणि रसिक कणकवली !

३. कणकवलीमध्ये माझी बालपणाची वर्षे गेली. इंग्रजी पहिली ते एस-एससीपर्यंतचे शिक्षण तेथल्या कणकवली हायस्कूलमध्ये, आताच्या एस. एम. हायस्कूलमध्ये, मी घेतले. चाळीस-पंचेचाळीस वर्षांपूर्वीची कणकवली कशी होती, हे सांगितले तर आज कुणाचा त्यावर विश्वासही बसणार नाही. आजची कणकवली कितीतरी बदलली आहे दर खेपेला मी कणकवलीला जातो तेव्हा ती नवे रूप घेताना दिसते आहे; एखादे भरभराटीला येणारे टुमदार शहर दिसावे तशी कणकवली आज दिसते आहे; पण एके काळी कणकवली गाव फार वेगळे होते. आजूबाजूच्या खेड्यांच्या मानाने तिथे बऱ्याच सुधारणा दिसून यायच्या. म्हणजे तेथे पोस्ट आणि तार ऑफीस होते. पोलीस ठाणे होते. ग्राम-पंचायतीचे घासलेटाचे मिणमिणते दिवे गावात रात्री नाक्यानाक्यावर लावले जात. गावात हायस्कूल होते. मोटारस्टँड होता आणि गायतोंडे, पेणकर आणि भिरवंडेकर सावंत हे डॉक्टर होते. तसे पाहिले तर कणकवली, तेव्हापासूनच पुढारलेले गाव. कलमठात देवांग कोष्टी लोकांचे हातमाग असत. तेथेच जिल्ह्याचे खादी कार्यालय, चरखाकेंद्र होते. जानवली नदीच्या काठावर 'म्हाळसाबाई हिंद छात्रालय' हे गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह होते. कणकवली गाव राजकीयदृष्ट्या पुढारलेले होते. तेथे प्रभातफेऱ्या निघत. लिंगाप्पा उचले हे स्वातंत्र्यसैनिक काँग्रेसची चळवळ सतत जागृत ठेवीत

पण आजच्या तुलनेने तेव्हाची कणकवली अगदीच साधीसुधी, गावठी होती. मैलभर पसरलेली पूर्व-पश्चिम बाजारपेठ हेच काय ते वैशिष्ट्य. बाजारपेठ आणि गावठाण जणू एकच. तशा गावाच्या अनेक वाड्या आणि आळ्या असल्या तरी बाजारपेठेतच गावची मुख्य वस्ती एकवटलेली, एकमेकाना चिकटलेली. समोरासमोर वसलेली पडव्यापडव्यांची, दारीवागेची दुपाखी कौलारू छपराची घरे, पुढल्या भागात किराणा मालाचे नाहीतर नारळ, तंबाकूचे, दोरखंड, वाडवणी विक्रीचे असे कसलेही लहानसे दुकान आणि पाठीमागे पसरलेल्या चार-पाच छोट्या छोट्या खोल्या. ही तेव्हाची बाजारपेठेतली घरे. मुकी, आळवे, तायशेटे, सापळे, वळंजू,

गोवेकर, शेट्ये, धडाम, नरवडेकर, उचले, मेणकुदळे, मुज, पारकर, खोत, ओटव-कर, बाबुलकर, कामत, बाणावलकर ही बाजारपेठेतली प्रतिष्ठित घरे. बाजूला तेली आळी. तेथे उपरकर, काळसेकर, आरोलकर, डिचोलकर ही घराणी; तर कोष्टी आळीत देवांग कोष्ट्याची. हर्णे, मुसळे, कडुलकर इत्यादींची पिढयान पिढया वसलेली घरे. सावंत, पटेल आणि राणे हे इथले जुने जमीनदार. त्यांच्या जमिनी रानोमाळ पसरलेल्या लायशेट्ये आणि उचले हे मातबर व्यापारी. त्यांची डिपार्टमेंट स्टोअर्स-सारखी अनेक वस्तू मिळणारी दुकाने. पुस्तके-वह्यांपासून काष्ठौषधीपर्यंत सर्व चिजा. मोटारस्टँडवर काणेकर आणि शांतू लाडाचे हॉटेल. आप्पा धुमाळे याची 'कोहिनूर सोडावॉटर फॅक्टरी.' समोरच अनंतराव कोदे याचे 'रत्नाकर कोल्ड्रिंक हाऊस.' तेथे घडवंचीवर लावलेल्या रंगीबेरंगी पेयानी भरलेल्या काचेच्या रंगीत बाटल्या आणि एक आण्याला मिळणारे लेमन. दोन पैशाचे सोडावॉटर आणि चार आण्यांना मिळणारे मुंभ्रो ! हॉटेलातून उसळपुरी, कांदापोहे, भजी हे पदार्थ हमखास मिळत. शांतू लाडाच्या हॉटेलात 'मालपोवा' हा खास पदार्थ मिळे. नंतर गणपत्ये याचे हॉटेल सुरू झाले, तेव्हा बटाटेवडा माहीत झाला- रव्याचे, बेसनाचे लाडूही असत.

स्टँडवर देवगड मोटर युनियन आणि रत्नागिरी बस असोसिएशनचे बोर्ड असलेली सर्व्हिस मोटारीच्या एजंटांची हपिसे. खाकी कोट आणि खाली धोतर या वेशात वावरणारे आप्पा मुज, झालेच तर सोडावॉटर फॅक्टरीच्या गल्ल्यावर बसूनच कारभार चालवणारे ठेंगणे आप्पा धुमाळे; त्यांचे ते मानेपर्यंत वळवलेले लांब केस, कल्लेदार मिश्या नि पान खाऊन रंगलेलं तोंड, त्यांच्या इशाऱ्यासरशी थांबणाऱ्या नि हलणाऱ्या हाफटनी सर्व्हिस मोटारी. अल्ला, म्हमद्या, हे क्लिंडर. शुभ्र लेंगा नि झब्बा यात सदैव फिरणारे नि बोटांतल्या सोन्याच्या आंगठ्या व सल्ले दाखवीत सिग्रेट ओढणारे, गोरेपान देखणे तातू कवळेकर, पलीकडे स्वतःच्या मोटारीचा रुबाब मिरवणारे बाळ खोत-जोहारी एजंटाचा रुबाब वेगळाच असे.

ही सगळी कणकवलीच्या मोटारस्टँडची तेव्हाची मिजास होती !

त्यावेळी कणकवलीचा मंगळवारचा आठवडा बाजार म्हणजे उभ्या कोंकणपट्टी-तल्या व्यापारी माणसाची भव्य उलाढाल. मसुरे, कट्टा, सुकळवाडीपासून फोंडा-आचरा, मिठबावपर्यंत नि तळेबाजारपासून कुडाळ, वाडीपर्यंत कणकवलीच्या बाजाराचा दबदबा पसरलेला. बैलगाड्यासाठी तळावर जागा पुरत नसे, आणि नरडवे-दिवगळे -नाटळपासून आलेल्या गिऱ्हाईकानी पेठ तुडुंब वहात असे घाटावरून माल उतरून घेणारी फोंड्यानंतरची ही पहिलीच मोठी उतारपेठ ! व्यापारही दणातर व्हायचा. सकाळपासून रात्रीपर्यंत पेठेतल्या व्यापाऱ्यांची तागडी एकसारखी झुकत वाकत असायची. त्या काळी त्या बाजारपेठेची शानच तशी होती !

गावात हायस्कूल एकच, पण त्यामध्ये अख्ख्या तालुक्याचे विद्यार्थी शिकायला

येत हरिभाऊ मोंडकर, पावरी आई याच्या घरगुती खाणावळी म्हणजे विद्यार्थ्यांची वसतिगृहेच. तिथे दोन वेळा जेवायचे आणि हायस्कूलमध्ये शिकायचे, हा परिपाठ. नारिंग्याचे राणेमास्तर, सारगमास्तर, आर. के. सावंत, साळवी आणि चित्रेसर, म्हापणकरबाई, कणकवलीचे साई आळवे, ड्रॉइंगचे म्हातारे जगतापमास्तर, पीटीचे खानोलकर हे सगळे मास्तर आम्हाला मनोभावे शिकवीत. शाळा लहानशी होती, पण त्रेचाळीस सालच्या गॅदरिंगसाठी कोल्हापूरहून प्रो. ना सी. फडक्याना अध्यक्ष म्हणून त्यावेळच्या सुरेशबाबू भोसले या कवी म्हणून गाजलेल्या हेडमास्तरानी आणले होते आणि त्याची ' जडावाची देवी ' ही नाटिका विद्यार्थ्यांनी बसवली होती. त्यानंतर साळवी सरानी तर थेट तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी याना एक वर्षी अध्यक्ष आणले होते. शाळेमध्ये आमच्यावर चागले संस्कार होत असत. ' संघ ' आणि ' दल ' यात आम्ही सारख्याच उत्साहाने जात असू.

पण त्याच शाळेत १९४७ साली स्वातंत्र्यदिनादिवशी कुणीतरी राष्ट्रध्वज उलटा टागला आणि त्यातून केवढे तरी रामायण घडून आले. आमचे आवडते हेडमास्तर साळवी सर त्यामुळे शाळेतून बाहेर पडले. त्यांचे आणि ' गोपुरी 'च्या देशभक्त अप्पासाहेब पटवर्धनाचे तात्त्विक भूमिकेतून पटत नसे. साळवीमास्तराना त्यामुळे कणकवली सोडावी लागली.

त्यावेळी लहानसे असलेले आमचे हायस्कूल आता वटवृक्षाप्रमाणे विस्तारले आहे. हजारभर विद्यार्थी तेथे शिक्षण घेत आहेत. नव्या इमारती, नवे अभ्यासक्रम आणि नवी हुषारी यामुळे आमची शाळा सर्वत्र नावाजली जात आहे. गावात पचवीस वर्षांपूर्वी ' विद्यामदिर ' नावाचे आणखी एक उत्तम हायस्कूल निघाले आहे. तेही गुणवत्ता वाढवीत मोठे होत आहे. शिवाय आर्टस–कॉमर्सच्या पदव्या देणारे कॉलेजही आता कणकवलीला झाले आहे.

गावाच्या दोन्ही बाजूंनी वाहणाऱ्या गड व जानवली या नद्या. त्याच्या पाण्यावर कष्टाळू शेतकऱ्यांनी पिकवलेली बारमाही शेती. चाळीस वर्षांपूर्वी जानवलीच्या नदीवर ' डकीण ' लावून उसाचे मळे वाढवणारे सापळे बधू हे पहिले शेतकरी. आता उसाबरोबरच इतर पिकेही या नद्याच्या पाण्यावर घेतली जातात गावच्या मंडळींना संध्याकाळी फिरायला जायचे हक्काचे ठिकाण म्हणजे या दोन नद्यावरचे पूल! गड नदीवर पुलाजवळ गर्द झाडावळीतून स्थिरावलेला उभादेव हे अप्रतिम सौंदर्यस्थळ म्हणजे कणकवलीकरांचे जवळचे पिकनिक स्पॉट! एक दीड पुरुष उचीचा भव्य पाषाणखड तिथे पुरातन वृक्षाना आलिंगन देत नदीकिनारी उभा आहे त्याचे व्यक्तिमत्त्वच पाहणाऱ्याला नम्र करणारे आहे. जवळच गड नदीचा खळाळता प्रवाह. रस्त्यापासून हाकेच्या अतरावर असलेले हे रमणीय स्थळ गर्द झाडीने गुरफटलेले असल्यामुळे सहज कुणाच्या ध्यानात येत नाही आणि तिथली

नीरवता गढुळली जात नाही.

गड नदीच्या काठावरचा उमादेव तसा जानवलीच्या नदीवरचा श्री कलेश्वर! गर्द देवराईमध्ये वसलेले हे निवात शिवमदिर म्हणजे कणकवली आणि कलमठकराचे मोठे श्रद्धास्थान. मला मात्र तेथील निवांतपणा, गर्द झाडाची दाटी, नदीचा शात डोह आणि पाखरांचा अष्टौप्रहर चालणारा किलबिलाट यांचे अधिक आकर्षण वाटते अलीकडे तेथील पुरातन मदिराचा जीर्णोद्धार करून त्याचा चेहरामोहरा बदललेला आहे. आता जुन्या नळ्याच्या छपराऐवजी उंच सुदर कळस बसवण्यात आला आहे. जानवलीच्या पुलावरून जाताना राईतून वर आलेला तो कळस आता उठून दिसतो.

कणकवलीचे ग्रामदैवत म्हणजे श्री स्वयंभू श्री काशी विश्वेश्वर. स्वयंभूच्या देवस्थानाला 'सैमाचे देऊळ' म्हणतात. ते देवस्थान अद्यापीही जुन्या जमान्यातून बाहेर आलेले नाही, पण श्री काशीविश्वेश्वर थोडाफार सुधारलेला आहे. कणकवली गाव जसे सपन्न होत गेले तसे त्याने आपल्या ग्रामदेवतेलाही संपन्न करीत आणले. रगरगोटी, दुरुस्ती आणि आधुनिकीकरण यानी श्री काशीविश्वेश्वर आता पूर्वीपेक्षा सुखवस्तू दिसतो; पण माझ्या लहानपणी मी पाहिलेला तो देव अगदीच साधासुधा, गरीबसा होता. फक्त रामनवमीच्या उत्सवादिवशी त्याचे वैभव प्रकट व्हायचे!

श्री काशीविश्वेश्वराचा भव्य सभामडप म्हणजे कणकवलीकराचे सार्वजनिक सभागृह. तिथे पूर्वी मोठमोठ्या पुढाऱ्याच्या जाहीर सभा होत. देशभक्त लिंगाप्पा उचले याची अनेक भाषणे आम्ही तेथे बसून ऐकली. अजूनही त्या सभामंडपाचे सार्वजनिक महत्त्व कमी झालेले नाही.

श्री काशीविश्वेश्वरासमोरच श्री भालचंद्र महाराजांचा मठ. पूर्वी एक लहानशी चंद्रमौळी मठी असणारी ही जागा आता बाबांच्या भक्तांनी राजप्रासादासारखी आलिशान बनवली आहे. श्री भालचद्र महाराज हेही कणकवलीकराचे श्री काशी विश्वेश्वराखालोखाल मोठे आराध्यदैवत. गड नदीच्या पुलापलीकडे वसलेले श्री आर्यादुर्गेचे प्रेक्षणीय मदिरही पचक्रोशीतील भक्ताची श्रद्धा जोपाशीत असते.

एके काळी 'गोपुरी'मुळे कणकवलीचे नाव सर्वत्र गाजत होते. 'गोपुरी' म्हणजे पूज्य अप्पासाहेब पटवर्धनांनी उभारलेली, नव्या जीवनाचे प्रत्यक्ष शिक्षण देणारी अभिनव कार्यशाळा. अप्पासाहेबाना 'कोंकणचे गांधी' ही सार्थ पदवी लोकानी दिली होती. रत्नागिरी जिल्ह्यातील स्वातन्त्र्यपूर्वकाळातील स्वातन्त्र्यलढा चालवणारे ते बिनीचे सेनापती. त्यांनी त्यावेळच्या जुन्या रत्नागिरी जिल्ह्यात आपले अनुयायी निर्माण केले. प्रथम स्वातंत्र्याची चळवळ, नंतर सर्वोदयी कार्यक्रम, नतर भूदानाची चळवळ आणि अखेरीस शोषणमुक्त समाजासाठी चलनशुद्धीचा कार्यक्रम, अशी

अप्पाच्या जीवनात मोठी स्थित्यंतरे घडत गेली त्यातील 'गोपुरी' हेही एक मोठे स्थित्यंतर. गोपुरी हे त्यांना पडलेले एक आदर्श मानवसमाज जीवनाचे भव्योदात्त स्वप्न होते. केवळ कणकवली गावाचे भाग्य म्हणूनच त्यांनी त्या स्वप्नाच्या उभारणीसाठी तेथील गड नदीच्या काठावरील जागा निवडली. पुराणकाळातील एखाद्या तपस्वी मुनीने आपल्या आश्रमासाठी जागा शोधून काढावी, तशी ही जागा अप्पांनी निवडली. कोल्हापूरच्या दानशूर कोरगावकरशेठनी त्यांना सर्वतोपरी साह्य केलं आणि त्यातून बावीस एकराच्या भूखंडावर एक आदर्श गोशाळा, हिरवीगार शेती आणि फळबाग हा हा म्हणता उभी राहिली आदर्श जीवन जगण्याची प्रयोगशाळा म्हणून अप्पांनी कुठून कुठून माणसे जमवली आणि आपल्या मनातील आदर्शत्वाचे सर्व प्रयोग तेथे केले.

पण माणसे शेवटी उणीच पडली!

अप्पा पटवर्धनांच्या मनाची आणि चारित्र्याची उची गाठणारी माणसे काही त्यांना हवी तेवढी मिळाली नाहीत आणि त्यांचे प्रयोग यशस्वी होईनात सामान्य माणसे सामान्यासारखीच वागू लागली आणि त्यामध्ये बापडे अप्पा विसंगतपणे वावरू लागले; कालांतराने विरक्त झाले आणि एक दिवस खुशाल त्यांनी आपली मठी सोडून दिली आणि चलनशुद्धीच्या विचाराने पछाडून ते गावोगाव भटकू लागले.

त्याच धडपडीत देहाची शक्ती क्षीण होऊन एके दिवशी गोपुरीपासून कित्येक योजने दूर अशा पुण्याला अप्पा निजधामाला गेले. अप्पा पटवर्धन म्हणजे एक तपस्वी होते, त्यांची तपस्विता त्यांच्याबरोबरच लयाला गेली.

आजही कणकवलीच्या सीमेशी अप्पांची गोपुरी उभी आहे. बाहेर अप्पांचा कृशदेही पुतळा खिन्नसा उभा आहे.

गोपुरी आणि कणकवली यांचे त्याकाळी तरी गोत्र कधीच फारसे जुळले नव्हते. अप्पांनी कणकवलीसाठी खूप खस्ता खाल्ल्या. कणकवलीकरांचे संडास आणि मुताऱ्या त्यांनी स्वहस्ते धुतल्या, पण तेथल्याच काही खुळ्या लोकांनी एकदा त्यांच्या गोपुरीला चक्क आग लावली!

आज अप्पाही नाहीत आणि ते आग लावणारे लोकही कणकवलीमध्ये उरलेले नाहीत. आजच्या कणकवलीपाशी फक्त घडल्या घटनांविषयी पश्चात्ताप व हळहळ उरली आहे. एवढी कणकवली आता बदलली आहे.

एकेकाळी कणकवलीमध्ये जातीयता फार पिळदार होती, असे जुने लोक सांगतात. तिची अप्पा पटवर्धनांनाही झळ लागली होती. आता तो पीळ राहिलेला नाही. आताची नवी पिढी उमद्या आणि उघड्या मनाने नवी कणकवली घडवते आहे.

गेल्या पधरा वर्षांमध्ये कणकवलीचे रूप आरपार बदलले आहे. मुंबई-गोवा

राजमार्गावरील हे गाव विलक्षण वेगाने वाढते आहे. त्याचा जसा विस्तार होतो आहे तसाच विकासही. बाजारपेठेची कळा संपूर्ण बदलली आहे. पूर्वीचा मलूलपणा जाऊन नवी टवटवी, नवा तजेला प्रत्येक दुकानात दिसू लागला आहे. चिचोळी बाजारपेठ वाहनाच्या रहदारीला पुरेनाशी होत आहे. दुकानाच्या शोरूम्स पाहिल्या तरी मुंबई-पुण्याची आठवण होते. पूर्वी येथे जमीन स्वस्त मिळायची. हजार दोन हजार रुपये एकर. आता गुंठ्याला सातआठ हजार पडतात! नव्या इमारती, नवी दुकाने, नव्या पेढ्या यांनी गाव गजबजले आहे. त्यातच भर पडली आहे ती सरकारी कचेऱ्यांची एसटी, वन विभाग, विद्युत् मंडळ, पाटबंधारे आणि बांधकाम विभाग यांसारखी महत्त्वाची अनेक खाती जिल्ह्याचे मुख्य ठाणे म्हणून येथे कायम रहिवासाला आली त्यामुळे गावात सरकारी चाकरमानी, त्यांची बिऱ्हाडे आणि त्यांच्या जीपगाड्या यांची वाढ झाली. मारुती गाड्यांची नवलाई आता कणकवलीला राहिली नाही आणि स्टॅन्डवर शंभर सव्वाशे रिक्शांची रांग लागलेली असते! एसटीच्या भव्य डेपोतून शेकडो एसट्या रात्रंदिवस सुटतात नि येतात. दवाखाने आणि हॉस्पिटले पावलापावलावर झाली आहेत. अगदी एम. एस. आणि एम. डी. डॉक्टर्सही आता कणकवलीमध्ये मौजूद आहेत! अगदी अडले तरच पेशंट मुंबई किंवा पणजीला जातो.

वैद्यकीय सेवा अद्ययावत् मिळू लागली. उत्तम शिक्षण मिळू लागले. नोकऱ्या भरपूर उपलब्ध झाल्या. कोर्टकचेऱ्या आल्या. व्यापारउदीम वाढला. गड नदीच्या तीरावर विद्युत मंडळाचे प्रचंड मनोरे आणि कार्यशाळा उभ्या राहिल्या आणि त्या भागाचे नावच 'बिजली नगर' झाले! जवळच लघुउद्योग वसाहत निर्माण झाली. पूर्वी कणकवलीला फक्त पंचे आणि नऊवारी लुगडी विणणारे हातमाग होते. आता त्यांचा खटखट आवाज ऐकू येत नाही, पण लघुउद्योग वसाहतीमध्ये लेथवर काम करणारे तरुण दिसून येऊ लागले आणि तेथील विविध यंत्रांचे आवाज कणकवली ऐकू लागली. मोटारी, रिक्शा आणि ट्रक यांची गर्दी झाल्यामुळे गावात ऑटोमोबाईल वर्कशॉप्स तयार झाली. सॉ मिल्स आल्या. मुद्रणालये आली. उदय पंडित यांच्या मुद्रणालया-मध्ये मुंबई-पुण्याच्या अग्रेसर मुद्रणालयात होते त्या तोडीचे देखणे मुद्रण होऊ लागले. गावात एक दैनिक व साप्ताहिक वृत्तपत्रही निघाले. मुंबई-पुण्याची नि रत्नागिरी-कोल्हापूर-बेळगावकडील वृत्तपत्रे लोकांना रोज सकाळ-संध्याकाळ मिळू लागली. नरडवे रोडवर नवी टुमदार घरे उभी रहात आहेत. कनक नगर, शिवाजी नगर, बिजली नगर अशी अनेक नवी नगरे कणकवलीमध्ये उभी रहात आहेत.

गावात हॉटेले आणि आईस्क्रीम पार्लर्स झालीच, पण व्हीडीओ पार्लर्सही निघाले. ताजे चित्रपट लोक व्हीडीओवर पाहू लागले. जुन्या चित्रपटासाठी 'यशोदा चित्रमंदिर' आहेच. मुंबईच्या नाटककंपन्या आणि आर्केस्ट्रावाले आपापले खेळ घेऊन संपन्न

कणकवलीत येऊ लागले व गल्ला जमवू लागले. फार पूर्वी दारूचा एक ' पिठा खोताच्या मालकीचा होता. आता मुंबईसारखे बीअर बार एवढेच नव्हे, तर ' परमिट रूम 'सुद्धा कणकवलीत आले !

फार काय, कधीही माहीत नसलेले ' सोशल क्लब 'ही आता कणकवलीमध्ये दिसू लागले. तेथे ' सोशल ' माणसे गर्दी करू लागली ! कणकवली खरोखरच आर्थिक दृष्ट्या बलवत्तर झाली. आर्थिक दृष्ट्या कणकवली बलवत्तर झाली तशीच सांस्कृतिक दृष्ट्याही इथल्या इंग्रजी शाळेत शिकणारी हुषार मुले आता एसस्सीला मेरिट लिस्टमध्ये नावे काढतात. येथले नगरवाचनालय म्हणजे उत्तमोत्तम वेचक ग्रंथांचा खजिनाच ! नॅशनल जिऑग्राफी ' सारखे महागडे आणि नेमकेच वाचक वाचणारे इंग्रजी नियतकालिकही येथे आवर्जून मागवले जाते; यातच या वाचनालयाची संपन्न अभिरुची ओळखता येते. ' नगरवाचनालय आणि ' वसंतराव आचरेकर सांस्कृतिक प्रतिष्ठान ' या दोन संस्था म्हणजे कणकवलीकराचा मूर्तिमंत अभिमान ! गेली दहाबारा वर्षे या संस्थातर्फे दरवर्षी डिसेंबरात ' नाथ पै एकांकिका स्पर्धा ' भरविल्या जातात आणि त्यामध्ये उभ्या महाराष्ट्रातून स्पर्धक आपले नाट्यगुण दाखविण्यासाठी कणकवलीपर्यंत येतात, ते सात दिवस म्हणजे कणकवली ' नाट्यपंढरी ' बनलेली असते. बाजारपेठेतले दुकानदार एकांकिका पाहण्याच्या आकर्षणाने आपापली दुकाने लवकर बंद करतात. सीझन तिकिटे पहिल्या दिवशीच संपून जातात. भाई बेळेकर, उदय पंडित, सुरेश कोदे, माधव कदम आणि त्यांचे असंख्य तरुण सहकारी या स्पर्धा सुविहीतपणे पार पडाव्या यासाठी अक्षरशः जिवाचे रान करतात. या मंडळींचे वैशिष्ट्य असे की, महाराष्ट्रातील नाट्यक्षेत्रातील नावाजलेली मोठमोठी माणसे कणकवलीला एकांकिकाचे परीक्षक म्हणून येतात ! मग त्यात माधव मनोहर आले आणि जयवंत दळवी आणि पुष्पा भावे याही आल्या ! कणकवलीच्या ' नाथ पै एकांकिका स्पर्धे ' मध्ये पारितोषिक मिळणे ही गोष्ट सर्वच स्पर्धक संघाना गौरवाची आणि प्रतिष्ठेची वाटते.

कणकवली अशी सर्व अंगानी फुलते आणि बहरते आहे. एकेकाळी व्यापारी वळणे टाकून रसिकतेची नवी वळणे ती पाहते आहे. इथला पूर्वीचा होळीचा परंपरागत ' मांड ' पूर्वीसारखाच खेळला जातो. इथल्या गणेशोत्सवाला फक्त मालवणी मुलखात मालवण तेवढेच तोडीला तोड देऊ शकेल ! आणि इथले भजनांचे सामने म्हणजे तर इथली मिरासदारीच. या भजनाच्या सामन्यापोटीच या छंदवेड्या गावाने वीस वर्षापूर्वी एका ट्रक अपघातात आपली अनेक माणसे बळी दिली ! इथल्या मनस्वी, रसिक माणसांना आपला छंद, आपली हौस जोपासताना जीवाचेही भान रहात नाही, हा इतिहासाचा दाखला आहे. इथे कुणी चांगले गाणे गाऊ लागले की माणसे कान टवकारतात, चांगल्या नाटकासाठी इथले रसिक प्रेक्षक आसुसलेले असतात, तकतीथे

लक्ष्मणशास्त्र्यांसारख्या प्रकांड पंडिताचे व्याख्यान ऐकण्यासाठी इथे श्रोत्यांची तुडुंब गर्दी जमते. बाजारात ताजी भाजी, ताजी फुले आणि आचऱ्या-मालवणची ताजी मासळी आली की त्यासाठी इथे माणसे हातांतले काम टाकून असोशीने उठतात!

कणकवली अशी दिवसेंदिवस समृद्ध होत आहे आणि तिची रसिकताही वाढते आहे. जुनी बालबोध कणकवली पाहिलेल्या माझ्यासारख्या गाववाल्याला एवढेच वाटते की या साऱ्याला, दकालीपणाची दृष्ट कधीही लागू नये.

# कणकवलीचे नागडेबुवा !

४\. चाळीस पंचेचाळीस वर्षांपूर्वी कणकवली गावी मी हायस्कूलमध्ये जाण्यासाठी येऊन राहिलो. आता खोतांचे दुकान आहे, त्याच्या समोर शेट्यांच्या पेढीला लागून तेव्हा मोंडकरांची खाणावळ (ऊर्फ प्रभात लॉज) होती आजूबाजूच्या गावातील गरजू विद्यार्थी तेव्हा या मोंडकरांच्या किंवा शेजारच्या धावरी आईच्या खाणावळीत ओरोसकरमास्तरांच्या आधाराने कणकवलीस शिक्षणासाठी येऊन रहात. तेव्हा बेचाळीसची स्वातंत्र्याची चळवळ जोरात होती. कणकवलीचे स्वातंत्र्यलढ्यातील पुढारी लिंगाप्पा उचले तेव्हा नेहमी प्रभातफेऱ्या काढीत या प्रभातफेऱ्या बाजारपेठेच्या शेवटी कोष्टी आळीच्या नाक्यावर असलेल्या श्री काशीविश्वेश्वराच्या मंदिरापाशी समाप्त होत. तिथे लिंगाप्पा अण्णा भाषण करीत. प्रभातफेरीत सामील झालेले सारेजण त्यांचे श्रोते

आम्ही हायस्कूलमध्ये नुकतीच दाखल झालेली खेडवळ मुले हौसेने लिंगाप्पांच्या प्रभातफेरीत सामील होत असू. ' भारतमाता की जै–' असे बेंबीच्या देठापासून ओरडताना खूप गमत वाटायची ! लिंगाप्पा अण्णा आम्हा मुलांना नहमी प्रमाने वागवायचे. ते गंभीर शांत दिसायचे. त्यांना खळखळून हसताना आम्ही कधीच पाहिले नाही, पण आम्ही त्यांच्या दुकानावर वह्या-पेन्सिली घेण्यासाठी उभे राहिलो की, एखादा खडीसाखरेचा खडा किंवा खारीक ते प्रभातफेरीतला आमचा चेहरा ओळखून न मागता हातावर ठेवीत ! ते दिवस मोठे मौजेचे होते.

प्रभातफेरीनंतर लिंगाप्पांचे भाषण संपले की आमची सारी वानरसेना बाजारपेठेतून हुदडत परत फिरे. आमच्यापैकी काही पोरे नागडेबुवांना बघायला जात. श्री काशीविश्वेश्वराच्या देवळासमोरील एका बारीकशा मागरासारख्या, जवळ जवळ पडक्या, ठेंगण्या कौलारू घरकुलात नागडेबुवा खोंगी घालून बसलेले असत. का कुणास ठाऊक; पण त्या नागडेबुवांना पाहण्याची ओढ आम्हाला लागायची. सारे सौंगडी निघून गेले तरी मी त्या बुवाच्या मठीशेजारी कुतूहलाने घुटमळत राही.

आजही सारे दृश्य स्पष्ट आठवतेय. पावसाळ्याचे दिवस. विश्वेश्वराच्या देवळाभोवती तेव्हा अगदीच खूप गर्द झाडी असायची. नागडेबुवांच्या मठीभोवतीसुद्धा खूप

'अरकड' माजलेला दिसे. नेरडा, टाकळा, आघाडा, तेरे, अळू अशा पावसाळी वनस्पती अवतीभवती दाट माजलेल्या असत. त्यातच बेडक्या पटापट पायाखाली येत. पावसाच्या सरींची झडही बुवाच्या मठीत यायची, पण त्या साऱ्याची जणू खिसगणतीही नसावी, तसे नागडेबुवा समाधिस्थ असल्यासारखे भिंतीला टेकून, खाली मान घालून स्तब्ध बसलेले असत. त्याचे दोन्ही हात गुडघ्याभोवती वेटाळे घातलेले असत. दाढी काळीभोर आणि वाढलेली. केसांच्या जटा झालेल्या. दृष्टी स्थिर, पापणी हलते न हलते अशी. वर्ण सावळा. अंगकाठी कृश. मात्र डोळे विलक्षण तेजस्वी आणि सर्वांग नागडे उघडे! अंगावर औषधालासुद्धा चिंधी नाही. खाली अंथरूण नाही की रात्री बेरात्री अंगावर ओढावे तर जवळ पांघरूण नाही! बुवा अंगाची जुडी करून त्याच एका अवस्थेत अहोरात्र पहुडलेले दिसत.

त्यांच्या मठीच्या रेंज्यातून आम्ही भयचकित नजरेने त्यांना न्याहाळत असू, पण आमचे हात काही जोडले जात नसत. नागडेबुवांना त्यावेळी फारसे कुणी नमस्कार करीत नसे. जवळच्या घरातील कुणी एक वयस्कर भाई त्यांचे सारे करी. पण करण्या-सारखे होतेच काय? देहधर्म सोडले तर नागडेबुवा म्हणजे जणू एक अबोध, अविचल, मानवी पुतळा होता. आम्ही रेंज्यामधून पाहू तेव्हा आम्हाला त्यांच्यासमोर एखादे केळे किंवा रामफळ वा असेच एखादे फळ ठेवलेले दिसे. क्वचित जेवणाचे उष्टे ताट दिसे. क्वचित बुवा विडी मुठीत धरून धूर काढताना दिसत. एरवी ते आम्हाला दिसत ते समाधिस्थ, अविचल आणि मौने. दाढीजटावाला अवलिया बैरागी असावा त्याप्रमाणे.

शेजारी एखादे बेवारशी कुत्रे.

आमच्यातला कुणी खोडकर पोरगा खिडकीतून नागडेबुवांच्या अंगावर वारीकसा खडा भिरकावी; पण बुवा मान उचलतील तर शपथ!

आमचे पोरकट कुतूहल नागडेबुवाच्या नागडेपणापुरते मर्यादित होते. बाजार-पेठेतल्या दुकानाच्या फळ्यावर कितीदा तरी वेडेखुळी पोरं झोपलेली दिसत. करूळचा गंगाराम शेणवी असाच नागडाउघडा फिरे नि लोकांना धोंडे मारी. हे नागडेबुवा त्यातलेच, फक्त ते बोलत नाहीत; हात उचलून लोकाना दगड-गुंडे मारीत नाहीत; उलट, त्यांना चाळविण्यासाठी आमच्यातली पोरेच त्यांना खडे मारतात.

आम्ही तर तेव्हा पोरेसोरेच, पण एवढी मोठी कणकवलीची बाजारपेठ; पण तिलाही बुवाचे कुतूहल फक्त त्याच्या नागडेपणापुरतेच तेव्हा वाटायचे. हे बुवा कुठून आले, त्याचं चरित्र काय, आगापिछा कोणता हे कुणालाही माहीत नव्हते. त्याचा इतिहास माहीत करून घेण्याची कुणाचीही इच्छा नव्हती.

दिवसामागून दिवस, महिन्यामागून महिने नि ऋतूमागून ऋतू उलटत होते.

नागडेबुवा आपले त्या मठीत जणू त्या मठीचाच एक निश्चल खांब बनून राहिले होते. पावसाळ्यात मुसळधार पाऊस असो, हिवाळ्यात जीव गोठवणारी थंडी असो किंवा उन्हाळ्यातील जीवघेणी तल्खली असो. नागडेबुवांना त्यापैकी कशाचीही झळ पोचलेली नसायची. लोकाना फक्त याच एका गोष्टीचे अप्रूप वाटायचे. तरीही अजून कुणी नागडेबुवाच्या समोर हात जोडून उभे रहात नव्हते. फक्त समोरचा श्री काशी-विश्वेश्वर तेवढा त्यांना रात्रंदिवस टक लावून पहात होता नि नागडेबुवा जणू बसल्य जागेवरून त्यालाच विचारत होते, ' आता तरी माझी ओळख पटतेय का ? '

पण कुणालाच कुणाची ओळख पटत नव्हती. खरे म्हणजे देवाचीसुद्धा ओळख आधी माणसालाच पटावी लागते. मगच देव झाला तरी तो माणसाला ओळखू लागतो! नागडेबुवाच्या बाबतीत तेच घडत होते. त्याची ओळख कणकवलीतल्या माणसाना पटतच नव्हती. मग ती श्री काशीविश्वेश्वराला तरी कशी पटावी!

ती आळख प्रथम पटू लागली शेहचाळीस सालच्या प्लेगमध्ये. पंचेचाळीस–शेहेचाळीस साली कोंकणात प्लेगच्या साथीने हाहाकार उडविला होता कणकवली पेठेत तर कहर झाला. माणसे पटापट मरून पडू लागली. बाजारपेठ हा हा म्हणता खाली झाली. आता जिथे कोर्टाची नवी इमारत झाली आहे त्यामागे असलेल्या उघड्या माळावर तट्ट्यांची छपरे उभारून तेथे लोक रहायला गेले. बाजारपेठ, शाळा ओस पडलेल्या, गाव रिकामे झालेले. श्री काशीविश्वेश्वराचे देऊळ गावाच्या मध्य-भागी बसलेले. दोन्ही बाजूंनी बाजारपेठ एखाद्या नदीसारखी दूरवर पसरलेली. शिवाय वेगवेगळ्या वस्तीच्या आळ्या, गल्ल्याबोळ एकात एक घुसलेले. प्लेगने थैमान मांडले नि हा सारा परिसर उजाड बनला, निर्जन झाला. तेथे चिटपाखरूही राहिले नाही.

पण एवढे झाले तरी नागडेबुवा नि श्री काशीविश्वेश्वर यानी काही आपली जागा सोडली नव्हती! नागडेबुवाची कुडी तर माणसाची होती; पण तिला एकही प्लेगची पिसू चावली नाही की त्याना कसलीही गाठ आली नाही. एवढेच नव्हे तर त्याच्या मठीभोवती कुत्रीसुद्धा सहीसलामत राहिली, कुणालाही प्लेग झाला नाही!

मग दोनचार महिन्यांनी पावसाळा सुरू झाला. प्लेग ओसरला माणसे आपापल्या घरातून रहायला आली. सगळा गाव माणसांनी गजबजला तेव्हा लोकांनी पाहिले, नागडेबुवा एवढे झाले तरी जागचे हल्ले नव्हते नि तरीही त्यांना काहीही झाले नव्हते. चमत्कार व्हावा तसे ते खुशाल होते. खोंगी घालून निवांत बसलेले होते.

त्याक्षणी कणकवलीतील सज्जनांना साक्षात्कार झाला, ' अरे! ही कुणी साधीसुधी असामी नव्हे. कुणीतरी सत्पुरुष या नागडेबुवाच्या रूपाने आपल्या गावी अवतरला आहे. हा थट्टेवारी नेण्याजोगा अवलिया नव्हे. या नागडेबुवाच्या ठिकाणी परमे-श्वराचा अंश आहे. याच्या कुडीला थंडी, वारा, पाऊस, प्लेग बाधत नाहीय. ही

कुठी मानवी दिसली तरी तिथे कसली तरी दिव्यशक्ती आहे. माणसाचे थिटे माणूसपण सपते तिथे चिद्‌शक्तीची उत्तुग शिखरे उभी राहतात. त्यांच्यासमोर नमले पाहिजे या सत्पुरुषाला मनोभावे नमस्कार केला पाहिजे!'

मग हळूहळू एकेक अशी माणसे बाबासमोर येऊन हात जोडून उभी राहू लागली. आता लोकाना या मौनीबुवाच्या इतिहासाचे स्मरण झाले. कुणीतरी तो इतिहास तपासू लागला. तेव्हा कळले की नागडेबुवा म्हणजे पूर्वाश्रमीचे वसई भागातील कुणी ठाकूर आडनावाचे सुशिक्षित गृहस्थ होते; पण ते नेमके कणकवलीलाच का आले याचा उलगडा कुणास होईना. बाबा तर मुखातून एकही शब्द कधी उच्चारीत नव्हते. त्याचे अस्तित्व म्हणजे पचमहाभूतांपैकी एक असावे तसे! जसा वारा, जसा पाऊस, जसे ऊन तसे बाबाचे जीवन...धरती आणि अतराळ दोन्ही समान!

वसईपर्यंत त्याचा कुलवृत्तांत लोकानी शोधून काढला नि त्यांचे मूळचे नावही कळून चुकले. त्याचे नाव होते भालचद्र म्हणून लोकांनी त्यांना श्री भालचंद्र महाराज म्हटले. नागडेबुवांचे भालचंद्र महाराज झाले. लोक त्याच्या भजनी लागले. सकाळ-संध्याकाळ बाबाची पूजाअर्चा होऊ लागली. श्री दत्तदिगबराचा अवतार अशी बाबांची कीर्ती पसरू लागली; पण बाबांना त्याचा पत्ताही नव्हता. ते आपल्याच तंद्रीत समाधिस्थ अवस्थेत मग्न होते. अलौकिक अशी देहाची आणि अलौकिक अशी मनाची अवस्था. आनंदाच्या डोही आनंद तरग!

मी पन्नास एकावन्न सालपर्यंत कणकवलीचा रहिवासी होतो. तोपर्यंत बाबाना नित्य पहात होतो. नागडेबुवांचे श्री भालचंद्रबाबा झाले ते याच मुदतीत. आता तर गावातील आणि परगावातीलही माणसे भक्तिभावाने हात जोडून समोर उभी राहू लागली. शिरसाष्टांग नमस्कार घालून आशीर्वाद मागू लागली. बाबा स्थिर दृष्टीने सारे पहात होते. शरीराची धनुकली झाली होती. दाढी—केस आता कुणीतरी कापवून घेतले होते. बाबा पूर्वी उघडे होते, आता बोडकेही दिसू लागले; पण त्याच्या नजरेतील तेज आता विलक्षण झळाळू लागले होते. क्वचित् ते मान वर उचलून पहात. क्वचित प्रसन्न हसत; क्वचित रुष्ट होऊन रागाने पहात; क्वचित हाताची हालचाल करीत; आशीर्वाद दिल्यासारखे तोंडातल्या तोंडात पुटपुटत. बस्स. याहून वेगळे काही घडत नव्हते.

त्यानंतर कितीतरी वर्षे माझा कणकवलीशी संबंध उरला नव्हता. करूळला आलो तरी कणकवलीला खेप होईच असे नाही. गोव्यात वगैरे जाताना कणकवलीवरून गाडी जाई, पण थांबणे होत नसे. भालचंद्र महाराजांची भेट होत नव्हती, पण बाबांची कीर्ती आता वाढत होती. दूरदूरचे लोक बाबाच्या दर्शनासाठी येऊ लागले होते. कणकवलीकरानी आता बाबाची मठी दुरुस्त करून तिथे टुमदार देऊळ बाधले होते.

अडुसष्ट साली मी गोव्यात नोकरीला असताना माझ्या ' देवकी ' या नाटकाचा प्रयोग कपनीने कणकवलीला लावला. त्या निमित्ताने मी कणकवलीला आलो. बाळासाहेब उचले आणि अतुअण्णा कोदे हे दोघेजण मला बाबाच्या दर्शनास घेऊन गेले. कितीतरी वर्षांनी मी एके काळच्या नागडेबुवाच्या ठिकाणी पाय ठेवीत होतो.

बाबांचे रूप आता बदलले होते. ते वयोवृद्ध दिसत होते. पूर्वीची कृशता जाऊन देह थोडा सुखवस्तू दिसत होता अग गोरटेले भासत होते. तुळतुळीत हजामत केलेले मस्तक, माझ्या डोळ्यांना नवीन होते बाकी पूर्वीसारखेच अगाचे मुटकुळे करून बसत खाली मान घालून, पण मध्येच डोळे उचलून वर पाहणे हे सारे पूर्वीचेच होते, पण यावेळी बाबा मुठीत सिग्रेट धरून झुरके घेत होते. पूर्वी क्वचित् त्याच्या हाती विडी दिसे. कुणीतरी म्हणाले, ' अलीकडे बाबा सिगरेटी खूप ओढतात ! '

मी साष्टांग नमस्कार घालून आशीर्वाद मागितला. त्यानी माझ्याकडे मान उचलून वर पाहिले नि ते स्वत:शीच हसले. मग उजवा हात उचलल्यासारखे केले. मी तो आशीर्वादच मानला. दुसऱ्याच क्षणी त्यांनी माझ्यावरील दृष्टी काढून घेतली आणि ते स्वतःच्या तद्रीत मग्न झाले. आजूबाजूचे भान विसरून बाबांनी दिलेला आशीर्वाद मी प्राणपणाने झेलला आणि अतःकरणाच्या संपुष्टात जपून ठेवला. त्याची आपल्या-वर कृपादृष्टी आहे, याची जाणीवसुद्धा विलक्षण प्रेरक होती.

पण एकट्या माझ्यावरच नव्हे तर त्यांच्या अनेक भक्तावर त्यानी आपल्या शुभाशीर्वादाची, अनुग्रहाची शिंपडणी केलेली आहे व त्याची फळे त्याना प्राप्त झाली आहेत. कणकवलीकरानी बाबांचे ऋण फेडण्यासाठी आपल्या परीने जे जे करता येईल ते ते सर्व केलेले आहे. माझ्यासारख्याला बाबांचे चरित्र वेगळे आणि प्रेरक वाटण्यासारख्या गोष्टी म्हणजे इतर बुवासारखा त्यानी कधीही कसलाही ' चमत्कार ' करून दाखवला नाही, ज्यामुळे लोकाची त्याच्यावर भारी भक्ती जडावी ! त्यानी शब्द उच्चारून कुणाजवळही काहीही मागितले नाही, पण त्यांच्या-पाशी दैवी शक्ती होती असे वाटावे, असा ' चमत्कार ' त्यांच्या जड मानवी देहाने करून दाखवला. त्याची मला विलक्षण अपूर्वाई वाटते. साध्या थडीने आपण आजारी पडतो, तर इथे याच्या कुडीने सतत पन्नास वर्षे कणकवलीला आल्या घटकेपासून अंगावर बोटभर चिंधीही न वाळगता ऊन, पाऊस, थडी, वारा कसे सोसले ? पन्नास वर्षे मुखातून अवाक्षरही न काढण्याचे सामर्थ्य त्याना कसे प्राप्त झाले ? कुणाजवळ काहीही न मागण्याची नि कुणालाही कसलाही चमत्कार करून न दाखवण्याची अलौकिक सिद्धी त्यानी कशी संपादन केली ? आणि समोर येईल त्या मूठभर अन्नावर त्यांचा देह इतकी वर्षे निरामयपणे कसा टिकला ? कसा तेजःपुज राहिला ! त्याची नजर एवढी तेजस्वी कशी बनली ? त्यांना प्लेग का झाला नाही ?

माझ्या अल्पमतीला एवढ्यासाठी तरी त्यांच्यासमोर लीन व्हावे असे वाटले आणि मी त्याना मनोभावे नमस्कार केला, त्याचा आशीर्वाद मागितला किर्तीही वैज्ञानिक निकष लावले तरी या माणसाची दुबळी काया पचमहाभूतांना तोंड देत इतका प्रदीर्घ काळ कशी टिकली, याचा उलगडा तर्काला होत नाही आणि मग मन केवळ विनम्र होते. तसेच माझेही झाले.

अखेरच्या दिवसात बाबांच्या भक्ताची संख्या अगणित झाली. मोठमोठे श्रीमंत आपल्या कोऱ्या करकरीत गाड्या घेऊन कणकवलीला येत. बाबाच्या मठासमोर आपली गाडी उभी करीत. बाबा बसल्या जागेवरून पहात. त्यांना इतक्या वर्षांच्या बैठकीमुळे उभे राहता येणे मुष्कील झाले होते. मग ते मनात आले तर अंगाची जुडी मोकळी करीत, बैठक मोडीत आणि खुरडत खुरडत गाडीजवळ जात मग त्यांना गाडीचे दार उघडून कुणीतरी गाडीत बसवी असे झाले तर पुष्कळदा ते त्या गाडीतून उतरतच नसत ! गाडीचा मालक तो एक अनुग्रहच मानी आणि बाबाना घेऊन गाडी बाहेर पडे. स्वेच्छेने बाबा गाडीतून उतरेपर्यंत मग त्यांना फिरवावे लागे. अशा पद्धतीने बाबाचे भक्त त्याना कणकवलीबाहेर घेऊन जात. मुंबई–पुणे–कोल्हापूर-जळगाव, कुठेही.

अशाच एका मुंबईच्या खेपेमध्ये बाबांना अखेरची हाक ऐकू आली त्यांना अज्ञाताचे वेध लागले होते. त्या घटकेपर्यंत त्यांनी आपल्या मुखाने कुणाला कसलाही गुरूपदेश केला नव्हता. कुणाला काही दिले असे ऐकिवात नव्हते. त्यांचा अनुग्रह सुप्त असे. त्यांचा शब्द अनाहत असे. सत्पुरुषांनी वाजवलेल्या अनाहत टाळीमध्ये प्रचंड घटानादाच्या घोषापेक्षाही अधिक नादसामर्थ्य असते; पण ते ज्याला जाणवेल त्यालाच. बाबांची मूक वाणी कुणाला जाणवली होती, कुणास ठाऊक !

मुंबईलाच ते आयुष्यात प्रथम आणि शेवटचेच आजारी पडले भक्तगणांनी केलेल्या अत्युत्तम औषधोपचाराचा काहीही उपयोग न होता, एका उत्कट क्षणी ते या ऐहिक जगाचा त्याग करून इतकी वर्षे अंतर्यामी जपलेल्या मोक्षमार्गावरून निघाले, जिथे त्यांनी आपल्या जीवनातील प्रदीर्घ योगसाधनेचा काळ व्यतीत केला तिथेच कणकवलीला त्यांच्या नश्वर देहाला भक्तांनी अखेरच्या संस्कारासाठी आणले.

जिवतपणी कोणताही ' चमत्कार ' न केलेले, पण आपले सारे आयुष्य म्हणजेच एक चमत्कार झालेले एकेकाळचे ' नागडेबुवा ' म्हणजे कणकवलीला चिरतन प्रेरणा देणारे एक अलौकिक व्यक्तिमत्त्व होते.

# श्री रामेश्वर; श्री कुणकेश्वर

५.

आचरे गावाच्या पूर्व सरहद्दीवर तीन बाजूंनी येणारे तीन हमरस्ते मिळतात. चौथा रस्ता फरसबदी घाटी उतरून गावात थेट श्रीरामेश्वराच्या पायरीपाशी जातो. पूर्वेकडून कणकवली आणि दक्षिणोत्तरेकडून कालवल-देवगड अशा गावांतून हे रस्ते आचरे 'संस्थाना'ला येऊन भिडतात. पश्चिमेला खुद्द आचरे 'संस्थान.' कोंकणात देवस्थाने अनेक आहेत; पण या देवस्थानामधले संस्थान फक्त आचरे हेच ! या संस्थानचा महाराजा तेथील ग्रामदैवत श्री देव रामेश्वर. सारा गाव या ग्रामदैवताचा सेवक वर्षाचे बाराही महिने या दैवताच्या नगारखान्यातील पडघम घुमत असतात आणि 'श्रीरामेश्वर' असे उठता बसता म्हणत उभा गाव वावरत असतो

आचरे गाव समुद्रकिनारी बसलेला असला तरी मुख्य गाव समुद्रापासून थोडा दूरच. मध्ये एक उथळ पाण्याची खाडी गाव बारा वाड्यांचा. वरच्या भागाला बाजारपेठ, जिथे वर उल्लेखिलेले तीन रस्ते भेटतात. नाक्यावर एक पुरातन पिंपळ सळसळत असलेला त्याच्या पाराचे चिरे ढासळलेले; पण तिथून खाली रामेश्वराच्या दिशेने उतरणारी घाटी नेमस्तपणे चालत असलेली. पायऱ्यापायऱ्यांचे पिढीजाद चिरे आता हलत आले आहेत. काही ढासळले आहेत, पण ही फरसबदी वाट हजारो भाविकानी वर्षोनुवर्षे तुडवलेली. श्रीरामेश्वराचे नाव मुखात घेऊन उभा देवगड तालुका नि त्यापूर्वीच्या देशी राजवटीतील साळस महाल या फरशीवरुन देवाच्या पायापर्यंत नम्र होऊन चालत गेलेला. घोड्यावरून जाणारे चौऱ्याऐंशी खेड्यांचे जमेदार सुद्धा या घाटीवर तीनशे वर्षांपासून पायउतार होत असलेले. या रामेश्वराच्या घाटीची परपरा थोरच.

घाटी उतरून खाली रामेश्वराच्या प्राकारात आल्यानंतर त्या पुरातन ग्रामदैवताच्या पवित्र गंभीर व्यक्तिमत्त्वाने आपण भारल्यासारखे होतो. या मंदिराची मन खिळवून टाकण्याची शक्ती अद्भुत भासते. त्याची जागृती आपल्याला साक्षात पहिल्या दर्शनातच जाणवते. दोन्ही बाजूला प्रशस्त धर्मशाळा ( अग्रशाळा ). बाहेर चिरेबंदी फरशा बाजूला रहाटाचा विहार, आत तुडुंब भरलेले पाणी. बाजूला नौबतीचे उच्च मनोरे

आणि सभोवार गर्द झाडावळ. लाल कौलांची ठेंगणी प्रेमळ घरे. काही कॅवळीसुद्धा, तर काही पक्की चिरेबंदी. श्रीरामेश्वर तसा गावातच वस्तीला आहे.

हातपाय धुऊन आणि शुचिर्भूत होऊन पुढे गेल्यावर लागतो भव्य सभामंडप. त्या पलीकडे गर्भागार. आत नंदादीपाच्या स्निग्ध उजेडात डोळे रोखून पाहणारी ती घनगंभीर, काहीशी उग्र भासणारी सनातन मुद्रा—श्रीरामेश्वराची! वरचा लखलखीत पिवळी मुखवटा नि त्याभोवती वेटोळे घालून बसलेला फणाधारी भुजंग—त्याच्या आत एरवी भक्तांना न दिसणारी सजीव स्वयंभू पिंडी—श्रीशंकराचे जागृत स्थान—श्री संस्थान रामेश्वर! गाभाऱ्यातील त्या मूर्तीकडे टक लावून पाहताना कधी आपले डोळे मिटतात नि एक अनामिक तंद्री लागते कळत नाही समोर भक्तिभावाने नम्र होऊन उभ्या राहिलेल्या भाविकाला क्षणार्धात आपल्याशी तन्मय करणारे हे विलक्षण दैवत आहे. या मंदिराच्या परिसरातील नीरव शांतता केवळ अनुभवायलाच हवी!

मालवणी मुलखातील सर्व देवस्थानात श्री रामेश्वर सर्वांत श्रीमंत देव. त्याचे सर्व जडजवाहर तिजोरीतून काढून रामनवमीसारख्या वार्षिक उत्सवाला जेव्हा त्याचा साज त्या मूर्तीला चढवतात आणि पालखीतून श्रींची मिरवणूक निघते, तेव्हा डोळ्याचे पारणे फिटते. हजारो भक्तजनांच्या हेलावत्या सागरातून ती शोभिवंत, आसनस्थ श्रींच्या अवतारामुळे मूर्तिमंत श्रीमंत अशी पालखी पुढे सरकू लागते तेव्हा या संस्थानाधिपतीचे वैभव भक्तांच्या डोळ्यात मावत नाही.

श्रीरामेश्वराच्या दयेची पाखर उभ्या गावावर पसरलेली आहे, ही गावकऱ्यांची श्रद्धा आणि त्या श्रद्धेसाठी काहीही करण्याची तयारी. दर तीन किंवा पाच वर्षांनी या गावात एक अद्वितीय प्रकार घडून येतो, नि तोही रामेश्वराच्या कौलानुसार. त्या दिवशी सारा गाव 'फुटतो' आणि प्रत्येक घर आपापले चबुगबाळे घेऊन बाहेर-गावी जाऊन राहते. गावात नावालाही चिटपाखरू उरत नाही! या प्रथेला इथे 'गावपळण' असे म्हणतात. सारा समाज देवाचे नाव घेऊन गाव सोडतो. मग गावाबाहेरच्या रानावनात तात्पुरत्या झोपड्या, काढून उभारली जातात. काहीजण शेजारच्या गावातील घरांचा आधार घेतात. तीन दिवसपर्यंत गावात माणूस काणूस, गुरू-वासरू, फार काय, शेळी-कोंबडीसारखा जिता जीवसुद्धा राहात नाही फक्त आसन्न-मरण अथवा आसन्नप्रसवा कुणी नाईलाजास्तव गाव सोडू शकत नसले तर त्याला श्रींच्या प्रसादाने, परवानगीनेच गावात राहण्याची खास परवानगी मिळते! १९७७ साली 'गावपळण' झाली तेव्हा मी हा अद्‌भुत प्रकार पाहण्यासाठी आचऱ्याला मुद्दाम गेलो होतो. भर दुपारच्या प्रहरी साऱ्या गावात सन्नाटा! मग या देवळात गेलो. तेथे मालवणहून आलेले तालुक्याच्या ठाण्याचे डझनभर पोलीस देवाची राखण

करीत असलेले आढळले! गावाची जो देव राखण करतो, त्याच्या पहाऱ्यासाठी पोलीस आलेले पाहून मला नवल वाटले, पण पोलीस म्हणाले, ' आम्हाला इथ काही काम नाही. फक्त सरकारी हुकूम म्हणून आम्ही इथ आलो ! ' ही त्रैवार्षिक ' गावपळण ' आचरे गावात गेली तीनशे वर्षे तरी चालू आहे, पण कधी पाच पैशाची चोरी झाल्याचा दाखला नाही. तरीही अलीकडील काळात सरकारला धोका पत्करवत नाही एवढेच. त्या सबंध रिकाम्या गावात ते पोलीस भुतासारखे दांडा आपटीत वेळ घालवण्यासाठी उगाच भटकत होते तेवढीच काय ती जाग!

कधी काळी म्हणे या गावात भुतानी उच्छाद माडला, तेव्हा लोक हैराण झाले. मग रामेश्वर म्हणाला, ' या भुताना तीन दिवस गाव मोकळा करून द्या—तोपर्यंत त्याना ' बाधून ' ठेवतो ! ' मग रामेश्वराने भुताना ' बाधून ' ठेवून त्याचा बदोबस्त केला. पण रामेश्वराच्या आज्ञेप्रमाणे गावकऱ्यांना तीन किंवा पाच वर्षांनी एकदा गाव ' भुताच्या ताब्यात ' देण्यासाठी ' गावपळण ' घालावी लागते

मला मात्र भुताच्याऐवजी गावात त्यावेळी पोलीसच दिसले होते. भुते कदाचित अदृश्य स्वरूपात वावरत असावीत ! मग मी श्रीरामेश्वराचे दर्शन घेतले. रामेश्वर स्थिर मुद्रेने पहात होता. त्याचे दर्शन मन तल्लीन करणारे होते, एवढे निश्चित. मग गावात हिंडायला निघालो मनुष्यवस्ती नसलेला तो गाव उजाड वाटण्याऐवजी नेहमीसारखा प्रसन्न आणि गजबजलेला वाटला गजबजण्यासाठी नेहमीची माणसे नव्हती तर गर्द झाडे, वेली आणि त्यावर स्वच्छद विहरणारे पक्षी. गाव बागायती होता. हिरवागार, नारळी, रातांबीच्या झाडांचा, वडपिंपळाचा, आब्या—काजूच्या बागाचा हिरवागार, पाणथळीचा नि निवात—

' गावपळण हा विलक्षण प्रकार उभ्या दुनियेत फक्त आचरे याच ठिकाणी होतो.

आचरे बंदरात पूर्वी मुंबईची बोट लागायची. गेली दहावीस वर्षे बोट थाबत नाही मालवण-वेंगुर्ल्यासारखेच हेही बंदर भकास झाले आहे. पण बदरावरील समुद्रकिनारपट्टीचे रमणीय सृष्टिसौंदर्य अजूनही पूर्वीसारखेच शाबूत आहे. स्वच्छ, शुभ्र वाळूने भरलेला किनारा, सुरूची झाडे नि फेसाळणाऱ्या लाटा सूर्यास्तसमयी तद्री लागावी असा देखावा !

बंदर सोडून आपण गावात शिरलो की गावाची संपन्नता लक्षात येते. सारस्वत, ब्राह्मण, वैश्य, भडारी नि गाबीत समाजाची बहुसख्य घरे. शिवाय मराठा समाज आहेच. गुरव हे देवाचे पुजारी. पण रामेश्वराच्या मानकऱ्यात कानविंदे घराण्यातून दर रामनवमीला येणाऱ्या रघुवीरामुळे त्या घराण्याचा मान मोठा. शिवाय गुळगुळे, सुखठणकर, सांभारी, करडे, मिराशी ही आचऱ्याची प्रख्यात घराणी, बाहेरच्या मुलखात ख्यातनाम झालेली, पण गावाची खरी परपरा कलेच्या क्षेत्राने रसरशीत

केलेली. इथले तबलापटू वसंतराव आचरेकर, भार्गवराम पांगे, भार्गवराम आचरेकर, चित्रकार मुरलीधर आचरेकर ही नावे दिगंत कीर्तीची. रामनवमीच्या उत्सवाला त्यांनी आपल्या देवाच्या दरबारात गाण्याबजावण्यासाठी कित्येक नामवंत कलाकार आणले. कुमार गंधर्व, पु. ल. देशपांडे, वसंतराव देशपांडे, प्रभाकर कारेकर, जितेंद्र अभिषेकी ही मंडळी या आडबाजूच्या गावी आपापली कला सादर करण्यासाठी यावी, हा रामेश्वराचा प्रसाद आणि त्याच्या पायरीवर लहानाचे मोठे झालेल्या या गावातील कलाकाराचा थोरपणा ! या गावाला गाण्याबाजवण्याचे जणू बाळकडूच मिळालेले. आजही घराघरातून नाटकात रंगणारी आबालवृद्ध मंडळी आढळतात. तबल्याचा ठेका नकळत धरणारी नि बोल बोल म्हणता सुरात गाऊ लागणारी इथली रसिक, दर्दी माणसे. इथल्या रसिकत्वाची एक हकीकत इथलेच दादा ठाकूर मोठ्या अभिमानाने सांगतात. कुमार गंधर्वांचे गायन रामनवमीच्या उत्सवात श्रीरामेश्वराच्या सभामंडपात चालले होते. संध्याकाळ झाली होती. कुमारांचा पूरिया धनश्री ऐन रंगात आला नि एकाएकी वीज गेली ! कुमारांना कशाचेच भान नव्हते. ते तल्लीन होऊन गात होते. श्रोतेही तल्लीन झाले होते कुमारांनी रागदारी संपवून डोळे उघडले नि त्याचक्षणी गेलेली वीज चमकली आणि सगळीकडचे दिवे पेटले. सभामंडपात पूरिया धनश्रीमध्ये बुडालेल्या मर्मज्ञ श्रोत्यांनी कडाडून टाळी दिली. ती जशी कुमारांच्या गायकीला होती, तशीच त्यांच्या गाण्यावर जणू लुब्ध होऊन पुन्हा अवतीर्ण झालेल्या लहरी विजेलाही ! दादा ठाकूर आचरेकरांमधल्या रसिकत्वाची आणखी एक आठवण सांगतात. गावात आप्पा भज्जी नावाचा एक भिकारी होता. भिकारी असला तरी गाण्याचा मोठा षोकीन! रामनवमीला उत्सवात होणारी गाणी मन लावून ऐकणारा नि वाहवा म्हणत स्वतःशी मान डोलावणारा. एकदा एका प्रख्यात गायिकेचे गाणे चालले होते नि ती समेवर येताना किंचितशी अडखळली. आचऱ्याच्या कानसेनांनी ती बारीकशी चूकही मनात घालून ठेवली. त्यात भिकारी आप्पाही होता. दुसऱ्या दिवशी आप्पा कुणा तालेवाराच्या दारात भीक मागण्यासाठी उभा राहिला, तेव्हा त्याला 'मग ये' असे त्या घरमालकाने सांगितले, कारण कालची गायिका त्या घरात पाहुणी आली होती ! फटकळ आप्पा लगेच बडबडून गेला—'माकां मगे ये म्हणणारच तुमी ! मिया भिकारी मा ! पण काल समेवर येताना आडखळलेल्या या गायिकेक च्यापाणी करताना कान आम्यार आसत मां तुमचे ?'

इथले फाटक्या लंगोटीवाले भिकारीसुद्धा 'समेवरचे अडखळणे उमजणारे ! इथल्या ग्रामस्थांना गावातील वार्षिकाचे नाटक व रामनवमी ही पर्वणी. श्रीरामेश्वराने या गावाला सतत एकत्र ठेवलेले आहे. गावोगावची भांडणे, कलागती इथे फारशी आढळत नाहीत. रामेश्वराचे कार्य म्हटले की सारे गावकरी झटदिशी एक होतात. मग ती रामनवमी असो, गावपळण असो, डाळपस्वारी असो की महाशिव-

रात्रीला रामेश्वराची स्वारी कुणकेश्वराला भेटीसाठी जायची असो! रामेश्वर-कुणकेश्वराची भेट म्हणजे केवढा सोहळा! या प्रसंगी फक्त आचरे गावच एकत्र होतो असे नव्हे, तर आचऱ्यापासून कुणकेश्वरपर्यंतचे सारी गावे या महान वारीमध्ये सामील होतात आचऱ्याच्या उत्तरेला पाच कोसापलीकडे समुद्रकिनारी वसलेला श्री कुणकेश्वर हा रामेश्वराचा भाऊ. भावाभावाची भेट पाचदहा वर्षांनी महाशिवरात्रीच्या पर्वणीला होत असते हजार-दोन हजार माणसे वारीबरोबर भाविकपणे चालत असतात. या अलोट जनसंमर्दाबरोबर ढोल, ताशे, सनया याची धुमश्चक्री चालू असते. गरनोल, भुईनळे, आकाशबाण, चक्रे हे दारूकाम सुरू असते आणि श्रीरामेश्वराचे तरंग हाती घेतलेले 'खाब्धुरी' वाद्याच्या तालावर डौलात पावले टाकीत चालत असतात. वाटोवाट पेणी होतात वाटेतल्या गावोगावचे लोक देवाचे पाय धुतात धुळीत साष्टांग दडवत घालतात सद्गदित होत स्वागीत सामील होतात. भालदार, चोपदार, ढाल-तलवार घेतलेले दरकदार, बारापाचाचे मानकरी, अब्दागीर, निशाणे या सर्व संस्थानिकी थाटाच्या ऐश्वर्यानिशी श्रीदेव रामेश्वरांची ही कुणकेश्वर यात्रा डौलात चाललेली असते.

पंढरपूरला जाणाऱ्या दिंड्या आणि ही कोंकणच्या राजाची स्वारी, यामध्ये भक्तिभाव एकच असला तरी ऐश्वर्याचा दिमाख वेगळा. सौंदर्य नि मानापमान याची कळा वेगळी. गरीब कोंकणचे लखलखीत मन श्रीमंत होऊन येथे प्रगट होताना दिसते नि अभिमानाने ऊर भरून येतो.

आचरे गावाला श्रीरामेश्वराने असे सर्व बाजूनी, सर्व प्रकारांनी आपल्या पाशामध्ये गुलवून ठेवलेले आहे. देवळाच्या कुठल्याही अंगाने निघाले तरी परतणारी वाट पुन्हा रामेश्वराच्याच दिशेने चालू लागते असा येथे रामेश्वराचा प्रभाव.

बाजारपेठेतून वर आले की दक्षिण दिशेला जाणाऱ्या रस्त्याने निघाल्यावर हुतात्मा कोयंडे याचे सुरेख स्मारक दृष्टिपथात येते मालवणी मुलखात तीन हुतात्मे स्वातंत्र्य-संग्रामात कामी आले. मालवणला प्रभाकर रेगे, करूळला भास्कर कर्णिक आणि आचऱ्याला कोयंडे! गावकऱ्यांना आपल्या सुपुत्राचा यथार्थ अभिमान. हमरस्त्यालाच हे स्मारक उभे आहे. तिथून पुढे गेले की वायंगणी ओलांडून सरळ रस्ता कालावलीच्या नदीला भिडतो. पूर्वी हा डोंगराळ चढउताराने भरलेला रस्ता लाल धुळीची झूल पांघरून होता. अलीकडे झगमगणारी वीज नि डांबरी रस्ते यानी इथले रूप थोडे बदलले आहे.

कालावलची नदी म्हणजे सह्याद्रीत उगम पावलेली गड नदी. कणकवली, मालडी, वाडिवडे, मसुरे करीत ती रुंद प्रशस्त होत कालावल-वायंगणीवरून पुढे सर्जेकोटला जाऊन अरबी समुद्राला मिळते. इथून पलीकडे हडी गावचे सुंदर दृश्य दिसते.

बाजूला नदीच्या पात्रात उभे असलेले ' जुवे ' आपली नजर वेधून घेते.

आता कालावलीच्या खाडीवर पूल झाला आहे. इथून मालवण हाकेच्या अंतरावर. आचऱ्याहून निघाले की पानाला चुना लावीपर्यंत मालवणास पाऊल टाकायचे. पूर्वी पन्नास मैलाचा ' भोवाडा ' होता.

आचऱ्याहून दुसरा रस्ता उत्तरेला जातो तो थेट देवगडला. या रस्त्यावरील नदीवर पूर्वी पूल नव्हता. तोही आता झाल्यामुळे आचरे–देवगड वाहतूक एका पाळणात होऊ लागली आहे. कुणकेश्वरला जायचा रस्ता हाच. मिठबाव, नारिंग्रे, मुणगे, पोयरे, दाभोळे ही वाटेवरची गावे. पश्चिम किनाऱ्याला भिडून समांतर हा रस्ता धावतो. डावीकडील बाजूला समुद्राला भिडलेली, नारळी–पोफळीत गुरफटलेली आणि लाल मातीत रंगलेली गावे नि उजवीकडे काळ्या कातळाचा अथांग ' सडा ' जिथे काळा कातळ नसेल तिथे तांबडी शेंदरी, जांभ्या दगड व त्यावर ठिकठिकाणी गडगे घालून केलेली कुडणे नि आत हिरव्यागार पालवीने रसरसलेली, तरतरीत हापूसची कलमे. जगप्रसिद्ध देवगड हापूस तो हाच !

याच रस्त्यावर अवचितपणे मला ते जगावेगळे सौंदर्यस्थळ भेटले. खरे तर ते ज्या कुणी प्रथम शोधून काढले त्याला कितीही मोठे पारितोषिक दिले तरी भरपाई होणार नाही. कणकवलीचे मित्र सुरेश कोदे हे माझ्यासारखेच कोंकणात गावोगाव भटकणारे. कुठे एखादा रमणीय ' स्पॉट ' दिसला की तो न विसरता मला सांगणारे त्यांनीच पोखरबाव दाभोळ्याची ही विलक्षण सुंदर जागा मला दाखवली.

दाभोळे गावची ' पोखरबाव ' ही वाडी. पोखरून काढलेली बाव, ती पोखरबाव. रस्त्याच्या मध्येच डावीकडे एक छोटेखानी श्री गणेशाचे मंदिर उभे आहे. देवगडच्या गोगटयांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केला नि खाली कातळात पोखरून काढलेल्या त्या बावीवर जाण्यासाठी पक्की चिरेबंदी फरशी एखाद्या जिन्यासारखी बांधून काढली. गणपतीच्या मंदिराच्या पार्श्वभागी सुमारे दोन पुरुष खोल पायऱ्या उतरून जाताच वरच्या काळ्याकभिन्न कातळातून वाहत आलेला तो झुळझुळ वाहणारा, थंडगार, स्फटिकासम स्वच्छ पाण्याचा संथ झरा आपल्या नजरेला पडतो नि भूल पडल्यासारखी आपली पावले खिळतात. खडकाच्या कपारीतून उमटलेल्या प्रवाहाचा निवळशंख डोह नि त्यावर सावली धरणारी झाडे. साक्षात बालकवींची ' औदुंबर ' कविता येथे चित्रासारखी प्रगट झालेली आहे. तोंडवळीच्या त्या डोहाची थेट आठवण करून देणारी !

कितीही वेळ गेला तरी त्या लोभसवाण्या जागेवरून हलावेसे वाटत नाही.

रानावनातील इतकी सौंदर्यस्थळे मी मुद्दाम जाऊन पाहिली आहेत. पण पोखरबावीचे हे प्रसन्न सौंदर्यस्थळ अद्याप कसे भेटले नव्हते याचेच नवल वाटते !

मग तीनचार मैलाची चाल. त्यानंतर थोडी डावीकडे मुरड मारली की दोन्ही

बाजूनी हापूस आंब्याच्या बागामधून तो अरुंद रस्ता पुढे जाऊ लागतो, त्या उतारावरून घरगळल्यासारखे खाली जावे. क्षणार्धात आपण कुणकेश्वरच्या आवारात येऊन ठेपतो

साळस महालातले कुणकेश्वर हे आचऱ्याच्या रामेश्वरासारखेच जागृत आणि स्वयंभू दैवत. समुद्राच्या काठावर पूर्वाभिमुख अशी ही जांभ्या दगडाची रुजीव पिंडी शेकडो वर्षांपूर्वी कुणीतरी पाहिली समुद्रातून चाललेल्या अरबी कोठ्याच्या मुसलमान तांडेलाने वादळात सापडल्यावर किनाऱ्यावर असलेल्या दैवतेची प्रार्थना केली की माझे रक्षण कर किनाऱ्याला लागेन तिथे तुझे मदिर बांधीन ! कुणकेश्वराने अरबाला वाचवले. अरब शब्दाला जागला नि त्याने खूप पैसा खर्च करून हिंदूच्या देवाचे हे देऊळ इथे बाधून दिले, अशी आख्यायिका सागतात. पण एक गोष्ट खरी, ती ही की, कुणकेश्वराच्या मदिराच्या आवारातच एक जुनी मुसलमानी स्थापत्यशास्त्राची खूण आहे. दर्गा किंवा मसजीद. वर गोल घुमट, आत कबर आणि ही दगडी इमारत श्री कुणकेश्वराच्या मुख्य देवळाला जवळ जवळ भिडूनच उभी आहे यामागील तपशील पुराव्यानिशी सागणारा माहीतगार तिथे कुणी उपलब्ध नाही, याची रुखरुख वाटते.

श्री कुणकेश्वराचे भव्य मदिर प्राचीन आहे. दगडी बाधणीचे भक्कम. बारीकसारीक कलाकुसरी फारशी नाही; पण एक अगभूत देखणेपण या उभ्या इमारतीला आहे. पायरीपासून कळसापर्यंत सर्व कसे आखीव-रेखीव प्रमाणबद्ध. सभामडपातून आत जाताच गाभाऱ्यात नंदादीपाच्या मद प्रकाशात मुखवटाधारी श्री कुणकेश्वर स्थिरावलेला दिसतो मी गेलो तेव्हा मुखवटा काढून ठेवलेला होता मला मूळच्या स्वयभू पाषाणाचे दुर्लभ दर्शन घडले. जांभ्या दगडातील चिऱ्यांची अशी पिंडी मी प्रथमच पहात होतो वरील अभिषेकपात्रातून अभिषेक चालू होता. बिल्वदलाचा सभोवार खच पडला होता नि ती माझ्या वाडवडिलापासून हृदयात साठवलेली प्राचीन पवित्र पिंडी पाहताना माझ्याही हृदयात अननुभूत सवेदना जाग्या होत होत्या.

श्री कुणकेश्वराचे नि आचऱ्याच्या रामेश्वराचे नाते असते, तसेच आमच्या करूळ गावच्या श्रीरामेश्वर या ग्रामदैवताचेही लागबांधे कुणकेश्वराशी आहेत. करूळ गावचे ‘ अवसर ’ पिढ्यान् पिढ्यापासून महाशिवरात्रीला कुणकेश्वराला चालत आलेले आहे नि त्यांच्याबरोबर आमचे श्रद्धाळू पूर्वज, रामेश्वर–कुणकेश्वर यांचे नाव मुखी घोळवत कोसामागून कोस जमीन तुडवीत येथवर आलेले.

मदिराच्या दक्षिणेकडील पायऱ्या उतरून खाली येताच एक भव्य निसर्गदृश्य डोळ्यांसमोर उभे रहाते. दक्षिणोत्तर बांधलेली उंच दगडी भिंत, खाली पसरलेला अथांग सागर, शुभ्र मऊसूत वाळूने ओतप्रोत भरलेला प्रदीर्घ किनारा, स्थावर ओढून ठेवलेली एकाद दुसरी होडी. त्यापलीकडे दक्षिण दिशेला छोट्या टेकड्या, कातवणवाडीचे पठार. कुणकेश्वर या भव्य देखाव्याला पाठीशी घालून ध्यानस्थ बसला आहे.

रुद्राच्या आवर्तनांसारखी सागराची घनगभीर गाज अविरत कानी येत आहे

सबंध वर्षभर कुणकेश्वर ही गाज ऐकत एकटा बसलेला असतो नि मग माघ महिन्यातील कृष्ण त्रयोदशी उगवते. महाशिवरात्रीचा हा दिवस, श्री कुणकेश्वराचा वार्षिकोत्सव सारा देवगड तालुका या तीर्थक्षेत्रावर लोटतो गावोगावची ग्रामदैवते आपापले ' तरंग ' अवसर वारे सूत्रासकट धावत, गर्जत, झेपावत कुणकेश्वरी धाव घेतात धूळभेटीची कडकडून मिठी होते. शिवकळा अंगी सचारलेले ' झाडये ' कुणकेश्वराच्या सभामंडपात सद्‌गद्‌ल्यासारखे थरथरत उभे राहतात, मग धावत जाऊन देवाला ' शेव ' घालतात. हातातला ' खांब ' गरगरत खाली झुकतो. पीतांबराचा भरजरी शेव कुणकेश्वराच्या माथ्यावर क्षणभर पताकेसारखा हलतो नि अवसर त्याच वेगाने मागे फिरतो देवगड-कणकवली भागातली सर्व महत्त्वाची ग्रामदैवते नियमितपणे आपल्या साऱ्या लवाजम्यानिशी कुणकेश्वरी फेरी करतात. अमावास्येला समुद्रस्नान करून कुणकेश्वराचा निरोप घेतात. हे तीन दिवस इथे तुडुंब जत्रा भरते. सारा गाव गजबजतो. बाहेरून आलेल्या पैपाहुण्यानी, देवादिकांनी आणि जतरकरानी! ज्याना घरा-देवळात जागा मिळत नाही, ते माडाआंब्याच्या बागायतीत तीन धोंडे पेटवून चुली मांडतात. भात आमटी शिजवतात. कुणकेश्वराला बेल वाहतात नि कृतार्थ होऊन परत फिरतात.

दक्षिण कोंकणातल्या ग्रामदैवतांच्या या वार्षिक स्वाऱ्या थेट पंढरपूरला जाणाऱ्या पालख्यांची आठवण करून देतात. भक्तिभावाचा उमाळा तोच वाटचालीचे कष्ट तेच, टाळ-मृदुगाऐवजी इथे ढोलताशे व सूरसनई. पालखीऐवजी ' तरंग-निशाणे-अब्दागिरे ' आणि पांडुरंगमाऊलीऐवजी कुणकेश्वरमाऊली किंवा कुणकोबा! जसा विठोबा!

रामेश्वर-कुणकेश्वर हे मला वाटते, मालवणी मुलखातले पांडुरंग-खंडोबाचे अवतार असावेत खेड्यापाड्यांतल्या मराठमोळ्या भाविकांशी त्यांच्या हृदयाचे भावडे नाते जुळलेले आहे.

महाशिवरात्रीची यात्रा तीन दिवसांनतर ओसरते, सारा परिसर रिकामा होतो. पुन्हा पश्चिमेचा सागर गाजू लागतो, त्याची रुद्रावर्तने सुरू होतात आणि निर्गुण, निराकार कुणकेश्वर पुनश्च ध्यानस्थ होतो.

# हापूस आंब्याचे गाव : देवगड

६. देवगड म्हटले म्हणजे 'बंदर' आठवते माझ्या मनात तरी देवगड म्हणजे मध्यरात्रीला बोटीला भेटणारे एक झोपाळू बदर अशी प्रतिमा लहानपणापासून कोरलेली आहे. खरे म्हणजे आज देवगड पूर्वीचे राहिलेले नाही. बदरापेक्षाही अधिक किती तरी गोष्टी या गावात आज रहिवास करून आहेत पूर्वी कोर्ट आणि ट्रेझरी होती. दीपगृह होते. हायस्कूल होते. कालेंकरांचे हॉटेल होते ललिताची आणि कामताची खाणावळ होती. सड्यावर कोदे वकिलांचा एकुलता एक बगला होता. बदरात काही तारवे, होड्या नि चुकार लॉंची होंग्या जगन्नाथशेट पारकराची लॉंच थेट मुंबईपर्यंत मजल मारायची आणि त्यापूर्वी बाबुरावशेट खाडये देवगडचा ताग मचव्यात भरून अमेरिकेला निर्यात करायचे आणि देवगडचे बदर गोवा लाईनच्या बोटीपुरते मध्यरात्रीच्या सुमाराला आणि दुपारी चहाच्या वेळेला थोडेफार गजबजायचे.

आता देवगडचे रूप अतर्बाह्य बदलले आहे दिवसेंदिवस बदलत आहे ते आता नुसते बदर राहिलेले नाही. पूर्वीचे कोर्ट आणि ट्रेझरी ही जुनी मिरास आजही आहे. पण 'देवगड कोर्ट' म्हटले की थेट ब्रिटिश राजवटीतला इतमाम आठवतो इथले कोर्ट नि इथली अशिले याची परपरा फार जुनी. उभ्या देवगड तालुक्यातले जमिनीचे घडेवाटपाचे, खोताकुळाचे दिवाणी दावे या दगडी इमारतीच्या इभ्रतदार कोर्टाने ऐकले, सुनावले आणि निकाली काढले. इथे फौजदारी वकिली फारशी चालली नाही गुन्हेगारी, खून, मारामाऱ्या यांचे कोंकण प्रांताला मुळातच अपथ्य, त्यामुळे तसली खेकटी देवगडच्या कोर्टाला कधी बाटवू शकली नाहीत, पण दिवाणी दाव्याच्या कज्जेदलालांनी नि वकिलांनी इथे आपले बौद्धिक कौशल्य पिढ्यान् पिढ्या पणाला लावले मराठे, रानडे, कोदे, वळंजू ही इथली नामवत वकील मंडळी काही घराण्यात तर वकिलीचा वारसा पिढ्यान् पिढ्या चालत आलेला !

तीच गोष्ट इथल्या मामलेदार कोर्टाची नि ट्रेझरीची. देवगड तालुक्यात पूर्वी कणकवली महाल समाविष्ट होता. कणकवली महालातील भिरवडे, नरडवे, तरंदळे, नाटळ ही गावे पलटणवाल्याची तर देवगड तालुक्यात पोलीसवाले अधिक. या दोन्ही

पेशातील पेन्शनर्स पेन्शनीसाठी दरमहा बिनचूक देवगडच्या ट्रेझरीमध्ये थव्याथव्यानी जमा होत. कामताच्या खाणावळीत ताज्या माशांचे साबारे नि भात जेवीत.

पण तो जमाना मागे पडला. देवगड मोटार युनियनच्या पितळी दरवाज्यांच्या हाफटन मोटारी नि त्या चालविणारे काशीनाथ तेली, मामा पोयरेकर ही ड्रायव्हर मंडळीही एसटीचे दिवस सुरू होताच अस्तंगत झाली देवगडच्या सड्यावर एसटीचा भव्य डेपो उभा राहिला, वर्कशॉप सुरू झाले नि तालुक्याच्या कानाकोपऱ्यातल्या गावासाठी एसटी गाड्या सुटू लागल्या बंदराचीही दशा पालटली. आम्ही लहानपणी या बंदरात बोटीची वाट पहात ताटकळत असायचे, पॅसेंजरासाठी एक अरुंद शेड बंदरात उभी असे. तिथे चार लाकडी बाकडी, त्यात दिवस–रात्र बुजबुजणारे ढेकूण. ग्रामपंचायतीचे लावलेले चार मिणमिणते कंदील, कस्टमच्या कचेरीजवळ भगभगणारी गॅसबत्ती आणि खपाटे वल्हवणारे खलाशी, त्यांचे ' हवेस आर्या ऽऽ ' हे न कळणारे शब्द. भर मध्यरात्री भोंगा वाजवीत नि किल्ल्यावरील लाइट हाऊसचा फिरता झोत अंगावर घेत बंदरात शिरणारी बाँबे स्टीम ॲण्ड नॅव्हिगेशन कंपनीची ' हिरावती ' किंवा ' चंपावती ' ही जुनीपुराणी अनुभवी–कोंकण किनाऱ्याच्या बारा बंदरांचे पाणी प्यालेली बोट, दूर अंतरावर समुद्रात उभी रहायची मग रुंद पोटाचे खपाटे डुचमळत बोटीला भिडायचे आणि मुंबईहून ओकत, जागरण करीत, पेंगत देवगडपर्यंत आलेले उतारू धडपडत त्या खपाट्यात उतरायचे. बोंबील–बटाटीचे ओझे नि पत्र्याच्या ट्रंका हे मुंबैहून येतानाचे सामान तर सुपे–रोवळ्या, सुके बांगडे, शेंगलाच्या शेंगा, आंबे, फणस ह्या वस्तू जातानाच्या ओझ्यामध्ये न चुकता असायच्या.

देवगड बंदराची एकेकाळी भलतीच ऐट होती तसे पाहिले तर कोंकणकिनाऱ्याची सारीच बंदरे तेव्हा मिजासखोर होती. दिवसा–रात्री बोटी ये–जा करायच्या. जयगडपासून वेंगुर्ल्यापर्यंत सारीच बंदरे खाऊनपिऊन टुमटुमीत होती.

पण लवकरच एकामागून एक बंदरे बंद पडू लागली त्यातल्या त्यात देवगड बंदर नशिबवान ! अजून तरी बोटींनी त्या बंदराशी फारकत घेतलेली नव्हती पण श्रीलंकेमधल्या यादवीयुद्धामध्ये भारतीय सैन्याची रसद पोचवण्यासाठी सरकारला कोंकण किनाऱ्यावरच्याच बोटी हव्या झाल्या नि रडतखडत चाललेली मोगल लाईन्सही कायमची बंद झाली ! देवगड बंदरही रिकामे पडले, मग एसटीच्या रातराण्यानी चाकरमान्यांना ओढून नेले.

पण बोटीची गोष्ट सोडली तर देवगड बंदर दुसऱ्या गोष्टींनी भरभराटले आहे. पूर्वी पाचपंचवीस गावठी होड्या मासेमारीला बाहेर पडत, शेपन्नास वावांपर्यंत भटकून येत. येताना दोनचार टोपल्या पेडवे, बांगडे, चिंगुळी किंवा फारच झाले तर सरंगे–इसवणी घेऊन येत. आता यान्त्रिक ट्रॉलर्स इञ्जनानी झाले आहेत. कोयडे,

जोशी, परब या गावातल्याच मंडळींनी यांत्रिक होड्या बनविण्याचे कारखाने काढले आहेत. सरकारी कर्ज आणि डिझेल घेऊन सगळी मच्छीमार मंडळी आता नायलॉनच्या जाळ्यांनी पूर्वीपेक्षा खोल आणि दूरच्या पाण्यात जाऊन मच्छीमारी करतात. टनावारी चिंगूळ बंदरात ओतली जाते तशीच बाकीची चवदार मासळी! देवगड बंदरातील मासळीची मोठी उलाढाल पाहून थेट श्रीवर्धनपासून तो गोव्यापर्यंतचे ट्रॉवलर्स या बंदराकडे धाव घेतात अपरंपार मासळी मारतात. या सगळ्या पैशामुळे देवगड बंदराची कांती आता एकदम सुधारली आहे. व्यापारउदीम दणदणीत चालू आहे. सायंकाळी बंदरात ट्रॉवलर्सची एकच गर्दी दिसते आणि देवगडच्या रस्त्यावरून फिरणारे बारा बंदरातले मच्छीमार, बाजारात नोटा आणि नाणी यांची आता चंगळ सुरू आहे.

तरीपण इथली वेचक मासळी इथल्या मार्केटात मिळत नाही. समुद्रात परस्पर तिची विक्री होते, ट्रक भरले जातात आणि थेट ते मुंबईला रवाना होतात. तिथून आणखी कुठल्या कुठल्या परदेशात इथला मत्स्यावतार जात असेल ते एक परमेश्वरच जाणे! एक गोष्ट खरी की, या नव्या धंद्याने देवगड बंदराला बरकत आली आहे.

जशी मासळी तसा हापूस आंबा!

मुंबईच्या क्रॉफर्ड मार्केटात 'देवगड हापूस' एवढे नाव उच्चारले तरी चोखंदळ गिऱ्हाईके कान टवकारतात. हापूस आंबा रत्नागिरी–सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या किनारपट्टीत सगळीकडेच होतो. पण देवगडचा कातळावरचा हापूस म्हणजे बावनकशी सोने! त्याचा वर्ण, त्याची कांती, त्याचा आकार, त्याचा सुवास आणि त्याची चव याला हापूसच्या पंगतीत तोड नाही! हे फळ म्हणजे देवगडचे मूर्तिमंत वैभव आहे आणि त्याने देवगड परिसराला अक्षरशः सोन्याचा स्पर्श करून श्रीमंत बनवले आहे. नेमकी किती कोटींची–लाखांची नव्हे कोटींची–उलाढाल या फळातून इथे होते हे गुपितच आहे; पण गेल्या दहापंधरा वर्षांमध्ये फणसगावापासून विजयदुर्ग–वाड्यापर्यंतचा सर्व मोंड–बापर्ड्यांचा मुलूख अणि शिरगावपासून जामसंड्यापर्यंत आणि खाली थेट किंजवडे–पोयऱ्या–मिठबावीपर्यंतचा लत्ता हा सर्व नव्या रसरशीत कलमांनी हिरवागार बनलेला आता दिसू लागलेला आहे. जानेवारी–फेब्रुवारीमध्ये ताज्या मोहराच्या उन्मत्त सुगंधाने हा परिसर घमघमून जातो आणि पाठोपाठ जमिनीपर्यंत लगडलेल्या हिरव्याकंच कैऱ्यांनी प्रत्येक हापूसचे कलम भरगच्च होते. पाहणाऱ्याचे डोळे देवाची ती कृपा पाहून तृप्त होतात! हापूसची कलमे लावणे हा आता इथल्या लोकांचा छंद बनला आहे. पूर्वी कुठे कुठे कातळावर चार कलमे चुकार दिसत. आता कातळावर छोटे सुरुंग लावून हाताहातावर कलमे लावण्याची अहमहमिका चालू आहे. त्यात पाचपंचवीस कलमांचे मालक असंख्य. पण जुने बागायतदार गोगटे,

पारकर, मराठे, इत्यादी खुद्द देवगडचे आणि आजूबाजूच्या गावांतून असलेलेही बरेच आहेत त्यांच्या हाती येणारे चलन डोळ्याना दिसते; पण त्यांना त्यासाठी वर्षभर करावी लागणारी अखंड मेहनत फारशी प्रसिद्ध नाही. मासळी काय किंवा आंबा काय, धनदायी पिके आहेत, पण त्यांना अपरंपार कष्ट हवेत. देवगडच्या काळ्या कानळावर पाय रोवून असलेली ही मंडळी जबरदस्त मेहनत करतात आणि सोने कमावतात.

कोंकण गरीब नाही, आळशी नाही, हे सिद्ध करणारे वेंगुर्ल्यासारखेच देवगड हे एक मालवणी मुलखातले महत्त्वाचे गाव—!

मासळी आणि आंबा ही कोंकणाला देवाने दिलेली पिके. कोंकणी माणसाला जशी परमुलखात गेल्याशिवाय स्वतःची आणि स्वतःच्या भूमीची खरी ओळख पटत नाही तसेच या दोन चिजांचे झालेले आहे. या चिजा साता समुद्रापार जाऊन पैसा आणू लागताच त्याची खरी ओळख कोंकणी माणसाला पटू लागली आणि आता तो ती ओळख जोपासतो आहे. देवगड नि वेंगुर्ले हा पट्टा या बाबतीत पुढारला आहे. मुंबईत राहून सुखात नोकरी करीत जन्मभूमीला दरिद्री आणि दैवयोगाने तेथेच रहावे लागलेल्या आपल्या भावंडाना आळशी म्हणून हिणवणाऱ्यांनी आता येथे यावे आणि डोळे उघडे ठेवून सारे न्याहाळावे. आपण मुंबईला जाऊन चाकरमानी झाल्याचा त्याना पश्चात्ताप होईल. देवगडचे गोगटे, मराठे, बोंडाळे; विजयदुर्गचे जामेकर, बगदादी वेलणकर आणि वेंगुर्ल्याचे चमणकर, कुबल हे श्रमदेवतेचे पुजारी आणि समृद्धीचे मानकरी आहेत. त्याना कोंकणच्या नव्या पिढीने लवून नमस्कार करावा आणि त्यांच्या मार्गाने पुढे चालावे.

देवगडची आर्थिक प्रकृती सुधारू लागताच येथे बँका आल्या, अगदी राष्ट्रीयीकृत बँका आल्या. जिल्हा बँक, भूविकास बँक या तर आहेतच. लोकाना बँक व्यवहाराची जाम सवय लागली.

देवगड गाव पूर्वीपासूनच बुद्धिजीवी. वकिली, डॉक्टरी, शिक्षकी पेशाची कुटुंबे इथे खूप. पूर्वी मुंबई–पुण्याची वृत्तपत्रे येत. आता गावातच वृत्तपत्रे निघाली. या एवढ्याशा गावात दोन साप्ताहिके व चार मुद्रणालये आहेत. आणि ती उत्तम चालतात. देवगडला बुद्धीची देणगी उपजतच आहे. या खडकाळ तालुक्यातून सोन्याच्या प्रतीची माणसे निर्माण झाली. साहित्यसम्राट न. चिं. केळकर, मामा वरेरकर, वि. वा. हडप, काकासाहेब खाडिलकर, ' दर्पण 'कार बाळशास्त्री जांभेकर, विंदा करंदीकर, शाहीर नानिवडेकर यांच्यापासून तहत आजच्या पिढीतील श्रीपाद काळे आणि अकाली दिवंगत झालेले तरुण गुणी कथाकार बाळकृष्ण प्रभुदेसाई, मंदाकिनी गोगटे, विद्याधर भागवत, उषा दातार, डॉ. भा. वा. आठवले ही साहित्यिक मंडळी इथलीच. तसेच राजकारणातील नानासाहेब गोरे, एस. एम.

जोशी, रघुनाथराव खाडिलकर, वामनराव महाडीक हे अतिरथी–महारथी मूळचे याच भूमीतले ! संगीतकार सुधीर फडके इथल्या वाड्या–फणशाचे.

खुद्द देवगड गावाने आपली विद्येची परपरा फार पूर्वीपासून लखलखीत ठेवली आहे साठसत्तर वर्षापूर्वी इथे हायस्कूल स्थापन झाले आणि उभ्या देवगड तालुक्यातील विद्यार्थी इथे शिकू लागले. टेंगशेसराच्या रूपाने या हायस्कूलला एक आदर्श प्रमुख लाभला होता, टेंगशेमास्तर फक्त शिक्षण देत नसत तर देवगडकराची सगीतकलेची अभिरुचीही समर्थपणे जोपाशीत. त्यांची पेटी ऐकणे हा एक निर्मळ आनंद होता. गोविंदराव टेंब्याचे हॉर्मोनियम वादनातले शिष्य टेंगशे आता नाहीत; पण देवगडचे मफतलाल गगलभाई हायस्कूल म्हटले म्हणजे त्याचे नाव आपोआपच मुखावर येते. या हायस्कूलने खूप गुणी विद्यार्थी दिले. जे आता विविध क्षेत्रात नाव कमावून आहेत.

या गावाचे एक वैशिष्ट्य इथे मला सागायला हवे. आपल्या गावच्या शाळेला आर्थिक मदत व्हावी म्हणून इथल्या आंबा व्यापाऱ्यांनी आणि बागायतदारानी ठरवले की बदरातून रवाना होणाऱ्या प्रत्येक आंबा पार्सलमागे चार आणे तरी हायस्कूलसाठी देणगी द्यायची आणि हा उपक्रम दर हगामात सतत चालू आहे. सहजपणे हायस्कूलला हजारो रुपयाची मदत गावकरी करतात. ही दानत विद्येच्या उपजत प्रेमातून निर्माण झाली.

आता गावात महाविद्यालयही झाले आहे. आजूबाजूच्या विद्यार्थ्यांची सोय झाली. पूर्वी देवगड–कणकवलीकरांना महाविद्यालयासाठी रत्नागिरीपर्यंत मजल मा॰ावी लागायची; नाहीतर मुबई ही कायमचीच. देवगडचे महाविद्यालय सड्यावरील प्रशस्त भूखडावर विस्तारले आहे. देखणी वास्तू आणि निसर्गरमणीय परिसर यामुळे तेथून पाऊल हलत नाही महाविद्यालयाच्या सौधावर उभे राहिले की पश्चिमेकडील सागर–क्षितिजाचे सुदर चित्र नजरेत भरते. इथून जरा खाली गेले की सदानदशेठ पारकर यांची विस्तीर्ण आंब्याची बाग लागते ही बाग म्हणजे रखरखत्या कातळाखाली गोड पाण्याचा झरा लागावा, तशी शीतळ गारेगार जागा आहे

पारकर मासळी आणि आंबा या दोन्ही वस्तूना घट्ट पकडून आहेत. त्याची बाग समुद्राला भिडते तेथे एक चिमुकली वेळा– (बीच) आहे एखाद्याच्या खाजगी मालकीचा असा निवांत, एकात समुद्रकिनारा मी अद्याप पाहिला नव्हता. देवगडला सदानद पारकरांचा हा किन॰ारा पाहून त्याचा मनोमन हेवा वाटला. खाडी–समुद्राच्या नितळ पाण्यात डुंबावे नि आबराईच्या शीतळ सावलीत खाऱ्या वाऱ्याने अग सुकवावे, तहान लागली तर चार आडसरे तोडावीत. थकल्या भागल्या जीवाला विश्रांतीसाठी आणखी कोणती जागा हवी ?

देवगड गाव पूर्वेकडून वा पश्चिमेकडून पाहिले तरी देखणे भासते. पश्चिमेकडून

म्हणजे किल्ल्याच्या भागातून येताना त्याची अपूर्वाई जेवढी नजरेत भरते, तेवढीच तळेबाजाराकडून–आमसळ्याच्या बाजूने येणाऱ्या पूर्वेकडील रस्त्याने येतानाही देवगड गाव अर्धा उचावर–सड्यावर वसलेला आहे नि बाकीचा खाली, समुद्रसपाटीला भिडला आहे. तेथील जुन्या देवगडच्या बंदरभागातील घरे जुनीच आहेत, पण घाटी चढून वर आले की नवे देवगड उठून दिसू लागते नव्या चिरेबंदी टुमदार इमारती नि रेखीव गडगे, दगडी कुंपणे. त्यात पाण्याच्या टंचाईशी मुकाबला करीत वाढवलेली चार नेटकी फुलझाडे, केळी, हापूसची कलमे.

पूर्वी देवगडचे रस्ते लालभडक होते पायवाटा गोजिरवाण्या होत्या त्यानाही लाल माती चिकटली होती त्याचे एक रसिले सौंदर्य होते. लाल चिऱ्याची घरे, लाल मुरुमाचे गडगे, लाल मातीचे रस्ते–पण आता डांबराने त्याला कालिमा फासला आहे! तरीही डांबरी रस्ता सोडला की पायाखाली येते ती लालचुटुक पानाने रंगलेल्या जिभेसारखी पाऊलवाट किंवा पाणद. देवगडचे एक वैशिष्ट्य म्हणजे पावसाळयात इथे कोंकणात सर्वत्र आढळणारा रपरपीत चिखल औषधालाही आढळत नाही. पाऊस आला की गेला. रस्ते, जमीन, अंगणे स्वच्छ. सारा चिखल उताराने समुद्रात वाहून जातो. सारे देवगड कोरडे सटसटीत.

देवगडचा किल्ला फारसा पुरातन नाही. फक्त अडीचशे वर्षांचा त्याला इतिहास आहे. अठराव्या शतकाच्या प्रारंभी कान्होजी आंग्रे यानी तो बांधला. त्यावेळी त्याच्या सभोवती समुद्राचे पाणी होते म्हणून ' जंजिरे देवगड ' असे त्याला म्हणत. पेशवाईच्या अस्तानंतर इंग्रजी राजवटीला या किल्ल्याचे फारसे महत्त्व वाटेना. त्यानी त्याची हेळसांडच केली. आजमितीला देवगड किल्ल्यावर कोणताही लक्ष वेधून घेणारा भग्नावशेष आढळत नाही. नजिकच्या सरकारी रेस्ट हाऊसच्या आवारात दोन तोफा आढळतात. गडावर खुरटी वनस्पती, खडकाळ भाग आणि गवत एवढेच आहे. जवळच रात्री चकाकता दिवा फिरवणारे दीपगृह आहे. जवळच सरकारी रेस्ट हाऊस आहे. आता नव्या विज्ञानाची खूण म्हणजे भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर प्रथमच बसविलेल्या ' पवनचक्क्या ' देवगडला लाभल्या आहेत. त्या इथून नजीक आहेत. त्याची लखलखती पाती दुरून दिसतात. देवगड हे अशा मोक्याच्या ठिकाणी किनारपट्टीला वसलेले आहे की, नेमक्या याच भागात पश्चिम–दक्षिणेकडील वेगाने येणारे वारे शास्त्रज्ञाना आढळून आले आणि त्या वाऱ्याना पवनचक्कीवर पकडून इथे वीजनिर्मिती केली जात आहे. देवगड म्हणजे सड्यावर भणाणता वारा; पण तो कसा उपयोगात आणावा, ते या पवनचक्क्यानी शिकविले!

देवगडचे सगळे वर्णन सांगून झाले तरी इथल्या फुरश्यांचा उल्लेख केला नाही तर ते अपुरेच राहील! फुरसे हा वीतभर लांबीचा नि करंगळीएवढ्या जाडीचा सरपटणारा प्राणी. पण महाभयंकर विषाने त्याचे शरीर भरलेले असते. फुरसे चावले नि

त्याचे दात उलटे फिरले की माणसाचा मृत्यू ठेवलेलाच. आता माणसाना वाचविणारी इंजेक्शने निघाली आहेत; पण पूर्वी झाडपाला नि अंगारे–धुपारे यामध्ये जगले किती नि मेले किती याचा हिशेब नसायचा. फुरशी कोंकणात सर्वत्र आढळतील; पण देवगडला त्यांची उत्पत्ती भलतीच विपुल ! इथली माती आणि हवामान यांचा काही त्यांच्याशी संबध असावा, पण देवगड भागातून हिंडताना संध्याकाळी हातात बॅटरी नि काठी नि पायात मजबूत जुते याशिवाय माणसे बाहेर पडत नाहीत. कुठल्या दगडाखाली फुरशाची गाठ पडेल याचा भरंवसा नसतो; पण या निसर्गाने दिलेल्या विषारी देणगीचाही उपयोग इथल्या गोरगरीब मंडळींनी पोटासाठी केलेला पाहून परक्या माणसांचे डोळे आश्चर्याने नि भीतीने विस्फारतात ! पावसाळ्याच्या हगामात हजारोंनी पैदा होणारी फुरशी इथले काही लोक पकडून चक्क मुंबईच्या हाफकीन इन्स्टिट्यूटला दरदाम करून विकतात व पैसा कमावतात ! पूर्वी आण्या–दोन आण्याचा दर होता, आता तो दोन रुपयावर गेला आहे आणि ही फुरशी गोळा करण्यासाठी हाफकीन इन्स्टिट्यूटची खास गाडी देवगडात येते. हाफकीनमध्ये शास्त्रज्ञ या फुरशांचे विष काढून घेतात व त्यापासून प्रभावी इंजेक्शने बनवतात. फुरशी पकडणे ही खास कसबाची बाब असते; पण त्यासाठी यंत्रसामग्री वगैरे काही लागत नाही. एक काठी, एक मडके व पकडणाऱ्याचे कौशल्य इतके पुरेसे असते.

देवगडला जसा रसराज हापूस आम्रा निसर्गाने बहाल केला आहे; तशीच ही विषराज फुरशीही ! हापूस दिवसेंदिवस बहरतो आहे. फुरशी त्याचवेगाने नाहीशी होत आहेत. निसर्ग साऱ्या व बऱ्यावाईटाचे संतुलन राखीत असतो.

# कोंकण किनाऱ्यावरील जिब्राल्टर : विजयदुर्ग

७. कोंकणलाईनच्या बोटी चालू होत्या तेव्हा देवगडला माध्यान्हीनंतर बोटीत बसले की अवघ्या तासाभरात विजयदुर्ग बंदर येई. प्रथम दूरवर विजयदुर्गाचा ऐतिहासिक किल्ला दिसू लागायचा. त्याची काळी तटबंदी नजरेत भरे. हळूहळू बोट भले थोरले वळण घेई, पाठोपाठ भोंगा वाजे आणि डेकवरच्या प्रवाशांना उजवीकडे एक झाडामाडांत दडलेले गाव नि काठाला चंद्रकोरीसारखा चिमुकला किनारा दिसू लागे. एक लाल कौलारू इमारत आणि समोरून दक्षिणेकडे जाणारा सरळसोट रस्ताही दिसू लागे, तोच बोट जणू किल्ल्याला भिडून हळूहळू पुढे सरकू लागे. आता किल्ला स्पष्ट दिसू लागायचा. त्याचे प्रचंड काळीथर पाषाण, बुलंद बुरूज, तटाला बरकंदाजांसाठी पाडलेली गवाक्षे आणि किल्ल्यात उंच जागी निशाणाची काठी अंगणात रोवून उभा असलेला सुंदर डाकबंगला आणि किल्ल्यातली खुरटी झाडे. हा सारा देखावा दिसतो न दिसतो तोच बोट आणखी एक सणसणीत भोंगा वाजवते आणि विजयदुर्ग बंदरात खळखळ आवाज करीत नांगर टाकते.

जयगडनंतर कोंकणपट्टीला बंदरात अगदी धक्क्याजवळ विजयदुर्ग येथेच बोट उभी रहायची. बाकीच्या बंदरात ती अर्धापाऊण मैल दूर समुद्रात थांबायची आणि खपाटे लाटांवर डचमळत सावकाशीने तिला स्पर्श करायचे. इथेही खपाटे जणू तिची वाटच पहात असायचे. भराभर उतारू शिडीवरून लोंबकळत उतरू लागत. डेकवरील प्रवासी उभ्या उभ्या उजव्या हाताचा विजयदुर्ग किल्ला आणि समोर दिसणारे ते टुमदार देखणे गाव न्याहाळीत असतात. किल्ल्यामधले मारुतीमंदिर, पायथ्याची हॉटेले, तिथे रेंगाळणारी माणसे, समोरील पळ्ळेकरांची बिल्डिंग, पायरीपायरीसारखी चढत उतरत गेलेली विजयदुर्गाची घरे, सारे सारे काही स्पष्ट आणि रेखीव चित्रासारखे दिसत असते.

विजयदुर्गाच्या या बाह्य दर्शनानेच माणूस या गावाच्या प्रेमात पडतो!

मालवणी मुलखाच्या उत्तरेकडील नाके म्हणजे विजयदुर्ग बंदर. वाघोटणखाडीच्या

मुखाशी हे इतिहासकालीन गाव वसले आहे. खाडीपलीकडे राजापूर तालुका म्हणजे रत्नागिरी जिल्हा सुरू होतो. तिथून बोलीभाषा बदलते. खाणेपिणे बदलते, मालवणी मुलखाचा मालवणीपणा या खाडीच्या हद्दीशी नाहीसा होतो.

विजयदुर्ग बंदराचे वैभव म्हणजे इथला इसवी सन बाराशेमध्ये बांधलेला भव्य, बळकट किल्ला. शिलाहार घराण्याच्या भोजराजाच्या अमदानीत तो बांधला गेला आणि गेली आठशे वर्षे तो ऊनपाऊस आणि पश्चिम समुद्राच्या लाटा याचा मारा सोशीत अभग उभा आहे. इंग्रजांनी या बळकट व अभेद्य किल्ल्याची थेट जिब्राल्टरशी तुलना केलीय! या किल्ल्याने शिलाहाराच्या काळापासून विजयनगरची अमदानी, त्यानतर बहामनी रियासत, विजापूरकराची आणि छत्रपती शिवाजीमहाराजाची सत्ता, इंग्रजाचा अंमल हे सारे ऐतिहासिक खेळ उघड्या डोळ्यानी पाहिले. इसवी सन १६५३ साली शिवाजीराजानी किल्ल्याची नवी तटबंदी उभारली. त्या वर्षी विजय सवत्सर चालू होते; म्हणून पूर्वीचे घेरिया किल्ला हे नाव बदलून राजांनी त्याचे ‘ विजयदुर्ग ’ असे नामकरण केले. त्या वेळेपासून गेली तीनशे वर्षे हा किल्ला व हे गाव ‘ विजयदुर्ग ’ नावाने अस्तित्वात आहे.

‘ विजयदुर्ग ’ हे मराठ्याचे आरमारी केंद्र म्हणून शिवाजीमहाराजाच्या काळीच नावारूपाला आले. इब्राहीम दौलतखान हा आरमारप्रमुख तर मायनाक भंडारी त्याचा सहाय्यक अधिकारी. कोंकण किनाऱ्यावर चाचेगिरी करणाऱ्या सिद्दी आणि फिरंगी यांना दहशत बसविण्याचे काम महाराजाच्या आरमाराने पक्के पार पाडले. राजाराम महाराजाच्या काळात कान्होजी आंग्रे मराठ्याच्या आरमाराचे प्रमुख बनले. त्याना ‘ सरखेल ’ ही किताबत मिळाली. कान्होजी आंग्रे याच्यानंतर धुळपानी आरमार गाजवले व इंग्रजांची भलीथोरली जहाजे विजयदुर्ग बंदरात ठाणबंद केली. इंग्रज–डचांना विजयदुर्गचा भारी वचक वाटत असे. शेवटी त्यांनी वरभेदेपणाची नीती अवलंबून पुण्याच्या पेशव्यांना तुळोजी आंग्रे यांच्याविरुद्ध उभे केले आणि इंग्रज व पेशवे या दोघानी मिळून विजयदुर्ग किल्ला आंग्र्यापासून जिंकला आणि १७५६ मध्ये म्हणजे शिवाजीमहाराजानी त्याचे विजयदुर्ग असे शुभसूचक नामकरण केले त्यानतर शंभर वर्षांनी, या देशी किल्ल्यावर परदेशी इंग्रज निशाण फडकू लागले! मात्र योगायोग असा की, त्याच वर्षीच्या ऑक्टोबरात इंग्रज व पेशवे यांच्यात समझोता होऊन इंग्रजांनी विजयदुर्ग किल्ला पेशव्यांच्या हवाली केला आणि पुन्हा त्याच्या निशाणकाठीवर भगवा जरीपटका फडफडू लागला. इंग्रज अमल अवघ्या हिंदुस्थानात १८१८ साली जारी झाल्यानतरच पुन्हा एकवार हा जरीपटका खाली उतरला आणि तेथे युनियन जॅक चढला.

मराठ्याच्या या पराक्रमी किल्ल्याने असे कितीतरी उन्हाळे-पावसाळे पाहिले. कोंकणातील किनारपट्टीवरील या एकाच किल्ल्याने लढाया आणि पराक्रमाची जी

शर्थ अटीतटीने पाहिली तिला इतराची तुलना नाही.

या पराक्रमाच्या वातावरणातच विजयदुर्ग गाव वाढला. तेथील भंडारी घराणी नावाजलेली जावकर, कोयडे, तारकर, कुवेसकर ही त्यातील घराणी आजही लौकिक टिकवून आहेत विजदुर्ग किल्ल्याकडे आज कुणाचेही लक्ष नाही. महाराष्ट्रातील अन्य गडकिल्ल्याप्रमाणेच तोही उपेक्षित अवस्थेत आहे, पण मुळातच बलदंड असलेल्या पुरुषाला जसे दुष्काळातही शरीर साथ देते, तसे या बुलंद किल्ल्याचे झाले आहे. त्याचे बहिरंग पूर्वीसारखेच मजबूत आहे. गावातून आपण किल्ल्यात प्रवेश करतो तेव्हा शिवप्रभूनी बांधलेले जागृत हनुमान मंदिर भेटते. त्याला लागूनच किल्ल्याचे महाद्वार आहे, आत गेल्यानंतर मात्र आणखी कोणताही भग्नावशेष आढळत नाही, पण किल्ल्याच्या पश्चिम तटावरून दिसणारे सिंधुसागराचे-अरबी समुद्राचे दृश्य पाहण्यासाठी तरी तेथे एकदा जायलाच हवे! जवळच्या सरकारी गोदामाच्या सौधा-वरून पश्चिमेकडील वाऱ्याच्या झुळका अंगावर घेत हे दृश्य पहायला हवे!

किल्ल्यावरून आपण गावात आलो की खाडीला भिडलेली चिमुकली बाजारपेठ दिसते एसटीच्या सरळ रस्त्याने घाटी चढून वर सड्यावर जावे किंवा परुळेकराच्या, गोखल्याच्या मोठाल्या घराजवळून किनाऱ्याला समांतर जाणाऱ्या पाखाडीने, धुळपाचा वाडा मागे टाकून वर जावे, दोन्ही वाटा एसटीच्या डेपोजवळ पुन्हा आपणास एकवटलेल्या दिसतात. सड्यावर पूर्वी उजाड देखावा होता; आता नवनवीन घरे उठताहेत धुळपांच्या दारातल्या घाटीने सरळ दक्षिणेला गेल्यावर, वाटेत श्रीरामेश्वराचे नितांत रमणीय, निवांत असे मंदिर लागते. चिरेबंदी भिंत व दगडी फरशी चहू बाजूनी असलेल्या या मंदिराची उभारणी पेशवाईत नाना फडणीसांच्या भावाने केली आणि आनंदराव धुळपांनी सुमारे दोनशे वर्षांपूर्वी विजयदुर्ग येथे जिंकलेल्या एका परदेशी जहाजावरील प्रचंड घंटा आणून श्री रामेश्वराच्या मंदिरात टांगली! आजही त्या भव्य घंटेचे नाद धुळपाच्या पराक्रमाचे पडसाद पश्चिम किनाऱ्यावर घुमवीत आहेत. आनंदराव धुळप हा योद्धा त्याच ईर्षेचा होता. पोर्तुगीजाबरोबर त्याने पश्चिम किनाऱ्यावर प्रचंड सागरसंग्राम केला आणि त्याचे ' सांतान ' हे प्रचंड मोठे आरमारी जहाज पकडून विजयदुर्ग बंदरात आणून दावणीला गुरू बांधावे, तसे जखडबंद करून ठेवले. एवढेच नव्हे तर त्या जहाजावरील उत्तुंग अशी डोलकाठी काढून आणून त्याने ती या गिर्याच्या श्रीरामेश्वर मंदिरासमोर रोवली! परवापरवापर्यंत ती गगनभेदी डोलकाठी मराठ्यांच्या पराक्रमाची ग्वाही देत श्रीरामेश्वरासमोर पहारा देत जशीच्या तशी उभी होती! आता ती तुटून अर्धवटच उरली आहे. आंग्रे आणि धुळप यांनी खरोखरच विजयदुर्गाच्या नाक्यावरून अवघी कोंकणपट्टी आपल्या शौर्याने गाजवून सोडली होती फुटलेल्या एका जहाजावर—ते बहुधा कुणा हिंदू व्यापाऱ्याचे किंवा आणखी कुणाचे असावे-धुळपांना एक मोठी मारुतीची मूर्ती सापडली. धुळपानी ती

मुखाशी हे इतिहासकालीन गाव वसले आहे. खाडीपलीकडे राजापूर तालुका म्हणजे रत्नागिरी जिल्हा सुरू होतो. तिथून बोलीभाषा बदलते, खाणेपिणे बदलते, मालवणी मुलखाचा मालवणीपणा या खाडीच्या हद्दीशी नाहीसा होतो.

विजयदुर्ग बंदराचे वैभव म्हणजे इथला इसवी सन बाराशेमध्ये बांधलेला भव्य, बळकट किल्ला. शिलाहार घराण्याच्या भोजराजाच्या अमदानीत तो बांधला गेला आणि गेली आठशे वर्षे तो ऊनपाऊस आणि पश्चिम समुद्राच्या लाटा यांचा मारा सोशीत अभग उभा आहे. इंग्रजानी या बळकट व अभेद्य किल्ल्याची थेट जिब्राल्टरशी तुलना केलीय! या किल्ल्याने शिलाहारांच्या काळापासून विजयनगरची अमदानी, त्यानंतर बहामनी रियासत, विजापूरकराची आणि छत्रपती शिवाजीमहाराजाची सत्ता, इंग्रजाचा अमल हे सारे ऐतिहासिक खेळ उघड्या डोळ्यानी पाहिले. इसवी सन १६५३ साली शिवाजीराजानी किल्ल्याची नवी तटबंदी उभारली. त्या वर्षी विजय संवत्सर चालू होते, म्हणून पूर्वीचे घेरिया किल्ला हे नाव बदलून राजानी त्याचे 'विजयदुर्ग' असे नामकरण केले. त्या वेळेपासून गेली तीनशे वर्षे हा किल्ला व हे गाव 'विजयदुर्ग' नावाने अस्तित्वात आहे.

'विजयदुर्ग' हे मराठ्याचे आरमारी केंद्र म्हणून शिवाजीमहाराजांच्या काळीच नावारूपाला आले इब्राहीम दौलतखान हा आरमारप्रमुख तर मायनाक भंडारी त्याचा सहाय्यक अधिकारी. कोंकण किनाऱ्यावर चाचेगिरी करणाऱ्या सिद्दी आणि फिरगी याना दहशत बसविण्याचे काम महाराजांच्या आरमाराने पक्के पार पाडले. राजाराम महाराजांच्या काळात कान्होजी आंग्रे मराठ्याच्या आरमाराचे प्रमुख बनले. त्यांना 'सरखेल' ही किताबत मिळाली. कान्होजी आंग्रे यांच्यानतर धुळपानी आरमार गाजवले व इंग्रजाची भलीथोरली जहाजे विजयदुर्ग बदरात ठाणबद केली इंग्रज–डचांना विजयदुर्गचा भारी वचक वाटत असे शेवटी त्यांनी घरभेदेपणाची नीती अवलंबून पुण्याच्या पेशव्याना तुळोजी आंग्रे यांच्याविरुद्ध उभे केले आणि इंग्रज व पेशवे या दोघानी मिळून विजयदुर्ग किल्ला आंग्र्यापासून जिंकला आणि १७५६ मध्ये म्हणजे शिवाजीमहाराजांनी त्याचे विजयदुर्ग असे शुभसूचक नामकरण केले त्यानंतर शभर वर्षांनी, या देशी किल्ल्यावर परदेशी इंग्रज निशाण फडकू लागले! मात्र योगायोग असा की, त्याच वर्षीच्या ऑक्टोबरात इंग्रज व पेशवे याच्यात समझोता होऊन इंग्रजांनी विजयदुर्ग किल्ला पेशव्याच्या हवाली केला आणि पुन्हा त्याच्या निशाणकाठीवर भगवा जरीपटका फडफडू लागला इंग्रज अंमल अवघ्या हिंदुस्थानात १८१८ साली जारी झाल्यानतरच पुन्हा एकवार हा जरीपटका खाली उतरला आणि तेथे युनियन जॅक चढला.

मराठ्याच्या या पराक्रमी किल्ल्याने असे कितीतरी उन्हाळे-पावसाळे पाहिले. कोंकणातील किनारपट्टीवरील या एकाच किल्ल्याने लढाया आणि पराक्रमाची जी

शर्थ अटीतटीने पाहिली तिला इतराशी तुलना नाही.

या पराक्रमाच्या वातावरणातच विजयदुर्ग गाव वाढला. तेथील भंडारी घराणी नावाजलेली. जावकर, कोयडे, तारकर, कुबेसकर ही त्यातील घराणी आजही लौकिक टिकवून आहेत विजदुर्ग किल्ल्याकडे आज कुणाचेही लक्ष नाही. महाराष्ट्रातील अन्य गडकिल्ल्यांप्रमाणेच तोही उपेक्षित अवस्थेत आहे; पण मुळातच नल्दड असलेल्या पुरुषाला जसे दुष्काळातही शरीर साथ देते, तसे या बुलंद किल्ल्याचे झाले आहे. त्याचे बहिरंग पूर्वीसारखेच मजबूत आहे. गावातून आपण किल्ल्यात प्रवेश करतो तेव्हा शिवप्रभूंनी बांधलेले जागृत हनुमान मंदिर भेटते त्याला लागूनच किल्ल्याचे महाद्वार आहे, आत गेल्यानंतर मात्र आणखी कोणताही भग्नावशेष आढळत नाही, पण किल्ल्याच्या पश्चिम तटावरून दिसणारे सिंधुसागराचे-अरबी समुद्राचे दृश्य पाहण्यासाठी तरी तेथे एकदा जायलाच हवे ! जवळच्या सरकारी गोदामाच्या सौधावरून पश्चिमेकडील वाऱ्याच्या झुळका अंगावर घेत हे दृश्य पहायला हवे !

किल्ल्यावरून आपण गावात आलो की खाडीला भिडलेली चिमुकली बाजारपेठ दिसते एसटीच्या सरळ रस्त्याने घाटी चढून वर सड्यावर जावे किंवा परुळेकराच्या, गोखल्याच्या मोठाल्या घराजवळून किनाऱ्याला समांतर जाणाऱ्या पाखाडीने, धुळपांचा वाडा मागे टाकून वर जावे, दोन्ही वाटा एसटीच्या डेपोजवळ पुन्हा आपणास एकवटलेल्या दिसतात. सड्यावर पूर्वी उजाड देखावा होता, आता नवनवीन घरे उठताहेत धुळपाच्या दारातल्या घाटीने सरळ दक्षिणेला गेल्यावर वाटेत श्रीरामेश्वराचे नितांत रमणीय, निवांत असे मंदिर लागते. चिरेबंदी भिंत व दगडी फरशी चहू बाजूंनी असलेल्या या मंदिराची उभारणी पेशवाईत नाना फडणीसांच्या भावाने केली आणि आनंदराव धुळपानी सुमारे दोनशे वर्षांपूर्वी विजयदुर्ग येथे जिंकलेल्या एका परदेशी जहाजावरील प्रचंड घंटा आणून श्री रामेश्वराच्या मंदिरात टांगली ! आजही त्या भव्य घंटेचे नाद धुळपांच्या पराक्रमाचे पडसाद पश्चिम किनाऱ्यावर घुमवीत आहेत. आनंदराव धुळप हा योद्धा त्याच ईर्षेचा होता. पोर्तुगीजाबरोबर त्याने पश्चिम किनाऱ्यावर प्रचंड सागरसंग्राम केला आणि त्याचे ' सांतान ' हे प्रचंड मोठे आरमारी जहाज पकडून विजयदुर्ग बंदरात आणून दावणीला गुरू बांधावे, तसे जखडबंद करून ठेवले. एवढेच नव्हे तर त्या जहाजावरील उत्तुंग अशी डोलकाठी कापून आणून त्याने ती या गिर्याच्या श्रीरामेश्वर मंदिरासमोर रोवली ! परवापरवापर्यंत ती गगनभेदी डोलकाठी मराठ्यांच्या पराक्रमाची ग्वाही देत श्रीरामेश्वरासमोर पहारा देत जशीच्या तशी उभी होती ! आता ती तुटून अर्धवटच उरली आहे आंग्रे आणि धुळप यांनी खरोखरच विजयदुर्गाच्या नाक्यावरून अवघी कोंकणपट्टी आपल्या शौर्याने गाजवून सोडली होती फुटलेल्या एका जहाजावर—ते बहुधा कुणा हिंदू व्यापाऱ्याचे किंवा आणखी कुणाचे असावे-धुळपाना एक मोठी मारुतीची मूर्ती सापडली. धुळपानी ती

आणून आपल्या वाड्याशेजारी तिची प्रतिष्ठापना केली. 'धुळपांचा मारुती' म्हणून हा हनुमंत ओळखला जातो. ऐतिहासिक प्रेक्षणीय स्थळे म्हणून खुद्द विजयदुर्ग गावामध्ये किल्ल्याशिवाय आणि श्रीरामेश्वर मंदिराशिवाय फारसे पाहण्यासारखे काही नाही. वाघोटणच्या खाडीमध्ये आंग्र्यांच्या काळी आरमारी गोदी होती; पण आता तिचे अवशेषही उरलेले नाहीत.

पण ऐतिहासिक स्मृतिशेष सोडले तरी हा चिमुकला गाव निसर्गसौंदर्याने नटलेला आहे आणि ते सौंदर्य पाहण्यासाठी किल्ला पहायला आलेला रसिक इथे घुटमळल्या-शिवाय रहायचा नाही. धुळपांच्या घाटीजवळ किल्ल्याच्या दक्षिणेला मोक्याची जागा पाहून शासनाने येथे नवा डाकबंगला बांधला आहे वेंगुर्ल्यांच्या ब्रिटिशकालीन नामांकित डाकबंगल्याखालोखाल हा डाकबंगला गणता येईल.

किल्ल्याच्या दक्षिणेला असलेली चंद्रकोरीच्या अर्धवर्तुळाकार आकाराची सुंदर वेळा (बीच) म्हणजे विजयदुर्गचे वैभव होय एवढा स्वच्छ, मऊसूद वाळूने भरलेला निवात किनारा या गावाला जणू देणगीदाखल मिळालेला असावा! एप्रिल–मेमध्ये मुंबईकर चाकरमानी हवा खायला गावी येतात. त्यांचे सायंकाळचे थवे सोडले तर बाकीचा काळ हा किनारा निर्मनुष्य आणि निवात असतो! पाणीही येथे फारसे खोल नसते त्यामुळे समुद्रात पोहोणाऱ्यांची इथे चंगळ होते

किनारा पाहून गावात फिरावे तर अरुंद पाणंदी जिकडे तिकडे, वर उंच सडा आणि खाली पायथ्याशी गाव, त्यामुळे सगळ्या पाणंदी ओघळत उताराकडे वाहणाऱ्या. त्यातल्या काही फरसबंदी, काही तशाच लाल मातीच्या, या उतारावर वसलेली घरे पायरीपायरीने रचल्यासारखी वाटतात. गोखले, जांभेकर, वेलणकर, परुळेकर ही इथली जुनी तालेवार घराणी. मुसलमान वस्तीही मुबलक आहे बंदरात मासळी नि वर सड्यावर आंबा. यातून पैसा कमावणारे हे लोक. त्यांतही ब्राह्मण वर्ग आंब्याच्या मशागतीत गुंतलेला; तर मुसलमान समाजाला मासळी आणि आंबा दोन्ही सारखेच! विजयदुर्गच्या परिसरात आता देवगड–वेंगुर्ल्यासारख्या हापूसच्या बागा उठताहेत. माणसे बाराही महिने अहोरात्र राबताना दिसतात

विजयदुर्गच्या किल्ल्यासमोर समुद्राला मिळणारी खाडी म्हणजे या गावाला रूप पाहण्यासाठी जणू देवाने दिलेला आरसा! या खाडीचे पात्र एका बाजूला किल्ला नि दुसऱ्या बाजूला दाभ्या–अणुसुऱ्याचा डोंगर याच्यामध्ये भरतीच्या वेळी संथपणे पसरते–उगाचच चार होडकी नि चुकार ट्रावलर्स असले तर! बाकी सगळे पात्र निवांत निश्चल विजयदुर्ग गावाचे सुरेख प्रतिबिंब त्या पात्रात पडलेले आढळते; पण हे दृश्य एक तर किल्ल्याच्या उंच तटावरून किंवा नांगरलेल्या बोटीच्या डेकवरून न्याहाळायला हवे. विजयदुर्ग गावाला आपल्या या सौंदर्याचा पत्ताही नसतो!

ही खाडी पूर्वेला वाघोटण–मुटाट–मणचे–धालवल–उपळे अशी छोटीछोटी बंदरे

करीत थेट खारेपाटणपर्यंत पोचते. तिथे सह्याद्रीतून येणारी सुखनदी तिला गोडे पाणी घेऊन भेटते नि खाडीचे पात्र बदलते, तिचे रूप बदलते. वाघोटणच्या खाडीतून मी फार वर्षांपूर्वी होडीतून खारेपाटणपर्यंत प्रवास केला होता. पौर्णिमा होती खाडीला भरती होती. आमची होडी बारकीशी होती. ती वल्हवणारा एक दाल्दी मुसलमान होता, पण त्या होडीत एक इसम असा होता की तो गाणी म्हणायचा. सबंध रात्रभर चांदण्या पाण्यातून त्याचे झुलवे ऐकत आम्ही प्रवास केला! वाटेत खाडीचे पात्र उथळ असले की होडीवाला खुशाल खाली उतरे आणि त्या ढोपरभर पाण्यातून होडी हाताने ढकलीत पुढे नेई! ही पस्तीस वर्षांपूर्वीची गोष्ट. त्या वेळी या खाडीत लाँचची वाहतूक चाले! बंदर किनाऱ्याच्या गावाना ही लाँच म्हणजे मोठी सोयीची वाहतूक असे. आता खारेपाटणची ही खाडी संपूर्ण होरली आहे. लाँच तर सोडाच, पण पडाव नि गलबतेही बंद झाली. बारीकसारीक होड्या दाल्दी मंडळी वल्हवतात—मासळी पागविण्यासाठी, पलीकडून अलीकडे येण्यासाठी.

या खाडीकिनारीचा निसर्ग विलक्षण सुंदर आहे असे रमणीय सृष्टिसौंदर्य आमच्या मुलखात कर्लीच्या आणि कालावलच्या खाडीतच आढळते!

विजयदुर्ग बंदरपट्टा देवगडपेक्षा निसर्गसौंदर्याने अधिक समृद्ध आहे. देवगडला झाडी विरळ आहे आंब्याच्या बागाची मुद्दाम केलेली लागवड डोळ्यात भरते, तेवढीच; पण विजयदुर्ग सोडून वर गिर्ये, पुरळ, कुर्णे, रेडेबाध अशी झाडावळीने भरलेली व थंड सावल्यात विसावलेली गावे मागे टाकून आपण वाडा तिठ्यावर येतो आणि पुन्हा एकवार कातळी सडा नजरेला पडतो. पूर्वी या तिठ्याजवळ सड्यावर एक पुरातन साल्विणाचा वृक्ष होता. आता तो दिसत नाही. खाली डावीकडे मुटाट-वाघोटणचा उतार नि उजवीकडे वाड्याला जाणारा रस्ता. वाघोटणच्या तिठ्यावरून एक रस्ता थेट बंदरापाशी जातो इथे एक फार पुराणा बंगला आहे. पूर्वी कधीतरी तिथे इंग्रजानी ब्रह्मदेशच्या थिबा राजाला, रत्नागिरीला ठेवण्याआधी कैदेत ठेवला होता, असे कुणीतरी सांगितल्याचे आठवते; पण त्याचा पुरावा कागदोपत्री सापडत नाही. पण हा एकाकी बंगला इथे कुणी व का बांधला त्याचं गूढच आहे.

वाड्याच्या रस्त्याने जाणारी एसटी हा हां म्हणता वाड्याच्या लायब्ररीसमोर उभी राहते. हा एक देवगड तालुक्यातला सुरेख समृद्ध गाव. उत्तम ग्रंथालय, वाचनालय शिक्षणाची तशीच उत्तम सोय—दवाखाना, पोस्टऑफिस, प्रशस्त सभागृह या एखाद्या तालुक्या—जिल्ह्याच्या गावी असाव्या त्या सर्व सांस्कृतिक सुविधा या लहानशा गावी उपलब्ध आहेत. विमलेश्वराचे पुरातन मंदिर आणि प्राचीन लेणी यांचा आवर्जून उल्लेख करायला हवा. प्राचीनत्वाच्या खुणा या गावाने जशा जपलेल्या आहेत, तसे अर्वाचीनत्वही शिरोधार्य मानले आहे. प्रख्यात साहित्यिक श्रीपाद काळे हे येथे

आपल्या झाडापेडानी, फुलाफळानी वेढलेल्या निवात घरात राहून वेदविद्या जतन करत असतानाच मराठी साहित्यात उत्तमोत्तम कथा–कादबऱ्याची भर घालत असतात.

वाडा गावही आंबा बागायतदारांचे. इथला पाढरपेशा ब्राह्मण असो अथवा बहुजनसमाज असो सारे लोक अहमहमिकेने आम्ब्याची लागवड जोपासणार! आता इथल्या नदीवर पूल झाला आहे. त्यामुळे विजयदुर्गहून निघालेली एसटी वाड्यावरून घटकाभरात देवगडला पोचते. पूर्वी ' तर ' ओलाडून चार मैल जमीन चालावी लागे या नव्या पुलावर उभे राहिले की पश्चिमेला देवगड बंदराचा प्रेक्षणीय देखावा दिसतो.

वाडा तिठ्यावरून तरेळा रोडकडे आपण जाऊ लागलो की डावीकडे खाडीकाठ लागतो गावोगाव उतरत जाणाऱ्या पाणदी, चढत येणाऱ्या घाट्या दिसतात आणि वैराण सड्यावरून डांबरी रस्ता सुसाट धावू लागतो. फणसगाव, पाटगाव करीत गाडी तरेळ्याला येते आणि मुबई–गोवा हमरस्त्याला मिळते. या वैराण सड्यावर हल्ली जागोजाग आंब्याच्या बागा गडग्याच्या कुडणांतून वर येत असलेल्या दिसतात. पाटगावला रस्त्यापासून जवळच टेकडीवर श्री दत्तमदिर आहे. दत्तजयतीला येथे उभा देवगड–विजयदुर्ग पट्टा दर्शनास लोटतो.

इथून खाली घाटी उतरून गेले की खाडीकाठी पोंभुर्ले लागते अगदी दुर्गम असे हे गाव; पण निसर्गाच्या रमणीयतेची बहार येथे दिसते. मराठीतील आद्य पत्रकार ' दर्पण ' कर्ते बाळशास्त्री जाभेकर या पोंभुर्ले गावचे. आता जिल्ह्यातल्या नव्या पत्रकारांनी या दुर्गम गावी जाण्यासाठी रस्ता व्हावा आणि येथे बाळशास्त्र्यांचे स्मारक व्हावे, यासाठी धडपड चालविली आहे

जरा पुढे गेले की बदर खारेपाटण भेटते. विजयदुर्गसारखेच हेही एक प्राचीन ऐतिहासिक गाव. शिलाहारकालीन संस्कृतीचे हे केंद्र होते. शिवकाळातही हे बदर भरभराटलेले होते. विजयदुर्गहून मालाने भरलेले मचवे थेट खारेपाटणपर्यंत येत घाट आणि कोंकण याच्या दरम्यानची राजापूरसारखीच ही एक गजबजलेली उतारपेठ होती बाजारपेठ खाडीकाठावर वसलेली. दर पावसाळ्यात पेठेत पाणी भरते. पेठ अतिशय अरुद पण जुन्या वैभवाच्या खुणा आजही तिने शाबूत ठेवलेल्या आहेत पेठ ओलांडून गेले की टेकडीवर येथील जुना सुदर डाकबगला आढळतो. इथून खालच्या खाडीकिनाऱ्याचा देखावा अप्रतिम दिसतो. ब्रिटिशांनी अशा सुरेख जागा डाकबगल्यासाठी कशा शोधून काढल्या! त्यांची सौंदर्यदृष्टी खरोखरीच कौतकास्पद वाटते.

खारेपाटण येथे एकेकाळी जैनाची संस्कृतीही भरभराटली होती. येथे दोन जैनमदिरे आहेत. कोंकणात–सिंधुदुर्ग जिल्ह्यात तरी जैनमदिरे इतरत्र कोठेही आढळत

नाहीत. या मंदिरातील पार्श्वनाथाची दोन फुटी उंचीची मूर्ती विलक्षण मनोहर आहे.

खारेपाटणला आता हायस्कूल, ज्युनियर कॉलेज झाले आहे. हे आडवळणाचे एकेकाळी इतिहासात—व्यापारात गाजलेले गाव हळूहळू पुन्हा वैभवाला येते आहे. वीर शंकरराव पेंढारकर या तडफदार स्वातंत्र्यसैनिकाने या गावच्या शैक्षणिक विकासासाठी कंबर कसली त्याला कित्येक वर्षे उलटली. आता त्याची मधुर फळे इथला परिसर चाखीत आहे.

विजयदुर्ग येथे सुरू झालेला प्राचीन इतिहासाचा वारसा खारेपाटणपर्यंत येऊन पोचलेला आहे आणि तेथे सुरू झालेले सुधारणेचे वारे खाडीकाठाने वहात खारेपाटणच्या हारलेल्या खाडीपर्यंत थडकले आहेत.

## ८. आरती प्रभूंच्या कवितेतील 'कुडाळ'

" हिरव्या माळापुढे निळा गिरी गिरवित काळी वळणे काही
छप्पर झाले लाल अधिकच धूर दरीतुन चढतच नाही—"

या कवितेच्या ओळी कुणाच्या आठवतं ! जुल एकोणीसशे छप्पन्नमध्ये कुडाळच्या गवळदेवाच्या माळावर फिरायला गेला असता कवी आरती प्रभू याला या ओळी सुचल्या. त्यावेळचे कुडाळ अगदी वेगळे होते. तेथला तो 'गवळदेवाचा माळ' हे आरती प्रभूचे नेहमीचे फिरण्याचे ठिकाण. त्याना अनेक कविता तिथे सुचल्या. जातिवत कवीला कवितांची ऊर्मी यावी, असाच तो रमणीय परिसर तेव्हा होता. आरती प्रभूनी पुढे लिहिलेल्या ओळी तर सरळ सरळ त्या माळालाच उद्देशून आहेत—

हिरव्या माळापुढे निळा गिरि मावत नाही इतुका फिकट
झुकत चालली पुढेच टिटवी माळ ओसरे मागे चौपट

आरती प्रभू ऊर्फ चिं. त्र्य. खानोलकर हा अवलिया प्रतिभावंत कवी कुडाळ गावात लहानाचा मोठा झाला. त्याच्यातील कवितेचा स्फुलिंग याच गावात प्रज्वलित होऊन त्याचा क्षणात स्निग्ध नंदादीप, तर क्षणात चकचकती वीज बनून त्या चमत्काराने साहित्याची पेठ विस्मयचकित झाली ! 'रात्र काळी घागर काळी' लिहिणारा खानोलकर याच कुडाळच्या बाजारपेठेत एकेकाळी 'वीणा गेस्ट हाऊस' उघडून मेंबराना जेवायला वाढीत होता, संध्याकाळचा गवळदेवाच्या माळावर फिरायला जात होता नि त्याला अशा कविता सुचत होत्या !

आता सरी वळवाच्या ओसरू लागल्या
भरे निळी नवलाई जळी निवळल्या .
...आता रात काजव्यांची माळावर झुरे
भोळी निर्झरी मध्येच बरळत झरे ..

याच गवळदेवाच्या माळावर खानोलकरबरोबर भ्रमती मी केलेली आहे. पचवीस तीस वर्षांपूर्वीचा तो काळ होता. तेव्हाचा तो माळ, त्या माळावरून पूर्वेला दिसणारे

निळे डोंगर, पावसाळ्यात तेथे भेटणारी अथांग हिरवळ आणि पलीकडील गर्द झाडीत दडलेले कुडाळ.

कुडाळ म्हटल्याबरोबर आरती प्रभू उर्फ चिं. त्र्यं. खानोलकरच्या आठवणी प्रथम जाग्या होतात. त्या वेळचे आपल्याच तंद्रीत वावरणारे, म्हटले तर निद्रिस्तसे भासणारे, शांत, नीरव कुडाळ आठवते.

कुडाळात मी पहिल्यांदा पाऊल टाकले त्यालाच आता चाळीस वर्षे होत आली. मी कणकवलीच्या शाळेत शिकत होतो. कुडाळला माझी मोठी बहीण रहायची. भाटाच्या किंवा गवळ्याच्या सर्व्हिस गाडीतून कणकवली ते कुडाळ असा प्रवास, मधल्या प्रत्येक गावी थांबत थांबत पार पाडलेला. तेव्हा तेथे 'सावंतवाडी संस्थान प्रजा परिषदेचे' आंदोलन जोरात चालू होते. सबंध गाव त्या लढ्याने स्फुरण पावत होता, दुमदुमत होता. कुडाळचा मोटरस्टँड नि बाजारपेठ त्या आंदोलनातली मोक्याची ठिकाणे. सावंतवाडी संस्थान त्यानंतर भारतात रीतसर विलीन होईपर्यंत हे आंदोलन सतत चालू होते.

कुडाळचे तेव्हाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ संस्थान विलीनीकरणाचीच चळवळ नव्हती, तर भारतीय स्वातंत्र्याची चळवळसुद्धा या गावाने हिरीरीने चालवली होती. गोवा विमोचनाचा संग्राम आणि त्या दरम्यानचे संयुक्त महाराष्ट्र आंदोलनसुद्धा या गावाने सक्रियतेने चालवले होते. रसरशीत भावनावेग हा या गावचा स्थायिभाव. राजकारण, पत्रकारिता आणि साहित्य या तिन्ही क्षेत्रात बुद्धीबरोबरच उत्कट भावना-वेगाशिवाय कर्तृत्ववान माणसे निर्माण होत नाहीत. कुडाळ गावाने आणि जवळ-पासच्या परिसराने या तिन्ही विषयांमध्ये आपले अध्याय लिहिलेले आहेत.

स. का. पाटील ही गेल्या पिढीतील कर्तबगार राजकारणी व्यक्ती कुडाळमधूनच उदयाला आली. (मालवणचासुद्धा त्यांच्यावर हक्क आहे; पण ते मुळात कुडाळ परिसरातले!) त्यांच्याबरोबरीने दादा महाजन, आबा वालावलकर, भाऊ बागलकर यासारखी स्वातंत्र्यलढ्यात अमित आपदा सोसलेली माणसे. केवळ कुडाळ, मालवण, कणकवली हा पट्टा सोडून मुंबईला गेली नाहीत, म्हणूनच ती राष्ट्रीय पातळीवर चमकली नाहीत. पण स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी बजावलेली कामगिरी अविस्मरणीयच होय. वालावलकर आणि महाजन हे सव्यसाची पत्रकार म्हणून गाजले. महाजनांच्या 'हिंदसेवक'च्या आठवणी आजही लोक विसरलेले नाहीत. तर आबा वालावलकरांचे 'व्याध' आता त्यांची पुढची पिढी, त्यांचे पुत्र भय्यासाहेब आणि सूनबाई चालव-तात—पत्र लहानसे पण पीळ जुनाच. त्याहून जुन्या जमान्यात जायचे तर 'विविधवृत्त' या महाराष्ट्रात एके काळी गाजलेल्या साप्ताहिकाच्या संपादक मंडळातील पुरुषोत्तम रा. नाडकर्णी हे खुद्द कुडाळचे, तर 'विविधज्ञानविस्तार' या त्याहीपूर्वीच्या थोर पत्राचे संपादक पु. गो. नाडकर्णी हे कसालचे, कुडाळच्या परिसरातले. आजचे प्रथित-

यश साहित्यिक रत्नाकर मतकरी हे मूळचे याच पट्ट्यातले त्यांचे वडील रा वि मतकरी हेही एकेकाळचे साहित्यिकच. माल्वणी गाणी ग्रामोफोनवरून घराघरात नेणारे वि. कृ. नेरूरकरसुद्धा याच भागातले, नेरूरचे.

ठेय झिला घराची आठव रे
पाच तरी रुपाये पाठव रे॥

या रेकॉर्डने त्या काळी प्रत्येक मालवणी माणसाला भुरळ पाडली होती. 'गो चेडवा, पडावातसून नोटील जपान' हेही एक त्याचे अनेकांच्या तोंडी आजही गुणगुणले जाणारे मालवणी गाणे!

साहित्यक्षेत्रातील हा वसा अगदी आजतागायत कुडाळ भागात चालू राहिलेला आहे. चिं त्र्य. खानोलकर तर अकाली गेले; पण त्याच्यानतरची पिढीही आपल्या परीने साहित्यसेवा इथे रुजू करत आहे. हरिहर आठलेकर, दि. मो. दुधगावकर आणि प्र. श्री. नेरूरकर, तसेच सी. श्री. उपाध्ये आणि विद्याधर भागवत यासारखी मडळी कुडाळचे नाव महाराष्ट्रात सर्वत्र गाजवणारी.

पण साहित्यातच नव्हे, तर इतर कलाक्षेत्रातही कुडाळची परपरा स्वयसिद्ध आहे. सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक वसत देसाई कुडाळच्या परिसरात वाढले. ते सोनवड्याचे. आमच्या लहानपणी पहाटे दारावर जागे करायला येणारे वासुदेव आणि त्याच्या पाठोपाठ नंदीबैल घेऊन येणारे नि गुबूगुबू ढोलके वाजवणारे 'पागुळ', रात्री गोंधळ घालणारे गोंधळी आणि खुणामुद्रा करून बैलाच्या मान हलवण्यावरून नेमके नाव ओळखणारे ठाकर, पोवाडे म्हणून शिवाजीमहाराजांचा पराक्रम वर्णन करणारे आणि संध्याकाळी दिवट्याच्या प्रकाशात कळसूत्री बाहुल्यांचा खेळ करणारे कलाकार, गुडघ्याला फळीचा पाट लावून त्यावर ठेवलेल्या चित्रावलीवरील कथानक आपल्या विनोदी शैलीने कथन करून खेड्यातल्या लोकांची करमणूक करणारे चित्रकथी, हे सारे कुडाळजवळच्या पिंगुळी गावचे, हे जाणत्या वयात कळले! कुडाळजवळ वावरणारी ही भटकी जमात आता सरकारी योजनांमुळे आणि त्याच्यातील शिकून मोठे झालेल्या पुढाऱ्यांमुळे एका जागी स्थिर होते आहे. त्याच्या पारपारिक कलेचा सांभाळ नव्या जाणिवांनिशी होतो आहे

पण जुन्या कलांबरोबर नव्या कलांची बूज राखणारे दमदार पिढीचे कलावतही कुडाळात मौजूद आहेत. कणकवलीच्या नाथ पै एकांकिका स्पर्धेतून दरवर्षी मानाचे पान घेऊन जाणारे चंदू शिरसाट म्हणजे एक चमत्कार म्हटला पाहिजे! त्याला नेहमीच्या वेषात पाहिले तर तो कुडाळच्या बाजारपेठेतला एखादा किरकोळ व्यापारी वाटावा. अगदीच मामुली देहयष्टी. यष्टीच! पण ही असामी रगभूमीवर उभी राहिली की पाहणाऱ्याच्या डोळ्याचे पाते स्थिर रहात नाही! विलक्षण ताकदीचा कलावत. त्याने दिग्दर्शन केलेल्या नाट्यकृतीला जणू परिसाचा स्पर्श होतो.

हा कलावंत मुंबईला येईल तर भल्याभल्याची छुट्टी करू शकेल. त्याचा एकूण साराच सच नाट्यवेडा आहे. दिवसभर कुडाळात विविध ठिकाणी पोटापाण्यासाठी राबणारे त्याचे सारे सौंगडी रात्री नाटक या एका विषयाच्या ओढीने एकत्र जमतात आणि दिवसाचे सारे कष्ट क्षणात विसरतात. कुडाळात ' नाटक ' या पोरांनी जिवंत ठेवलेले आहे. मालवणी मुलखात सगळीकडेच नाटकाचे वेड आपल्याला आढळते; पण कुडाळात चंदू शिरसाट आणि कपनी, यांचे काही औरच !

पण हे वेड नाटकापुरतेच या ठिकाणी शिल्लक आहे असे नाही. कुडाळच्या अवतीभोवती असलेल्या वालावल, चेंदवण, कवठी या गावी अस्सल ' दशावतार ' जन्मलेला आहे. चेंदवणकराची किंवा पार्सेकर–वालावलकरांची दशावतारी पार्टी म्हणजे मालवणी मुलखाचे केवढे आकर्षण ! हे सारे धन कुडाळने जपून ठेवलेले. सारा दशावतारच कुडाळच्या परिसरात फुलला नि वाढला

कुडाळ हे आमच्या मुलखातले असे ठिकाण आहे की तिथे पुन्हा पुन्हा जाण्याचा कधी कंटाळा मला तरी येत नाही. कदाचित तीसचाळीस वर्षांपासून या गावाला मी जात-येत आलो, हे त्याचे कारण असावे. हे गाव मी नाना रूपात पाहिले आहे. वेंगुर्ल्याकडे जाणारा, गावच्या हायस्कूलला कडेवर घेणारा रस्ता असो की वालावल-नेरूर भागात शिरणारा, चिंचोळा, झाडाझुडपानी वेढलेला, एखाद्या पाणदीसारखा दिसणारा रस्ता किंवा जुन्या भंगसाळ पुलावरून पावशीमार्गे मुंबई–गोवा हायवेला जाणारा रस्ता असो, कुडाळातले सारे रस्ते मी तुडवलेले आहेत कुडाळची अरुंद बाजारपेठ कोंकणातील सर्व बाजारपेठांसारखीच कृश, पण प्रतिष्ठित आणि आपल्या इतमामाला जपणारी. इथल्या बुधवारच्या आठवडा बाजारची एकेकाळची ऐट पाहण्याजोगी असे. आता गावोगाव बाजार झाले तरीही अजून एखाद्या बुधवारी बाजारपेठेत ट्रकांची, बैलगाड्यांची आणि बाजारकरूंची दाटी उडते. माणसाला बोट शिरायला जागा मिळत नाही.

बाजारात मारुतीचे देऊळ. त्याच्या समोरच्या माडीच्या घरात पूर्वी ' वीणा गेस्ट हाऊस ' म्हणजेच आरती प्रभूंची खाणावळ होती. ' जोगवा ' मधल्या कविता याच माडीवर जन्मलेल्या. त्या काळी कुडाळात वीज नसे. मिणमिणत्या चिमणीच्या प्रकाशात खानोलकर कविता लिहीत बसे. त्याच्या कादबऱ्यातली सारी पात्रे त्याने या माडीवरूनच न्याहाळलेली.

आता त्या ठिकाणी एक बँक नि दुसरे हार्डवेअरचे दुकान आहे !

गवळदेवाच्या माळावर मोठमोठे औद्योगिक प्रकल्प उभे राहिले आहेत. इंडस्ट्रीअल इस्टेटने तेथला ' निळा गिरी ' नि ' झरळणारी निर्झरी ' कधीच खाऊन टाकली आहे.

कुडाळ गाव खऱ्या अर्थाने ऐतिहासिक. शिवप्रभूंचे पाय या गावाला लागलेले.

त्यापूर्वी सामंतशाहीने येथे साम्राज्य गाजवलेले; पण शिवकाळात या भूमीवर तरवारीचे खणखणाट झाले. घोड्यांच्या टापा दुमदुमल्या. मुसलमानांना शिवाजीराजांनी नि त्यांच्या सरदारांनी याच भूमीवर पाणी पाजले. विजयाचे आणि पराभवाचे कित्येक देखावे या गावाने पाहिले. आता फक्त त्या साऱ्याची साक्ष म्हणून जुन्या कलेक्टर कचेरीजवळ असलेली घोडेबांव नावाची रुंद आणि पडकळीस आलेली जुनी विहीर, तोंड उघडे टाकून बसलेली आहे. या विहिरीत एकेकाळी घोडेस्वार पाय-उतार न होता खाली उतरत नि घोड्यांना पाणी पाजीत. इथला कोट किल्ला तर अवशेषापुरताही उरलेला नाही!

एकेकाळी हा गाव छानपैकी हिरव्यागार झाडीत लपलेला होता. लाल कौलारू सुबक बांधणीची माडीची घरे आवाठा–आवाठातून दिसत. भिंतींना फिक्या निळ्या गुलाबी रंगाचे गिलावे असत ओटीवर पाठीला बळलेली प्रशस्त बाके नि झोपाळे असत पोपटाचे पितळी पिंजरे घरोघरी लटकलेले असत. अंगणात अबोली, सदाफुलीचे ताटवे फुललेले दिसत नि शालीन, सुस्वरूप गृहिणी एकमेकींची चौकशी गडग्यावर उभ्या राहून करीत. कितीतरी पेन्शनर्स संध्याकाळचे कलते तृप्त दिवस सुखासमाधानाने या गावात घालवीत. बाजारपेठेतली वर्दळ सोडली तर पाणदी-पाणदीतून, उचसखल भागातून विभागलेला हा गाव अगदी शांत शांत होता लक्ष्मीचे, कुडाळेश्वराचे देऊळ म्हणजे सांस्कृतिक देवाणघेवाणीची सोज्वळ केंद्रे होती. सव्वाशे वर्षांपूर्वीची जुनी लायब्ररी गावाचे भूषण असावे तशी, जुनी दुर्मिळ पुस्तके सांभाळीत होती. इथले सुजाण वाचक त्या लायब्ररीचा चवीने उपयोग करीत.

उत्तर दिशेला संथ वाहणारी भंगसाळ नदी हे गावातील एक जिते जागते ठिकाण. या नदीतले सावे मासे बाजारकराच्या जिभेचे चोचले पुरवणारे. कोचरा बंदरातील समुद्रातली फडफडीत ताजी मासळी कितीही आली तरी अपुरीच पडते. मग अशावेळी भंगसाळीतले गोडे मासे तूट भरून काढतात. भंगसाळ उन्हाळ्यात हडकुळी भासली तरी पावसाळ्यात धष्टपुष्ट होऊन मुसंड्या मारीत सैरावैरा धावते. जुन्या पुलावरून रहदारी चालायची. भंगसाळीला हौर आला की त्या सखल पुलावर पुरुषभर पाणी चढायचे नि दिवस दिवस दोन्ही तीरांवरील गाड्या पाणी ओसरण्याची वाट पहात ताटकळायच्या. ते दिवस मोठे मौजेचे होते. भंगसाळीच्या हौराचीही एक मौज होती ‘भंगसाळ’ नदीत दर तीन वर्षांनी एक ‘मारा’ होतो कुणीतरी अचानक बुडून मरते ही आख्यायिका सत्यकथा होऊन प्रत्ययाला येत असे. एकूणच भंग-साळीचे दर्शन भीतिप्रद, तरीही आकर्षक होते. जुन्या पुलावर संध्याकाळी फिरायला जाणाऱ्यांना तोटा नसे.

कालांतराने कुडाळ गावाने कात टाकायला सुरुवात केली. पूर्वी ते गाव होते, आता ते ‘शहर’ बनले! ते नव्या जिल्ह्याचे ठाणे व्हावे, यासाठी तेथील लोकांनी

जिवाचे रान केले. कोंकणात सर्वत्र घडते तेच इथेही घडते. लोकाचा कोणताही प्रश्न असो, तो राजकारणाच्या गायरीत टाकायचा. इथल्या लोकाना राजकारणाची हौस दाडगी. एकेकाळी आबा वालावलकर, आप्पा पटवर्धन, दादा महाजन यानी गाजव-लेल्या राजकारणाचे मातबर अड्डे आता अगदीच मामुली इसमांच्या हाती गेले.

कुडाळचा कायापालट होतो आहे. जुनी माणसे जुन्या स्नेहाचा धागा आजही हृदयात बाळगून वावरत आहेत. नवी पिढी जुन्याशी नाते सागत नाही, हा सगळी-कडचाच नियम आहे. पूर्वीचे कुडाळ आता पहायला सापडत नाही. आता विजेचा लखलखाट आला. स्टँडवर पूर्वी वर्दमांचे हॉटेल होते. चविष्ट उसळपुरी तिथे मी वर्षोन् वर्षे खाल्लेली. आता तिथे आणखीही कितीतरी हॉटेले आली. 'कुरमापुरी' हा चमत्कारिक शब्द कुडाळात उगवला. बीअर बारची भलीमोठी पाटी स्वागताला उभी आहे. एस. टी.च्या गाड्या रोरावत येतात नि जातात. परतु पूर्वीच्या गवळ्याच्या नि भाटाच्या 'हाफटन'ची गमत गेली. टूरिंग टॉकीजऐवजी शेजारीच पक्के सिनेमा थिएटर झालेय. हॉस्पिटले नि हॉटेले झाली. पूर्वीचा साधासुधा तावड्या मातीचा, खडी पायांना टोचणारा रस्ता जाऊन 'बीकेजी रोड' या उपऱ्या नावाचा गुळगुळीत 'हायवे' चोवीस तास वर्दळीने वाहू लागला. त्यावर मुबईसारखे वडापाव, पावभजी यांचे स्टॉल दिसू लागले. या हायवेवर पंत्रितारांकित बादशाही हॉटेले परमिटरूमसह उभी राहिली. त्या हॉटेलासमोर गोव्याच्या आलिशान टूरिस्ट गाड्या दिवसरात्र उभ्या राहू लागल्या. गोव्याच्या काजूफेणीचा उग्र दर्प सर्वत्र परमाळू लागला.

'उद्यम नगर' नामक औद्योगिक वसाहत इथे तिथे सर्वदूर पसरली. तेथे कामगार धाम गाळू लागले. संपवाल्यांचे तावडे बावटे फडफडू लागले. स्थानिक राजकारणी त्या तावड्या बावट्यावर आपली उपजीविका चालवू लागले. कारखाने बंद पडू लागले. बंद पडलेल्या कारखान्यातील बेकार कामगार गावात रिकामे उडगू लागले. एम.आय.डी.सी.ची विस्तीर्ण एरिया महापुरासारखी पसरली. विहिरीऐवजी नळाचे पाणी एम आय. डी. सी. ने गावात आणले. गावच्या गृहिणी मुबईवाल्या चाकरमानीणींसारख्या नळाच्या पाण्याची वाट पाहू लागल्या. विहिरीवरील सलज्ज कुजबूज थांबली. त्या बापुडवाण्या दिसू लागल्या.

गावातील पूर्वीची टुमदार बैठी, कौलारू किंवा माडीची घरे सरकारी अंमलदारानी व्यापून टाकली. भाडी भरमसाट मिळतात म्हणून घरमालक मांगरांत राहू लागले नि वडिलोपार्जित घरे भाड्याला दिली जाऊ लागली. सरकारी अधिकारी नि कर्मचारी यानी कुडाळ गावाचा जणू ताबाच घेतला. रस्त्यारस्त्यावर जीपगाड्या दिसू लागल्या. गावातल्या अगदी अडचणीच्या ठिकाणीही सरकारी कचेऱ्या मिळेल त्या घरात उभ्या राहिल्या.

हे कुडाळ गेल्या दहा वर्षांतले.

मी पाहिलेले जुने कुडाळ कधीच अंतर्धान पावले आहे. तरीही मला ते प्रिय आहे, कारण या गावाभोवती माझ्या अंतरातल्या सुखद रमणीय आठवणी निगडित आहेत. आरती प्रभूबरोबर मी याच गावात त्याच्या ताज्या टवटवीत कविता ऐकल्या आहेत. त्याच्याबरोबर गवळदेवाचा माळ कवितेच्या ओळी गुणगुणत मी कितीदातरी तुडवला आहे.

आज तो माळही उरलेला नाही. आज आरती प्रभूही नाही. कुडाळ गाव मात्र नव्याने, कात टाकून उभे आहे. मला ते तरीही प्रिय आहे. कारण जुन्या गवळदेवाच्या माळावरील औद्योगिक वसाहतीतून पूर्वेचा निळा डोंगर अद्यापीही पूर्वीसारखाच ताजातवाना नि निळाभोर दिसतो आहे.

# पाषाणसौंदर्याची गावे

१. माणूस दगडातून प्रथम मूर्ती खोदतो आणि त्या मूर्तीमुळे मूळच्या ओबडधोबड दगडाला सौंदर्य प्राप्त होते. पण देवाने या पृथ्वीतलावर मनाला येईल तेथे भिरकावलेल्या लहानमोठ्या दगडाना मुळात सौंदर्य असते का? मी या जगाचा जो नखभर भाग हिंडून फिरून पाहिलेला आहे त्यातील कणभर जागीच मला हे दगडाचे उपजत सौंदर्य न्याहाळायला मिळाले आहे नि त्या चिमुकल्या प्रदेशामध्ये मालवणी मुलखातल्या झाराप–आकेरी–माणगाव या परिसराचा हमखास समावेश होतो.

हैद्राबाद शहरात रेल्वेने प्रवेश करण्याआधी कितीतरी अंतर गाडी एका दगडाळ प्रदेशातून धावत असते आणि रेल्वेलायनीच्या दुतर्फा विविध आकाराचे अक्राळ विक्राळ पाढरट करडे पाषाण आपली सोबत करीत असतात. प्रथम उघडे बोडके नि विनचेहऱ्याचे भासणारे ते दगड हळूहळू आपल्याला चेहऱ्या–मोहऱ्याच्या माणसा-सारखे दिसू लागतात, आपल्या नजरेचा ते ताबा घेतात नि मग त्याची सोबत माणसांसारखी वाटू लागते त्या दगडाच्या प्रत्येक चेहऱ्याचे वेगवेगळे रूप आपणास दिसू लागते. आंध्रप्रदेशमधल्या या पाषाणखंडाची ही कथा, तर तामीळनाडूमधील महाबलीपुरम येथील विशालकाय फत्तरांची वेगळीच हकीगत. तिथे तर प्राचीन काळच्या मूर्तिकारांच्या छिन्न्याना जणू आव्हानच मिळाले होते. त्या करड्या–पाढरट पण काहीशा मृदू पाषाणातून त्यांनी एवढ्या भव्य, सुदर नि नजरबंद करणाऱ्या कलाकृती निर्माण केल्या आहेत, की त्या पाहताना नजर स्तिमित होते.

राजस्थानात कोट्यापाशी असलेल्या तांबूस–गौर वर्णाच्या दगडाच्या खाणींनाही एक गोमटे रूप आढळते. तेथील दगडाची कांतीही नवजात बालकाच्या कांतीची आठवण करून देणारी. प्रत्येक दगड कसा गोंडस, तकतकीत, गुलाबी!

पण या साऱ्याहून माळवणी मुलखातल्या झाराप–आकेरी येथील प्रचंड काळ्या पाषाणांचे रूप किती अद्‌भुत आणि निराळे! पाषाणाचा कृष्णवर्ण आणि त्याचे कणखर नि कठोर सौंदर्य पहावे ते एका याच ठिकाणी.

कुडाळहून सावतवाडीच्या रस्त्याने निघालो की, पिंगुळी–बिबवणे ही हिरवीकच गावे

मागे पडतात नि रस्त्याच्या दुतर्फा सुरू आकेशा झाडाच्या रेखीव रांगा सुरू होतात. पूर्वीच्या काळी रस्त्याच्या कडेला अशी परदेशी झाडे कधी पहायला मिळत नसत. फक्त आंबा, वड, नांदरुख यासारखी सावल्या देणारीच झाडे रस्त्यावर असायची. पण अलीकडे सरकारच्या वनखात्यानेही सौंदर्यदृष्टी दाखवायला सुरुवात केलेली दिसते. त्याचाच परिणाम म्हणजे या रस्त्यावर कित्येक मैलांपर्यंत सुरू, सुबाभूळ आणि आकेशा यांचा शिस्तशीर आटोप असलेली झाडे कशी कवायतीला उभे असावे तशी आढळतात. एकूणच या रस्त्याचे सुंदरपण या झाडाच्या 'ॲव्हेन्यू' मुळे वाढले आहे. या झाडांची कवाईत झाराप गावाजवळ संपते नि आपली नजर झाडांऐवजी आजूबाजूला सुखेनैव पहुडलेल्या काळ्याभोर खडकांवर बंदिस्त होते. प्रथम टेकड्यांचा, खुरट्या झुडपांचा, कोंकणच्या भाषेत 'कवळकाडी' चा प्रदेश दिसू लागतो नि या खुरट्या झाडांच्या मध्ये हत्ती किंवा रानरेडे यानी पाय पसरून ताणून द्यावी, तसे हे प्रचंड खडक इतस्तत: पसरलेले दिसतात. हिरव्या रानात नि निळ्या आभाळाच्या पार्श्वभूमीवर उंच झाडासारखे हे काळे खडक एक वेगळीच रंगसंगती साधतात. पश्चिमेकडील एका खडकाच्या कुशीत एक उंच सात्वीणवृक्ष उगवलेला आहे. हा हां म्हणता त्याने खडकापेक्षा उंची कमावली आहे. तो सात्वीण आपल्या हिरव्या गच्च पानांनी सावली पायाखालच्या खडकावर पसरताना दिसतो. पलीकडे भातशेतीतच काही दगडानी ठाण मांडले आहे. श्रावण महिन्यात कोवळी पोपटी भातरोपे त्या राकट दगडाच्या अवतीभवती वाऱ्यावर डुलताना दिसतात. हिरवी कोवळीक आणि काळा रानदांडगेपणा यांची ती मैतरकी मोठी मजेदार वाटते.

झारापीपासून आकेरीपर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूला हे काळे पाषाणखंड पिढ्यान् पिढ्या उभे आहेत. कुणाचा आकार पखालीचा, कुणाचा हत्तीचा तर कुणाचा एखाद्या प्रचंड बेडकाचा. प्रत्येक पाषाणाला एक आकार आहे चेहरा आहे. दगडाच्या काळेपणाला इथे एक नितळ शाळीग्रामी कांती आहे आणि त्याच्या कठोरपणाचा एक दगडी साक्षात्कार इथे सतत घडत असतो. दगड असावा तर तो इथल्यासारखा. पाथरवटाला घाम फोडील आणि सुरुंगालाही दाद देणार नाही असा—अक्राळविक्राळ-पणातही एक सौंदर्य असलेला.

या दगडातून आजवर कुणी एकही मूर्ती कशी खोदली नाही?

आरती प्रभूने या दगडाच्या, त्याला भावलेल्या सौंदर्यावर सुरेख लेख लिहिला आहे एकदा तो मला म्हणाला होता, 'या दगडानाच मुळात मूर्तिसदृश सौंदर्य आणि व्यक्तिमत्त्व आहे; जातिवंत मूर्तिकाराला ते जर जाणवले असेल, तर तो वेगळी मूर्ती खोदण्यासाठी आपली छिन्नी कशाला उचलील?

खरोखरच, झाराप—आकेरीचे हे पाषाण म्हणजे आमच्या मुलखाचे एक भूषणच आहे! अजिंठा—वेरूळची चित्रे, शिल्पे तसे कोंकणचे हे अपूर्व पाषाणशिल्प. लाल

मातीतून आकाराला आलेले निराकार, निर्गुण सौंदर्यब्रह्म !

आकेरीच्या तिठ्यावर येईपर्यंत ही दगडी सोबत आपणास पुरते, पण तिथून डावीकडे माणगावच्या दिशेने निघाले तरी ती सपत नाही. माणगावच्या वाटेवर बाजूच्या डोंगरात गच्च झाडीमध्येही एक प्रचंड खडक सुळक्यासारखा आकाशात घुसलेला दिसून येतो. डोंगरावरच्या उत्तुंग झाडांशीच जणू त्याची स्पर्धा चाललेली असावी.

मग माणगाव येते

झाडापेडात बुडालेले, शीतळ, शात, हिरवेगार गाव दत्तभक्त श्री वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी यांच्या वास्तव्याने पुनीत झालेले दक्षिण कोंकणातले एक पवित्र क्षेत्रस्थान. माणगावची हद्द लागते–भटवाडी, ढोलकरवाडी अशा वस्त्या मागे टाकीत आपण माणगावच्या बाजारपेठेत येऊन ठेपतो. जवळच हायस्कूलची टुमदार सुदर इमारत बाजारपेठेत ठराविक कोंकणी उदीम चाललेला .

पण येथे येणारा परस्थ ओढीने येतो तो येथल्या पूज्य टेंब्येस्वामींच्या आणि श्री दत्तगुरु महाराजांच्या ! या सुंदर गावाची ग्रामदेवताही तेवढीच सुदर आणि काव्यमय नाव लाभलेली श्री यक्षिणी !

यक्षिणी देवीचे मदिर सहसा कुठे आढळत नाही. माणगावी ते आहे चौसष्ट योगिनींमधील आदिमाया यक्षिणी ही मुख्य योगिनी. या देवीचे येथील मदिर फार प्राचीन आहे सभामडप प्रशस्त आहे. श्री यक्षिणीखेरीज वरुण, इद्र, यम, शकर, अग्नी या देवताच्या मूर्ती या मदिरात आहेत लाकडी खांबावर नक्षीदार कोरीव काम केलेले आहे. श्री यक्षिणीवर ग्रामस्थांचीच नव्हे, तर अन्य भक्तांचीही नितांत श्रद्धा आहे. देवी नवसाला पावते असा तिचा प्राचीन काळापासून या घटकेपर्यंतचा लौकिक टिकून आहे.

श्री यक्षिणीच्याच रमणीय परिसरात श्री दत्तात्रेयाचे वसतिस्थान. या दोन देवतांची कृपादृष्टी उभ्या माणगाव परिसरावर सतत पसरलेली. या पुनीत परिसराला अलीकडील काळात एक नवे दैदीप्यमान परिमाण जडले ते परमपूज्य श्री वासुदेवानद सरस्वती ऊर्फ श्री टेंबेस्वामी याच्या वास्तव्याचे व त्यांनी निर्माण केलेल्या पुण्यप्रद भक्तिसंप्रदायाचे श्रीटेंबेस्वामी हे मनुष्यलोकीचे एक अलौकिक सत्चरित्र होते. श्रीदत्तसंप्रदायी, भूलोकी खडतर तपश्चर्या करून त्यानी आपल्या मानवी देहाला दैवी सामर्थ्य प्राप्त करून घे ले होते 'वर्णाश्रमविरहित मानवधर्माची उपासना करा' अशी शिकवणूक देणाऱ्या या संताने भरपूर वाङ्मयनिर्मिती केलेली आहे. त्या सर्व वाङ्मयातून सामान्य माणसाला गृहस्थाश्रमाचरणातून असामान्य शातीकडे नेणारा पावन संदेश आहे. टेंबेस्वामींचे चरित्र हे कित्येकांच्या मन शांतीची आणि उद्धाराची प्रेरणा ठरलेले आहे.

मालवणी मुलखामध्ये एकेकाळी श्री संत सोहिरोबा, श्री टेंबेस्वामी, श्री टाकी-महाराज यांसारखे सत्पुरुष होऊन गेले त्या सऱ्यानी या मुलखावर एक अनुग्रह केला आहे. कदाचित म्हणूनच या लाल मातीतला एरवी तिरसट, अहंकारी, तेरमी माणूस क्षणार्धात आर्त आणि कोमल बनू शकतो. या पाषाणभूमीवर शीतळ भक्ति-रसाचे हे चादणे पडल्यामुळे साराच परिसर कसा आरपार बदललेला दिसतो.

माणगाव गाव निसर्गसौंदर्याने बारमाही बहरलेला. वर्षाचे बाराही महिने या गावातल्या सावल्या कधी विरळ झालेल्या नाहीत. इथे उन्हेही कोवळी बनतात. पूर्वेला नजर टाकली की सह्याद्रीची निळी शिखरे पाच पावलावर उभी असल्यासारखी भासतात. गिरीवनराजीने नटलेली इथली गावे पूर्वीच्या काळी मलेरियाने हैराण झालेली असत. या दाट झाडीच्या, बाराही महिने पाणथळीच्या भागात डास अतोनात असत मी प्रथम या भागात गेलो तेव्हा मला थेट बंगालची आठवण झाली. सगळा तसाच देखावा. सारीच भातखाचरे. पूर्वी तर माणगाव तर्फ म्हणजे सावंतवाडी संस्थानाचे भाताचे कोठार म्हटले जाई. कुणी त्याला कोंकणचे रंगूनही म्हणत. एवढे अपरंपार भात पिकविणारे इथले मळे. पण माणसे मलेरियाने पीडलेली. बंगाल-मध्येही पूर्वी हाच प्रकार होता. कालांतराने हिवतापाचे उच्चाटन झाले. माणगावात आता हिवतापाचे नावही उरले नाही. पण जुनी माणसे त्या तापसरीच्या आठवणीने आजही हुडहुडतात !

पलीकडे ‘ निर्मल ’ नदी. नावाप्रमाणेच निर्मळ. या नदीचा आशीर्वाद गावकऱ्या-वर सदोदित असलेला. म्हणूनच येथे बारमाही पिकावळ: पण कोंकणातल्या सगळ्या नद्यासारखी निर्मलाही उन्हाळ्यात आपला पान्हा आखडते. पावसाळ्यात मात्र हिची अंगभूत निर्मलता आणि शांतता जणू क्षणैक नाहीशी होते नि ही पूर्वेकडून सह्याद्री-तून धावत येणाऱ्या जलौघाना पोटात रिचवून उन्मत्तासारखी बेभान दौडू लागते. पावसाळी हौरातील निर्मलेचे स्वरूप म्हणजे खरच शांत, सुस्वभावी गृहिणीचा प्रासंगिक रुद्रावतार ! पण ही निर्मला लागलीच शांतही होते. काठावरच्या उंच उंच झाडावर, काळ्या पाषाणखडावर आणि आजूबाजूच्या माणसावर पूर्ववत प्रेम करू लागते. तिचे उधळणारे, खळखळणारे प्रवाह बंदिस्त होतात नि ती खरोखरीची निर्मला, विमला, प्रेमला बनते—

आराप–आकेरीपासून माणगावपर्यंतचा हा टीचभर पट्टा निसर्गाच्या अशा विविध परींनी नटलेला आहे. या पट्ट्यातले पाषाण, डोंगर, झाडे, शेते, नद्या नि माणसे ही सारीच मला इतराहून निराळी वाटत आली आहेत. मालवणी मुलखाचा हा भूप्रदेश म्हणजे एक नितांतसुंदर पदर आहे, भरजरी, हिरवागार पैठणीचा असावा तसा !

# सावंतवाडी, नव्हे सुंदरवाडी !

१५. सावंतवाडीचे नाव कागदोपत्री सावंतवाडी असले तरी तिचे खरे नाव सुंदरवाडीच आहे आणि ती वर्षाच्या सर्व ऋतूमध्ये सारखीच सुंदर भासते. तिचे सुंदरवाडी हे नाव खरोखरच यथार्थ वाटते. सावंतवाडीत कोणत्याही मार्गाने प्रवेश करावा. तिचे हे अगभूत सौंदर्य प्रत्येक ठिकाणी बहरलेले दिसते. तुम्ही आंबोली घाट उतरून पूर्वेकडून या; किंवा वेंगुर्ले–शिरोडा–आजगाव करीत पश्चिम दिशेने या, गोव्याकडून दक्षिणेच्या अंगाने या किंवा कुडाळ–झाराप–आकेरी करीत उत्तरेकडून या; सावंतवाडीत प्रवेश करताना प्रथम डोळ्यात भरते ती इथली घनगर्द झाडी ! वर्षाचे बाराही महिने हिरवागार नरेंद्र डोंगर नि शहराच्या मध्यभागी आंगठीतल्या पाणीदार मोत्यासारखा पाण्याने डुंबलेला मोती तलाव !

सावंतवाडीला मी गेली कित्येक वर्षे जात–येत आहे पण एकदाही मला ती कुरूप किंवा ओंगळवाणी दिसली नाही. चैत्र–वैशाखाच्या तलखलीमध्ये कधी तिची शीतळाई हरपली नाही; तसेच आषाढ–श्रावणातल्या अविरत पर्जन्यधारांमध्येही तिचा ओलावा प्रमाणाबाहेर झाला नाही; डिसेंबर–जानेवारीच्या गात्रे गोठवणाऱ्या थंडीतही तिची ऊब ओसरली नाही, पावसाळ्यात तर तिच्या हिरव्या लावण्याला एक बहर आलेला असतो. वनराईभरली इथली गच्च झाडे पावसाच्या बोटाएवढ्या धारांतून निथळत उभी असतात आणि त्यांच्या पर्णसंभाराची तकतकीत कांती विलक्षण देखणी भासते. ग्रीष्मात ओसरलेला मोती तलाव पावसाळ्यात अधाशीपणे काठावर उड्या मारू लागतो आणि नरेन्द्र डोंगरातले मोर आर्तपणे केका घालू लागतात. डोंगरउतारावर वसलेली नि माणसांपेक्षा झाडांची जास्त वस्ती असलेली ही नगरी यामुळेच सदासर्वकाळ सौंदर्याने रसरसलेली वाटत आली आहे.

गावात कुठूनही शिरावे. मोती तलाव आणि नरेंद्र डोंगर यांचे दर्शन चुकणारच नाही. मग नजरेत भरते ती इथल्या नगरपालिकेची तलावाकाठची इमारत नि तिच्या मस्तकावरील भलेथोरले घड्याळ ! मुंबईच्या राजाबाई टॉवर क्लॉकसारखे हे वाडीचे टॉवर क्लॉक ! समोरच खेमसावंताचा ' राजवाडा ' ! त्यावर भगवे निशाण फडकते.

पण आता त्या राजवाड्याची राजा–राणीसाहेबांनी ' उद्यमनगरी ' बनवली आहे. तऱ्हेतऱ्हेच्या सुंदर हस्तकला वस्तू इथे खास राणीसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली तयार होतात. सावतवाडीची हस्तकलेबद्दल ख्याती फार पूर्वीपासूनच होती. इथल्या गंजिफा, लाकडी खेळणी नि फळफळावळ सर्व जगात नावाजलेली. आजही उभ्या बाजाराची चढण चढून गेले की ' चितारआळी ' लागते नि तिथे घराघरांत लाकडी-शाडूची खेळणी, गंजिफा तयार करण्यात येतात. सावतवाडी शहर डोंगराच्या कुशीत वसलेले आहे. त्यामुळे या शहरातल्या आळ्या नि बाजार पायी हिंडताना पायात गोळे येतात. अशी एकेक घाटी नि उतार जबरदस्त, पण थकायला होत नाही; कारण झाडा-पेडांची, नारळी–पोफळींची शीतळ छाया सतत पाठ राखीत असते. ती डोक्याला थंडावा देते नि शिवाय पाखरांचा अष्टौप्रहर चिवचिवाट आपली सोबत करतो.

जुन्या फडताळात किंवा कोनाड्यात वस्तू ठेवाव्या, तशी इथली घरे वरखाली, उताराला, घाटीला, ओढ्या-वहाळाला भिडून वसलेली. त्याचे अस्तित्व पटकन ध्यानात येतच नाही; पण बाजारपेठ मात्र एकदम उघड्यावर. मुंबई–पुण्याची आठवण करून देणारी झगमगीत दुकाने, चकचकीत शोरूम्स, खमंग उपाहारगृहे नि रसरशीत मंडई तिथे अबोली-सुरंगीचे घमघमणारे वळेसर, चाफ्या-गुलाबाची फुले, तऱ्हेतऱ्हेच्या ताज्या भाज्या नि केसांत गच्च फुले माळलेल्या बायका. मासळीमार्केट जरा पलीकडे, छोटेसेच; पण वेळेवर गेले तर तऱ्हेतऱ्हेची ताजी फडफडीत मासळी स्वागतासाठी सज्ज असते, भांडणाऱ्या पण प्रेमळ स्वभावाच्या किरिस्तावणी ! एकीकडे खासकील-वाडा, सालईवाडा, सबनीसवाडा असे इतिहासकालीन वाडे गावाचे जुनेपण जपत, काळाशी झुंजत राहिले आहेत, तर दुसरीकडे सिमेंट–काँक्रिटचे टुमदार देखणे नवे बंगले डौलात उभे राहताहेत.

तलावाकाठी उभे असलेले सुसज्ज सरकारी विश्रामधाम. त्याचे नाव ' पर्णकुटी. ' केव्हाही तिथे उतरण्याचा मोह व्हावा, एवढे सुंदर. गावात एकदोन चांगली लॉजिंग बोर्डिंग आहेत. त्यातील एके ठिकाणी तरी रुचकर मासळीचे जेवण हमखास मिळणार–शाकाहारी माणसाची एकंदरीत या गावी अडचणच !

या गावाचा चेहरामोहरा असा घरगुती, कुटुंबवत्सल आणि सगळीकडे निसर्गाची हिरवी माया पसरलेली. पण निसर्गाचे मन मोहवून टाकणारे सौंदर्य इथे मुक्तपणे उधळले गेले आहे, म्हणून जसे हे गाव मला आवडते, तसेच इथल्या खास बाणाच्या माणसामुळेही ! सावतवाडीची माणसे ही अख्ख्या मालवणी मुलखात आपल्या वैशिष्ट्या-मुळे वेगळी ठरणारी. ' वाडकर ' हा त्यांच्यासाठीच खास जपून ठेवलेला शब्द. ' वाडकर ' माणसापुढे इतर ठिकाणचा माणूस काहीसा दबूनच वागणार, बोलताना जपूनच बोलणार. कारण ' वाडकर ' केव्हा, कुणाची नि कशी फिरकी घेईल याचा

नेम नाही! वागण्यातसुद्धा तशीच चलाखी. इथल्या वाडकराने पायाने मारलेली गाठ हाताने सुटणे कठीण! पण ही वागण्याबोलण्याची तऱ्हा माणूस पाहूनच प्रगट होते. पुढ्यातला माणूस एक बेरकी असेल तर वाडकर सात बेरकी होईल. पुढ्यातला माणूस आतबाहेर, एकदोन, असा बोलू लागला की 'वाडकर' त्याची त्याच्याच पद्धतीने फिरकी घ्यायला एका पायावर तयार! 'भले तरी देऊ कासेची लंगोटी--' हा इथला रोखठोक व्यवहार. नाठाळाचे माथे काठीने सडकण्यासाठी जातीवंत वाडकराला मुहूर्त शोधावा लागत नाही. त्याची बुद्धी त्या दिशेने आपोआपच चालत असते. पण हा रोखठोक बाणा सोडला तर वाडकर गृहस्थ अतिशय रसिक, आतिथ्यशील, प्रेमळ आणि दुसऱ्याच्या दुःखाने व्याकुळ होणारा! नाटकात आणि साहित्यात रमणारा, बौद्धिक, शैक्षणिक कार्यात रस घेणारा, संस्था काढणारा नि त्या दक्षतेने चालवणारा, वृत्तपत्रे सुरू करणारा, ती अहमहमिकेने वाचणारा, ग्रंथालय जोपासणारा, लेखक-कलाकार याविषयी मनात आपुलकी बाळगणारा-ती वृत्तीतून व्यक्त करणारा.

पण वेळ आली तर भांडणारा, नुसते भांडण नव्हे तर कोर्ट कचेऱ्या करणारा, त्यासाठी वाटेल त्या टोकाला जाणारा, राजकारणात ईर्षेईर्षेने झुंजणारा आणि प्रतिपक्षाला सारे सामर्थ्य एकवटून नामोहरम करण्यात कृतार्थता मानणारा, हेही अस्सल 'वाडकरा'चे एक आगळे दर्शन! कधी खेळकरपणे तर कधी अस्वलाच्या बोचऱ्या गुदगुल्याची आठवण करून देणाऱ्या जीवघेण्या विनोदाने मैफल रंगवणारे 'वाडकर जगाच्या पाठीवर कुठेही गेले तरी आपल्या गावाचे वैशिष्ट्य विसरत नाहीत. एरव्ही 'दशावतारात रंगणारा वाडकर आपल्या वागण्या-बोलण्यातही दहा तऱ्हेचे अवतार धारण करताना आढळतो.

निवडणुकीचा हंगाम असावा आणि बाजारपेठेतल्या गांधी चौकात कुणाही 'मोठ्या' पुढाऱ्याचे 'लेक्चर' असावे, सावंतवाडीकर श्रोता अगदी अगत्यपूर्वक त्याचे 'बोल' ऐकायला चौकात हजर होईल. पण सभेत पुढे कधीच बसणार नाही. किंबहुना बसून भाषण ऐकणे इथल्या 'जनते'ला मान्यच नसावे. दूरदूर दुकानाच्या वळचणीला घोळक्याघोळक्याने उभे राहून वाडकर श्रोते भाषण ऐकणार आणि आपापसात त्या भाषणाचा जिथल्या तिथे 'पचनामा' करणार! अशा वेळी एकीकडे पुढाऱ्याचे राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय समस्यांवर पोटतिडकीचे भाषण चालू असते, तर त्याचवेळी त्यावरील तिखट, तुरट अभिप्राय आपल्या खास ढंगाच्या कॉमेंट्ससह वाडकर मंडळी एकमेकांना ऐकवीत असते! भाषणावरील ह्या कॉमेंट्स ऐकणे हीच एक वेगळी पर्वणी असते! भाषण कंटाळवाणे होऊ लागले की याच कॉमेंट्स जरा चढ्या आवाजात वक्त्याला ऐकू जाण्याइतपत मोठ्याने सुनवायलाही वाडकर भीडभीड बाळगणार नाही. त्याच्या अभिव्यक्तीची एक खास तऱ्हा आहे. मग ती चौकातल्या भाषणाच्या वेळी जशी प्रगट होईल, तशीच ती मासळी बाजारातही आपला आविष्कार

घडवून आणील. मासळी बाजारात वेंगुर्ल्याच्या बंदरातील चमकदार, नजरेत भरण्याजोग्या 'मुडदुश्या' दिसल्या तर वाडकर पहिल्यादा दर विचारील नि तो दर भलताच कडक वाटला तर निर्विकारपणे किरिस्ताणीला म्हणेल, 'मुडदुश्यो कारवारच्येशो दिसतात!' आता कारवारच्या मुडदुश्या सावतवाडीला कशाला येतील, हा प्रश्न यावर कोणी विचारायचा नाही पण मासेवाली किरिस्ताणीण मनात टोमणा ओळखते नि हसून उत्तर देते, 'पिसो मरे तू! तुज्या खिशाक दर परवाडतो तर ह्यो येंगुर्ल्याच्यो मुडदश्यो वाटल्यो आसत्यो! तुज्या खातीर ह्यो कारवारच्योच!'

पण हाच वाडकर एखाद्या गोष्टीवर लुब्ध झाला की त्याच्या तोंडच्या कौतुकाच्या शब्दाना जशी काही भरती येते! गोविंद नाट्यमंदिरात मुंबईच्या नामांकित नाटक कंपनीचा खेळ रंगला नाही, तर जशी त्यावरची नाराजी वाडकर तिखट शब्दात जिथल्या तिथे व्यक्त करील, आणि जर नाटक मनापासून आवडले तर आठपंधरा दिवस त्याची स्तुती प्रशंसेने घोळलेल्या शब्दातून आल्या-गेल्याजवळ करत राहील, 'छ्या! प्रभाकरान् काय काम केला म्हणान सांगा! आपल्या तर बुवा डोळ्याचा पारणा फिटला!' हा प्रभाकर म्हणजे प्रभाकर पणशीकर! आवडलेला कलावत जणू काही आपल्या घरातला एखादा 'अरेतुरे'तला कुटुंबीयच . असे जीवाभावाचे प्रेम, अशी भक्ती—

पण तेच एखादा नट मद्य पिऊन स्टेजवर आला नि त्याने नाटकाचा बेरंग केला तर ठेकेदाराला सणसणीतपणे सुनावतील– 'पुन्हा असले दारूडे जर वाडीक हाडलंस तर याद राख! थिएटराची झापा नि तुज्या मिश्यावरचे क्यास जाग्यावर न्हवाचे नाय–! हा, सांगान ठेवतय–'

वाडकराला नाटक–संगीताएवढच राजकारण प्रिय किंबहुना काकणभर अधिकच. 'जनता' वाले नि 'काँग्रेस'वाले दिल्लीला लढणार नाहीत एवढे इथे लढतील. त्यातच आता शिवसेनाही अवतीर्ण झाली आहे घराघरातून नि दुकानादुकानातून राजकारणावरील खमंग 'गजाली' या चालणारच! मुंबईची सारी वृत्तपत्रे इथे बारकाईने वाचली जातात नि 'लोकसत्ता' नि 'महाराष्ट्र टाइम्स' यांच्या अग्रलेखांवर अगत्यपूर्वक चर्चा होतात. शिवाय स्थानिक वृत्तपत्रे आहेतच. त्यांतून बाप्पा धारणकर होते तेव्हा स्थानिक स्वरूपाचे वादविवाद हिरीरीने खेळले जात, उत्तरे–प्रतिउत्तरे झडत. खुलासे प्रसिद्ध होत. नि वेळीप्रसंगी प्रकरणे कोर्टातही जात बौद्धिक कसरतीमध्ये इथल्या माणसाना जात्याच गोडी. लेखणी आणि वाणी याचे वरदान इथे सर्वांनाच लाभलेले; पण स्वभावात फणसाच्या गऱ्याचा रसाळपणा. वरवर कितीही काटेरी खडबडीतपणा दिसून आला तरीही.

वाडकर माणसाची ही सारी वैशिष्ट्ये म्हणजे इथली खास संस्कृतीच म्हणायला हवी ही संस्कृती इथल्या संस्थानच्या खानदानीपणाने, सोहिरोबानाथाच्या नि गवी-

नाथांच्या तसेच तळवण्याच्या मियाँसाहेबांच्या नि दाणोलीच्या साटममहाराजांच्या आध्यात्मिक वारशाने, साहित्य-नाट्य-संगीताच्या आवडीने, फळाफुलांच्या सहवासाने आणि बुद्धिमत्तेच्या वरचढ श्रेणीमुळे निर्माण झालेली आहे. इथला माणूस सहजा-सहजी हीन पातळीला जाणार नाही 'उत्तम' असेल त्यावरच त्याची उडी पडेल. बाजारात लाकडाची भारी विकायला घेऊन येणारी गरीब बाईसुद्धा माथ्यात अबोलीचा भरघोस वळेसर माळायला विसरणार नाही! इथल्या मुलीबाळी विटक्या कपड्यानी प्राण गेला तरी घराबाहेर पडणार नाहीत नि इथले पुरुष? एरवी बारीकसारीक मत-भेदासाठी भाडतील, तडतील, पण नाटकांतील एखादे पद सुरेख रंगले तर खूष होऊन भर नाट्यगृहात एकमेकांच्या हातावर टाळी देतील, सगळा वाकुडपणा विसरून! हा मनस्वीपणा इथल्या मातीतच रुजलेला आहे

मुळातच या गावाला संस्थानचा राजस पार्श्वभूमी लाभलेली. सावंतवाडी संस्थान हे एकेकाळचे छोटेखानी पण समृद्ध आणि अभिरुचिसंपन्न संस्थान इथल्या बापूसाहेब महाराजांच्या साधुवृत्तीच्या आणि प्रजाहितदक्षतेच्या आठवणी आज पन्नास वर्षांनंतरही लोक काढतात. महात्मा गांधींनी बापूसाहेबांच्या या संस्थानाला रामराज्य' म्हटले होते. एवढा त्यावेळी न्यायबुद्धीने कारभार चालायचा कोल्हापूरच्या शाहू-महाराजांचा होता तसाच रांगडा, मराठमोळा आणि प्रजेवर पोटच्या अपत्याप्रमाणे प्रेम करणारा बापूसाहेबमहाराजांचा स्वभाव होता आणि त्याला साटममहाराजांच्या शिकवणुकीची, शुचिर्भूत साधुत्वाची जोड होती असा राजा आणि तसा कारभार पुन्हा कोठे होणे नाही. आंबोली या डोंगरी गावाचे निसर्गसौंदर्य ओळखून या रसिक राजाने तिथे आपली उन्हाळी राजधानी, उन्हाळी मुक्काम वसवला आणि आपोआपच आंबोलीला पर्यटनस्थळाचे महत्त्व प्राप्त झाले! सावंतवाडीचे शैक्षणिक आणि बौद्धिक महत्त्व वाढावे यासाठीही इथल्या संस्थानिकांनी मनःपूर्वक प्रयत्न केले. इथे फार पूर्वीपासून, नक्की सांगायचे तर सव्वाशे वर्षांपूर्वी एक 'हायस्कूल' आणि एक 'वाचनमंदिर' सुरू झाले नि आज या दोन्ही संस्था 'राणी पार्वतीदेवी हायस्कूल' व 'श्रीराम वाचनमंदिर' भरभराटीला आलेल्या आपल्याला आढळतात. ज्या गावात उत्तम ग्रंथ वाचले नि सांभाळले जातात, त्या गावची सांस्कृतिक महत्ता वेगळी काय सांगावी? अगदी अलीकडील काळात सावंतवाडी परिसरातील साहित्यिकांनी स्थापन केलेला 'साहित्य संघ' इथल्या रसिकांची वाङ्मयीन भूक भागवण्याचा प्रयत्न करीत असतोच, पण या गावाने नि इथल्या परिसराने केवळ उत्तमोत्तम ग्रंथांचे वाचन केले नाही, तर इथे प्रतिभावंत साहित्यिकांनाही जन्म दिला.

वांद्याचे सत्पुरुष श्री सोहिरोबानाथ आंबिये आणि त्यांची 'दृष्टांत प्रत्ययी' काव्य-रचना संतवाङ्मयात कोणालाही विसरता येणार नाही.

सावतवाडीजवळच माणगावी श्री वासुदेवानंद सरस्वती यानीही आपल्या प्रासादिक रचनांत संस्कृत आणि मराठी आध्यात्मिक साहित्यात मोलाची भर घातलेली आहे. हे दाखले झाले पूर्वकाळातील, पण अलीकडील काळामध्येसुद्धा या परिसरात किती जण साहित्याची पताका घेऊन उभे राहिले ! 'पुरुषार्थ' मासिकाचे संपादक आणि वेदवाङ्मयाचे अनुवादक पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर, सतचरित्राचे व्यासंगी लेखक ज. र. आजगावकर यांच्यापासून तो वि. स. खांडेकरांपर्यंत, ते लगतच्याच शिरोड्याला दीर्घकाळ राहिले तरीही, सारेजण स्वत ला ते सावतवाडीकरच म्हणवून घेत. ग. त्र्य. माडखोलकर, वि. कृ. नेरूरकर, 'शारदाश्रमवासी' काणेकर, कविवर्य मंगेश पाडगावकर, नाटककार मो. ग. रांगणेकर, आनंद साधले आणि श. गो. साठे ही नावे चटकन् आठवणारी. पण पत्रकारितेच्या क्षेत्रातही एकाहून एक दिग्गज इथे उभे राहिले आणि इथूनच अन्यत्र गेले. जुन्या काळातील 'विविधज्ञानविस्तार'चे संपादक मोरमकर, तसेच मासिक 'मनोरंजन'चे संपादक का. र. मित्र आणि विठ्ठल जिवाजी नाडकर्णी, त्यांचेच सुपुत्र 'विविधवृत्त' आणि 'आलमगीर' यांचे सहसंपादक भा. वि. नाडकर्णी आणि मुख्य संपादक च. वि. बावडेकर, 'नवशक्ती'कार पु. रा. बेहेरे, हे सर्व रथी-महारथी सावतवाडीने व लगतच्या परिसराने निर्माण केले. 'वैनतेय'कार मे. द. शिरोडकर आणि 'सत्यप्रकाश'कार बाप्पा धारणकर हे स्थानिक पत्रकार– पण दोघानीही मराठी पत्रकारिता समृद्ध केलेली. या साऱ्याशिवाय आणखी अनेक जण आपापल्यापरीने साहित्याची आणि पत्रकारितेची सेवा आजतागायत निष्ठेने करीत आहेत. नावे तरी किती नि कुणाकुणाची घ्यावी ! या साऱ्या नव्या पिढीच्या तरुणानी काही वर्षांपूर्वी इथे 'अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन' दणक्यात पार पाडले हे नाट्यसंमेलन मराठी नाटकवाल्याना कधीच विसरता येणार नाही. दशावतारी नाटकातून भूमिका करणाऱ्या मालवणी मुलखातल्या बाबी नालगाने केलेल्या उत्स्फूर्त भाषणाने भल्याभल्या समीक्षक, विद्वानाना तोंडात बोट घालायला लावले ! मासळीचे जेवण, सोलकढीचे भुरके आणि वाडकरी आतिथ्याचा भडिमार यांमुळे दहा दिशांतून आलेले नाट्यपंढरीचे वारकरी गारेगार झाले.

आधुनिक मराठी कवितेचे जनक केशवसुत या वाङ्मयीन गावात अल्पकाळ का होईना, वास्तव्य करून गेले, याचा इथल्या मंडळींना केवढा अभिमान. ते येथे शिक्षक म्हणून काम करीत होते. मोतीतलावाच्या काठावरील एका झाडाखाली ते रोज सायंकाळी येऊन हवा खात बसत. अद्यापही 'इथे केशवसुत बसत' असे म्हणून ते झाड बाहेरून येणाऱ्या साहित्यप्रेमी व्यक्तीला दाखविण्याची इथल्या लोकांना भारी हौस वाटत असते. 'संध्याकाळ' नावाची कविता केशवसुतांनी १८९३ साली सावतवाडी मुक्कामी लिहिली अशी कागदोपत्री नोंद आहे. आजमितीला सावतवाडीचा वाजता गाजता कवी म्हणजे वसंत सावंत. 'स्वस्तिक', 'उगवाई' आणि 'देवराई'

या आपल्या कवितासंग्रहांनी मराठी कवितेमध्ये मोलाची भर घालणारा हा आत्ममग्न कवी सावतवाडीच्या निसर्गामध्ये तन्मय होऊन एकाद्या झऱ्यासारखा अहोरात्र कविताच गात असतो. आपल्या सावंतवाडीवरच्या कवितेत या कवीने सहज लिहून ठेवले आहे—

'हे गाव म्हणजे परमेश्वराला पहाटे पडलेले एक अधुरे स्वप्न !'

सावतवाडीचे याहून अधिक सुंदर वर्णन ते कोणते ?

# अंतरीचा ज्ञानदिवा : बांदे

११. सावतवाडीहून बांद्यापर्यंतचा सर्वच परिसर अतिशय निसर्गरमणीय आहे. तसे पाहिले तर मालवणी मुलखात एकही जागा अशी नाही, की जिथे रखरखीतपणा, उजाड नि ओसाड वातावरण आढळावे. या प्रदेशाला सृष्टीने आपल्या सर्व कळांचे लावण्य बहाल केलेले आहे. पावसाळा असो, हिवाळा असो, उन्हाळा असो; कोणत्याही ऋतूत हा मुलूख वैराण भासत नाही. पावसाळ्यात हिरवेपणाने सारे रानोमाळ भरून जातात. अष्टौप्रहर पडणाऱ्या पावसाने सगळ्याचे तनमन धुऊन लखलखीत होऊन त्याचे सौंदर्य द्विगुणित होते. हिवाळ्यात इतर ठिकाणी होते तशी उदास पानगळ या भागात फारशी होत नाही. शेतकरी राबासाठी 'कवळे' तोडून झाडे उघडीबोडकी करतात तेवढेच; पण एरवी सर्व सृष्टी टवटवीतच असते आणि उन्हाळ्यात रानातले पळस, पांगारे, शेवरी फुलू लागल्या म्हणजे तांबड्या रक्तवर्णाचे सर्वत्र डोंब उसळतात नि उन्हात तापणाऱ्या रानाला अद्भुत सौंदर्याचे देणे लाभते. करा, कुडा आणि उक्षी करवदी या रान वनस्पतींच्या फुलांचे उत्सव सगळ्या जगाला मोहित करतात त्यातच पिवळाधमक वाहवा नि जाभळा ताम्हना यांचे रंग मिसळले म्हणजे एक अविस्मरणीय रंगपंचमी कोकणच्या रानारानात रंगू लागते.

सावतवाडी—बांदा परिसरात निसर्गाचे हे डोळे खिळवणारे विभ्रम बारमाही आढळतात. सावतवाडीच्या उशाला जो नरेन्द्र डोंगर आहे त्यामुळे खुद्द सावंतवाडीला एक निरंतरची हिरवी वेशभूषा लाभली आहे; पण तेथून दक्षिणेला बांद्याच्या दिशेने जाऊ लागलो तरीही ही हिरवी सोबत कुठे कमी पडत नाही. सावतवाडीकडून गोव्या-कडे जाणारा डांबरी रस्ता एकसारखी वळणे घेत पुढे जातो. ते पाहून कोंकणात सर्वत्र आढळणाऱ्या दिवडाचीच आठवण होते. शिवाय तो एखादीच मोटारगाडी जाईल इतपत रुंद ! पुन्हा दोन्ही बाजूंनी गर्द झाडावळ. अशा रस्त्याने जात असताना मध्येच एके ठिकाणी वनराईचा भास होतो. रस्त्याकडेला एका बांधीव पाराच्या मधोमध सात जांभळीची झाडे एकमेकांना बिलगून उभी असतात. त्या जांभळीच्या पायथ्याशी एक घुमटी. उदबत्त्या दरवळणाऱ्या; कुणीतरी नुकताच एक नारळ

फोडलेला, चार फुले टाकलेली. आपण त्या देवस्थानाकडे कुतूहलाने पहात क्षणभर उभे रहावे, तोच समोरून एक गोव्याची लक्झरी बस येते. उतारूनी गच्च भरलेली. बस उभी राहाते. तिचा कंडक्टर पटकन खाली उतरतो. त्या जांभळीच्या पारावर घाईघाईने एक उदबत्तीचा जुडगा पेटवून ठेवतो, हातातला नारळ खचकन् फोडतो. त्याचे पाणी इकडेतिकडे उडवतो खोबऱ्याचा प्रसाद झाडाच्या मुळाशी ठेवतो एक चारआठ आण्याचे नाणेसुद्धा ठेवायला विसरत नाही मग आला तसाच घाईगडबडीने पुन्हा बसमध्ये जाऊन बसतो. बस सुरू होते.

जांभळीभोवती माकडासारखी जमलेली पोरे तो खोबऱ्याचा प्रसाद मटकावून टाकतात. नाणी खिशात घालतात.

मग दुसरी बस येते किंवा ट्रक येतो. पुन्हा 'सात जाभळी'च्या या देवस्थानचा मानपान पार पाडून मगच पुढे जातो.

दिवसरात्र हा प्रकार या सात जांभळीजवळ चालू असतो. चौकशी करता समजले की हे 'सात जाभळी'चे देवस्थान मोठे जागृत आहे. इथून नेहमी ये–जा करणाऱ्या वाहनांना, या देवस्थानचा मान राखावाच लागतो.

खंडाळ्याच्या घाटात 'शिंग्रोबा' समोर अशीच प्रत्येक गाडी थांबते नि नारळ फुटतो माणसाची श्रद्धा त्याला कुठे वाकवील सागता येणार नाही.

मला मात्र हा सात जाभळीचा परिसर, तेथील गर्द वनराजी आणि पक्ष्यांचा चिवचिवाट यासाठी फार आवडतो 'बर्ड वॉचिंग'साठी असे अप्रतिम ठिकाण दुसरे सापडणार नाही सात जाभळी मागे टाकून आपण पुढे निघालो की लगेच या भागात सुप्रसिद्ध असलेले 'इन्सुलीचे मेट' हे ठिकाण लागते हा एक छोटासा पण भयकर धोकेबाज वळणे असलेला घाट आहे प्रचंड सागवान नि तेवढेच प्रचंड पाषाणखड हे या 'इन्सुलीच्या मेटात' दुतर्फा आढळतात. हा सारा भाग सतश्रेष्ठ श्री सोहिरोबा आंबिये याच्या हिंडण्याफिरण्याने पवित्र झालेला. सोहिरोबा हे नाथपथीय अवलिये सत. गृहस्थाश्रमातून थेट सतमार्गावर पोचलेले अत्यत प्रासादिक काव्यरचना करणारे.

या संत सोहिरोबाना जिथे चिद्‌शक्तीचा साक्षात्कार प्रथम झाला, ती पवित्र जागा इन्सुलीचे मेट उतरून खाली येताच अगदी रस्त्याच्या कडेलाच दृष्टीला पडते. रस्त्याच्या डावीकडे एक विशाल खडक पसरलेला आहे आजूबाजूला झाडेझुडपे. सोहिरोबाच्या काळी म्हणजे नेमक्या सव्वादोनशे वर्षांपूर्वी निश्चितच हे ठिकाण अत्यत निवांत, निर्जन असले पाहिजे. फार तर जवळून जाणाऱ्या या रस्त्याच्या ठिकाणी तेव्हा एखादी पायवाट किंवा बैलगाड्याची चाकोरी असे सागतात की, सोहिरोबा या रस्त्याने चालले असता त्याना भूक लागली. त्याच्याजवळ एक रसाळ फणस होता. त्यानी जवळपासच्या झऱ्यावर हातपाय धुतले आणि परमेश्वराचे स्मरण करून ते फणसाचे गरे भक्षण करावयास सुरुवात करणार तोच कुणाची तरी हाक

त्यांना ऐकू आली. कुणीतरी भुकेल्या स्वरात हाक मारीत होते, ' बाबा, हमकू कुछ देता है ? ' आणि पाठोपाठ कुणी एक तेज पुंज महापुरुष समोर उभा असलेला त्यांना दिसला. तात्काळ सोहिरोबानी समोरचा फणस त्या अनामिकासमोर ठेवला आणि त्याला साष्टांग नमस्कार घातला. एकमेकाची कुठेतरी मनोमन खूण उभय सत्पुरुषांना पटली होती समोर प्रगटलेल्या तेजस्वी कुडीने चार गरे खाल्ले आणि सोहिरोबासमक्ष तो अंतर्धान पावला ! जणू त्याने सोहिरोबावर अनुग्रह करून प्रयाण केले होते. सोहिरोबाची खात्री पटली की साक्षात गहिनीनाथ आपल्याला दर्शन देऊन गेले ! त्याच्या मुखातून शब्द उमटले, ' गैबी प्रसादे गैबीच झालो ' आणि त्यांची ब्रह्मानंदी -टाळी लागली. क्षणार्धात ते एका वेगळ्याच चिदानंदाच्या विश्वात गेले. एका मानवी जीवाला करुणाघनाच्या कृपाप्रसादाने परमोत्कट असे सुखनिधान लाभले. साध्यासुध्या गृहस्थाश्रमी सोहिरोबाना दैवी साक्षात्कार घडला

इन्सुली गावच्या या खडकावर ही घटना नऊदहा पिढ्यांपूर्वी घडली आणि सोहिरोबाना गुरुप्राप्ती होऊन त्याचे सारे जीवन पालटून गेले.

आजही तो खडक तसाच आहे गावकऱ्यानी, भक्तजनानी तेथे एक लहानशी घुमटी बांधली आहे. संतांच्या साक्षात्काराचे पवित्र स्थळ म्हणून एक पाटीही तेथे लावली आहे.

इन्सुलीपासून बांदे अगदी जवळ. बांदे परिसर हा सोहिरोबाच्या चरित्राने पुनीत झालेला. बाप्पाच्या जुन्या पिढीतल्या मंडळींना सोहिरोबांचे अगत्य फार होते. त्यांची प्रासादिक रचना घरोघरी मुखोद्गत होती.

सोहिरोबांच्या कितीतरी हकीकती इथले भाविक लोक सांगतात त्यातल्या भाबड्या दंतकथा वजा केल्या तरी इतिहासाचे दाखले लाभलेले काही प्रसंग सोहिरोबाच्या सत्चरित्राची आजही खात्री पटवतात. सोहिरोबा फिरत फिरत ग्वाल्हेरीस गेले. महादजी शिंद्याचा अमल तिथे तेव्हा चालू होता. त्यांचे सेनापती जिवबादादा बक्षी केरकर हे बांदे परिसरातले. गोवा प्रांतातल्या केरी पालये या गावचे. त्यांच्या कानी सोहिरोबाची कीर्ती पोचलेली होती. सोहिरोबा आपल्या संस्थानात आल्याचा त्यांना साहजिकच आनंद झाला. त्याना घेऊन ते शिंदेसरकारच्या भेटीस गेले. शिंदेसरकारांना कविता रचण्याचा छंद. त्यानी अभ्यादराने सोहिरोबाना आपल्या तख्तावर बसण्याचा आग्रह केला सोहिरोबांनी त्याला विनम्रपणे नकार दिला नि ते सर्वसामान्यासारखे बाजूला बसले. नंतर शिंदे सरकारनी आपल्या कवितांची चोपडी सोहिरोबांना दिली नि म्हटले, " ही माझी रचना कशी साधली आहे ते पहावे ! '

त्यांना आपल्या कवितेची प्रशंसा सोहिरोबा करतील असे वाटले होते; पण सोहिरोबा कोंकणच्या विरक्त मातीत जन्मलेले अवलिये होते. देण्याघेण्याच्या व्यवहारापलीकडे पार पैलथडी त्याचे मन पोहोचलेले. त्यांनी महादजींची कविता वाचली नि बाजूला

ठेवून दिली. सरकारस्वारीने पुन्हा अभिप्राय विचारला तेव्हा ते फलंदरपणे उद्गारले, ' या कविता प्रासादिक नाहीत. ईश्वराच्या गुणानुवादाशिवाय जी कविता, ती आम्हांस नीरस कटाळवाणी वाटते. '

भर दरबारात खुद् शिंदे सरकारांना असा अभिप्राय कथित करणाऱ्या या निःसंग महात्म्याबद्दल अधिक काय सांगावे ? मग सोहिरोबानी महादजींना कवितेमध्येच उपदेश केला—

अशाच खाली गेला प्राण्या, जन्म तुझा व्यर्थ ।
कवण मी हा कोठिला तुजला नकळे परमार्थ ॥
अरूप आत्मा ब्रह्मस्वरूपी नलगे लक्षांश—
अनेक शास्त्राधारे तुजला प्रियकर वाचांश—।
जितुकी विद्या तितुकी वृत्तीचा आढळतसे अंश
परंतु न दृष्टि न पाहे नाथसंकेती चिद् अंश
अशाच खाली गेला प्राण्या, जन्म तुझा व्यर्थ ॥

महादजी नम्र झाले. त्यांनी जडजवाहीर भरलेले चांदीचे ताट नजराण्यादाखल सोहिरोबासमोर ठेवले. पुन्हा सोहिरोबा फकिरासारखे म्हणाले—

अवधूत ' नही गरज तेरी । हम बेपर्वा फकीरी
तू है राजा मै है जोगी । पृथक पंथ का न्यारा——
छत्रपती सब तेरे सरिखे । पाव न परे हमारा ।
सोना चांदी हमें नही चाहिये । अलख भुवनके वासी
महल मुलुख सब लंड बराबर हम गुरुनाम उपासी ।

शिंदे सरकार आणि त्याचा समग्र दरबार या अवलियाच्या बेफिकीर उद्गारांनी चकित झाला. पाठोपाठ सोहिरोबानी दुसरे पद म्हटले—

दौलत देख दिवाना मेरी । अपना मौज न करना फेरी
कोई दिन बनिया के दुकान । कोई दिन पर्वत के ठिकान
करम कारखाना ' हमारा नसिब जामदारखाना
जब सोहिरा तख्तपर बैठे । तब सब दुनिया लंडपर बैठे !

ही अफलातून वाटणारी, कुणाचाही मुलाहिजा न ठेवणारी, पण अंतर्यामी आत्मज्ञानाने पाजळलेली, ऐकणाऱ्याला खडबडून जाग आणणारी कविता कानी पडताच शिंदेसरकारांनी सोहिरोबासमोर लोटांगण घातले नसते तरच नवल !

असे हे सोहिरोबा जवळ जवळ ऐंशी वर्षांचे उदासीनपणाचे फकिरी आयुष्य

कविता करीत करीत जगले आणि एके दिवशी आपल्या महानिर्वाणाची सूचना देणारे काव्य लिहून ठेवून हे जग सोडून गेले. सत्पुरुष जेव्हा कुडीरूपाने नष्ट होतात, तेव्हा प्रसादरूप अशी त्यांची शिकवण मागे चिरतन उरते. सोहिरोबांचेही तसेच झाले. आज घडीला मालवणी मुलखातल्या खेडोपाडी आणि गोमतकामध्ये या संतकवीच्या रचना भजनातून, देवळातून, उत्सवातून भक्तिभावाने म्हटल्या जातात. पदे, झुलवे, अभग अशा नाना तऱ्हेच्या रचना सोहिरोबानी लिहून ठेवल्या आहेत. प्रासादिक, सुबोध शैली, रसाळ शब्दरचना, सामान्य माणसाला पटणारे दाखले आणि सहज तोंडी गुणगुणता येतील अशा गेयतापूर्ण चाली, यामुळे सोहिरोबाना विसरता येणे कठीण झाले आहे. आजही त्यांचे 'अतरीचा ज्ञानदिवा मालवू नको रेऽऽ' हे आर्त भजन कानी पडले की शुद्धबुद्ध न हरपणारा रसिक भक्तजन सापडणे विरळा. कविवर्य बा. भ. बोरकर तर सोहिरोबांना कोकणचे ज्ञानेश्वर म्हणत !

अशा या सोहिरोबांच्या गावी, बांदे मुक्कामी आपण पोचतो तेव्हा कोंकणातल्या एका वेगळ्या धर्तीच्या गावी आल्याचा भास होतो. बादे गावचे मला आढळलेले वैशिष्ट्य म्हणजे हे बाजारपेठेचे, हंगामात भरपूर व्यापार करणारे गाव, एरवी अगदी घरंदाज नि कुलीन वाटते. गावात शिरण्यापूर्वी एक नदी लागते. कोंकणातल्या सगळ्या नद्या उन्हाळ्यात खडखडीत कोरड्या पडलेल्या; पण बांद्याची ही नदी बारमाही पाण्याने भरलेली. उन्हाळ्यात पाणी थोडे आटेल, पण पात्र सपूर्ण कोरडे होत नाही.

तीस–चाळीस वर्षांपर्वी या नदीवर पूल नव्हता. नदीची रुंदी हातभरच; पण तरीही होडीची गरज भासावी एवढे पाणी खोल. आता पूल झाला असला तरी मधल्या वाटेने नदीच्या उन्हाळ्यातल्या उथळ पात्राने माणसे पायी ये–जा करतात. पुढे पश्चिम दिशेला विस्तीर्ण होणारी तेरेखोलची खाडी, ती हीच बांद्याची नदी. पूर्वी जेव्हा पूल नव्हता तेव्हा या नदीतून लोक पैलथडीला उतरत आणि पायऱ्या चढून पुढे जवळच असलेल्या बाजारपेठेत प्रवेश करीत, पण त्याआधी तेथे एक गुराचा बाजार असायचा. उन्हाळ्यात आठवड्याच्या बाजाराला घाटावरचे 'हेडे' विकाऊ गुरे घेऊन तेथे उभे असत नि आजूबाजूच्या गावातले कुळवाडी कमरेचा 'कसा' चाचपीत हव्या असलेल्या 'जित्रापा' ची पाहणी करीत. तिथून पुढे उघड्यावर मासळीबाजार भरे बांद्याला वेंगुर्ल्याची ताजी मासळी रोज येते नि गावातले दर्दी मत्स्यखाऊ ती कधी येते त्यावर नजर ठेवून असतात.

बांद्याची बाजारपेठ सुखवस्तू, हाती चार पैसे राखून असलेल्या खुशालचंद व्यापाऱ्याची. गोवा बॉर्डर जवळ. पोर्तुगीजाच्या काळी गोवा ते भारत हे दळणवळण ठप्प होते, तेव्हा छुप्या मार्गाने व्यवहार करणाऱ्याना सरहद्दीवरची गावे म्हणजे

सोन्याची वाटत. गावात डोळ्यांना वरवर दिसणारा उदीम होत नसला तरी अदृश्य स्वरूपात खूपच उलाढाली होत नि गावावर त्या व्यवहाराची एक सुप्त सधनता दिसून येई. आता सरहद्दीवरच्या कुठल्याच गावाला तसे काही व्यवहार करण्याची गरज भासत नाही. आता घाटावरचा माल आणायचा नि कोंकणात विकायचा. बेळगाव शहर नेहमीच्या दळणवळणातले. झालेच तर हाकेच्या अंतरावर गोवा.

बांद्याच्या बाजारपेठेचा रुबाब पहावा तो मार्च–एप्रिल–मे महिन्यात काजूबियांचा नि आमसोलाचा हंगाम सुरू झाला म्हणजे. बांद्याच्या बाजारपेठेत जागोजागी हातात तागडी घेऊन 'काजी' नि 'थुलो' यांचा व्यापार करणारे लहानमोठे असंख्य व्यापारी काजूचे, आमसुले–भिरडे यांचे ढीग घेऊन बसलेले आढळतात. [illegible] लाखोंच्या रुपयांचे काजू नि थुले या बाजारात खरेदी केले जातात. आजूबाजूच्या कुळवाड्यांच्या हातात नोटा नाणी मावेनाशी होतात.

काजी खरेदीमध्ये काँपीटेशन जोरदार असते. समोरच्या व्यापाऱ्याने दहा रुपये किलो मागितलेले काजू आपण अकराला घेतले याची बहादुरी न बोलता व्यक्त करणारे हुषार व्यापारी इथे आढळतात नि मापात पाप करून रुपया अधिक दिला तरी गिऱ्हाईकाला फसवले, असे त्याची उघड नालस्ती करणारेही समोरच काजीचा ढीग घेऊन बसलेले दिसतात! एकूणच बांदेकर मंडळींना आत एक, बाहेर दोन असा प्रकार आवडत नाही. एक घाव दोन तुकडे ही वृत्ती आणि ती व्यक्त करताना अस्सल प्रेमळ शिव्यांचा मुबलक वापर करणे हा प्रघात. बांदेकराची भाषा ही खास ऐकावी अशी. तिरफळे घातलेले नि भरपूर आंबट–तिखटाचा वापर केलेले मासळीचे 'तिखले' असावे तशी ही झणझणीत, झोंबणारी, पण हवीहवीशी वाटणारी खास बांदेकरी भाषा! ती ऐकायलाच पाहिजे नि जिभेचा बुळबुळीतपणा घालवण्यासाठी स्वतः बोलायला शिकले पाहिजे. इथल्या हॉटेलातून मिळणारी 'भजी' हीसुद्धा इथल्या भाषेइतकी रुचकर, खमंग नि झणझणीत!

बांदेकराची नितांत भक्ती गावच्या ग्रामदेवतेवर. 'श्रीबांदेश्वर' ही इथली ग्रामदेवता. बांदेकराची तिच्यावर श्रद्धा 'बांदेश्वराच्यान.' असे दर वाक्याला [illegible] बांदेश्वराला आमचक–एकदा दक्षिणा न करणारा बांदेकर आढळणार नाही.

श्रीबांदेश्वराचे देवालयही मोठे प्रसन्न आणि सुरेख आहे.

बांदेश्वराइतक्याच भाविकतेने ग्रामस्थानी सोहिरोबाच्या पादुकांचीही प्रतिष्ठापना केली आहे. सोहिरोबाचे आजच्या पिढीतले वंशज प्रा. आबिये यानी त्या पादुकांची दैनंदिन देखभाल कर्तव्यबुद्धीने स्वीकारली आहे.

बाजारपेठ सोडावी नि थोडे गावाबाहेर किंवा गोवा रोडने चालावे. रस्त्याच्या दुतर्फा रसिकतेने, सौंदर्यदृष्टी जागी ठेवून बांधलेली चिरेबंदी, कौलारू सुबक ठेंगणी

घरे हे त्याचे आणखी एक मनात भरणारे वैशिष्ट्य या घराभोवती गर्द केळी, कर्दळी नि तुळशी, फुलझाडे नि आंबे-फणस यांची दाटी. घरकारणी अपूर्वाईने त्या बागशाईला पाणी शिंपणाऱ्या. या गावाला घरंदाजपणा आहे असे मी म्हणतो. तो या घरामुळे, या गृहिणीमुळे आणि गावाच्या एकूणच खानदानी व्यक्तिमत्त्वामुळे! सोहिरोबांचा 'अलरीचा ज्ञानदिवा' जपणाऱ्या बादा गावाला सोहिरोबांच्या विरक्त अध्यात्माची जोड आहे. श्री बांदेश्वरावरील श्रद्धेची गावावर पाखर आहे, बाजारपेठेतला इरसाल झणझणीतपणा आहे नि तुळशीच्या अंगणातला ऊबदार, स्निग्ध घरंदाज गाखा आहे—

म्हणून मालवणी मुलखामधले हे गाव मला निरंतर आवडते.

श्री मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
१९२०
६३२२
२५४५

# तळ्यात रूप पाहणारे धामापूर

१२. मालवणला जाण्यापूर्वी धामापूर पहायलाच हवे. चौक्याला गाडी उजवीकडे वळली आणि लवकरच दुतर्फा हिरवेगार रान लागले. डांबरी रस्ता मागे पडून कोकणच्या सुप्रसिद्ध लाल मातीतून धुरळ्याचे ढग उडवीत एसटी पुढे धावू लागली. डावीकडील सृष्टिसौंदर्य पहावे की उजवीकडील मोगरण्याचे जंगल पहावे याचा डोळ्यांना संभ्रम पडला. मोगरणे हे मालवण–धामापूर जवळचे एक कष्टाळू गाव. गावच्या बायका रोज सकाळी सुक्या लाकडाची मोळी, गवताची बरड किंवा काजूगर, भाजीपाला घेऊन मालवणच्या बाजारात येतात. चार नाणी हाती लागतील त्यांचा बाजार खरेदी करून दुपारी पुन्हा चालत घरी परततात. या भागात बायका–बाप्ये काहीशी वेगळी मालवणी बोली बोलतात, असे माझ्याबरोबर भ्रमंतीसाठी आलेले अरविंद म्हापणकर म्हणाले मी विचारलं, 'उदाहरण देऊन सांगा—'

'मालवणी माणसे 'आलंय किंवा 'इलय अस 'आलो' या अर्थी म्हणतील. तर या मोगरणे परिसरातली माणसे 'आलाव–गेलाव' अशी हेंगाडी मालवणी बोलतात!' म्हापणकर म्हणाले.

मालवणी बोलीचं व्याकरण अद्‌भुत आहे 'आलो' हा एकच शब्द अनेक तऱ्हांनी इथ बोलला जातो. 'मी' चे क्षणात 'मिया' होतं नि 'तू' चे तुया! मी धामापूरला चाललो होतो नि मालवणी मुलखाचे सौंदर्य डोळ्यात नि बोलीचा गोडवा कानात साठवीत होतो.

मग उजवीकडे एक मोठी घनदाट झाडावळीने भरलेली दरी लागली. खाली काजु-आंबे, फणस-नारळी नि पोफळी यांची एकच गर्दी. त्यांचे शेंडे वरच्या पठाराला भिडलेले. मोठे पहाण्यालायक दृश्य होते ते. तेवढ्यात एसटी एका वळणदार उतारावरून घरंगळू लागली. रस्ता अधिकच लालबुंद झाला. अरुंद वळणे पावलोपावली अडवू लागला. एसटी जिवाच्या करारानं हलके हलके पुढे सरकत होती. मध्येच एक काळ्या कातळांनी नि स्वच्छ पाण्याच्या खडित प्रवाहाने भरलेली इवलुळी नदी

घरे हे बांद्याचे आणखी एक मनात भरणारे वैशिष्ट्य या घराभोवती गर्द केळी, कर्दळी नि तुळशी, फुलझाडे नि आंबे–फणस यांची दाटी. घरकारणी अपूर्वाईने त्या बागशाईला पाणी शिंपणाऱ्या. या गावाला घरदाजपणा आहे असे मी म्हणतो. तो या घरामुळे, या गृहिणीमुळे आणि गावाच्या एकूणच खानदानी व्यक्तिमत्त्वामुळे ! सोहिरोबाचा ' अंतरीचा ज्ञानदिवा ' जपणाऱ्या बांदा गावाला सोहिरोबांच्या विरक्त अध्यात्माची जोड आहे श्री बांदेश्वरावरील श्रद्धेची गावावर पाखर आहे, बाजार-पेठेतला इरसाल झणझणीतपणा आहे नि तुळशीच्या अंगणातला ऊबदार, स्निग्ध घरदाज गारवा आहे—

म्हणून मालवणी मुलखामधले हे गाव मला निरंतर आवडते.

लागली. नदीच्या काठावर एक धर्मशाळेसारखी शेड बांधलेली नि नदीकाठ नि रस्ता यांच्या जोडीला चार तांबडे धावडे, पाचपंचवीस पितळी घंटा टांगलेल्या नि एका दगडावर फेकलेली ओंजळभर रानफुले दिसली अशी रस्त्यावरची देवस्थाने कोंकणात सगळीकडे आढळतात. तोच म्हापणकर म्हणाले,

'हा कासार टक्का! मोठं जागृत देवस्थान आहे हे, पण कमालीचं हिंसक! इथे फक्त बकरी आणि कोंबडी यांचाच नैवेद्य चालतो. वर्षाकाठी हजारो कोंबड्या नि शेकडो बकरे इथे बळी दिले जातात.. शेजारच्या त्या शेडमध्ये लोक जेवण करतात नवस फेडतात नि जातात—

'इथं फार फार वर्षांपूर्वी एका कासाराचा खून झाला होता. त्याचेच आता जागृत देवस्थान बनलंय पण मुळात खुनाचा अमल असल्यामुळे ते हिंसक व रक्तामांसासाठी आसावलेलं, त्यामुळे ज्याचा अपघात, मारामाऱ्या, धोकेबाज व्यवहार यांच्याशी संबंध असतो, असे ट्रकड्रायव्हर आणि हिंस्र प्रकारानी पछाडलेले लोक इथे नवस बोलतात. खून झालेला कासार बिनचूक पावतो नि रक्ताचे पाट इथल्या या शांत रानातल्या नदीकाठावर वाहतात—

आजूबाजूच्या रमणीय निसर्गसौंदर्यावर एक विलक्षण भीषण सावट पडल्यासारखे मला वाटले

जरा वेळाने एक घाटी उतरलो नि समोर विलक्षण देखावा दिसू लागला. दृष्टी पोचणार नाही, तेथपर्यंत जणू पाचूचे एक विस्तीर्ण बेट पसरावे तसा हिरवागार मळा. त्याला चहू बाजूंनी गर्द झाडीने वेढलेल्या डोंगराचं कोंदण आणि झुळझुळत्या पाण्याचे उन्हात चमकणारे पाट. ते दृश्य उजवीकडे पहावे, तोच डावीकडे खाली धामापूरचा प्रसिद्ध तलाव–दोन डोंगराच्या मध्ये जणू अडवल्यासारखा दिसणारा, 'विस्तीर्ण' या एकाच शब्दात न मावणारा, निळ्याशार शांत पाण्याने तुडुंबलेला, दोन्हीकडील डोंगरांचे प्रतिबिंब आरशासारखे दाखवणारा—

तोच एसटी हादरे घेत थांबली नि अरविंद म्हापणकर म्हणाले, 'आलं धामापूर. उतरू या—'

एसटीतून आमच्या आधी, मालवणहून आलेली एक म्हावरेवाली उतरली. तिने एसटीच्या टपावरून ताज्या मासळीच्या तीन टोपल्या आणल्या होत्या. बांगडे, कर्ल्या नि इतर सटरफटर मासळी. हीच मासळी आता धामापुरातल्या घराघरातून जाणार होती. त्या फडफडीत मासळीला प्रदक्षिणा घालून आम्ही पुढे गेलो नि माझ्या जुन्या स्मृती जाग्या झाल्या. कित्येक वर्षांपूर्वी मी या धामापूर गावी शाळेच्या सहलीतून आलो होतो. एखादे सुंदर स्थळ ध्यानात रहावे तसे धामापूर गाव नि तेथले भगवतीचे देऊळ, तलाव हे सारे माझ्या ध्यानात राहिले होते. माझ्या 'जुईली' कादंबरीतसुद्धा मी याच गावचे चित्रण केले होते नि आज पस्तीस–अडतीस वर्षांनी

पुन्हा अकल्पितपणे या गावी येऊन थडकलो होतो–तरीही हे गाव मला आज नवेच भासत होते

ढासळलेल्या चिऱ्यांच्या उंच पायऱ्या चढून श्रीभगवतीच्या मंदिरात गेलो तळयाच्या कांठावरच हे प्रशस्त मंदिर बांधलेले आहे. सभामंडपातून पलीकडे नजर टाकली की सारा अथांग जलाशय अथांग म्हणावे तर त्याला काठ आहेत. पायऱ्या-पायऱ्यांचा घाट आहे. पण तरीही तो अथांगच आहे.

कारण या तलावाचा तळ सापडत नाही, असे गावकरी सांगतात. गावकऱ्यांचे खोटे कसे असेल?

भगवतीचे देऊळ खूप वर्षांपूर्वी पाहिले होते, त्याचे एक मनोहर चित्र मनातल्या कप्प्यात दडून होते पण आज समोर दिसणारे देऊळ, का कुणास ठाऊक, पूर्वीसारखे दिसत नव्हते. ते निर्जन आणि उदासवाणे वाटत होते. पण गर्भागारासमोर उभा राहिलो नि बंद गाभाऱ्यातील त्या काळ्या पाषाणी महिषासुरमर्दिनीकडे नजर टाकली आणि मनाची उदासी क्षणार्धात नाहीशी झाली. पुजाऱ्याने सकाळीच देवीची पूजा केलेली होती. जास्वंदी–चाफ्याच्या लाल–पांढऱ्या फुलांनी देवी सजली होती. तिला हिरवी साडी–चोळी नेसवली होती. समोर नंदादीप तेवत होता. पुऱ्या उंचीच्या त्या मूर्तीचे कोरीव काम प्रेक्षणीय होते. सुबक, गोजिरे, रेखीव पाषाणी अवयव...पाया-खाली महिषासुराला दडपलेला, पण मुद्रा कमालीची प्रसन्न...डोळे कृपाळू आशीर्वाद देणारे.. आपले हात आपोआपच जुळतात, मन विनम्र होते—

गाभाऱ्याबाहेरच्या प्राकारात कोंकणातील ग्रामदेवतांच्या देवळात सगळीकडे आढळतात ते निरनिराळ्या देवतांचे ' तरंग ' ऊर्फ ' खांब ' उभे करून ठेवलेले होते. एका गोल खांबाला वर देवीचा पितळी मुखवटा लावून खाली गोल घागरेदार वस्त्र नेसवलेले असते. देवस्थानच्या उत्सवाच्या वेळी देवाचे मानकरी हे रंगीबेरंगी वस्त्रांनी नेसलेले ' तरंग ' ऊर्फ खांब हातात घेऊन उभे राहतात आणि ढोल, ताशे, मोगर-शिंगाच्या गजरात त्यांच्या अंगात संचार होतो, त्याला ' अवसर ' आला म्हणतात, हे हलते चालते देव. अवसराच्या मुखाने भक्तांशी बोलतात. त्यांची गाऱ्हाणी ऐकून उपाययोजना सुचवतात! कोंकणातील गावकरी घरात दुखणे आले तर डॉक्टरकडे जाण्याआधी गावातल्या देवाकडे साकडे घालण्यासाठी जाणार–अंगात संचार झालेले अवसर घुमत घुमत उपाययोजना सांगणार.

त्यानंतरही दुखणाईत शेवटच्या घटकेला पोचला की मग डॉक्टरसाठी धावाधाव!

श्रीभगवतीच्या या देवळातही पाच तरंग उघडे बोडके उभे होते. पावणाई, बाराचा पूर्वस, जैन, रवळनाथ आणि घाडवस ( घाडीवरा ) हे ते देव. त्यांच्या अंगावर कापड चढणार ती ' वार्षिक ' उत्सवादिवशी. भगवतीचे उत्सव रामनवमी, हनुमानजयंतीला होतात. चैत्रात जत्रा भरते. तिला ' गाडग्याची जत्रा ' का म्हणतात

ते तेथील ' देवळी ' सांगू शकला नाही !

पण श्री भगवतीच्या संबधात एक सुरेख कथा तिथे ऐकायला मिळाली. देवी भगवती ही अनादि कालापासून जाज्वल्य म्हणून प्रसिद्ध. भक्ताच्या संकटात त्याच्या-पाठीमागे वरदायिनी होऊन उभी राहणारी. धामापूर गाव कोंकणातला ग्रामस्थांची परिस्थिती यथातथाच, पण त्यांच्या घरची लग्ने थाटामाटात होत. नवरा मुलगा-नववधू हिऱ्यामोत्याच्या, रत्नामाणकांच्या दागिन्यानी मढवून लग्नसमारभात उभी केली जात. बाहेरगावच्याना आश्चर्य वाटे. हे गरीब गावकरी हे दागिने आणतात तरी कुठून ? त्यातले रहस्य असे होते की देवी भगवतीच खुद्द आपल्या भक्तासाठी हे दागदागिने पुरवीत असे ! लग्नकार्य उभे राहिले की गावकरी फुलांनी भरलेली एक परडी देवीला नमस्कार करून तलावात सोडीत नि आपणास कोणते दागिने हवेत ते देवीला प्रार्थना करून सांगत. सगळी फुलांची परडी तळ्याच्या पाण्यात बुडे नि पुन्हा दागदागिन्यानी भरून वर येई गावकरी ते दागिने लग्नसमारभात वापरीत. समारभ आटोपला की पुन्हा परडीत भरून तलावात नेऊन सोडीत. पुन्हा दागिन्याऐवजी फुलांनी डवरलेली परडी वर येई. असा प्रकार पिढ्यान् पिढ्या चालला होता पण एकदा गावातल्या एका परटाला कुबुद्धी सुचली. त्याने तलावातून देवीने परडीत घालून पाठवलेले दागदागिने पुन्हा परत केलेच नाहीत. त्या परटाचा नंतर निर्वंश झाला, एवढेच नव्हे तर त्यानतर एकदाही तलावातून दागिन्यांची परडी वर आली नाही !

धामापूर गावात त्यानंतर परटाचा धदाही टिकला नाही ! अगदी आज घटकेपर्यंत !

आणखी एक आख्यायिका ऐकायला मिळाली. पण तिला आख्यायिका कसे म्हणायचे ? तिचा अनुभव अगदी आजही तिथले लोक घेत आहेत, असे कळले भगवतीचे देऊळ ज्या साडेचारशे फूट लाब नि शहाण्णव फूट रुदीच्या मातीच्या बाधावर उभे आहे, त्या बांधाची दुरुस्ती करून खालच्या धामापूर-काळसे गावासाटी दरवर्षी गावकरी पाणी अडवतात नि त्या पाण्यावर दक्षिण- पूर्व दिशेला पसरलेला विस्तीर्ण पाचूचा मळा पिकावळीनी बहरतो. पण हे पाणी अडवण्यापूर्वी काळसेचे गावकरी-बहुधा ते धाडी समाजाचे लोक असतात-एका मातीच्या गाडग्यात दहीभात घालून त्याची वाजत गाजत मिरवणूक काढतात. देवीची खणानारळानी ओटी भरून तो दहीभात या तलावाच्या काठावर आणून समारभपूर्वक पुरतात नि मगच मळ्याला पाणी सोडतात. आश्चर्य म्हणजे गेल्या वर्षी पुरलेल्या दहीभाताचे गाडगे या वर्षी बाहेर काढले जाते तेव्हा आतील दहीभात जसाच्या तसा ताजा असतो ! त्याचा प्रसाद वाटतात नि नवा दहीभात तेथे पुरतात.

श्रीदेवी भगवतीची ही कृपासाऊली असे काळसे-धामापूरचे शेतकरी गावकरी मानतात.

पण ही कृपासाऊली खरोखरच घनगर्द आणि फलदायी आहे, याबद्दल माझी तरी धामापूर–काळसे गावातून हिंडताना खात्री पटली.

धामापूर गाव शेतीबागायतीने समृद्ध आहे. गावाच्या उशाला असलेल्या तलावाचे पाणी प्रत्येक घराच्या पावळीत खेळते आहे. त्या पाटात घरोघरची मुले डुबताहेत प्रत्येक घराभोवती आंबे, फणस, माड, पोफळी सावलीने नि फळभाराने रसरसलेले दिसताहेत. रातांबे गगनाला भिडूनही लवलेले नि नम्र. प्रत्येक अंगणात अबोली–मालीचे, गुलबक्षीचे नि शेवती–सदाफुलीचे ताटवे. अळू नि बाकी पालेभाजी तर रानासारखी पाटाभोवताली माजलेली. बारमाही पाण्याची एवढी उदंड श्रीमंती कोकणातील अन्य कोणत्याही गावी आढळत नाही नि त्या पाण्याचा गावकऱ्यांनी केलेला चतुराईचा वापर.

गावातून मधोमध गेलेल्या रस्त्यावरून आम्ही चालत होतो. दोन्ही बाजूंना माडीची, कौलारू, व्यवस्थित बांधणीची चिरेबंदी सुरेख घरे होती–एकमेकांपासून भरपूर अंतर बाळगून. पण तरीही एकमेकाशी जवळीक ठेवून मायेने उभी राहिलेली. त्या घराच्या ओसरीवर सुंदर बाळसेदार मांजर मासेवाल्या गावतिणीची वेळ साधून शेपट्या मोकळ्या सोडून निवांत बसलेली. बाकी सारा गार गार निवांतपणा—

भर दुपारची वेळ होती. तरीही या गावात उन्ह फारसे तापले नव्हते. शेजारी एक किराणा मालाचे दुकान दिसले. बाहेर सोडावॉटरच्या बाटल्याचे क्रेटस दिसले–म्हटल, सोडा पिऊन तहान भागवावी. दुकानदार अरविंद म्हापणकराचे परिचित होते. त्यानी गोटीच्या सोड्याच्या बाटल्या उघडून आमच्यासमोर धरल्या. म्हापणकर माझं नाव न सांगता म्हणाले, ' आजगावकर, हे मोठे साहित्यिक आहेत मुंबईचे. त्यासरशी आजगावकर चटकन म्हणाले, ' आमच धामापूर तर महाराष्ट्रातल्या सर्वांत मोठ्या साहित्यिकाची सासुरवाडी आहे !

आम्ही प्रश्नार्थक मुद्रा केल्या, तशी ते हौसेने सांगू लागले, ' हे पाठीमागचे बंद घर दिसतेय ना, तेथे पु. ल. देशपांड्याची सासुरवाडी...सुनीताबाईंचं हे माहेरघर–'

आमची पावले आपोआपच पुढे सरली.

आजगावकराच्या दुकानालगत एक जुने देऊळ होते. त्याच्या कडेने आत गेले की कै. अप्पासाहेब ठाकुराचे, म्हणजेच पु. ल. देशपांड्याच्या श्वशुरांचे जुने घर दिसते. धामापुरातल्या बाकीच्या साऱ्या घरांसारखेच एक, चिरेबंदी माडीचे. घर बंद होते. आत कुणी शिक्षक राहतात. ते शाळेला गेले होते. मला ते घर आतून पहायची उत्सुकता होती, पण ती पूर्ण झाली नाही एकादे वस्तुसंग्रहालय कुतूहलाने पहावे, तसं आम्ही उघड्या खिडकीतून आत पाहिले. आत ठाकूर घराण्यातील जुन्या कुटुंबियाचे फोटो भिंतीवर टांगलेले होते. कुणीतरी पदवीधर तरुणाचा कॉन्व्होकेशनच्या वेळचे कपडे घालून काढलेला फोटो, कुणी टाय–सुटाबुटातले तरतरीत मुद्रेचे

तरुण—आणि जुनेपुराणे फोटोग्राफ्स. आतल्या मोठ्या हॉलमध्ये जुने प्रशस्त लाकडी फर्निचर—जुने दिवे—वडवंच्या, कपाटे, खाटा इत्यादी. घरासमोरच एक सुबकशी पक्क्या बांधणीची विहीर—पाठीमागे परसू—त्यात पाचसहा माड, सागवान, फणस नि आंबे यांची झाडे परसवात थंडगार सावली.. दूरच्या टोकाला संडास.

सारे काही असावे तसे होते—

फक्त घरात मालक नव्हता—कुणीतरी बाहेरची माणसे रहात होती—तरीहि वास्तु-देवता प्रसन्न होती, शांत होती.

कोंकणातून बाहेरच्या मुलखात नाव कमावण्यासाठी गेलेल्या असंख्य कर्तबगार मालकाची अशी घरे गावोगाव मी पहातो. या घरातल्या मालकमंडळींनी मधूनमधून या बाडवडिलांनी बांधलेल्या वास्तूला पाय लावले पाहिजेत. घरच्या देवासमोर तुपाचा दिवा पेटवला पाहिजे. आपल्या मुलाबाळांना जवळ घेऊन जुन्या स्वैंपाकघरात पेज-सोलकढीभात जेवले पाहिजे असे झाले की मी उगाचच खूप सुखावतो—या घराचे मालक आप्पा ठाकूर अलीकडेपर्यंत बरचेवर गावी येत—मालकीणबाई तर आवर्जून येत अलीकडेच ती दोघेही अंतर्धान पावली. पुण्यशील माणसे घराचे घरपण जाणून होती.

'पु. ल. देशपांडे कधी आले होते का हो या घरात ? मी उत्सुकतेने विचारले.

'होय तर, झाली धा बारा वर्सां सगळीजणे आली होती .. नाय रे जगन्नाथा ? तुका आठवण आसा ! दारात मांडव घातलेल्यानी.. जावयबापू भायर खाट घालून बसत हवणा, गाणीबजावणी काय इचारू नका ! [illegible] पु. देशपांडो म्हणजे केदो मोठो माणूस—आमच्या गांवचो जावय ना तो-'

आजगावकर खूष होऊन सांगत होते. मग त्यांनी ठाकूर घराणे धामापुरात किती पिढ्यापूर्वी आले, त्याचा इतिहास सुनावला नि म्हणाले,

'ह्या लक्ष्मीनारायण मंदिर दिसता मा तां ठाकूर घराण्याची खासगी प्रॉपर्टी ! नि ह्यो ह्यसर तुमी बसलाहात तो महापुरुष ! ठाकूर घराण्याचो राखणदार-' एका कट्ट्यावरील पाषाणी देवतेकडे हात दाखवीत ते म्हणाले.

आम्ही आप्पा ठाकुरांच्या त्या मिळकतीकडे, पु. ल देशपांड्यांच्या सासुरवाडीकडे भक्तिभावाने पाहिले नि महापुरुषाला हात जोडून जायला निघालो.

आजगावकरांनी आमच्याकडून सोड्याचे पैसे घेतले नाहीत ! 'जावदे. कधी न येणारे तम्ही इलास. पैसे कसले देतास ?' कदी जांवयबापू भेटले तर इच्यारला म्हणान सांगा !'

धामापूर—काळशाच्या रस्त्यावर वाटेतच एक रवळनाथाचे भलेथोरले देऊळ लागले. सहज आत शिरलो. देवाच्या काळीथर मूर्तीच्या अंगावर एखादी नक्षी काढावी, तशी लाल पेंडकुळीची फुले गुरवाने चिकटवली होती. पोटावर सोळा,

उजव्या हातावर चार नि डाव्या हातावर चार अशी एकूण चोवीस फुले पाण्याचा थेंब लावून तिथे चिकटवली होती. समोर गुरव बसलेला. त्याच्याजवळ एक वयस्क बाई नि पुरुष. त्यानी रवळनाथाला साकडे घातले होते नि गुरवाने कौल लावला होता. यालाच 'प्रसाद' म्हणतात. उजवीकडचे पाचवे फूल खाली पडले तर तो शुभशकुन. ! आम्ही तो कौलप्रसादाचा सोहळा त्या एकाकी देवळात भर दुपारच्या प्रहरी पार पडताना पाहिला नि निघालो

'अवसर' नि 'कौलप्रसाद' याचे प्राबल्य मालवणी मुलखातल्या देवळातून किती मोठ्या प्रमाणात आहे, याचा हा आणखी एक दाखला.

धामापूरला लागून काळसे ..कर्लीच्या खाडीवरील एक रमणीय खेडेगाव. दोन्ही गावांचे सख्ख्या भावडाचे असावे तसे पिढीजात नाते. काळशाच्या एका टोकाला खाडीकाठावर उभे राहिले की पलीकडे नेरूरपार. खाडीच्या रुंद पात्रातून फेरी होडीची ये-जा चाललेली कुडाळ तालुक्यातली माणसे 'तर' ओलांडून मालवण तालुक्यात येत असलेली. कर्लीच्या खाडीच्या पात्रात जागोजाग माडपोफळी वाकून आपले रूप पहात असलेल्या. आरती प्रभूच्या कित्येक कवितातून ही खाडी प्रगट झालेली. चिं. त्र्य. खानोलकरच्या कादबऱ्यातून वाहणारी हीच ती कर्लीची खाडी. या खाडीच्या पलीकडे सारा त्याच्या कादंबरीचा प्रदेश.

मन भारावून गेले. वाटले; किती संपन्न हा मुलूख निसर्गाने इथे हातचे काही राखून ठेवलेले नाही. इथल्या मातीत किती गुणी माणसे निपजली !

ही कर्लीची खाडी, हे धामापूरचे तळे, ही नेरूरपारची 'तर हे सारे किती किती सुदर आहे ! आमचे पर्यटक काश्मीरला जातात. कुलू-मनाली नि उटी चुकवीत नाहीत. आमचे सरकारही त्यांना नको तिथे भटकवते- त्याऐवजी महाराष्ट्राच्या अंगणातल्या या सुंदर स्वप्नभूमीकडे पर्यटकानी धाव घ्यावी, असे प्रयत्न सरकार का करत नाही ? डहाणूपासून गोव्यापर्यंतची सारी कोंकणपट्टी मी फिरलो; पण या धामापूरच्या तलावाएवढा सव्वाशे एकर क्षेत्रफळाचा विस्तीर्ण तलाव कुठेही आढळत नाही. याच्या काठी असलेल्या गर्द रानान भरलेल्या डोंगरात पशुपक्ष्यांचे उत्तम अभयारण्य होऊ शकेल. या तलावात चांदण्यातल्या नौकाविहारासाठी पर्यटकांची झुबड उडेल. इथले हिरवेगार सृष्टिसौंदर्य न्याहाळताना बाहेरची माणसे वेडी होतील.

पण या बाहेरच्या पर्यटकाना आणायचे कुणी ? इथं एखादे सुंदर घरदाज हॉटेल पर्यटन खात्याने बांधावे, थोड्या सुखसोयी निर्माण कराव्यात नि थोडी जाहिरात करावी.

मुबईच्या पर्यटकाना माथेरान, महाबळेश्वर नि गोवा यांचा आता कंटाळा आला आहे. पण हे कुणी कुणाला सांगायचे ? नि ऐकणार कोण ? कारण हे कोंकण आहे,

परशुरामकाळापासून उपेक्षित भूमी...

मग काळशाची सावली सोडून दोन्ही गावाच्या मधोमध असलेल्या होबळीच्या माळावर आलो. विस्तीर्ण रखरखीत माळ मधोमध रस्त्याची चाकोरी गेलेली. लाल धुळीने भरलेला, उन्हात तापलेला रस्ता भर माध्यान्ह झालेली. आम्हाला मालवणला परत नेणारी एसटी आता यायची होती.

त्या माळावरून पलीकडच्या वाडीतून एक पधरासोळा वर्षाचा हडकुळा मुलगा सायकलीवरून धडपडत चालला होता. उन्हात तो घामाने निथळत होता. पाय अनवाणी होते. सायकलीच्या पाठीमागे कसले तरी अवजड खोके होते. ते सावरीत तो कष्टाने पॅडल मारीत होता. त्याची खुणेची घंटा वाजली नि शेजारच्या घरातून दोन पोरे धावत आली. थकलेला सायकलवाला पोरगा थाबला. त्याने खाली उतरून सायकल उभी केली. एका हाताने पाठीमागील खोके उघडले. त्यात आईसफ्रूट नि आईसकँडी होती. त्या पोरांनी हातातली नाणी त्या सायकलवाल्याला दिली. त्याने त्याबदली त्यांच्या हाती रंगीत बर्फाचे गोळे दिले पुन्हा खोके बद केले. सायकलीवर टाग टाकली नि मोठ्या कष्टाने तो त्या उन्हातून पुढे निघाला. घामाने निथळत. तहानेने व्याकुळ होऊन.

मला वाटले, हा बर्फाचा धडावा पाठीशी असूनही तलखली सोसणारा पोरगा म्हणजे कोंकणचेच मूर्तिमत प्रतीक आहे! सगळे काही देवाने दिले आहे; पण ते त्याच्या मुखात जात नाहीय. गार पाण्याच्या काठी राहूनही तो तहानेलेलाच आहे.

तेवढ्यात एसटी आली. अरविंद म्हापणकर नि मी परत मालवणला निघालो. धामापूरची घाटी चढून एसटी रोरावत पुढे जाऊ लागली. आम्ही तलावात रूप पाहणारे स्तब्ध धामापूर पहात परत चाललो होतो ..

# मिजास मालवणची !

१३. मालवण बंदराची मिजास एकेकाळी फार होती. मिजास बाळगावी असेच वैभव त्या बंदराचे होते. समग्र कोंकण किनाऱ्यावर जेवढी बंदरे आहेत तेवढ्याना, एक वेंगुर्ले नि दाभोळ सोडले तर, व्यापारी परंपरा फारशी नव्हती. मालवणलाही ती नव्हती फिरंगी, पुर्तुगीज, डच, अरब अशा परदेशीय व्यापारी मंडळींशी उद्योगउदीम केला तो या मोजक्या बंदरानी. राजापूर, चिपळूण ही खाडीकिनाऱ्याची बंदरे व्यापारात हुषार होती; पण त्याना समुद्राची खोली आणि अमर्यादपणा नव्हता मालवण बंदर मात्र गळ्यातल्या चमचमणाऱ्या सोन्याच्या छल्ल्यासारखे कोंकणपट्टीवर पिढ्यान्‌पिढ्या चमकत, झळकत होते.

कारण, श्री शिवप्रभूंनी समुद्रातल्या कुरटे बेटावर तीनशे वर्षांपूर्वी 'शिवलंका शोभावी, असा प्रचंड सिंधुदुर्ग किल्ला बांधला आणि मालवण बंदर नि गाव यांना भलतेच महत्त्व प्राप्त झाले ! 'सिंधुदुर्ग' म्हणजे मालवण आणि मालवण म्हणजे सिंधुदुर्ग असेच लोक मानू लागले नि ती समजूत आजघटकेपर्यंत चालू राहिली.

मी मालवण प्रथम पाहिले त्याला आता चाळिसाहून अधिक वर्षे लोटली त्यावेळचे मालवण आजही कसे लख्ख नजरेसमोर दिसते आहे. आम्ही कणकवलीहून इंग्रजी शाळेतली मुले ट्रिपसाठी मालवणला आलो होतो. शाळांच्या सहलीसाठी मालवण हे ठिकाण नामांकित. गावोगावची मुले सिंधुदुर्ग किल्ला नि मालवणचा किनारा, बाजारपेठ, काजू कारखाने, सिनेमागृह, पितळी वस्तूंचे कारखाने पाहाण्यासाठी उत्सुकतेने येत. आम्हीही तसेच आलो होतो. तेव्हा युनियनच्या मोटारी असत, पण त्याचे भाडे आम्हाला परवडण्यासारखे नसे, म्हणून आम्ही बिनखर्चाच्या 'मधल्या वाटा' शोधीत असू. कणकवलीहून मालवणला यायची अशी मधली वाट म्हणजे, रामगडवरून मालडीपर्यंत चालत यायचे नि तिथे सर्जेकोटच्या होडीत बसून कोळंबच्या नाक्यावर उतरायचे. तिथून पुन्हा तंगडतोड करीत मालवण शहरात प्रवेश करायचा. चालणे आपल्या पायीचे असे नि होडीचे भाडे द्यावे लागे फक्त चार आणे ! तेव्हा कणकवलीहून मालवणला आम्ही एका पावलात पोहोचलो होतो.

मालडीला पौर्णिमेच्या रात्री होडीत बसून रात्रभर केलेला होडीचा तो प्रवास कधी विसरता येणार नाही. वाटेत आंदिवडे, मसुरे ही काठावरची गावे लागायची. मध्येच एक ' जुवे ( बेट ) ' सुद्धा लागे नि होडीवाले, उथळ पात्र असले की खाली पाण्यात उतरून हाताने गाडी ढकलावी तशी होडी ढकलीत नेत! शिवाय ते होडी चालवताना सुंदर गाणी म्हणत. काठावरील पाण्यात डोकावणाऱ्या माडांच्या सावल्या, खाडीच्या पाण्यावर चमचमणारे चांदणे नि होडीचा डुबुक डुबुक आवाज ही माल-वणच्या या पहिल्यावहिल्या प्रवासाची अजूनही जागी असलेली आठवण.

त्यावेळी कोंकणातल्या सगळ्याच खाड्यातून होड्याची, लाँचीची वाहतूक चालायची मगलोरी कौलांनी नि निरनिराळ्या मालानी भरलेले मचवे खाडीतून खूप आतवर यायचे. कालावलीच्या खाडीतून चालणाऱ्या होड्या तर दिवस-रात्र नजरेला पडायच्या मालडी ते सर्जेकोट हा प्रवास उभ्या उत्तर मालवण तालुक्याला ठाऊक होता.

आता खाडी अतोनात होरली आहे. जुवे वर्षावर्षाला पाण्यात बुडत आहे नि वाहतुकीच्या होड्या कधीच बंद पडल्या आहेत आता एसटी तुम्हाला कुठेही घेऊन जाते.

मालवणला त्या काळी बंदर म्हणून नि बाजारपेठ म्हणूनही मोठी प्रतिष्ठा होती.

सोमवार पेठेतून चालत चालत आपण बंदरावर केव्हा येऊन पोचायचो ते कळत नसे. मुंबईची बोट पहाटे यायची. त्याकाळी गोवालाईनची एक स्पेशल बोट असे; पण मालवण बंदरात नांगर टाकणारी बोट फक्त वेंगुर्ल्यापर्यंतच जायची. तिला कोकणलाईनची बोट म्हणत. ' रत्नागिरी, ' ' हिरावती, ' ' चंपावती ' अशी त्या बोटींची नावे असत. ' बॉंबे स्टीम नॅव्हिगेशन कंपनी 'मार्फत त्या बोटींची वाहतूक होई. बोटी भल्यामोठ्या नि प्रशस्त असत. मालवण बंदरात बोट शिरू लागली की दुरूनच मोठ्याने भोंगा वाजे. त्याचे पडसाद सिंधुदुर्गाच्या तटावरून थेट कुंभार-माठीच्या माळापर्यंत घुमत. मग साऱ्या मालवणला जाग येई. बंदर तर गॅसच्या बत्त्यानी कधीच झगमगू लागलेले असे. त्याकाळी मालवण बंदराची ऐटच तशी असे. मालवणच नव्हे तर कोकणपट्टीचे प्रत्येक बंदर तेव्हा एका बोटीमुळे तशा ऐटीत वावरायचे. सकाळ-संध्याकाळ मुंबईची आलिशान बोट मुजरा करायची नि शेकडो पासिंजरांनी बंदर नुसते गजबजून जायचे! बंदर असो वा एसटी स्टँड, तिथे माणसांची वर्दळ नसेल तर त्याला कोण विचारते? मालवण बंदराला अशी अवकळा कधीच माहीत नव्हती. बोट बंदरात आली की घटकाभरापूर्वी सुटलेले ' खपाटे ' तिला अल्लद भिडत नि पासिंजर चढू-उतरू लागत बोटीच्या पासिंजराचे सामान म्हणजे एक औरच मजा! त्यात काय नसायचे? मुंबईहून येणारे चाकरमानी जणू अख्खी मुंबई खरेदी केल्यासारखे बोजे तेव्हा घेऊन येत. बोंबील, बटाटी नि खजूर हे तर असतच,

पण नाना तऱ्हेच्या चीजानी भरलेले गोण नि ट्रंका घेऊन ते कोंकणात येत. त्याच्या बोज्याना एक मुंबईचा खास वास असे! तीच गोष्ट कोंकणातून मुंबईला जाणाऱ्यांची. हंगाम असेल तशा वस्तू चाकरमानी जाताना बरोबर नेत. फणस, आंबे, शेंगलाच्या शेंगा, सोवशी, रोवळ्या, सुपे, वाडवणी, सुके बांगडे, कुळथाचे पीठ, उकडे तांदूळ, फार काय, कोंबड्यासुद्धा कधी कधी त्यांच्या सामानात असत! ही सारी भरताड पोटात साठवायला बोट तयारच असे. बोटीने कधीही सामान पुरे, म्हटले नाही नि कोंकणी प्रवाशाची गैरसोय केली नाही. किलोवर सामानाचे वजन करणे तर कोंकणी प्रवाशांना एसटी सुरू होईपर्यंत ठाऊकही नव्हते.

पण कोंकणच्या प्रवाशाच्या कुंडलीतली शनीची साडेसाती साडेसातच काय, साडेसातशे वर्षे उलटली तरी संपणारी नाही. त्यांच्या प्रवासात हालअपेष्टा ही गोष्ट कधीही चुकणारी नव्हे. बोट कंपनीने एके दिवशी कोंकण किनाऱ्यावरची रत्नागिरी, वेंगुर्ले नि मालवण ही वाजती गाजती नि पासिंदरानी गजबजती बंदरे, काहीतरी कारण काढून बंद करून टाकली नि मालवण बंदराची सारी रयाच गेली. कणा मोडून पडलेला माणूस कसे तरी दिवस काढतो, तसे हे बंदर आता बापुडवाणे बनून येईल त्या दिवसाला तोंड देते आहे. एके काळच्या बंदरातल्या खाणावळी, हॉटेले, ताडी-माडीची दुकाने हे सारे वैभव मग लयाला गेले.

पण बंदर बंद पडले म्हणून उरलेले मालवण गाव काही बंद पडलेले नव्हते. बाजार पेठेने बोट बंद झाली याचे काही काळ दु:ख केले, पण मग आपले लक्ष दुसरीकडे वळवले. मालवण हे काही असे ऐरक्याशा वाऱ्यावादळाने मोडून पडणारे गाव नव्हे. या गावाने शिवशाही पाहिलेली. खुद्द शिवाजीराजाला गरजेला पैका पुरवणारे कुशे सावकार या गावात होते इथला उदीम थेट मुंबई–सुरतेपर्यंत उत्तरेला नि कोचीन–मंगळूरपर्यंत दक्षिणेला पोचला होता. इथली तारवे दर्यापार वावरलेली, इथला मालवणी माणूस त्रिभुवनात हिंडून आपले पराक्रम गाजवणारा. शर्थीची, ईर्षेची नि बुद्धिमत्तेची उपजत देणगी लाभलेला.

या हुषार माणसाने पुन्हा एकवार कंबर कसली. मधली दहापधरा वर्षे, देवाला नारळ देतात तशी देऊन टाकली नि दरम्यान मालवण गावच्या व्यापार–उदीमाची घडी पुन्हा बसवली. काजूचे कारखाने काढले, कसल्या कसल्या एजन्सीज मिळवल्या, स्टोअर्स खोलले, नव्या पद्धतीची हॉटेलं काढली, बंदरातल्या जुन्या होड्या बदलून तिथे मच्छिमारीसाठी यांत्रिक पडाव आणले, बर्फाचा कारखाना काढला नि मासे, कोळंबी, बांगडे नि हंगामात आंबे यावर जोर दिला. या साऱ्या खटपटीमुळे आज पुन्हा मालवण गाव बाळसेदार दिसू लागला आहे बँकांची संख्या वाढली नि तिथे पैशाचे जोरदार व्यवहार होऊ लागले आहेत.

तसा हा गाव मुळातच सुंदर.

गावात प्रवेश करतानाच त्याच्या हिरव्यागार सौंदर्याच्या खुणा पावलोपावली भेटू लागतात. कुमारमठीची घाटी उतरून आपण पुढे होऊ लागलो की दुतर्फा 'कुळागर' भेटते. माड, पोफळी, आंबे यांची घनदाट बागायत नि तिला चिकटून, कठडाबंद रेखीवपणे वळत वळत धावणारा रस्ता. त्याआधी हुतात्मा रेगे याचे स्मारक लक्ष वेधून घेते. सुरुवातीलाच नवा पाहुणा या गावाच्या प्रेमात पडतो नि मग देऊळवाड्या-वरून पुढे एसटी स्टँड ओलांडून त्याने गावात पाऊल टाकले की तेथले चौरसचौरस आखीव रस्ते, स्वच्छता, टुमदार ठेंगणी घरे, मुंबई फॅशनने सजवलेली बाजारपेठेतली दुकाने नि प्रत्येक रस्त्याचे समुद्रकिनाऱ्याच्या दिशेने वळणारे पाऊल, हे पाहताच तो गारेगार होतो नि मग गावात थोडी ओळखपाळख होताच, त्याला पटू लागते की, हे झाडापेडात लपलेले गाव मोठे ऊबदार आहे. इथली माणसे प्रेमळ, आतिथ्यशील, रसिक आणि मनमोकळी आहेत. त्यांचे म्हणणे तुम्हाला ऐकून घेतलेच पाहिजे. कारण त्याला युक्तिवादाची भक्कम बैठक असते. गोव्यात जसे 'हांव सांगता, तू आयक' चालते, तसाच प्रकार थोडाफार इथही चालतो. इथल्या माणसांचे आग्रह तीव्र. राग नि लोभ व्यक्त करण्याच्या तऱ्हा तशाच. नाटक, सिनेमा, साहित्य, चित्रकला, शिल्पकला, शिक्षण, संगीत या जीवनाला समृद्ध करणाऱ्या साऱ्या सांस्कृतिक गोष्टीत मालवणच्या माणसाला विलक्षण गोडी. नाटकासाठी तो जीव टाकील. मुंबईच्या कंपनीचे नाटक पाहण्यासाठी नि स्वतः नाटक बसवण्यासाठी, त्याची सारखीच धडपड चालते. इथल्या लाल मातीने नाटककार निर्माण केले. नाट्यदिग्दर्शक, नेपथ्यकार नि निर्माते तयार केले. कमलाकर सारंग, भार्गवराम आचरेकर, वसंत आचरेकर, मच्छीन्द्र कांबळी, राजा मयेकर, नाना कोचरेकर, काका केणी, बाळ धुरी, बाळ परब, मास्टर भगवान (पालव), दामुअण्णा मालवणकर, लीलाधर कांबळी, मोहन तोंडवळकर, रघुवीर तळाशीलकर, सुंदर तळाशीलकर यांसारखे कितीतरी नामवंत लोक मालवण परिसराने महाराष्ट्राला केवळ 'नाटक, सिनेमा नि संगीत' या क्षेत्रात दिले. त्या सर्वांचा 'सोन्याचा कळस' असे मामा वरेरकर; तेही इथलेच. त्यांच्या घराचा आता मेढ्यात चौथरा फक्त उरलेला आहे, पण मालवणकर मंडळी कृतज्ञ आहेत. त्यांनी मामांची जन्मशताब्दी आपल्या हिंमतीवर तीन दिवस दणक्यात पार पाडली नि आता त्यांच्या घराचा जीर्णोद्धारही ते करणार आहेत! इथल्या उघड्या झापांच्या थिएटरात पहाटेपर्यंत नाटके रंगतात तिकिटासाठी झिम्बड उडते.

जी गोष्ट कंपनीच्या नाटकांची, तीच दशावतारी नाटकाची. दशावतार तर मालवणी मुलखाच्या रोमरोमात भिनलेला, पण तो मालवणच्या चतुःसीमेत होणार असेल तर त्याची रंगत भलतीच.

पावसाळ्यात, गौरी-गणपतीच्या दिवसात इथे रंगणारी 'भजने' ही एक

अवीट अनुभव. इथला गणेशोत्सव म्हणजे उभ्या मालवणी मुलखाने अभिमान बाळगावा अशा थाटात होतो. हे गावच मूर्तिकार–चित्रकाराचे. प्रल्हाद धोंड, एम्. आर आचरेकरापासून सारंग बंधू, बाळ वायंगणकर, शेडगे, परब, नाईक, पेडणेकर, रेवणकर, तळाशीलकर अशी किती नावे सांगावी? यांनी केलेली चित्रे नि शिल्पे त्रिखंडात गाजली. कोंकणच्या जन्मजात दारिद्र्यावर, देवाने इथल्या माणसाला दिलेल्या कलेच्या एका जिवंत रंगाने, आरपार मात केलेली आहे. इथली गरिबी या कलावंतांनी एका धुंदीत साफ धुऊन टाकली आहे. आर्थिक गरिबी असली तरी कलेची श्रीमंती इथे गावोगाव आढळते नि तिच्यामुळे इथला माणूस भूक–तहान विसरतो.

इथल्या बायकांनी आपल्या हातांनी सारवलेली अंगणे पहावी अशी शेणकाल्यातही उमललेली नक्षी नि चित्रकला जगाच्या पाठीवर कुठे सापडणार नाही. त्याच्या कणारांगोळीचे नि तुळशीवृन्दावनांचे याचे सौंदर्य, अबोली, सुरंगीचे त्यांनी गुंफलेले ‘ वळेसर ’ पाहिले की वाटते या अशिक्षित, साध्याभोळ्या बायलमाणसाच्या बोटांत देवाने कोणती कलेची जादू निर्माण केली आहे? मला वाटते, या मालवणी मुलखातल्या हवापाण्याचाच हा गुण असावा

भरडावरून पुढे सरकले नि डॉक्टर वल्लभ रोडने चालू लागले की तो अरुंद रस्ता आपणास थेट सोमवार पेठेत घेऊन जातो. तिथून स्टेट बँकेच्या पुढे एक वळण घेऊन तो गावात शिरतो नि ‘ मेढा ’ या वस्तीत घेऊन जातो मध्यमवर्गीय, सुखवस्तू ‘ गृहस्था ’ची आखेपशीर, एकमेकापासून योग्य अंतर ठेवून बांधलेली, बाहेरून छोटेखानी भासणारी, पण आतून प्रशस्त, हवेशीर घरे, काही माडीची, काही कौलारू, पण प्रत्येक घरासमोर तुळशी–कर्दळी–अबोलीची बागशाई, रंगीत छोटे तुळशीवृंदावन नि अंगण नि पाठीमागे चार माड, एखादा नीरफणस, आंबा, चिकू, असली फळे नि गर्द सावली देणारी झाडे बाहेरच्या बाकावर, झोपाळ्यावर बसलेली सुखासीन माणसे– ती तृप्त. संतुष्ट.

मालवणातल्या कोणत्याही भागात जरी आपण गेलो, तरी तिथे एक घरदाज खानदानीपणा आढळून येईल मालवणी माणूस प्रसंगी भांडतो, वितंडवाद करतो; पण त्याच्या घरात उभ्या राहिलेल्या आगंतुक पाहुण्याबद्दल त्याच्या कपाळावर कधीही आठी पडणार नाही त्याचे हास्यमुद्रेने स्वागतच होईल.

गावची शैक्षणिक नि सांस्कृतिक परंपरा दांडगी. इथले टोपीवाला हायस्कूल नि भंडारी हायस्कूल सुप्रसिद्ध तशीच कन्याशाळा. या शाळांनी कित्येक नामवंत व्यक्ती देशाला दिल्या आता आर्ट्स नि कॉमर्सचे शिक्षण देणारे कॉलेजही झाले आहे. इथल्या टोपीवाला हायस्कूलच्या प्रशस्त मैदानावरच मागे अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलन भरले होते. तसा सोहळा पूर्वी कधी झाला नव्हता. आचार्य अत्र्यांनी

मालवणच्या सोलकढीवर तर अग्रलेखच लिहिला होता. बालवाङ्मयाचे महर्षी 'बालसन्मित्र' पारूजी नारायण मिसाळ इथेच भरडावरील एका भाड्याच्या दोन खणी गाळ्यात राहून 'बालसन्मित्र' पाक्षिक वर्षानुवर्षे चालवीत होते. मालवण-करांना, मिसाळमास्तरांचा फार अभिमान आहे वृत्तपत्र क्षेत्रातही मालवणचा इतिहास मोठा आहे. 'धनुर्धारी'चे संपादक अ सी. केळूसकर इथलेच 'नवसंदेश'कार रमेश भोगटे जवळच्या मसुऱ्याचे. अलिकडे चालू असलेला 'जनयुग' नि 'आघाडी' ही दोन साप्ताहिके सोडली तरी 'सिंधुदुर्ग', 'कोकणदीप', 'अरुण', 'हिंदसेवक' यांसारखी वृत्तपत्रे त्यापूर्वी निघून त्यानी आपला कालखंड गाजवला. ग्रंथनिर्मिती करणारी मंडळीही मालवणात विपुल झाली. जुन्या पिढीच्या मामा वरेरकरांपासून तो नव्या पिढीच्या आ. ना पेडणेकर, ह. मो. मराठे नि लुई फर्नांडीस, अरविंद म्हापणकर, प्रकाश प्रभु आणि ए वी. सामंत, रवींद्र धामापूरकर, रवींद्र व सदा वराडकर यापर्यंत किती एक नवेजुने लेखक या गावात जन्मले वा वाढले. राज-कारणात स. का. पाटील, कामगारक्षेत्रांत दत्ता सामंत, विद्वत्तेत डॉ. भांडारकर, शिक्षणतज्ज्ञ रामभाऊ परुळेकर, डॉक्टरकीत डॉ. आजगावकर, डॉ वल्लभ, डॉ. सुवर्ण, ज्योतिषशास्त्रात वसंतराव लाडोबा म्हापणकर, ज्योतिर्भास्कर, जयतराव साळ-गावकर, क्रिकेटपटू पांडुरंग साळगावकर, अशी विविध क्षेत्रांतील किती म्हणून नामवंत माणसे सांगावीत? या साऱ्या गुणवान् व्यक्ती याच गावाने नि याच परिसराने दिल्या.

मालवणकराना या सगळ्यांचा सार्थ अभिमान.

मेढा, वायरी, आडारी, धुरीवाडा अशी मालवणची उपांगे आता आडारीला पूल झाला आहे, तिथून मालवण तालुक्याच्या उत्तर भागाल वाहतूक आता निर्विघ्नपणे सुरू झाली आहे

पण त्याच्या खऱ्याखुऱ्या अभिमानाचे स्थळ म्हणजे जंजिरे सिंधुदुर्ग! शिवाजी महाराजानी बांधलेला आणि त्यांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेला हा भव्य किल्ला मालवण बंदराच्या उशाला उभा आहे. गेली तीनशे वर्षे अरबी समुद्राच्या लाटा छातीवर तो घेतो आहे चहू बाजूनी सागर, पण मध्यभागी गोड पाणी, हा चमत्कार इथेच दिसतो! या किल्ल्याभोवती मालवणच्याच नव्हे, तर उभ्या कोंकणपट्टीच्या मानाच्या आठवणी रेंगाळत आहेत. प्रतिभावंत नाटककार राम गणेश गडकरी याना त्यांच्या 'राजसंन्यास' नाटकातील संभाजी आणि तुळशी याचा प्रणय-प्रवेश याच ऐतिहासिक किल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सुचला शूराना, वीरांना, प्रतिभावंताना, सामान्यजनाना स्फूर्ती देणारा हा बुलंद आणि बलदंड किल्ला म्हणजे मालवणकराच्या मस्तकातला शिरपेच आहे!

आणि इथला निसर्ग

तो फक्त रमणीय आणि प्रेक्षणीय आहे, असे म्हणून त्याचे नीटसे वर्णन होऊ

शकणार नाही तसे पाहिले तर सारा मालवणी मुलूखच निसर्गरमणीय आहे, पण त्यातही मालवणचे रूपच वेगळे. इथली ' वेळा ' म्हणजे समुद्रकिनारा, दक्षिणेला थेट देवबागेपर्यंत पोचली आहे. बारा किलोमीटर्स लांबीचा, सुतासारखा सरळ जाणारा, शुभ्र रेशमी वाळूने भरलेला असा प्रदीर्घ किनारा उभ्या कोंकणकिनारपट्टीत विरळा. तसे शुभ्र मऊ वाळूचे किनारे उदंड आहेत; पण इथली विस्तीर्णता इतरत्र नाही. उजव्या बाजूच्या सिंधुदुर्गाला न्याहाळीत घटका न् घटका नुसते अनवाणी पावलांनी चालत रहावे. उघड्या पायांना, ओल्या लाटांनी स्वच्छ धुतलेल्या वाळूचा स्पर्श किती हवाहवासा वाटतो, ते अनुभवलेच पाहिजे. डावीकडे मालवण गावची गर्द माड-पोफळीची व सुरूची बनराई. उजवीकडे सिंधुदुर्ग. ही या किनाऱ्याची श्रीमंती! सायकाळी सूर्यास्ताची घटका जर या ' वेळे 'वर घालवता आली, तर त्यासारखे स्वर्गसुख दुसरे नाही! यासाठी बाहेरगावाहून आलेले पाहुणे जीव टाकतात. या वेळेखेरीज खुद्द मालवणात एक चिमुकली ' चिवल्यांची वेळा ' आहे. असे म्हणतात की मालवणातल्या रसिक प्रेमिकांचे हे एकेकाळचे संकेतस्थळ! कदाचित् आजही असेल! दुसरी सुप्रसिद्ध वेळा आहे ती किल्ल्याच्या तटाखाली, ' राणीची वेळा '. तिथे किल्लेदारीण एकांतात आंघोळ करायची

चिवल्याच्या वेळेजवळ आता बॅ. नाथ पै यांचे एक सुरेख स्मारक ' सेवांगण 'च्या रूपाने उभे राहाते आहे. मालवणी मुलखातले नाथ पैंचे हे दुसरे कृतिशील स्मारक. पहिले स्मारक आहे ते करूळ येथे. पुढच्या पिढ्यांसाठी नाथ पै यांची प्रेरणा देणारी अशी स्मारके गावोगाव व्हायला हवीत. यात मालवणने आपला हिस्सा कर्तव्यबुद्धीने उचलला आहे —

मेढ्यातून चालत गेले की सरळ सरकारी रेस्टहाऊसवर जाता येते; इथल्या पीडब्ल्यूडीच्या रूक्ष ' रेस्ट हाऊस 'ला ' आरसे महाल ' असे सुंदर नाव आहे. इथे पुन्हा पुन्हा येऊन रहावे, असे वाटायला लावणारा तो डाकबंगला आहे. ' आरसे महाल 'समोर उभे राहून समोरची खाडी पहावी. खाडीपलीकडे दिसणारे वायंगणी गाव, निळ्या पाण्यावर डुलणाऱ्या पांढऱ्या शिडाच्या होड्या आणि जाळी फेकणारे मच्छीमार.

हे मच्छीमार पूर्वी मालवणच्या ' वेळेवर 'च रापण ओढून आणीत. खूप वर्षांपूर्वी मी ते दृश्य पाहिले होते. अलीकडे यांत्रिक होड्यांनी मच्छीमारी सुरू झाल्यामुळे बहुतेक पूर्वीसारख्या ' रापणी ' किनाऱ्यावर लागत नसाव्यात; पण अजूनही क्वचित् प्रसंगी रुपेरी बांगड्या, तारल्यांनी फडफडणारी रापण किनाऱ्यावर लागते, तेव्हाचे दृश्य विलक्षण असते. रापणीची दोन्ही टोके ओढून ती समुद्रातून बाहेर काढण्यासाठी दोन्ही बाजूंना पाच-पचवीस मच्छीमार आणवतात नि ' हायहेसऽ हायहेसऽऽ ' हे त्यांनाच कळणारे व स्फुरण आणणारे शब्द जोराने ओरडत रापण

मालवणच्या सोलकढीवर तर अग्रलेखच लिहिला होता. बालवाङ्मयाचे महर्षी 'बालसन्मित्र' पाळजी नारायण मिसाळ इथेच भरडावरील एका भाड्याच्या दोन खणी गाळ्यात राहून 'बालसन्मित्र' पाक्षिक वर्षानुवर्षे चालवीत होते. मालवण-करांना, मिसाळमास्तरांचा फार अभिमान आहे वृत्तपत्र क्षेत्रातही मालवणचा इतिहास मोठा आहे 'धनुर्धारी'चे संपादक अ. सी केळूसकर इथलेच. 'नवसंदेश'कार रमेश भोगटे जवळच्या मसुऱ्याचे. अलिकडे चालू असलेला 'जनयुग' नि 'आवाडी' ही दोन साप्ताहिके सोडली तरी 'सिंधुदुर्ग', 'कोकणदीप', 'अरुण', 'हिंदसेवक' यांसारखी वृत्तपत्रे त्यापूर्वी निघून त्यांनी आपला कालखंड गाजवला. ग्रथनिर्मिती करणारी मंडळीही मालवणात विपुल झाली. जुन्या पिढीच्या मामा वरेरकरांपासून तो नव्या पिढीच्या आ. ना. पेडणेकर, ह. मो. मराठे नि लुई फर्नांडीस, अरविंद म्हापणकर, प्रकाश प्रभु आणि ए. बी सामंत, रवींद्र धामापूरकर, रवींद्र व सदा वराडकर यापर्यंत किती एक नवेजुने लेखक या गावात जन्मले वा वाढले. राज-कारणात स का. पाटील, कामगारक्षेत्रांत दत्ता सामंत, विद्वत्तेत डॉ. भांडारकर, शिक्षणतज्ज्ञ रामभाऊ परुळेकर, डॉक्टरकीत डॉ. आजगावकर, डॉ बल्लव, डॉ. सुवर्ण, ज्योतिषशास्त्रात वसंतराव लाडोबा म्हापणकर, ज्योतिर्भास्कर, जयंतराव साळ-गावकर, क्रिकेटपटू पांडुरंग साळगावकर, अशी विविध क्षेत्रांतील किती म्हणून नामवंत माणसे सांगावीत ? या साऱ्या गुणवान् व्यक्ती याच गावाने नि याच परिसराने दिल्या.

मालवणकरांना या सगळ्याचा सार्थ अभिमान

मेढा, वायरी, आडारी, धुरीवाडा अशी मालवणची उपांगे आता आडारीला पूल झाला आहे. तिथून मालवण तालुक्याच्या उत्तर भागात वाहतूक आता निर्विघ्नपणे सुरू झाली आहे.

पण त्याच्या खऱ्याखुऱ्या अभिमानाचे स्थळ म्हणजे जंजिरे सिंधुदुर्ग! शिवाजी महाराजांनी बांधलेला आणि त्यांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेला हा भव्य किल्ला मालवण बंदराच्या उशाला उभा आहे. गेली तीनशे वर्षे अरबी समुद्राच्या लाटा छातीवर तो घेतो आहे. चहू बाजूंनी सागर, पण मध्यभागी गोड पाणी, हा चमत्कार इथेच दिसतो ! या किल्ल्याभोवती मालवणच्याच नव्हे, तर उभ्या कोंकणपट्टीच्या मानाच्या आठवणी रेंगाळत आहेत. प्रतिभावंत नाटककार राम गणेश गडकरी यांना त्यांच्या 'राजसंन्यास' नाटकातील संभाजी आणि तुळशी यांचा प्रणय-प्रवेश याच ऐतिहासिक किल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सुचला. शूरांना, वीरांना, प्रतिभावंतांना, सामान्यजनांना स्फूर्ती देणारा हा बुलंद आणि बलदंड किल्ला म्हणजे मालवणकरांच्या मस्तकातला शिरपेच आहे !

आणि इथला निसर्ग

तो फक्त रमणीय आणि प्रेक्षणीय आहे, असे म्हणून त्याचे नीटसे वर्णन होऊ

शकणार नाही. तसे पाहिले तर सारा मालवणी मुलूखच निसर्गरमणीय आहे, पण त्यातही मालवणचे रूपच वेगळे. इथली ' वेळा ' म्हणजे समुद्रकिनारा, दक्षिणेला थेट देवबागेपर्यंत पोचली आहे. बारा किलोमीटर्स लांबीचा, सुतासारखा सरळ जाणारा, शुभ्र रेशमी वाळूने भरलेला असा प्रदीर्घ किनारा उभ्या कोंकणकिनारपट्टीत विरळा. तसे शुभ्र मऊ वाळूचे किनारे उदंड आहेत; पण इथली विस्तीर्णता इतरत्र नाही. उजव्या बाजूच्या सिंधुदुर्गाला न्याहाळीत घटका न् घटका नुसते अनवाणी पावलांनी चालत रहावे. उघड्या पायांना, ओल्या लाटांनी स्वच्छ धुतलेल्या वाळूचा स्पर्श किती हवाहवासा वाटतो, ते अनुभवलेच पाहिजे. डावीकडे मालवण गावची गर्द माड-पोफळीची व सुरूची वनराई- उजवीकडे सिंधुदुर्ग. ही या किनाऱ्याची श्रीमंती ! सायंकाळी सूर्यास्ताची घटका जर या ' वेळे 'वर घालवता आली, तर त्यासारखे स्वर्गसुख दुसरे नाही ! यासाठी बाहेरगावाहून आलेले पाहुणे जीव टाकतात. या वेळेखेरीज खुद्द मालवणात एक चिमुकली ' चिवल्याची वेळा ' आहे. असे म्हणतात की मालवणातल्या रसिक प्रेमिकांचे हे एकेकाळचे संकेतस्थळ ! कदाचित् आजही असेल ! दुसरी सुप्रसिद्ध वेळा आहे ती किल्ल्याच्या तटाखाली, ' राणीची वेळा ' तिथे किल्लेदारीण एकांतात आघोळ करायची.

चिवल्याच्या वेळेजवळ आता बॅ. नाथ पै यांचे एक सुरेख स्मारक ' सेवांगण'च्या रूपाने उभे राहाते आहे. मालवणी मुलखातले नाथ पैंचे हे दुसरे कृतिशील स्मारक. पहिले स्मारक आहे ते करूळ येथे. पुढच्या पिढ्यासाठी नाथ पै यांची प्रेरणा देणारी अशी स्मारके गावोगाव व्हायला हवीत. यात मालवणने आपला हिस्सा कर्तव्यबुद्धीने उचलला आहे—

मेढ्यातून चालत गेले की सरळ सरकारी रेस्टहाऊसवर जाता येते, इथल्या पीडब्ल्यूडीच्या रुक्ष ' रेस्ट हाऊस 'ला ' आरसे महाल ' असे सुंदर नाव आहे. इथे पुन्हा पुन्हा येऊन रहावे, असे वाटायला लावणारा तो डागबंगला आहे. ' आरसे महाला 'समोर उभे राहून समोरची खाडी पहावी खाडीपलीकडे दिसणारे वायरणी गाव, निळ्या पाण्यावर डुलणाऱ्या पांढऱ्या शिडाच्या होड्या आणि जाळी फेकणारे मच्छीमार.

हे मच्छीमार पूर्वी मालवणच्या ' वेळेवर ' च रापण ओढून आणीत. खूप वर्षांपूर्वी मी ते दृश्य पाहिले होते. अलीकडे यांत्रिक होड्यांनी मच्छीमारी सुरू झाल्या-मुळे बहुतेक पूर्वीसारख्या ' रापणी ' किनाऱ्यावर लागत नसाव्यात, पण अजूनही क्वचित् प्रसंगी रुपेरी बांगड्या, तारल्यांनी फडफडणारी रापण किनाऱ्यावर लागते, तेव्हाचे दृश्य विलक्षण असते. रापणीची दोन्ही टोके ओढून ती समुद्रातून बाहेर काढण्यासाठी दोन्ही बाजूंना पाच-पचवीस मच्छीमार आणवतात नि ' हायलेसऽ हायलेसऽऽ ' हे त्यांनाच कळणारे व स्फुरण आणणारे शब्द जोराने ओरडत रापण

ओढू लागतात. घटकाभरात समुद्रातून रापण बाहेर येऊ लागते नि आत सापडलेले हजारो मासे तडफडत पाण्याबाहेर येतात. त्यांना पकडून किनाऱ्यावर टाकण्यासाठी मच्छीमार बायकांची एकच धादल उडते. वर कावळे, घारी भिरंगत असतात. रापणीवर झडप घालून जिवत मासे वरच्या वर पळवण्यात त्यांचा पहिला नंबर. पाठोपाठ गोरगरिबांची पोरे रापणीतून निसटलेले बारीक सारीक मासे पळवतात. त्यांची धावपळ पाहण्याजोगी असते. पण सगळ्यांत लक्षात राहते ती पाण्याबाहेर आलेल्या हजारो रुपेरी जिवत माशांची अतकाळची व्याकुळ तडफड !

मासळी नि सोलकढी हे मालवणकरांच्या जेवणातले दोन महत्त्वाचे जिन्नस. मासळी मिळाली नाही तर मालवणातल्या गृहिणींना चुलीजवळ जाववणार नाही. बांगडे, पापलेट, मुडदुश्या सवनाळे, विसवण, सरंगे, कर्ली, यांपैकी काहीही मिळालेले असले, की त्यांच्या चुलीजवळच्या हालचालींना जी चपळता येते, ती पहात रहावी. वाटपा–घाटपाचे श्रम मग कुणालाच जाणवत नाहीत रुचिक मासळी मिळण्याजोगी आनंदाची नि उत्साहाची घटना मालवणात दुसरी कोणती असेल ? मग तिरफळे, सुकी हळदीची पाने, नारळाचा आपरस या साऱ्यांचा मनपसंत वापर करून मालवणची ‘ घरकारीण ’ असा काही स्वादिष्ट स्वैंपाक राधील, की हाताचा वास साबणानेही जाऊ नये.

भात, मासळीचे सावारे नि सोलकढी मिळाली की मालवणी माणूस अतर्यामी तृप्त. सोलकढी एरवीही हवीच. ती नसली तर साधी चार सोले कोमट पाण्यात घालून नि तिरफळाची धूव देऊन बनवलेला ‘ तिवळ ’ तरी हवाच. सकाळी सुरसुरीत पेज ( तोंडाक कातळी ! ), दुपारी–सायकाळी मनाजोगती मासळी मिळाली नि रात्री निजताना माथ्यावर पळीभर खोबरेल ‘ गजायला ’ मिळाले की मालवणी माणूस ऐहिक जगातल्या सुखाच्या राशीवर झोपतो. मग झोपही कशी सुस्त निवात येते.

असे हे मालवण गाव नि इथला मालवणी माणूस ! आजूबाजूच्या साऱ्या निसर्गरमणीय परिसराची भटकती करावी. हडी, कालावली, तळाशील, वायगणी, मसुरे, बांदिवडे, कर्लीचो खाडी, देवबाग, धामापूर नि काळसे येथली सृष्टिशोभा डोळे भरून पहावी नि निवाऱ्याला मालवणात यावे

असा निवारा खचीतच दुर्मिळ..

# निसर्गरमणीय ‘ मसुरे ’

१४.

सरत्या माघातील दिवस होते थंडीची शिरशिरी अजून शिल्लक होती. मालवणी मुलुखातील रानोमाळच्या काजी मोहराने घमघमल्या होत्या. या काजूबागाच्या मादक घमघमाटात आंब्याचा मोहर आपली निशाणी शाबूत ठेवून होता. प्रात:काळी काजू-आंब्याच्या मोहराने दरवळणाऱ्या रस्त्यावरून चालायला मिळणे, म्हणजे केवढी सुखाची गोष्ट! कोंकणातील बाराही महिन्यांत भेटणारे, फळाफुलांच्या दरवळाचे सगळे हंगाम माझ्या ओळखीचे आहेत. पौष-माघातला काजी–आंब्याच्या मोहराचा हंगाम–त्यात फणसाच्या कोवळ्या कुयऱ्यांना येणारा सूक्ष्म गंधही मिसळलेला, त्याच्याच आगेमागे घराघराभोवतालचे शेगूल पाढऱ्या फुलांनी लदबदले की त्याचा येणारा कडवट, हिरवट वास पाठोपाठ फुलणाऱ्या सुरंगी, त्यांच्या सोनफुलांनी गजबजलेली सुरंगीची रासवट झाडे नि त्यांनी उघडल्या केलेल्या अत्तराच्या कुप्या, चैत्र–वैशाखातले पिकलेल्या आंब्या–फणसाचे दरवळ, सोनचाफ्या–नागचाफ्यांचे घमघमाट, सरत्या पावसात नाचण्याच्या दळ्यात पिकलेल्या चिबडाचे परिमळ, हळदिव्या झालेल्या तिळाच्या वाफ्यावरून धावत येणाऱ्या सुगंधी झुळुका नि भाताच्या पोसवलेल्या केसरांचा आणि नाचणीच्या कणसाचा समिश्र सुवास...बाराही महिने नाकपुड्या उत्तेजित करणाऱ्या नदीकाठच्या केगदी...

हे सारे दरवळ आणि घमघमाट हुंगण्यासाठी कोकणातले सगळे ऋतू मला हवेहवेसे वाटत असतात.

पण त्यातही माझे अधिक प्रेम असते ते पौष–माघातल्या दिवसांवर. सुरंगी–बकुळी आणि आंबा–काजू यांची झाडे अंगभर सुवासाचे उटणे माखून सर्वत्र उभी असतात आणि त्यांची सोबत केवळ अवीट असते.

मालवणहून मी मसुऱ्याला निघालो होतो. आडारीची हद्द ओलांडून पलीकडचा डोंगर गाठताच रस्त्याच्या दुतर्फा मोहराने अष्टांगी फुललेली काजीची झाडे दिसू

लागली. तांबूस चमकत्या रंगाचा तुरेदार मोहर. आंब्याच्या मोहरासारखी याची मिरास नाही. आंब्याचा मोहर नक्षीदार आणि देखणा असतो. त्याच्या मंजिऱ्या खुडून केसात माळण्याचा कुणाही स्त्रीला मोह व्हावा. काजूच्या मोहराचे तसे नाही. त्याचे सौंदर्य रागडे, काती सावळी, त्याचा वेगळेपणा त्याच्या ओतप्रोत फुलण्यात! मोहराने उत्कट फुललेली एकेक काज अशी की तिला पाने कमी भासावीत—एवढा अगावर उदंड मोहर—

आडारीनतर भेटलेली काजीची झाडे अशीच होती ..

मला वाटले, मसुऱ्याला नि आंगणेवाडीला जाईपर्यंत या काजूच्या मोहरलेल्या झाडांची अशीच सोबत लाभेल तर वाट भरकन संपेल.

पण मग आंगणेवाडीला जाणारा फाटा फुटला नि ही काजीची झाडे एकदम अंतर्धान पावली. लाल धुळीने भरलेला रस्ता पायाखाली आला नि मी आंगणेवाडीच्या 'भराडी देवी' च्या जत्रेला निघालेल्या सहस्रावधी माणसाच्या गर्दीत स्वतःला हरवून बसलो. झाडाच्या गर्दीतून माणसाच्या गर्दीत आलो.

मालवणी मुलखातील मसुरे—बांदिवडे—तोंडवळी—वायगणी हा एक निसर्गरमणीय पट्टा आहे, हे मी ऐकले होते. आमच्या या मुलखात झाडापेडाचे अप्रूप कुणालाच नाही. पण त्यातही झाडाझाडांचे वेगळेपण असते. डोंगरी पट्ट्यातील झाडाना खलाटपट्ट्यातील माड—पोफळीचे देखणेपण नाही; माड—पोफळीतही पुन्हा प्रत्येक ठिकाणचा गारवा वेगळा, हिरवेपणा वेगळा नि सावली वेगळी. मसुऱ्या—बांदिवड्याच्या नारळीच्या बागा मला बघायच्या होत्या. खाडीकाठावर वाकून प्रतिबिंब निरखणारे माड मला खुणवीत होते.

मी मसुऱ्याला निघालो होतो

पण वाटेत आंगणेवाडीला मालवणी मुलखातली भराडीदेवीची प्रचंड जत्रा त्याच दिवशी आहे, असे कळले नि वाट थोडी वाकडी केली. एक रखरखीत माळरान मागे टाकले नि हा हा म्हणता आगणेवाडीला येऊन पोचलो.

या मुलखातले दहीकाले नि वार्षिक जत्रा मी कितीतरी पाहिलेल्या. पार्सेकर, मोचेमाडकर, चेंदवणकर याच्या दशावतारी खेळाच्या कंपन्या डोक्यावर सामानाचे पेटारे घेऊन गावोगावी वणवणताना मी पाहिलेल्या. मध्यरात्रीनतर सुरू झालेले आख्यान सपेपर्यंत फाटफट होताना मी अनुभवलेली. शकासुराच्या गावठी विनोदामुळे पोट धरधरून हसणारी खेडूत बायकामुले माझ्या लहानपणापासून नजरेसमोर होती, आणि या साऱ्या उत्सवासाठी कानाचे करडे आणि डोळ्यांचे दिवे करून बघत असलेली गावोगावची मंडळीही माझ्या ओळखीची होती.

पण आंगणेवाडीची यात्रा त्या सगळ्याहून वेगळी. तिला यात्रा म्हणावी की जत्रा? इथं दहीकाला नव्हता, दशावतारी नाटक नव्हत—तरीही वीसपचवीस हजार माणसे

उन्हातान्हातून पायी, एसटीतून आणि मिळालेल्या लॉरीतूनही तिथे पोचली होती. नवी साळ्याची कापडे, बायकांच्या हिरव्या, गुलाबी, आभाळी रंगाच्या साड्या नि पातळे आणि केसात अबोलीचे वळेसर, पोरासोरांच्या तोंडात पिपाण्या, फुगे नि आईस्फ्रूट, पेप्सीच्या काड्या-उसाचे करवे नि साखरेची गाठली-

भराडीमाता नवसाला पावणारी. उभ्या दक्षिण कोंकणपट्टीत हिच्यासारखी दुसरी जागृत माऊली नाही; असा भक्तांचा विश्वास घरोघरच्या बायका खणा-नारळाची ओटी घेऊन निघालेल्या. आंगणेवाडीच्या लग्ने झालेल्या सर्व लेकी माहेरी आलेल्या. सासुरवाशिणींच्या माहेरची माणसे आंगणेवाडीच्या पाव्हण्याकडे येऊन दाखल झालेली. भराडीदेवीच्या या यात्रेचे माहात्म्य एवढे की आंगणेवाडीच्या समग्र पंचक्रोशीतले चाकरमानी खास रजा घेऊन गावी येतात नि जत्रेचे चार दिवस राहून मगच मुंबईच्या एसटीत बसतात. या जत्रेला आंगणेवाडीतले घर न् घर माणसांनी फुलून जाते.

या खेपेलाही अशीच बेसुमार गर्दी लोटली होती मालवणहून एकामागून एक 'यात्रा-स्पेशल' चे खास बोर्ड कपाळाला लावून एसटी गाड्या येत होत्या नि माणसांचे लोटचे लोट त्यातून खाली उतरत होते.

देवीचे देऊळ तसे साधेसुधेच. कौलारू छप्पर. साध्या भिंती. आत भराडी देवी साडी, चोळी, नारळांच्या ढिगात बुडालेली. त्या कोंदट सभामंडपात शेकडो बायकांची घामेजलेली दाटी. त्यांच्या कडेवरील अर्भकांचा कोलाहल. त्यातच गुरवाचे गाऱ्हाणे, मानकऱ्यांचा गलका. मला वाटले, या ठिकाणी जत्रेचा दिवस सोडूनच आले पाहिजे. तरच या देवीचे धडपणे दर्शन घडेल.

भराडीदेवीची जत्रा दरवर्षी अमुक एकाच दिवशी भरते, असा नियम नाही! तशी या देवीची वार्षिकाची तिथी ठरलेली नाही. बहुधा फेब्रुवारीत ही जत्रा नक्की ठरते. पण त्याआधी बरेच सव्यापसव्य गावकऱ्यांना करावे लागते. महिनाभर आधी सारी मानकरी मंडळी एका बाबूच्या डाळीवर (चटईवर) बसून देवीला नारळ ठेवतात. डाळीवरच्या या बैठकीला 'डाळप' हे नाव आहे. देवीचा कौलप्रसाद मिळाल्यानंतर जत्रेचा दिवस ठरतो. मानकऱ्यांचे जेवण होते आणि कोंकणातील ग्रामदेवतांच्या प्रथेप्रमाणे गावकरी 'पारधी'ला बाहेर पडतात. ही पारध रानडुकराचीच व्हायला हवी! रानडुक्कर मारून वाजत गाजत देवीच्या समोर रुजू केला जातो. त्याच्या 'कोटी' चा म्हणजे मांसखंडाचा प्रसाद सारे भक्षण करतात आणि पुढले वार्षिकाचे विधी पुरे केले जातात जत्रेदिवशी समस्त आंगणेकरमंडळी उपास करतात. मध्यरात्रीनंतर उपवासाचे पारणे फेडून आलेल्या-गेलेल्या प्रत्येकाला वडे-सांबाऱ्याच्या जेवणाचा प्रसाद उजाडेपर्यंत देतात.

मी जत्रेत भटकत होतो. खेळण्यांची, कोंकणी मेवामिठाईची म्हणजे मालवणी

खाज्या नि शेवकाड्यांचे बुंदीचे लाडू यांचे ढीग असलेली असंख्य दुकाने, चहा, पावउसळ, भजी, वडे यांची हॉटेले, सोडा-लेमन, उसाच्या रसाची छपरे, शेतकऱ्यांना लागणाऱ्या नानाविध वस्तूंची उघड्यावर मांडलेली कावणे, कासारमामाच्या समोर बसून लाजत भिचकत चुडे भरून घेणाऱ्या बायका, मोकाड पसरलेले कर्णे नि लाऊडस्पीकरवरून बाजवले जाणारे 'जय संतोषी मातेचे' तेच तेच वाजणारे गाणे.

जत्रेचे हे सगळीकडचेच रूप मला इथेही दिसत होते. मुंबैकडले नि गाववाले एकमेकात मिसळून आपापला रुबाब दाखवीत होते. तारुण्यातल्या पोरीबाळी बघून लांब केसांचे नि टाईट पॅंटीतले गावठी हीरो लाईनबाजी करीत होते. पोराच्या फुग्या-पिपाण्यांनी मस्तक उठत होते. धुरळा अतोनात होता. सगळ्या जत्रांचा असतो तोच तोंडवळा इथेही दिसत होता.

मी भराडी देवीसमोरच्या गर्दीत उभा राहिलो.

हिरवे खण नि नारळ, तांदूळ बायकांच्या हातातून देवीला वाहिले जात होते नि त्या साऱ्यांचा ढीग तिथे मावत नव्हता. हळूहळू हिरवे खण नि तांदूळ गर्दीच्या पायतळी तुडवले जात होते.

कुणाचेच तिकडे लक्ष नव्हते. हे तांदूळ आणि खण कुणीतरी नीट का साठवून ठेवीत नाही! शेवटी हे अन्न आणि वस्त्रच ना!

आंगणेवाडीहून एसटी मसुऱ्याच्या दिशेने निघालो. आंगणेवाडी ही मसुरे गावचीच एक वाडी. अशा कितीतरी वाड्या त्या गावाला आहेत. एकेक वाडी म्हणजे जणू एकेक गावच—महानवाडी, कांदळगाव, चिळवस, मसदे, डागमोडे, खेरवंद, बागायत, अशा एकूण बारा वाड्या. इतिहासकाळी मसुरे गाव कसबा मसुरे म्हणून गणला जायचा.

हा हां म्हणता वरचे माळरान सरले. जंगली झाडावळ मागे पडली नि माडाच्या गर्द बनात आम्ही शिरलो. समोरच एक टेकडी दिसू लागली. त्या टेकडीवर दगडी बुरूज, ढासळलेली चिरेबंदी आणि माजलेले रान—

माडांच्या राईत लपलेली सुंदर कौलारू घरे. घरासमोर सुरेख सारवलेली अंगणे, तुळशीवृंदावने. माडाच्या पायतळी भातशेतीचे कुणगे.

मसुरे गाव पाहताक्षणी कुणालाही आवडावे, असे सुंदर आहे. केवळ गर्द सावली आणि ती देणारे गच्च माडबन. गावातल्या कुठल्याही वाटेने जावे, माथ्यावर माडाची अब्दागिरी आहेच.

एसटी थांबली तिथेच चिमुकली बाजार पेठ. उतरलो नि नाकाच्या अग्रावर फार जुन्या आठवणीतला भज्यांचा वास वाऱ्याबरोबर येऊन आदळला. कोंकणातल्या छोट्या हॉटेलातच फक्त मिळणारी ही कांदा भजी नि त्यांचा खमंग वास कितीतरी

दिवसानी भेटला. गोळ्याची भजी, खडके लाडू, काळ्या वाटाण्याची पातळ भाजी नि कुरकुरीत पुऱ्या, शेंगदाण्याचे गुळाच्या कडक पाकातले लाडू, या अप्रतिम चिजा फक्त आमच्या या मुलखाचीच मिरास! मसुऱ्याच्या बाजारातल्या त्या चार बाकड्यांच्या हॉटेलात त्या साऱ्या चाखायला मिळाल्या. मग बाजारपेठेतून एक फेरफटका केला. पलीकडे एक मोकळ्या चौकासारखी जागा आढळली. समोरच एक प्रशस्त जुने देऊळ नि त्याच्याच शेजारी आधुनिक बांधकामाचा श्रीमंत दिसणारा दर्गा-मशीद, जवळच एक देखण्या इमारतीत वसलेली टुमदार शाळा. या तिन्ही वास्तूमुळे त्या मोकळ्या चौकाला मोठी शोभा आलेली दिसली. इथूनच मघाशी दिसलेल्या टेकडीवर जाण्यासाठी वाट होती. ती टेकडी म्हणजे मसुरे गावचा इतिहासप्रसिद्ध भरतगड किल्ला.

मला टेकडी चढून जायची इच्छा होती, पण बाजारात कुणीतरी छातीवर हात ठेवून सांगितले,

'वर कित्याक जातास? आसा काय थंयसर? चार धोंडे नि असकड—'

'इतिहासातली एखादी वास्तू तरी शाबूत असेल?' मी विचारले.

'काय्येक ऱ्हवला नाय. वगीच उन्हातून जाशाल तर पश्चिताप करशात.'

खुद्द गावकरीच एवढे खात्रीपूर्वक सांगू लागल्यावर माझाही उत्साह फारसा राहिला नाही. मग मी पुढे विचारले, 'वर, पलिकडे दिसतो तो भगवंतगड. तिथ तरी काही अवशेष आहेत का इतिहासकाळातले?'

'छ्या: वगीच टायम खराब करण्यात अर्थ नाय. थंयसर येक देऊळ तेवढा आसा सिद्धेश्वराचा.'

म्हणजे भगवंतगडावरही जाण्यात मतलब नव्हता.

मी गावातच भटकण्याचे ठरवले. मला आकर्षण होते ते मालडी—बांदिवड्याकडून येणाऱ्या गड नदीचे या गड नदीची वाटचाल मी सह्याद्रीतल्या भैरवगडापासून पाहत आलो होतो. सह्याद्रीच्या उतारावरून ही नदी पावसाळ्यात लालबुंद हाराच्या पाण-लोटाने फुफाटत, एखाद्या माजलेल्या बैलासारखे डोळे तारवटून कणकवलीला पोचते नि पुढे तिचे रूप अक्राळविक्राळ बनते. वरवड्या-मालडीवरून पुढे ती जेव्हा बांदिवड्याच्या हद्दीत शिरते तेव्हा तिच्या हौराला पारावार उरत नाही. दिसेल तो भूभाग ही नदी आपल्या पाण्याखाली बुडवते आणि बांदिवड्या—मसुऱ्यानंतरच्या गावाची दैना दैना करून टाकते. काठावरील शेतीचा विध्वंस करीत, माडाना उलटेपालटे करीत, घराना धडका देऊन पाडीत आणि चिखल—वाळूचे ढीग शेतीभातीत पसरील ही प्रलयकाळ गाठणारी गड नदी गेली कित्येक वर्षे मस्तक फिरल्यासारखी पावसाळ्यात थिथरते नि उन्हाळ्यात गोगलगायीसारखी भिऊन मान खाली घालून वावरते! दोन वर्षांपूर्वी तिने उडवलेला हाहाकार मला ठाऊक होता. आता मला तिचे गरीब रूप

बघायचे होते.

चालत चालत एका पाणंदवजा रस्त्याने अर्धापाऊण मैल उत्तरेला गेलो नि समोरच जणू स्वागताला यावे, तशी गड नदी भेटली.

शांतपणे, निरुपद्रवीपणे वाहणारी—

पलीकडे भगवतगड, त्याचे झाडीने वेढलेले ठेंगणे शिखर नि झाडीतून दिसणारे श्रीसिद्धेश्वर मंदिराचे कौलारू छप्पर

भगवतगडाकडे जाणाऱ्या होड्याची वाहतूक जिथून चालते तेथल्या एका धक्क्यावर मी एखाद्या पुतळ्यासारखा बसून राहिलो–माझ्यासमोर गड नदीचे पात्र पसरले होते. आता ती गड नदी उरली नव्हती. ती आता 'सर्जेकोटची खाडी' बनली होती. इथून खाली पश्चिमेकडे अरबी समुद्राला मालवणजवळ मिळण्यापूर्वी ती 'सर्जेकोट' ला वळसा घालणार होती. इथला सारा परिसर–शिवप्रभूंच्या हालचालींचा, त्याच्या व्यूहरचनेचा साक्षीदार. फक्त तीनशे वर्षांपूर्वी इतिहासाने या भागात आपले ठसे उमटवले होते आज त्यातील काही महत्त्वाचे उरले नाही. पण अस्पष्ट निशाण्या शाबूत आहेत पाठीमागे उभा असलेला भरतगड आणि समोरचा भगवतगड. एका रेषेत असलेले हे दोन जुळे भाऊच जणू. मध्ये फक्त नदी पश्चिमेला मालवणचा सिंधुदुर्ग, भरतगड–भगवंतगड, या दरम्यान राजकोट, पद्मकोट, सर्जेकोट, आणि पलीकडे रामगड, ओवळीयाला सिद्धगड, देवगड, कोटकामत्याचा भुईकोट, हे सारे दुर्ग महाराजांनी हेतुपूर्वक जवळपास उभारले. सिंधुदुर्गच्या किल्लेदाराला या छोट्या किल्ल्याचा मोठा भरवसा होता–

आता सिंधुदुर्ग ढासळतो आहे—

आणि त्याचे हे साथीदार तर कधीच भुईसपाट झालेले आहेत. उरली आहे ती चिरेबंदी तटाची खूण. आणि त्याभोवती माजलेला झाडोरा—

सर्जेकोटच्या या खाडीतून मी कित्येक वर्षांपूर्वी मालवी ते सर्जेकोट असा होडीतून रात्रीचा प्रवास केला होता. आता ही जलवाहतूक बंद पडली. खाडी होरली फक्त पावसाळ्यात हौर आला की ती सैरावैरा पसरते. फक्त विध्वंस करण्यासाठी. उन्हाळ्यातले तिचे रूप मी आता पहात होतो. जसे हे गडकिल्ले पराभूत झालेले; तशीच ही खाडीदेखील.

या खाडीतच जरा खाली एक निवांत बेट आहे, जुवे नावाचे. पाचदहा मच्छीमाराची घरे तिथे आहेत. पुढल्या खेपेला त्या जुव्यावर जायचे. कितीतरी दिवसाचा तो अपुरा राहिलेला बेत आहे.

ओहोटीची वेळ होती. खाडीचे पात्र ओसरले होते. काठावरचे माड पाणी ओसरलेल्या दलदलीमध्ये चमत्कारिक आकार धारण करून पहात होते. खाडीत दूरवर एक

होडी उथळ पाण्यात उभी होती. भगवतगडला जाणारे उतारू त्या कंबरभर पाण्यापर्यंत कपडे वर आवरते घेऊन पात्रातूनच चालत जात होते. पुढे होडी उभी होती' तिथून काही वाव अंतरापुरतेच खोल पाणी उरले होते. तेही ओसरले म्हणजे होडीचीही गरज उरणार नाही. ओहोटीची वेळ साधावी नि सरळ पायाने चालत पैलतडी जावे.

पुरुष उतारू आपले कपडे आवरीत होते.

बायका सकोच बाजूला ठेवून माड्यापर्यंत कापडे वर आवरून पुढे सरकत होत्या. कोंकणची ती वाहतूक केविलवाणी होती. केविलवाणी नदी. तिच्यात केविलवाणी होडी नि तशीच प्रवासी माणसे–अगतिक.

कितीतरी वेळ मी त्या साण्यावर, होडी काठाला लागते त्या जागेवर, तसाच बसून होतो. नदीच्या उथळ पात्रात दोन मच्छीमार मासे पागवीत होते. बोटा–करंगळीएवढ्या मासोळ्या त्या जाळ्यात लखलखत फडफडत होत्या नि मोठे घबाड सापडल्याचा आनद त्या मच्छीमारांच्या मुद्रेवर उमटला होता.

कुणीतरी माझ्या शेजारी येऊन उभे राहिले. कुळ्यावर लंगोटी ठेवलेला तो गावकर हातातून दोन अडसरे ( शहाळी ) घेऊन आला.

' किती टायम झालो ह्यसर बसलहास ते. भूक तान काय नाय ? ' त्यातील एक अडसर फोडून माझ्यासमोर धरीत तो म्हणाला, ' घेवा–'

कदाचित तोही माझ्यासारखाच तहानलेला, भुकेलेला असेल. पण गावात आलेल्या परक्या पाहुण्याला आधी खाऊपिऊ घालावे, ही या मातीची रीत माहीत असलेला तो कुणीतरी होता–

मी पैसे पुढे केले, तशी तो आपले मोत्यासारखे शुभ्र दात अर्धवट दाखवीत छानदार हसला.

' पैसे न्हवांदे ! आमचो गाव आवडलो मां ? '

' भल्या माणसा; अरे हा तुझा गाव नि हा मुलूख मला परका नाही. सारे माझ्या ओळखीचेच आहे विसरलो होतो, ती ही तू दाखवलेली रीतभात. सगळेजणच ती विसरले आहेत. तेव्हा तुझा हा गाव मला आवडला आणि तूही–'

त्याच्या जोडीने मी मसुरे गावच्या एसटी थांब्याच्या दिशेने निघालो.

माडांच्या गर्द सावलीतून आम्ही चालत होतो नि वाऱ्याबरोबर मोहोरलेल्या काजी नि आंब्याचा सुवास दरवळत आमच्याबरोबर सोबत करीत होता.

# वाळूत वसलेले आणि फसलेले देवबाग

---

१५. त्या वर्षी पावसाळ्यातील एके दिवशी मी देवबागला जाऊन ठेपलो. आषाढी पौर्णिमा उद्या–परवावर आली होती आणि त्या पौर्णिमेला समुद्रावर महाप्रचंड उधाण येऊन त्याच्या लाटांखाली, या किनाऱ्याच्या गावाला जलसमाधी मिळणार, अशा जोरदार अफवा पसरल्या होत्या! सारा देवबाग गाव भयाकुल झाला होता, धडधडत्या हृदयाने गावकरी पौर्णिमेची वाट पहात होते नि मी त्याच वातावरणात देवबागेत पाऊल टाकले. माझ्याबरोबर मालवणची मित्रमंडळी होती. अरविंद म्हापणकर होते, ॲडव्होकेट खाडाळेकर होते. आणखीही काहीजण होते.

फार फार वर्षांपूर्वी, माझ्या बालपणी मी एकदा या गावी आलो होतो सिंधुदुर्ग पहायला आम्ही मास्तराबरोबर मालवणला आलो होतो तेव्हाची गोष्ट. देवबाग त्यांचे गाव असल्यामुळे त्यांनी आम्हा विद्यार्थ्यांना आपल्या या गावी आणले होते मालवण-हून आम्ही किनाऱ्याकिनाऱ्याने चालत देवबागला पोचलो होतो त्यावेळची आठवण होती ती फक्त एका वाळूने भरलेल्या विस्तीर्ण किनाऱ्याची, त्याला सोबत करणाऱ्या नि सतत गाजणाऱ्या समुद्राची नि मास्तराच्या घरी पडवीत बसून केळीच्या पाना वरून उकड्या तांदळाचा भात, आबटतिखट मासळीच्या कालवणासह जेवल्याची!

त्याशिवाय देवबागची खाडी मला आठवत होती. त्या खाडीत तरगणाऱ्या चिमुकल्या होड्या खाडीच्या काठावर उभे असलेले असख्य माड नि किनाऱ्यावर लागलेली रापण रापणीत फडफडणारे लख्ख रुपेरी बागडे. आज पुन्हा इतक्या वर्षांनतर मी देवबागला आलो होतो. माझ्या डोळ्यांसमोर कर्लीची खाडी दिसत होती, चिं. त्र्य खानोलकरांच्या कादंबऱ्यांतून भेटणारी आरती प्रभूच्या कवितेत दिसणारी कुडाळ, नेरूर, चेंदवण, वालावल—कवठी, असा वळसेदार प्रवास पूर्ण करील काठावरील अत्यंत रमणीय निसर्गसौंदर्य आपल्या पात्रात आरशासारखे न्याहाळीत रुंद रुंद होत जाणारी भगसाळ नदी मला दिसत होती. कोंडुरामधील घनगंभीर डोहाचे पाणी, खडकावर आदळणाऱ्या महाभयानक शुभ्र फेसाळ लाटा आणि खानोलकरांच्या कादंबऱ्यातील गहन वातावरण, आ. ना. पेडणेकरांच्या 'ऐलपैल'

मधील वाळूवर वावरणारी गरीब, सोशिक, निमूट माणसे हे सारे देवबागपाशी होते आणि हे 'देवबाग' प्राणसंकटात सापडले होते निमूट, सोशिक माणसे सहन करीत असलेले जीवनमृत्यूचे नाट्य प्रत्यक्ष त्याच्याबरोबरीने मला अनुभवायचे होते.

मालवणपासून दक्षिणेला समुद्रसमांतर असा रस्ता तारकर्लीला जातो. कधीकाळी कुणी गर्दे नावाच्या मामलेदारानी हा सहासात किलोमीटर्सचा रस्ता करवून घेतला होता. अजूनही कुणी त्याला 'गर्दे रोड' म्हणतात. बरोबरच्यापैकी कुणीतरी माहिती पुरवली, 'या रस्त्यावरून तारकर्ली ते मालवण अशा दिवसातून डझनभर तरी एसटी धावतात, पण त्या देवबागपासून चार किलोमीटर्सवर येऊन थांबतात. कारण पुढे रस्ताच नाही! देवबागेत अद्याप साधी जीपसुद्धा गेलेली नाही!–

'फक्त किनाऱ्या–किनाऱ्याने चालत यायचे. कुणी आजारी असले किंवा बाळंतीण अडली म्हणजे प्राणसंकट—'

हा हां म्हणता तारकर्ली गावची हद्द संपली नि आम्ही देवबागेच्या सीमेवर येऊन उभे राहिलो. तारकर्ली नि देवबाग याच्यामध्ये समुद्राच्या पाण्याचा एक जोरकस प्रवाह आत घुसून कालव्यासारखी 'राझ' बनली आहे. तिच्यावर एक कमकुवत पूल आहे. त्यावरून एसटी जाऊ शकत नाही म्हणजे वाहतूक तिथेच अडलेली. तिथून देवबाग गाव पुन्हा चार किलोमीटर दूर. फक्त किनारा हाच रस्ता आणि आता त्याच किनाऱ्यावर सागराच्या लाटा धिंगाणा घालीत असलेल्या, माणसाचे पाऊल थारवू देत नसलेल्या—

किनाऱ्याकिनाऱ्याने अर्धा पाऊण तास चाललो आणि देवबागच्या मध्यभागी येऊन पोचलो. पूर्वी कधीतरी निगडीच्या जाळींची दाटी झालेला हा भाग आता साफ धुपून गेला आहे आणि किनारा उजाड दिसतोय. तेथेच लाटानी आकांत माजवला होता. मजूर आणि गाववाले अहोरात्र खपून वाळूची पोती, पिंपे उभी करीत होते. पंचवीसतीस हजार रुपयाची फक्त त्याना मदत मिळाली होती आणि त्यात होईल तेवढी बांधबंदिस्ती चालली होती समुद्राची गाज वाढत होती. अजस्त्र लाटा घोंघावत होत्या. आणि तीन हात कुडीची दुबळी माणसे त्याना अडविण्यासाठी, खारीने रामाच्या सेतूवर चिमुकली वाळूची चिमूट टाकावी तशी धडपडत होती पुरुषभर वाळूच्या पोत्यांची भिंत सुमारे तीनशे मीटर लांबीची उभी करावयाची होती आणि त्यासाठी सारा खटाटोप चालला होता

क्षणभर मला वाटले, उधाणाच्या वेळी पर्वतप्राय उंचीची एकच लाट जरी मुसंडी मारीत आली तरी हा सारा खटाटोप क्षणभंगुर ठरेल—

वाळूच्या पोत्यावर पाय देऊन आम्ही थोडे वर सरकलो आणि समोरचे कर्ली नदीचे विस्तीर्ण पात्र डोळ्यात मावेनासे झाले! पाठीमागे घोंघावणारा वादळी दर्या

आणि पुढे हाताच्या अंतरावर कर्लीची वरवर शांत दिसणारी, पण हौराच्या वेळी तुडुंब दुथडी भरून धावणारी बेसुमार खाडी !

त्या ऐंशी फुटाच्या मधोमध दीडशे मुलांना शिकवणारी सात यत्तांची एक प्राथमिक शाळा ! आणि एक सुरेख बांधणीचे विठ्ठल मंदिर.

शाळेच तर घोंघावता दर्या पाठीवर घेऊन शांत उभे असलेले बापट पुजाऱ्यांचे घर आणि त्या घरात ट्रान्झिस्टर लावून निश्चित मनाने बातम्या ऐकणारे म्हातारे बापट भटजी---

मी शाळेत शिरलो. शिक्षक–शिक्षिका निश्चित दिसत होत्या आणि मुले ? जणू काही विशेष घडलेच नव्हते त्याच्यालेखी. मुले निर्भय दिसत होती. मी विचारले,

' भीति नाही रे वाटत दर्याची उधाणाची ? '

' दर्यावर्द्यांच्या मुलांना कसली दर्याची भीती ? ' त्याना शिकवणाऱ्या बाईंनी उलट मलाच विचारले.

समोरच्या विठ्ठल मंदिरात आषाढी एकादशीपासून भजनाचा ' सप्ताह ' चालू होता. गावकरी भाविकतेने विठ्ठलनामाचा गजर करीत होते. त्या मंदिराच्या पायऱ्या उतरल्या की कर्ली खाडीचे पात्र. त्याच्या काठाशी ' महापुरुषा 'चा पाषाण. त्याला जोवर समुद्र–खाडीचे पाणी भिडत नाही तोवर गाव सुक्षेम राहाणार असतो. गावकऱ्याची ती अढळ श्रद्धा असते.

शिवाजी महाराजानी तीनशे वर्षांपूर्वी समोरचा ' सिंधुदुर्ग ' किल्ला बांधला तेव्हाच मालवण गावची ' देवबाग ' ही वाडी नव्याने वसली. तेथील नव्या रहिवाशाना–राऊळ वंशाच्या घराण्याना–तेथे प्रथम सुख लाभेना. त्यांनी मालवणच्या श्रीदेव रामेश्वराला साकडे घातले. श्रीरामेश्वर घोड्यावरून या वाळूत वसलेल्या गावात आला. तेथे त्याने तीन पाषाणाची–महापुरुषाची–स्थापना केली आणि गावकऱ्याना अभय दिले, जोवर हे पाषाण कोरडे आहेत तोवर समुद्राची तुम्हाला भीती नाही ! आणि गेली तीनशे वर्षे समुद्राच्या लाटानी एकदाही रामेश्वराची आज्ञा उल्लंघिलेली नाही. बत्तीस साली असेच महाभयानक उधाण आले होते आज जेथे ऐंशी फूट पट्टी उरली आहे तेव्हा फक्त दहा फूट जमीन शिल्लक होती. पण गावकऱ्यानी रामेश्वरला, महापुरुषाला नारळ ठेवून गाऱ्हाणे घातले नि समुद्र आज्ञाधारक मुलासारखा मागे फिरला.

यदाही तसेच होईल ही देवबागच्या जुन्या गावकऱ्याची श्रद्धा.

दादा गावकर हे ऐंशीच्या घरात पोचलेले ग्रामस्थ. चौतीस माणसाचे त्यांचे एकत्र कुटुंब. त्याची मच्छीमारी गलबते आहेत. ते हळहळत म्हणाले, ' हयले सगळे माड नायसे झाले ! समुद्र नि ह्या आमचां घर ह्यामधी पाचपचवीस माड गुदस्तापर्यंत उभे होते. ह्या वरसात सगळे दर्यान् गिळान टाकल्यान् ! '

पण एकट्या दादा गावकराचेच कशाला ? जगन्नाथ गणेश साळगावकर हे साठीचे

दुसरे ग्रामस्थ म्हणाले, 'माझी एकूण पचावन्न गुंठे मालकीची जमीन. त्यातील वीस गुंठे धुपून गेली!'

नारायण कोळंबकराची तीच गत.

इतरत्र सगळीकडे पन्नास पंचावन्न एकर जमिनीची मालकी सांगणारे शेतकरी कुठे नि देवबागच्या या बाळूच्या चिंचोळ्या द्वीपकल्पावर पाचदहा गुंठ्यांची मालकी मिरवणारे मच्छीमार कुठे? आणि त्यांचे खरे दुःख म्हणजे समुद्राने गिळलेल्या जमिनीबद्दलही सरकार त्यांच्याकडून गेली कित्येक वर्षे जमीनमहसुलाची रक्कम वसूल करीत आहेच!

गाव दक्षिणोत्तर वसलेला, किनाऱ्यावर वाळत घातलेल्या धोतरासारखा. अरुंद लांबच लांब. सर्वात अधिक रुंदी होती तेथे पोचलो. सर्वत्र माडांचीच दाटी. पश्चिमेकडील समुद्रात कित्येक ठिकाणी फक्त माडाचे बुडखे उरलेले. पाळेमुळे बाहेर आलेले, करुण दिसणारे ते कल्पवृक्ष आता कोणत्या लाटेने जमीनदोस्त व्हायचे याचीच फक्त वाट पहात उभे राहिलेत. गावात वाळूशिवाय पायाखाली काही नाही. ना माती ना दगड. घर बांधायला माती नि चिरे खाडीपलीकडच्या गावातून होडीने आणायला हवे. गावात माडाशिवाय अन्य झाडे नाहीत. चवीपुरती चार आंब्यांची, एखादे फणसाचे झाड. उडलीची झाडे मात्र भरपूर आहेत. समुद्राच्या कडेला निर्गुडीच्या घनदाट जाळ्या होत्या. त्या समुद्राने गिळून टाकलेल्या. त्यामुळे दक्षिणेच्या एका टोकाला समुद्र नि खाडी यांची पातळी एका रेषेत आलेली. एक जोराची लाट आली की पश्चिमेची गाठ थेट पूर्वेशी पडणार आणि मधली निरुंद वाळूची पट्टी धुवून जाणार, वरील घरासह, माडासह

सुमारे चार हजार वस्तीचा हा गाव. आत फार स्वच्छ नि नीटनेटका आहे. प्रत्येक घर नीटस, स्वच्छ आणि प्रसन्न दिसते. मच्छीमार रापणीला टिंगळे जोडीत निवांतपणे बसलेले. बायका ओंजळीएवढ्या उथळ गोड्या पाण्याच्या विहिरीवर निर्भयपणे पाणी भरीत असलेल्या आणि महापुरुषाच्या आणखी एका सुंदर देवळात मुलेमाणसे पेटी-मृदुग-टाळ घेऊन भजन करण्यात दंग झालेली—

एवढे भयाण संकट पावलापावलानी चालून येत असताही हे गाव असे स्थितप्रज्ञ, निर्विकार आणि निर्भय कसे? या गावाला संकटाची जाणीव नाही का? का समुद्रात बुडायची त्याने तयारीच ठेवली आहे?

कुणीतरी म्हणाले, 'रोज मरे त्यास कोण रडे, असे त्यांचे झाले आहे. दरवर्षी पावसात दोनचार वेळा अशी उधाणे येतात, त्याची सवयच झाली आहे लोकांना. झालेच तर श्रद्धा. देवाच्या भोंड्याला (महापुरुषाला) समुद्राचे पाणी लागणारच नाही!'

देवबाग समुद्रकिनाऱ्याचा अठराशे शहात्तर सालचा नकाशा मी पाहिला. त्यावेळी देवबाग गावची रुंदी ऐंशी मीटर होती. आज ती तीस मीटरवर आली आहे. शंभर

वर्षांत पन्नास मीटर धुपून गेले त्यामुळे ही मंदगतीने होणारी धूप तशी कुणाच्या डोळ्यांत भरली नाही. पण गेल्या दोन वर्षांत मात्र समुद्राने ही मंदगती सोडून बेफाम वेगाने आपली घोडदौड सुरू केल्याचे गावकरी सांगतात आणि याच बेफाम आक्रमणाचा तातडीने, अगदी युद्धपातळीवर आता मुकाबला केला पाहिजे!

हा निमुळत्या चिरोटीवर वसलेला हा गाव व त्याची विलक्षण, अनाकलनीय भौगोलिक रचना पाहताना माझ्या मनात सहज आले, हा गावच इथून दुसरीकडे नेला तर? जसे कोयना धरणाखालच्या लोकाना दुसरीकडे नेऊन वसवलं—

मामा पेडणेकर खवळून म्हणाले, 'अहो, मच्छीमार माणूस समुद्राशिवाय जगूच शकणार नाही! तो समुद्रावर अठरा तास राबेल, पण जमिनीवर तो निकामी असतो! साधी शेणाची टोपली उचलणे त्याला जमणार नाही! आणि प्राण गेला तरी मच्छीमार माणूस आपले बंदर सोडून दुसरीकडे जायला तयार होणार नाही! सरकारने या गावाला जर पक्की संरक्षण भिंत बांधून दिली नाही तर आम्ही चार हजार गावकरी समुद्रतळी जायला तयार होऊ, पण परुळ्याच्या डोंगरावर राहायला आम्ही कबूल होणार नाही!'

'आणि उभ्या कोकणपट्टीत जिथे मच्छीमारीवर एवढ्या सातशे कुटुंबाना जगता येईल अशी रिकामी जागा आहेच कुठे? प्रत्येक किनारा, प्रत्येक चौपाटी आधीच मच्छीमारानी गजबजलेली आहे, तिथे आम्हाला कोण जागा देणार? आमचे जे काय होईल ते याच देवबागेत—' दादा गावकर निक्षून म्हणाले.

म्हणजे स्थलांतर किंवा पुनर्वसन हा विचार संपला!

'पण एवढ्या चार किलोमीटर्सना संरक्षक भिंत घालायला किती खर्च येईल?'

'सुमारे तीसपस्तीस लाख तरी येईल—'

'अहो, तुमच्या मुंबईला नरीमन पॉइंटला पाण्याखालचे प्लॉट सरकारने कोट्यवधी रुपये घेऊन विकले आणि नंतर तिथे टेट्रॉ पॉडस घालून भरणी केली! जे मुंबईच्या श्रीमंतासाठी कोट्यवधी रुपयांनी करता, ते देवबागच्या गरीब मच्छीमारासाठी काही लाख खर्चून करा ना—' कुणीतरी पोटतिडकीने म्हणाले.

'आमचा कुणी वाली नाही हो! कोकण असेच बुडून, झिजून, खंगून नष्ट होणार!'

मी सारे ऐकत होतो आणि गावात इतस्ततः हिंडत होतो

स्वातंत्र्यपूर्व काळात पंडित नेहरू ज्या 'नॅशनल हेरॉल्ड' या दैनिकाचे संपादन लखनौला करीत असत त्या जगप्रसिद्ध दैनिकाचे वृत्तसंपादक म्हणून या देवबागच्या नमशी वाडीत बालपण घालविलेले आणि पुढे महाराष्ट्र शासनाचे प्रसिद्धी संचालक म्हणून नावारूपास चढलेले दा. रा. सामंत हे इथलेच. मुंबईला लाखो कामगाराचा लॉंगमार्च काढणारे झुजार कामगार पुढारी डॉ. दत्ता सामंतही इथलेच! त्यांचे घर

नि माड इथे उभे आहेत क्रिकेटवीर पांडुरंग साळगावकर यांचे घर इथे आहे. ॲडव्होकेट शामराव भालेराव इथलेच! कित्येक कर्तबगार माणसे या देवबागने देशाला पुरविली.

आणि हे देवबाग आज वाळूत फसून खिन्नपणे सागराकडे पाहात उभे आहे. किनाऱ्यावर बायका–मुले घुले वेचताहेत. पाठीमागील खाडीत बिनशिडाची बिन-उलाडीची होडी तरंगते आहे. कदाचित् हा पावसाळा असाच जाईल. पुन्हा नारळी पौर्णिमा येईल. समुद्र शांत होईल. वेळेवर हजारो रुपयांची बांगडे, पेडवे, इस्वणी, कर्ल्या नि कोळंबी यांची उलाढाल करणाऱ्या रापणी लागतील. सारे स्थिर-स्थावर होईल.

मग पुन्हा मान्सून येईल पुन्हा दर्या गाजू लागेल. पुन्हा उधाण येईल. त्या उधाणात ही ऐंशी फुटांची चिरोटी नि त्यावरील सातशे मच्छीमार कुटुंबे टिकतील का! ही माडांची राई जाग्यावर राहील का? ही चिमुकली, शाळा शिकणारी, विठ्ठल मंदिरात निरागसपणे भजन करणारी मुले तिथे दिसतील का? हे गरीब म्हातारे बापट भटजी तेव्हा काय करतील? आणि हा देवाचा दगड!

मग आषाढी पौर्णिमा आली. सारा गाव विठ्ठल मंदिरात आणि महापुरुषाच्या स्थळात भजन करीत होता. दिवस संपला, रात्र उजाडली, दर्या घोंघावतच होता. लाटा आदळत होत्या; पण आश्चर्य म्हणजे त्यांनी आपली मर्यादा सोडली नव्हती! किनाऱ्याला लावलेली आधाराची वाळूची पोती त्या लाटांनी आपल्या उदरात गडप केली. वाळूमध्ये वाळू मिसळली आणि नाहीशी झाली. किनाऱ्यावरचे पाच पन्नास माड उन्मळले. त्यांचे बुडखे वाळूत भयाण दिसू लागले आणि फक्त एवढीच नासाडी करून समुद्र मागे फिरला.

देवबाग गावातील एकही माणूस त्या उधाणात दगावले नाही. महापुरुष आणि श्रीविठ्ठल यांनी गावाचे रक्षण केले

त्यानंतर गाव तसाच वाळूत उभा आहे या गावात सर्वत्र वाळूच वाळू. जणू हे गाव वाळूत वसले आणि वाळूतच फसले!

पण असेही म्हणता येणार नाही.

कारण हे गाव फसलेले असले तरी त्याचे हसणे त्याला सोडून गेलेले नाही देवबाग गाव उभ्या मालवणी मुलखात विलक्षण व्यक्तिमत्त्वाचे आहे. त्याचा चेहरा दर्याच्या उधाणाने एखाद्या अमावास्या–पौर्णिमेला काळवंडला तरी तो तेवढ्यापुरता. या गावाला जे निसर्गाचे वरदान लाभलेले आहे, त्यापुढे त्याला कसलीच विवंचना वाटत नाही. जोपर्यंत कर्लीची खाडी संथपणे वाहत आहे, 'कुशीतला दर्या मंदपणे गाजत आहे, तोपर्यंत हे फसलेले गाव हसतच राहणार आहे!

१६.

# कर्लीच्या खाडीकाठाने

मालवणी मुलखातली जी अनेक गावे सुप्रसिद्ध आहेत त्यांतील नेरूर हे एक. बारा वाड्यांचे हे गाव ऐसपैस पसरले आहे. सर्वत्र हिरवीगार झाडी, दाट माड, पोफळी, आंबे, काजू, भिरडे आणि उन्हाळी–पावसाळी हिरवे राहणारे भातमळे. रस्त्याच्या कडेला सुंदर, कौलारू घरे. अतिशय रमणीय, गारव्याने बाराही महिने शीतळ राहिलेले हे गाव कुणालाही आवडावे असेच आहे.

कुडाळहून मोटारीने निघाल्यावर हां हां म्हणता आपण नेरूरच्या हद्दीत शिरतो. नेरूरला जाताना डावीकडे एक डोंगर लागतो पुढे हिरव्यागार असलेल्या नेरूर गावाला हा, बेम्रद जंगलतोडीने ठायी ठायी भकास झालेला डोंगर मुळीच शोभत नाही. माझ्याबरोबर अण्णा देसाई होते. ते परुळ्याचे. जवळचेच. त्यांनी हा परिसर गेली कित्येक वर्षे न्याहाळलेला ते म्हणाले, ‘ ही डोंगरावरची झाडी गेल्या पाच-दहा वर्षांतच नष्ट झाली आहे. लाकूडतोडे ‘ कूप ’ विकत घेतात नि डोंगर बोडके करतात.. ’

मला आठवले; मी सावंतवाडीहून पूर्वेला माणगाव भागात हिंडत होतो, तेव्हा सह्याद्रीच्या पायथ्याशी नारूर, वाडोस, निळेली भागात अशीच बेसुमार जंगलतोड झालेली दिसत होती. एके काळी संस्थानी अमदानीतला राखीव जंगलाचा हा भाग. स्वातंत्र्योत्तर काळात धनदांडग्या कंत्राटदारांनी त्याची विल्हेवाट लावली तोच प्रकार नेरूरला जाताना घडलेला दिसत होता.

नेरूरला पोचलो. वाटेतच तेथील हायस्कूलची प्रशस्त इमारत दिसली. नेरूर गावचे एक ग्रामस्थ यशवंतराव नाईक थेट जर्मनीला पोचले आणि तिथे त्यांनी जवाहिऱ्याचा व्यवसाय केला. खूप पैसा मिळविला; पण माणूस गावाला विसरला नव्हता. यशवंतरावांनी आपल्या पैशानी ही भव्य शाळा उभी केली आणि गाव-कऱ्यांच्या स्वाधीन केली. यशवंतरावांनी एका जर्मन महिलेशी लग्न केले होते. तिच्या स्मरणार्थ त्यांनी आपल्या गावातच नव्हे, तर कोंकणात इतर काही ठिकाणीही अशीच विद्यालये, तांत्रिक संस्था उभारण्यास हातभार लावला. यशवंतराव नाईक नुकतेच

दिवगत झाले; पण त्यांनी उभारलेल्या शिक्षणसंस्था त्यांची स्मृती जागवीत उभ्या आहेत. नेरूर गावची हायस्कूलची इमारत ही त्यापैकीच.

सरळ रस्याने गाडी पुढे जात होती आणि अण्णा देसाई म्हणाले, ' हेच ते कलेश्वराचे मदिर ! '

नेरूरच्या श्रीकलेश्वराविषयी मी पूर्वी अनेक वेळा ऐकले होते. तेथील महाशिवरात्रीची यात्रा ही कुणकेश्वराच्या यात्रेसारखीच भव्य प्रमाणात भरते, हेही मला ठाऊक होते. कणकवलीजवळच्या कल्मठातील श्रीकलेश्वराचे छोटेखानी देऊळ मी पाहिले होते, त्यापेक्षा वेगळे इथे काय दिसणार, असे म्हणत मी पुढे झालो.

आणि माझे डोळे दिपले. श्रीकलेश्वराचे प्रचंड देऊळ, भव्य प्राकार, तो महाकाय रथ आणि एकूणच सारा थाट पाहून वाटले, कोंकणप्रांती अशी प्राचीन मदिरे जेव्हा केव्हा बांधली गेली, तेव्हाचे इथले वैभव किती उदड असावे ! नेरूरच्या कलेश्वराच्या देवळात शिवाची पिंडी आहे. तेथील परपरा चालवणारे अधिकारी भारद्वाजगोत्री देसाई हे कुडाळदेशकर गौड ब्राह्मण समाजाचे आहेत.

नेरूर गावातून पुढे निघालो, तेव्हा सहजच आठवण झाली ती जुन्या जमान्यातील कवी कै. वि. कृ. नेरूरकर याची. त्यानी मालवणी बोलीमध्ये सर्वात प्रथम गीतरचना केली. माझ्या लहानपणी फोनोग्राफवर त्यांची गीते वाजत. आम्ही ती नवलाने ऐकत असू. ' ठेव झिला घराची आठव रे— पाच तरी रुपाये पाठव रे—' हे त्याचे गाणे किंवा ' गो चेडवा पडावातसून आगबोटीत जपान— ' हे आणखी एक गाणे ऐकताना मन कसे भरून यायचे. वि. कृ. नेहरूकरांना कोंकणी माणूस केवळ या मालवणी गाण्यासाठी चिरकाल ध्यानात ठेवील.

नेरूरनतर वालावल. हेही गाव मोठ्या ऐतिहासिक परपरेचे. अनेक वालावलकर मंडळी विविध क्षेत्रांत चमकलेली आहेत. कोंकण रेल्वेचे आद्य प्रवर्तक अ. ब. वालावलकर याचे नाव कोंकणी माणसाला कधीही विसरता येणार नाही. तसेच ग्रेट रॉयल सर्कसचे मालक नारायणराव वालावलकरांचेही ! शिवाय नटवर्य माधवराव वालावलकरही याच गावचे.

देसाई आडनावाचे बहुतेक सर्व कुडाळदेशकर गौड ब्राह्मण वालावलचे एका काळी मुबईची शान म्हणून ज्याची गणना होत असे ते रा ब. अनंत शिवाजी देसाई हे वालावलीचेच. टोपीच्या धंद्यावर या कोंकणी माणसाने लाखो रुपये मिळविले आणि तशीच दिलदार खैरातही केली टोपीवाल्या देसाईंनी शैक्षणिक कार्यासाठी आपले कोषागार नुसते उघडेच ठेवले होते, असे म्हटल्यास त्यात अतिशयोक्ती होणार नाही.

नेरूर, परुळे, वालावल ही सर्व दृष्टीने सुविख्यात गावे. अनेक नामवंताना या

# कर्लीच्या खाडीकाठाने

१६. मालवणी मुलखातली जी अनेक गावे सुप्रसिद्ध आहेत त्यांतील नेरूर हे एक. बारा वाड्यांचे हे गाव ऐसपैस पसरले आहे. सर्वत्र हिरवीगार झाडी, दाट माड, पोफळी, आंबे, काजू, भिरडे आणि उन्हाळी-पावसाळी हिरवे राहणारे भातमळे. रस्त्याच्या कडेला सुंदर, कौलारू घरे. अतिशय रमणीय, गारव्याने बाराही महिने शीतळ राहिलेले हे गाव कुणालाही आवडावे असेच आहे.

कुडाळहून मोटारीने निघाल्यावर हां हां म्हणता आपण नेरूरच्या हद्दीत शिरतो. नेरूरला जाताना डावीकडे एक डोंगर लागतो. पुढे हिरव्यागार असलेल्या नेरूर गावाला हा, बेपद जंगलतोडीने ठायी ठायी भकास झालेला डोंगर मुळीच शोभत नाही. माझ्याबरोबर अण्णा देसाई होते. ते परुळ्याचे. जवळचेच. त्यांनी हा परिसर गेली कित्येक वर्षे न्याहाळलेला. ते म्हणाले, 'ही डोंगरावरची झाडी गेल्या पाच-दहा वर्षांतच नष्ट झाली आहे. लाकूडतोडे 'कूप' विकत घेतात नि डोंगर बोडके करतात ..'

मला आठवले, मी सावंतवाडीहून पूर्वेला माणगाव भागात हिंडत होतो, तेव्हा सह्याद्रीच्या पायथ्याशी नारूर, वाडोस, निळेली भागात अशीच बेसुमार जंगलतोड झालेली दिसत होती. एके काळी संस्थानी अमदानीतला राखीव जंगलाचा हा भाग. स्वातंत्र्योत्तर काळात धनदांडग्या कंत्राटदारांनी त्याची विल्हेवाट लावली. तोच प्रकार नेरूरला जाताना घडलेला दिसत होता.

नेरूरला पोचलो. वाटेतच तेथील हायस्कूलची प्रशस्त इमारत दिसली. नेरूर गावचे एक ग्रामस्थ यशवंतराव नाईक थेट जर्मनीला पोचले आणि तिथे त्यांनी जवाहिऱ्याचा व्यवसाय केला. खूप पैसा मिळविला, पण माणूस गावाला विसरला नव्हता. यशवंतरावांनी आपल्या पैशानी ही भव्य शाळा उभी केली आणि गाव-कऱ्यांच्या स्वाधीन केली. यशवंतरावांनी एका जर्मन महिलेशी लग्न केले होते. तिच्या स्मरणार्थ त्यांनी आपल्या गावातच नव्हे, तर कोंकणात इतर काही ठिकाणीही अशीच विद्यालये, तांत्रिक संस्था उभारण्यास हातभार लावला. यशवंतराव नाईक नुकतेच

दिवंगत झाले, पण त्यांनी उभारलेल्या शिक्षणसंस्था त्यांची स्मृती जागवीत उभ्या आहेत. नेरूर गावची हायस्कूलची इमारत ही त्यापैकीच

सरळ रस्त्याने गाडी पुढे जात होती आणि अण्णा देसाई म्हणाले, 'हेच ते कलेश्वराचे मंदिर!'

नेरूरच्या श्रीकलेश्वराविषयी मी पूर्वी अनेक वेळा ऐकले होते. तेथील महाशिवरात्रीची यात्रा ही कुणकेश्वराच्या यात्रेसारखीच भव्य प्रमाणात भरते, हेही मला ठाऊक होते. कणकवलीजवळच्या कलमठातील श्रीकलेश्वराचे छोटेखानी देऊळ मी पाहिले होते, त्यापेक्षा वेगळे इथे काय दिसणार, असे म्हणत मी पुढे झालो.

आणि माझे डोळे दिपले. श्रीकलेश्वराचे प्रचंड देऊळ, भव्य प्राकार, तो महाकाय रथ आणि एकूणच सारा थाट पाहून वाटले, कोंकणप्रांती अशी प्राचीन मंदिरे जेव्हा केव्हा बांधली गेली, तेव्हाचे इथले वैभव किती उदंड असावे! नेरूरच्या कलेश्वराच्या देवळात शिवाची पिंडी आहे. तेथील परंपरा चालवणारे अधिकारी भारद्वाजगोत्री देसाई हे कुडाळदेशकर गौड ब्राह्मण समाजाचे आहेत.

नेरूर गावातून पुढे निघालो, तेव्हा सहजच आठवण झाली ती जुन्या जमान्यातील कवी कै. वि. कृ. नेरूरकर यांची. त्यांनी मालवणी बोलीमध्ये सर्वांत प्रथम गीतरचना केली. माझ्या लहानपणी फोनोग्राफवर त्यांची गीते वाजत. आम्ही ती नवलाने ऐकत असू. 'ठेव झिला घराची आठव रे— पाच तरी रुपाये पाठव रे—' हे त्यांचे गाणे किंवा 'गो चेडवा पडावातसून आगबोटीत जपान—' हे आणखी एक गाणे ऐकताना मन कसे भरून यायचे. वि. कृ नेहरूकरांना कोंकणी माणूस केवळ या मालवणी गाण्यासाठी चिरकाल ध्यानात ठेवील.

नेरूरनंतर वालावल. हेही गाव मोठ्या ऐतिहासिक परंपरेचे. अनेक वालावलकर मंडळी विविध क्षेत्रांत चमकलेली आहेत. कोंकण रेल्वेचे आद्य प्रवर्तक अ. ब. वालावलकर यांचे नाव कोंकणी माणसाला कधीही विसरता येणार नाही. तसेच ग्रेट रॉयल सर्कसचे मालक नारायणराव वालावलकरांचेही! शिवाय नटवर्य माधवराव वालावलकरही याच गावचे.

देसाई आडनावाचे बहुतेक सर्व कुडाळदेशकर गौड ब्राह्मण वालावलचे. एका काळी मुंबईची शान म्हणून ज्यांची गणना होत असे ते रा. ब अनंत शिवाजी देसाई हे वालावलीचेच. टोपीच्या धंद्यावर या कोंकणी माणसाने लाखो रुपये मिळविले आणि तशीच दिलदार खैरातही केली टोपीवाल्या देसाईंनी शैक्षणिक कार्यासाठी आपले कोषागार नुसते उघडेच ठेवले होते, असे म्हटल्यास त्यात अतिशयोक्ती होणार नाही.

नेरूर, परुळे, वालावल ही सर्व दृष्टीने सुविख्यात गावे. अनेक नामवंतांना या

गावानी जन्म दिलेला आहे. वालावलचे सृष्टिसौंदर्यही मालवणी मुलखातल्या कोणत्याही सुदर भागाइतकेच इष्ट लागण्याजोगे. श्री लक्ष्मीनारायणाचे भव्य मंदिर इथे गावाला ललामभूत झालेले. या देवालयाच्या सहाव्या शतकापर्यंतच्या इतिहासाचा मागोवा लागतो अष्टदिक्पाल आठ दिशांचे पालन करणारे. देवालयाची छपराची बांधणी हेमाडपथी. लाकडी कोरीव काम पाहण्यासारखे. गाभाऱ्याचे द्वार काळीथर पाषाणाचे. तीन तुकड्यानी बनवलेले. चार 'तरग' बाजूला उभे असलेले. विशेष म्हणजे कोंकणातील अन्य कोणत्याही मदिरात न आढळून येणारे 'संगम शिल्प' एका लाकडी खांबावर कोरलेले आढळले! वालावलची ही ग्रामदेवता नजर खिळवून ठेवणारी आहे. भक्तिभावाने नतमस्तक व्हायला लावणारी आहे.

श्री लक्ष्मीनारायणाच्या पाठीमागे एक सुदर तळे. स्वच्छ जलाशयाने भरलेले. लाल पांढऱ्या कमळाना पृष्ठभागावर मिरवणारे. देवालयाचे प्रतिबिंब त्या तलावात पडले होते आणि तेथील शोभा अवर्णनीय भासत होती

पण त्याहून अवर्णनीय सृष्टिशोभा आम्हाला अद्यापि पुढेच दिसायची होती.

वालावलीचे साहित्यिक मित्र सर्वश्री सी. श्री. उपाध्ये आणि दुधगावकर याची भेट व्हायला हवी होती. त्यांपैकी दुधगावकर घरी होते. कवी वसत सावत आणि कवी दुधगावकर व कथाकार हरिहर आठलेकर असा संच मोटतीला जमला आणि आम्ही पुढे चेंदवणच्या दिशेने निघालो. खरे तर वालावलीच्या तळ्याच्या काठावरून पाऊल निघत नव्हते.

गाडीने एक चढाव पार केला. एक डोंगरघाटी ओलांडली आणि दुधगावकर ओरडले, 'इथ क्षणभर थांबा!'

गाडी थांबली. आम्ही खाली उतरलो आणि डावीकडे नजर टाकली. ओहोहो! केवढा सुदर देखावा!! वालावली गाव एखाद्या चित्रात रेखाटावे, तसे वरून दिसत होते. लक्ष्मीनारायणाचे मदिर, शेजारी सर्कसवाल्या वालावलकरांचे गेस्ट हाऊस, पाठीमागील तळे— त्याही पलीकडे नजर टाकताच कर्ली नदीचे वळणे घेत सरकणारे पात्र— त्यातील छोटी छोटी बेटे— आणि क्षितिजावर अथाग दिसणारे हिरवे कोंकण..

मालवणी मुलखातील डोळे खिळवणारे एक रमणीय ठिकाण म्हणून चेंदवणच्या या घाटीवरील जागेची मनाने नकळत नोंद केली चेंदवणच्या माऊलीच्या देवळा-कडे जायचे होते. गाडी क्षणार्धात घाटी चढू लागली चेंदवणच्या या डोंगरावर आणखी एक अद्भुत दृश्य दिसले. झाराप-आकेरी भाग.त जसे पुरातन प्रचंड काळेभोर शिलाखड इतस्तत' उभे आहेत तसेच ते या चेंदवणच्या डोंगरातही जागजागी उभे आहेत. पुरुषभर उचीचे तर कितीतरी, पण त्याहूनही आकाराने मोठे असे हे पाषाण शेकडो, हजारो वर्षांपासून ऊन-पाऊस खात पडले आहेत. गर्द

झाडावळींतून त्यांचे शेंडे उच डोकावतात. त्यातील एका पाषाणावर एक भला दांडगा काळतोंड्या वानर शेपटी खाली सोडून आरामात बसला होता. जणू तोही त्या पाषाणाचाच एक भाग असावा !

डोंगराच्या माथ्यावर श्रीमाऊलीचे देवालय आहे. आत दशभुजा महिषासुर-मर्दिनी. तिचा एक पाय चेंदवणात व दुसरा वालावलीत आहे, असे सांगतात. एका पायावरील या देवीचे रूप मनोहर आहे वार्षिक उत्सव फाल्गुन शुद्ध द्वादशीला होत असला तरी नवरात्रात येथे मोठी पर्वणी असते.

माऊलीला नमस्कार करून निघालो आणि घाटी उतरून खाली गावात आलो. चेंदवणला गावकऱ्यानी मुंबैकरांच्या सहकार्याने मोठे हायस्कूल बांधले आहे. आजू-बाजूला झाडे लावली आहेत. शाळेचा विस्तार मनात भरण्याजोगा आहे. शालेय प्रगतीही उत्तम आहे. घटकाभर त्या विद्यार्थ्यांनी किलबिलणाऱ्या वातावरणात [illegible] आम्ही पुढे निघालो पलीकडे कर्लीची खाडी आमची वाट पहात होती.

कर्लीच्या खाडीला मालवणी मुलखामध्ये एक वेगळेच स्थान आहे. सह्याद्रीमध्ये उगम पावलेली ही नदी कुडाळजवळ ‘ भंगसाळ ’ नाव धारण करून पश्चिमेला धावू लागते. कुडाळ गावाला या नदीमुळे एक वैशिष्ट्य प्राप्त झालेले आहे, पण एकट्या कुडाळलाच नव्हे, तिथून पुढे या नदीच्या काठावर वसलेल्या प्रत्येक गावावर या नदीने आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटवला आहे. कुडाळपासून खाली सरकलेल्या या नदीला अणावजवळ ‘ पिटढवळ धरून आणखी एक नदी मिळते व एकूण तीन नद्यांचे विस्तीर्ण पात्र ‘ खाडी ’ बनून वाटचाल करू लागते. पिटढवळ म्हणजे पिष्टधवल. पिठासारखे शुभ्र पाणी असलेली नदी ! नदीची ‘ खाडी ’ बनली की तिचे पाणी खारे बनते तिला समुद्राचा संसर्ग जडतो. भगसाळ नदीचेही तेच झाले आहे अणावपर्यंत भरतीबरोबर समुद्राचे खारे पाणी पश्चिमेकडून पूर्वेकडे चढते. अणावपासून पुढे ही खाडी [illegible] कुडाळ भागातील लोकांचा मोठा आधार बनते हिच्या काठी काळसे, धामापूर, कवठी, चिपी, 'आंबेरी, देवली अशी छोटी छोटी बंदरे वसली आहेत. या बंदरामार्फत चालणारी जलवाहतूक म्हणजे ऐलतडीच्या नि पैलतडीच्या गावांना वरदानच ठरलेले आहे. एरवी या भागात रस्त्यांचे जाळे फारसे नाहीच. खाडीकाठची गावे अजूनही होड्या, मचवेच वाहतुकीसाठी पसंत करतात. कर्लीच्या खाडीने अणावपासून तारकर्लीपर्यंतचा सारा पट्टा वाहतुकीसाठी आपल्या पाठीवर ओझ्या-सारखा घेतला आहे.

चेंदवण सोडून कवठीला आलो, पण त्यापूर्वी कथालेखक हरिहर आठलेकर यांचे घर वाटेवरच भेटले. आठलेकरानी ‘ साखरेची माणसे ’ रंगवली; पण स्वतः तेही एक साखरमाणूसच आहेत. त्यांच्या आग्रहाला नकार देणे शक्यच नव्हते. रस्ता

थोडा आडवा केला नि एका पादीतल्या पायवाटेने घाटी चढून जाऊ लागलो. मला अचानक ' बागलाच्या राईची ' आठवण झाली. थेट तसाच परिसर. झाडापेडाच्या गर्दीत डोंगरउतारावर एकातात बसलेले एकुलते घर. सोबत झुळझुळणाऱ्या पाटाची, झाडांची आणि पाखराची ! हरिहर आठलेकरांचा मनोमन हेवा वाटला. शेणाने सारवलेल्या जमिनीचे, कौलारू छपराचे त्याचे वडिलोपार्जित घर कुटुंबवत्सल आणि ऊबदार वाटले.

खाली बंदरवाड्यावर पोचलो आणि कर्लीच्या खाडीचे पात्र नजरेत भरले. शुक्लपक्ष होता. तिन्हीसाजा जवळ आल्या होत्या. खाडीला हळू हळू भरती येत होती. आम्ही एका होडीत बसलो. ही होडी म्हणजे दहा फूट लांब नि दीड फूट रुंदीचा एक उथळ तराफाच होता. मध्ये थोडा खोलगट असल्यामुळे त्याला होडी म्हणायचे. ही होडी चालविण्यासाठी कवठीचा सहदेव तारी हा नावाडी तयार झाला. त्याच्या एका हातात एक वल्हे व दुसऱ्या हातात एक उंच बांबू. एवढ्या आधारावर तो आम्हाला भरतीच्या प्रवाहाविरुद्ध होडी वल्हवून चार मैलांवरील ' काळवंड 'या वस्तीवर नेणार होता. काळवड ही परुळ्याची खाडीकाठची वाडी. सारा मच्छीमार वा भंडारी समाज. घरे खाडीच्या पाण्यात पाय सोडून बसल्यासारखी –

आम्ही चौघेपाचजण होतो. होडी थोडी डुचमळली आणि भरकन खाडीच्या मध्यभागी पोचली. सहदेव तारी वल्हे मारू लागला. आम्ही हाताने पाण्याला स्पर्श करू शकत होतो. दोन्ही हातानी होडी वल्हवल्यासारखे पाणी मागे सारीत होतो. होडी भराभर पश्चिमेकडे चालली होती. पूर्वेला आकाशात चंद्रबिंब तरंगत होते. रुपेरी चांदणे खाडीच्या पाण्यात चमकत होते. आणि खाडीमधली रुपेरी छोटी मासळी पाण्याबाहेर उड्या मारीत होती. तीही चांदण्यासारखी चमचमत होती. चुकार बगळे या तीरावरून त्या तीरावर उडत होते. दोन्ही काठच्या गावातून दिवेलागण होत होती. सहदेव तारी खुशीत होडी वल्हवीत होता. डावीउजवीकडील चिपी, कवठी, भरणी, आंबेरी, खालची देवली ही गावे एकामागोमाग एक मागे पडत होती.

मध्येच एक वळण लागले. सहदेव तारीने वल्हे मारून काठाकाठाने जाणारी होडी पात्राच्या मध्यभागी घेतली आणि तो वळणावरचा भोवरा सफाईने चुकवला. हरिहर आठलेकर या भागातले माहीतगार. ते म्हणाले,

' इथे महापुरुषाचे ' साणे ' आहे. पाणी फार खोल आहे तिथे आणि दर तीन वर्षांनी एक तरी बळी त्या साण्यावर जातोच ! म्हणून सगळे होडीवाले या ठिकाणी होडी बाजूला घेतात—'

तिन्हीसांजेला एकाएकी ती महापुरुषाची सुंदर कोंढ भारलेली आणि धास्तावलेली भासू लागली.

कर्लीच्या खाडीचे सौंदर्य आजूबाजूच्या निसर्गामुळे आणि प्रवाहामध्ये ठिकठिकाणी असलेल्या 'जुव्या' मुळे अधिकच वाढले आहे. आम्ही आवेरी सोडून पुढे गेलो आणि एक 'जुवे' लागले. एक निर्जन बेट; पण त्यावर माडाची कवायत. सहदेव म्हणाला, 'या जुव्याचे नाव वडाचे जुवे—'

बहुतेक या बेटाने खाडीच्या पात्राशी वड पुकारले असावे! खेडेगावातील अशा गमतीदार नावाची फोड करण्यात अर्थ नसतो. लोक सांगतील ते खरे मानून पुढे जायचे.

डाव्या बाजूला परुळे गाव लागले. त्याची एक वाडी म्हणजेच कालवड! डावीकडील डोंगराकडे नजर टाकली नि मला त्या सड्यावरून घेतलेले कर्लीच्या खाडीचे पश्चिम टोकावरील, समुद्रसंगमावरील दर्शन आठवले. या खाडीच्या सौंदर्याची परिसीमा, ती जेथे देवबागजवळ अरबी समुद्राला मिळते, तेथे नेवाळी गावच्या तटाशी व भोगव्याच्या आसमतात दिसून येते! परुळे गावातून कच्च्या रस्त्याने रणरणीत सडा पार करून आपण भोगव्याच्या तटावर यायचे नि तिथून समोर नजर टाकायची. उजवीकडून वळसा घेऊन आलेली संथ कर्लीची खाडी, पलीकडे अथांग अरबी सागर, मध्ये चिमटीत पकडावे तसे चिमुकले देवबाग गाव, पायथ्याशी डोंगर उतरणीवर पायरीपायरीने वसलेले नेवाळी आणि खाडी जिथे समुद्राला मिळते ते संथ, शांत, पृष्ठभागाची नितळाई पारदर्शकपणे दाखवणारे 'मोबार'! देवबागच्या माड–पोफळीचे डुलणारे शेंडे, हिरव्या झाडीत लपलेली लाल कौलारे, समुद्राच्या लाटा अंगाला भिडू देणारा विस्तीर्ण, स्वच्छ वाळूने भरलेला 'सुकुमार किनारा! (वेळा) हे सारे विहगम दृश्य भोगव्याच्या तटावरून जन्मात एकदा तरी पाहावे, अशा अपूर्वाईचे आहे! महाराष्ट्र शासनाला या सौंदर्यस्थळाची जाणीव असावीसे वाटत नाही; अन्यथा येथे एक पर्यटकाची झिम्मड उडवील असे मनमोहक पर्यटनकेंद्र यापूर्वीच झाले असते! हे स्थळ गोव्यात नाहीतर केरळात असते तर कधीच उपेक्षित राहिले नसते.

नेवाळी, भोगवे आणि कालवंड या साऱ्या परुळे गावच्याच वाड्या. आता मी या गावांच्या उत्तर दिशेने कर्लीच्या खाडीतून चाललो होतो. जरा वेळाने ही खाडी किंचित् डावीकडे मुरड घेईल—तारकर्ली गावाला स्पर्श करील आणि हां हां म्हणता देवबागपाशी 'मोबार' ओलांडून समुद्राला मिळेल. एका स्वप्नदृश्याचा तिथे शेवट होईल

# तेंडोली ते बागलाची राई

१७. कुडाळहून सकाळीच निघालो. तेंडोलीला जाऊन डी. जी. तेंडुलकराचे घर शोधायचे होते. एम्‌आयडीसीची औद्योगिक वसाहत मागे पडली. गोंधयाळाच्या टेपावरून मागे पाहिले तेव्हा कुडाळ शहरातल्या इमारती आणि पावशीच्या टेकडीवरील [illegible] गोंधयाळे हे गाव नेरूर हद्दीत येते. तेथपर्यंत कुडाळची औद्योगिक वसाहत पसरली आहे.

वैशाख महिन्यातील दिवस होते. तेंडोलीच्या रस्त्याला जाण्यासाठी आम्ही थोडे डावीकडे वळलो नि एखादी अरुंद पाणद असावी त्याप्रमाणे रस्त्याने अंग आखडून घेतले. दुतर्फा गर्द झाडी. आंबे घडानी लटकलेले. काजूच्या विस्तारलेल्या झाडांना बोंडू लगडलेले. रातांबी पिकून भराला आलेली. कोंकणची श्रीमंती ही झाडे दुतर्फा दाखवीत होती नि आमचा टेंपो त्या झाडांना ढुशा देत आडवळणे पार करीत पुढे चालला होता आम्ही तेंडोली गावात शिरलो होतो.

या गावी पूर्वी मी एकदा आलो होतो. डी. जी. तेंडुलकराचे घर तेव्हा पाहिले होते. वर माडी असलेले, मातीच्या भिंतीचे, कौलारू छपराचे, झाडीमध्ये विसावलेले ते घर अंधुक आठवत होते. त्या घराच्या जवळपास गेलो की मला ते सहजच ओळखता येईल, असे वाटत होते; पण त्या वेळच्या खुणा कुठेच दिसत नव्हत्या.

आम्ही वाटेतल्या एका माणसाला विचारले, डीजी तेंडुलकराचे घर कुठाय ?'

'कोण डीजी तेंडुलकर ?

त्या माणसाच्या पेहरावावरून तो कुणीतरी गावकरी वाटत होता, पण फारसा शिकलेला नसावा, एवढे ध्यानात आले. तरीही त्याला म्हटले, 'डीजी तेंडुलकर मोठे लेखक होते. महात्मा गांधींचे इंग्रजी चरित्र त्यांनी लिहिले होते. .'

'आसात बोवा ! आमका ठावूक नाय . होया तर फुडे तेंडोलकराची घरां आसत थंय इच्यारा—' असे म्हणून तो निर्विकारपणे पुढे चालू लागला. आम्ही थोडे हिरमुसले झालो. डीजी तेंडुलकर हे नाव केवढे मोठे ! त्यानी महात्मा गांधींच्या इंग्रजीमध्ये लिहिलेल्या चरित्राचे खंड जगभर गाजले होते. जवाहरलाल नेहरूना ते

'माय डिअर जवाहर' नि इदिरा गांधींना साध्या पोस्ट कार्डावर 'माय डिअर इदू' असे लिहून पत्रे पाठवीत आणि त्यांना न चुकता उत्तरे येत. तीही जवाहरलाल व इदिराबाई यांच्या दस्तुरखुद्द अक्षरांतली! पण त्या भल्या माणसाचे नाव गावकऱ्याना ठाऊक नव्हते. मला लोकमान्य टिळकांच्या घराची आठवण झाली. चिखल गावी आता तेथे थोडेफार स्मारक म्हणता येईल असे काही झाले आहे, पण पाचपचवीस वर्षांपूर्वी तिथे टिळकांच्या घराचा चौथराही शोधावा लागत होता. थोर माणसाच्या जन्मगावाला त्याची थोरवी कधी कळूच नये, असे चित्र हिंदुस्थानमध्ये नेहमी दिसते. त्याला मुकाम पोस्ट तेंडोली अपवाद कसे असेल?

तसेच पुढे निघालो. कुणातरी एका तेंडुलकराचे घर भेटले पाहिजे. याला तरी डी. जी. माहीत असतील, म्हणून शेते, घाटी, पाट, वहाळ याना वर-खाली करीत आम्ही कोळसेवाडीपर्यंत वाट तुडवली. टेंपो रस्त्यावरच उभा होता. तेंडोली गावातून ही पायपीट करताना या गावाची बागायती श्रीमती नजरेत भरली. सारे गाव फळाफुलानी गजबजलेले रातांबीची (भिरडीची) झाडे तर पावलापावलावर अब्दागीर घेतल्यासारखी उभी. तीही फळानी माथ्यापर्यंत लगडलेली. वाटेतल्या प्रत्येक घराच्या अंगणात सोललेली भिरडे वाळत घातली होती. भिरंडाचे पाडप जिथे तिथे चालले होते. जणू सारा गाव कोकमात आणि सोलकढीत बुडाला होता!

वाटाड्या म्हणून घेतलेला माणूस सागत होता, 'तेंडोलीत भिरडाचा उत्पन्न दाडग्या. !'

कोळसेवाडीमध्ये एक तेंडुलकरांचे घर होते, तिथे डीजींची नक्की माहिती मिळेल, असे मनाशी म्हणत आम्ही चाललो होतो आणि वाटेत एक सुरेख देवालय लागले. वाटाड्या म्हणाला, 'वायच दर्शन घेवा! देवी जागृत आसा—'

आम्ही देवालयात शिरलो. श्री अनलादेवीचे ते मदिर होते. अनलादेवी दुसरीकडे कुठे पाहिली नव्हती. गाभाऱ्यात शिरलो. सुबक साजिरी, चतुर्भुज महिषासुरमर्दिनीची मूर्ती समाधिस्थ असल्यासारखी दिसत होती. डोळे मिटलेले होते. मूर्तीची ढब ऐटदार, डोळे खिळवणारी होती. दोन्ही बाजूला छोटे अश्व होते. डावीकडील घोड्यावर स्वार होता. त्या घोड्याची ऐट प्रेक्षणीय होती. कोंकणातील ग्रामदेवतामध्ये अनलादेवी सर्वाहून वेगळी भासत होती. इतरत्र असतात तसे हिच्या आजूबाजूला वीरगळ, वराह, वृषभ यांसारखे पाषाणी पशू नव्हते किंवा खड्गधारी देवदेवता नव्हत्या. होते ते दोन सुबक, देखणे अश्व. जणू कोणत्याही क्षणी ते टापावर उभे राहून दौड सुरू करतील!

देवाल्याची रचना पाहताना मला थेट धामापूरचे श्रीभगवतीचे देवालय आठवले इतके दोघांमध्ये साम्य आहे वाटाड्या सागत होता, 'कार्तिकातील पौर्णिमेपासून तिसऱ्या दिवशी इथे वार्षिक जत्रा भरते!'

अनलादेवीचे दर्शन घेऊन निघालो. डीजींच्या जन्मस्थळाचे दर्शन तितकेच महत्त्वाचे होते. कोळसेवाडीतील तेंडुलकर वेगळेच निघाले; पण त्यांनी अगत्य दाखविले. डीजींचे नाव त्यांना माहीत होते. ते म्हणाले, ' तुम्ही भोमवाडीत जायला पाहिजे. डीजी तेंडुलकरांचे घर तिथे होते ! '

' तिथे होते म्हणजे आता नाही ? '

' छे ! ते केव्हाच पडले आता तिथे जंगल वाढले आहे ! '

मी हळहळलो. मागे एकदा पाहिलेले ते डीजींचे घर माझ्या डोळ्यासमोर तरळून गेले. त्या घराच्या पडवीत मी बसलो होतो. भक्तिभावाने देवाच्या पायरीवर बसावे तसा.. तेव्हा घरात एक वृद्ध आजीबाई होत्या. त्यांनी घमघमणारा पिका रसाळ फणस पुढ्यात ठेवला होता. पितळी फुलपात्रातून लाल चहा दिला होता. कुठे असेल ती आजी आता ? मी विचारले तेव्हा कोळसेवाडीचे तेंडुलकर म्हणाले, ' ती डीजींची जवळची नातेवाईक बाई होती ती वारली. मग घरही पडले. निगा ठेवतो कोण ? ' मग आमच्याबरोबर भोमवाडीत यायला ते स्वतःच पुढे सरसावले. ऊन-सावलीतून आम्ही भोमवाडीकडे निघालो.

भोमवाडीकडे जाणारा रस्ता म्हणजे आम्ही ज्या रस्त्याने म्हणजे पायवाटेने आलो तोच परत तुडवायचा. टेंपोमधून दोनएक किलोमीटर अंतर तोडले आणि भोमवाडीत येऊन पोचलो. हा परिसर मात्र माझ्या ओळखीचा वाटू लागला. आठवले, इथेच पूर्वी मी एकदा आलो होतो.

भोमवाडीत पुन्हा एक तेंडुलकरांचे घर भेटले. तेथील माणसे चटकन बाहेर आली. काहीशा संशयानं आमच्याकडे पाहू लागली. डीजी तेंडुलकर नावाचा एक माणूस आपल्या घराण्यातून पुढे आला, नावारूपाला चढला, मोठा झाला, पण त्याचे आता काय ? हे लोक त्याच्या घराची, जमीन-जुमल्याची चौकशी का बरे करताहेत ? प्रत्येकाच्या चेहऱ्यावर संशयाचे जाळे स्पष्ट दिसत होते. मग एकाने खुलासा केला. तो कोंकणी माणसाच्या प्रवृत्तीवर प्रकाश टाकणाराच होता. अर्थात मला असे अनुभव पूर्वीसुद्धा आलेले होते.

कोंकणातून जी घराणी पन्नास शंभर वर्षांपूर्वी बाहेरच्या मुलखात निघून गेली, त्यातील अनेकांची वंशवृद्धी नंतर बाहेरच झाली. त्या मंडळींनी पुन्हा कधी कोकणात पाऊल टाकलेच नाही. क्वचित् कुणी ग्रामदेवतेच्या दर्शनाला आले तरी एखाद्या दिवसापुरते. त्यांची घरे, जमिनी मग शेजाऱ्यापाजाऱ्यांनी बळकावल्या. आता मूळ मालकांपैकी कोण येतेय चौकशी करायला, असा विचार करून त्यांनी कागदोपत्री आपापली नावे वहिवाटदार म्हणून दाखल करून घेतली ! तेव्हा मूळ मालकांपैकी कुणीतरी कधीकाळी गावापर्यंत पोचलाच तर त्याला कसली ओळखपाळख दाखवायची नाही, हा धूर्त व्यवहारी विचार. डीजी तेंडुलकरांनी खरोखरच मरताना

मृत्युपत्र करून ठेवले असेल तर ? आणि त्याचा आधार घेऊन कुणी लुगासुंगा आपल्या जमिनीची पूसतपास करायला आला असेल तर ? वेळीच सावध झालेलं बरं. कोंकणी मनाने हे सगळे विचार केले आणि ठरवले की कुणी चौकशी करायला आलाच तर जाम पत्ता लागू द्यायचा नाही ! 'आम्हाला नाही बुवा काही माहीत ! हे डीजी तेंडुलकर कोण ? कुठले ? त्यांचं इथ काय ?' असले चार उलटे प्रश्न सशयी चेहऱ्याने विचारले की झाले. चौकशी करणारा थाबतो आहे कशाला ?

मीही हाडाचा कोंकणी ! माझ्याही जमिनी गावी होत्या—आहेतही माझे अनुभव माझ्या गाठीशी होतेच. त्यांच्या आधारावर मी मनाशी खूणगाठ बांधली नि साफसाफ सागून टाकले, 'आम्ही डीजी तेंडुलकराचे नात्री—गोत्री—सगेसोयरे कोणीही नाही ! आम्हाला फक्त लेखक तेंडुलकरांचे जन्मस्थान पहायचे आहे. त्याला नमस्कार करायचा आहे.' पाठोपाठ मी माझे नावही सांगून टाकले. विश्वास तर बसायला हवा ? मग मडळींना ओळख पटली. हेतूचे खुलासे झाले आणि मंडळी मोकळेपणाने सशय फिटून बोलू लागली. त्या बोलण्यातून कळले ते एवढेच की डीजी तेंडुलकरांचे घर आता जाग्यावर उरलेले नाही. त्या पलीकडच्या परसावात त्याच्या घराचा पडीक चौथरा तेवढा शिल्लक आहे. पहायचा असेल तर या कणकीच्या, निवडुगीच्या, करवंदीच्या काटेऱ्यातून जावे लागेल !

आम्ही उत्सुकतेने तेथे गेलो.

ज्या ठिकाणी मी पूर्वी डीजींचे उभे असलेले घर पाहिले होते, तिथे आता केवळ चार पडक्या भिंती, एक उखडलेला चौथरा नि आजूबाजूला घनदाट काटेरी वनस्पती हवी तशी माजली होती. डी.जी. तेंडुलकर या त्रिखंडात गाजलेल्या गांधी चरित्रकाराचे जन्मस्थळ भग्नावशेषाच्या स्वरूपातही तेथे उरले नव्हते.

फार उदास वाटले.

आणि तिथून केव्हा एकदा निघून जातो, असे होऊन गेले.

भर दुपारच्या रणरणत्या उन्हातून पुढे निघालो. गेल्या पिढीतल्या एका महान लेखकाचे जन्मस्थळ पाहिले; आता चालू जमान्यातल्या एका प्रतिभावत कवीच्या—कथा, कादंबरी, नाटके लिहून आपले नाव मराठी साहित्यात चिरंतन करणाऱ्या चिं. त्र्यं. खानोलकरांच्या जन्मस्थानाला भेट द्यायची होती. ज्या ठिकाणी खानोलकरानी आपल्या सुरुवातीच्या कविता लिहिल्या त्या ठिकाणी जायचे होते.

पुढील मुक्काम 'बागलाची राई !'

मालवणी मुलखातून थोर माणसे निर्माण झाली. आपल्या या लाल मातीच्या, जाम्या दगडाच्या, झाडापेडाच्या मुलखात त्यांना मोठेपणाचा साक्षात्कार झाला आणि त्यांनी परप्रातात जाऊन क्षितिजाला पालाण घालण्यासाठी आपले पंख पसरले. ज्या

भागातून मी चाललो होतो, तो केवढा समृद्ध मुलुख. लेखक, कलावंत, बुद्धिमान माणसे याना जन्म देणारा. तेंडुलकर, खानोलकर यांसारखे साहित्यिक, परुळेकर, भांडारकरासारखे शिक्षणतज्ज्ञ विद्वान; वसंतराव देसायांसारखे संगीतकार; टोपीवाल्या देसायासारखे उद्योगपती, स. का. पाटलांसारखे धुरंधर राजकारणी, असे कितीजण सागावे? अवघ्या दक्षिण कोंकणानेच सर्वत्र अशी नररत्ने निर्माण केलेली असली तरी कुडाळ-वेंगुर्ले-परुळे-मालवण या चिंचोळ्या पट्टीत जन्माला आलेली एकाहून एक थोर माणसे पाहिली की या भूमीचे अप्रूप वाटते—

वेंडोलीहून मुख्य रस्त्याला लागलो नि वाटेत आदुर्ले लागले. मध्यतरी श्री. रमेश भागट यांच्याशी बोलताना स. का. पाटील यांचा जन्म आदुर्ले येथे झाल्याचा उल्लेख त्यानी केला होता. अनायासे मी आज त्याच आदुर्ल्यातून पुढे जात होतो. आदुर्ल्यात रस्त्यालगतच एक भव्य देवालय होते. गाडी थांबली. 'ही इथली चामुंडेश्वरी! आम्ही उतरून देवालयात गेलो—

मला असे दिसले आहे की गोव्यानतर देवालयांनी नि देवदेवतांनी संपन्न असा दुसरा प्रांत असेल तर तो आमचा मालवण–वेंगुर्ल्याचाच! गावोगावी भव्य बांधणीची सुदर देवालये. आदुर्ल्याचे हे चामुंडेश्वरी देवीचे मंदिरही भव्य, निवांत आहे. देवाची मूर्ती बैठकीमधली आहे. इतर देवता उभ्या असतात–श्रीचामुंडेश्वरी बसलेली आहे. मुद्रा मोठी सुदर, आश्वासक, बैठकीचा थाट विलक्षण भारदस्त. आपले मस्तक नम्र व्हावे, असा या देवीचा एकूण आविर्भाव आहे. कोंकणात पाहिलेले एक वेगळे दैवत म्हणून स. का. पाटील याच्या जन्मग्रामातील–आदुर्ल्यातील चामुंडेश्वरी लक्षात राहिली.

आता बागलाची राई.

जिथे आरती प्रभूने सुदर सुदर कविता लिहिल्या. जिथे त्याने लिहिले, 'झाडे नग्न झाली!

'बागलाची राई' हे ठिकाण बागल या घराण्याचे. हे घराणे अध्यात्माकडे वळलेले. स्वामी चिदानद हे या घराण्यातील सात पिढ्यांपूर्वीचे सत्पुरुष. त्यानी या परिसरातील निवांत, निसर्गरमणीय जागी परमेश्वराचे सकीर्तन सुरू केले. परमेश्वराने निर्माण केलेल्या सुंदर दुनियेत तशीच सुदर मनाची माणसे निपजावी, हा सर्व संतांचा आग्रह असतो, तोच चिदानंदाचाही होता त्यासाठी त्यानी भजनपूजनाचा मार्ग स्वीकारला.

आम्ही झाडानी वेढलेल्या एका रस्त्यावर आलो. उजवीकडे उंच डोंगर तर डावीकडे सखल गावठाण. गाडी थांबली. रस्त्याला बिलगूनच एक अरुंद चिरेबंदी वाट टप्प्याटप्प्याने वर डोंगर चढत गेलेली आढळली. चिरेबदी बांधकाम ताजे होते. म्हणजे नुकतीच ही फरसबंद कुणीतरी घडवली होती. आम्ही त्या वाटेने वर जाऊ

लागलो. इथेच चिं. त्र्य. खानोलकरानी काव्यसाधना केली. आजूबाजूला पाहिले. गर्द झाडावळ उभी. माड, पोफळी, रातांबे, फणस आणि नाना तऱ्हेची झाडे. पाटाचे झुळझुळ पाणी. पाखरांची मजुळ किलबिल. भर दुपारीसुद्धा शीतल गारवा. अतिशय रमणीय स्थळ.

मग एक चिरेबंदी मठी लागली. एखादे पुरातन देऊळ असावे तशी अत्यंत अरुंद दरवाजा. आत धुसमटवणारा अंधार, वीज आलेली होती; पण दिवे लावलेले नव्हते. मधल्या चौकात दोन समाध्या. आतल्या गाभाऱ्यातही एक समाधी. तिथे शिवलिंगे. अत्यंत शांत, गंभीर वातावरण. फक्त समाधीजवळचा नंदादीप स्निग्धपणे तेवत होता. बाकी प्रकाशाची, आवाजाची चाहूलही नव्हती.

नास्तिकाचेही हात जोडले जातील अशी ती शुचिर्भूतता आणि मंगलता. मन स्थिर झाले. चिदानंदस्वरूप होत गेले—

जरा वेळाने बाहेर आलो. कुणीतरी सांगितले, 'आतल्या गाभाऱ्यात आहे ती चिदानंद स्वामींची समाधी. त्यांनी सजीवन समाधी घेतली होती—जशी श्री ज्ञानेश्वरानी घेतली होती. बाहेर आहेत त्या त्यांच्या दोन सुपुत्रांच्या समाध्या. बागल घराण्यात अध्यात्म हे वारसानेच आलेले आहे.'

घाटीची चढण चढून वर गेलो. तेथे एक जुने, छोटेखानी घर डोंगराच्या दरडीला खेटून उभे होते. हेच खानोलकरांचे आजोळ. इथेच त्यांची आई नि ते भावंडासह राहिले होते. इथेच या पडवीत बसून त्यांनी आपल्या कविता लिहिल्या होत्या. हे सारे मनात येऊन मन कातर झाले. उगाचच हळवे बनले. वाटले, चिं. त्र्यं. आता कुठून तरी येतील आणि कविता म्हणू लागतील—

परत एकदा परत फिरून—
पाषाणयुगाच्या नंतर एकदा
युगांच्या मोलाचा लाल ग्रीष्मगर्भ
राठ वल्कलात जपता जपता—
झाडे नग्न झाली!

## वेंगुर्ल्याच्या वाटेवर...

१८. कर्लीची खाडी आम्हाला होडीतून थेट तारकर्ली देवबागला नेऊ शकत होती; पण आम्ही काळ्वंड येथेच होडीतून उतरलो. हरिहर आठलेकर या गावी पूर्वी शिक्षक होते. त्यानी जोडलेली अनेक घरे या आसमंतात आहेत. सरमळकर यांचेही त्यातील एक. सरमळकरानी आमचे उत्तम स्वागत केले. दारातल्या खाडीतून पागवून आणलेल्या ताज्या फडफडीत मासळीचे चविष्ट कालवण नि भाताचा शुभ्र ढीग, शिवाय तांदळाच्या मऊसूत भाकऱ्या असा फक्कड बेत त्यांनी आमच्यासाठी केला होता आणि 'भट' आठलेकरासाठी 'गोडी डाळ नि भात.' कर्लीच्या खाडीला या अस्सल मालवणी पाहुणचारामुळे यापुढे कधीच विसरता येणार नव्हते.

काळ्वंडची घाटी चढल्यानंतर माणूस परुळ्याच्या बाजारात येऊन ठेपतो. परुळे हेही मालवणी मुलखातले एक जबरदस्त गाव याचा विस्तार सतरा चौरस मैलांचा आणि या गावाला एकूण बत्तीस वाड्या! एकेक वाडी म्हणजे जणू एकेक गावच. गाव तसा ऐतिहासिक महत्त्वाचा. इतिहासकालामध्ये जशी येथे प्रचंड कर्तबगारीची सामंत-देसाई कुळे निर्माण होऊन त्यानी कुडाळ देशाचे राज्य चालविले तसेच वर्तमानकाळातही या गावाने एकाहून एक लोकोत्तर अशा विभूती जन्माला घातल्या. या परुळे गावाचा उल्लेख सोळाव्या शतकात रचलेल्या कोंकणाख्यानात पुढीलप्रमाणे केलेला आहे .

परुळे गाव समर्थ । देव वेताळ रवळनाथ ॥
आणि आदिनाथ । कनकादित्य पैं म्हणती ॥ ४ ॥

कनकादित्याचे म्हणजेच 'श्रीदेव आदिनारायणाचे' प्राचीन देवस्थान म्हणजे परुळे गावचे जणू पंचप्राण होत. श्री सूर्यनारायणाचे मूर्तिरूप उभ्या हिंदुस्थानात फक्त दोनच ठिकाणी पहावयास सापडते. पूर्वेला जगन्नाथपुरीजवळ 'कोणार्क' या ठिकाणी एक व दुसरे पश्चिम किनारी वसलेल्या या परुळे गावामध्ये. साडेसातशे वर्षांचे हे देवालय. मध्ययुगीन शिल्पपद्धतीप्रमाणे कोनाकार निमुळत्या शिखराचे हे देवालय भव्य आणि नितांतसुंदर आहे. पंच्याऐंशी फूट लांबी आणि पस्तीस फूट

रुदीचे प्रशस्त प्राकार या देवालयाला लाभले आहे. या देवाल्यामध्ये पाऊल ठेवणारा प्रत्येक परुळेकर सद्‌गदित मनाने, विनम्र भावाने पायरीवर उभा राहून न चुकता म्हणत असतो—

प्रभो ! त्रिभुवनोज्ज्वला कनकसुंदरा भास्करा ।
समस्त जनरक्षणा विमलरूप सर्वेश्वरा ।।
प्रकाश जगता तुझा सकल विश्वसंरक्षणा ।
सदैव तुझिया पदीं नमन आदिनारायणा ।।

आम्ही श्रीआदिनारायणाच्या मंदिरात पोचलो, तेव्हा सकाळची प्रसन्न वेळ होती. मंदिरात पूजाअर्चा चालू होती. पुष्पांकित तेजसंपन्न परमेश्वराचे असंख्य दीपानी प्रज्वलित झालेल्या गाभाऱ्यातील दर्शन भाविक मनाला भरती आणणारे होते.

आदिनारायणाचा आसमंतही निसर्गरमणीय आहे. देवस्थानचा स्वतंत्र ट्रस्ट आहे. त्याच्यामार्फत भाविकांची राहण्याची, जेवणाची उत्तम सोय होते. तेथील निवांत वातावरणात चार दिवस राहून देवाची सेवा करावी, या हेतूने दूरदूरच्या ठिकाणांहून भक्त मंडळी येतात. श्रीआदिनारायणाचा वरदहस्त सर्व गावात असल्याचा प्रत्यय येतो. म्हणून परुळे गाव अतिशय संपन्न आहे. बाराही महिने शेतीभाती, बागायती करण्यात येथील शेतकरी गर्क असतात. नारळ–सुपारीचे उत्पन्न असतेच. लोक संतुष्टपणे वावरतात.

यापुढचा मुक्काम होता निवतीचा. निवती बंदर म्हणजे एकेकाळी फार गाजलेले मोक्याचे ठिकाण. बोटीने गोव्याला जाताना मालवण ओलांडले की एका खडकावर समुद्रात उभे असलेले ते दीपगृह दिसले की लोक सांगायचे, ‘ हे निवती बंदर आता वेंगुर्ले हाकेवर...! ’

पण खडकावरच्या दीपगृहापुरताच या ठिकाणाचा उल्लेख करून भागणार नाही. श्रीशिवाजीमहाराजानी सिंधुदुर्ग बांधला तेव्हा त्याच्या आजूबाजूला संरक्षणासाठी जे लहानमोठे आणखी काही किल्ले बांधले त्यातील एक महत्त्वाचा किल्ला या निवतीच्या तटावर बांधला होता. तिथून सिंधुदुर्ग फक्त दहा मैलांवर आहे. निवतीच्या पडझड झालेल्या किल्ल्याच्या खालच्या बाजूला समुद्र अहोरात्र गर्जत असतो. तेथील महाकाय खडकावर लाटा फुटत असतात आणि ते दृश्य पाहताना वेळ कसा उडून जातो कळत नाही. डावीकडे निवती बंदर. लहानसाच, पण रेखीव किनारा. मच्छिमारांच्या होड्या ओढून ठेवलेल्या बंदरात काही ट्रावलर्स नांगरून पडलेले. किनाऱ्यावरच्या उंडली–माडाच्या गर्दीत पाचपचवीस कौलारू, झापाची नि कॉंक्रीटचीसुद्धा घरे

निवतीच्या किल्ल्यावरून काय किंवा बाजूच्या भोगव्याच्या तटावरून काय, समोरचा साराच विहंगम देखावा वेड लावणारा. एकाद्या अप्रतिम पर्यटनस्थळासाठी

असे ठिकाण शोधूनही मिळणार नाही; पण .

कोंकणातील कित्येक किनारे पर्यटकासाठी आतुर होऊन वाट पहात आहेत; पण जिथे तिथे हा ' पण ' शब्द आड येतो आहे. या ' पण 'च्या भोवती गुंतागुतीच्या अनेक गोष्टी. खर तर साऱ्या सहजपणे दूर करता येतील अशा. शासनात लोकांचे प्रतिनिधित्व करणारे लोक आणि स्थानिक जनता याचे गणित जमायला हवे नि ते सुटायला हवे !

कोकणातले हे गणित सोडवणे आजवर तरी कुणाला जमलेले नाही–

निवतीवरून रेडी–रेवस या नव्या कोऱ्या सागरी मार्गाने आम्ही वेंगुर्ल्याच्या दिशेने निघालो. चिं. त्र्य. खानोलकरांची ' कोंडुरा कादंबरी मनात घोळत होती. घो घो ऽ वाजणारा ' कोंडुरा ' खानोलकरांनी या भागात कुठे पाहिला !

कुणीतरी म्हणाले, केळुसमार्गे सुरगपाणी येथे जायला हवे. उजवीकडे थोडे खोल उतरले की एक चिंचोळी, खडकाळ नि खाली समुद्रात उतरलेली, गुहांनी–खबदाडींनी–खडकांनी भरलेली जागा लागते, त्यालाच इकडचे लोक ' कोंडुरा ' म्हणतात.

या गुहेसारख्या खबदाडीत समुद्राच्या मान्सूनच्या प्रारंभीच्या घोंघावणाऱ्या लाटा वेगाने घुसतात. त्या पोकळीमध्ये त्यांचा कोंडमारा होतो आणि त्याचा रौद्रगंभीर नाद घुमू लागतो. रात्रीच्या निवांत प्रहरी हा आवाज पूर्वेला थेट कुडाळ–राणण्यापर्यंत [illegible] [illegible] ओळखतात, पाऊस जवळ आला. मृग आता कोसळणार.

कारण ' कोंडुरा ' गर्जू लागलाय !

कोंडुरा, सुरगपाणी, किरणपाणी ! किती सुंदर नावे इथल्या एकेका ठिकाणाला लाभली आहेत !

खानोलीच्या सड्यावर आलो नि अकस्मात त्या कातळभागात एक टुमदार वस्ती दिसू लागली. आखीव रेखीव, आधुनिक बांधणीच्या इमारती दिसू लागल्या. झाडे लावलेली आढळली नि कुणीतरी माहिती पुरवली–हेच ते श्री पूर्णानंद मानवसेवा ट्रस्टचे श्रीलक्ष्मीनारायण हॉस्पिटल ! स्वयंसेवी संघटना किती महत्त्वाचे कार्य करू शकतात, याचा आदर्श म्हणजे हा प्रकल्प. मुंबईमध्ये उत्तमपैकी पैसा मिळण्याची खात्री असताना या कातळावर उच्चविद्याविभूषित असे डॉक्टर्स, सर्जन्स हे हॉस्पिटल उघडून रुग्णांची सेवा करीत आहेत. कोणत्याही प्रसिद्धीचा प्रकाशझोत स्वतःवर पाडून न घेता, अहोरात्र सेवाभावाने झटणारी ही तरुण डॉक्टर मंडळी पाहिली की नव्या जमान्यातल्या, एरवी भल्या गोष्टींवरच्या ढासळत्या विश्वासाला भला मोठा आधार सापडतो—

दाभोलीचा कुडाळदेशकर समाजाचा मठ इथून जवळ. दाभोलीच्या दिशेने

निघालो नि पूर्वेकडे आणि पश्चिमेकडे दिसणारी चित्रासारखी निसर्ग दृश्ये पाहून पाय अडखळायला लागले. गोव्यात मंगेशीला जाताना कुडईच्या पठारावरून खाली अनुज महालातल्या मंगेश-शांतादुर्गेच्या कुळागरानी वेढलेला हिरवा परिसर मला आठवला. नेमका तोच देखावा दाभोलीच्या उतरणीवरून दिसत होता आणि पश्चिमेला अरबी समुद्राची त्रिकोणी पिंपळपानाच्या आकृतीसारखी अरुंद पट्टी दोन्ही बाजूनी तुटलेल्या टेकड्यामधून दृग्गोचर होत होती. मावळतीच्या उन्हात ते समुद्राचे सोनेरी पिंपळपान झगमगत होते. पूर्व-पश्चिमेला मांडलेली ती निसर्गाची आरास जणू दाभोली-खानोलीच्या त्या वैराण कापाळा-कातळमाळाला-शोभिवत करीत होती.

घाटी उतरलो नि वेंगुर्ले-कुडाळ हमरस्त्याला लागलो याच रस्त्यावर दाभोलीचा मठ आहे. या भागातील सर्वच देव-देवताच्या वास्तव्याची ठिकाणे रमणीय निसर्गाच्या कुशीत आढळतात. नारळी-पोफळीची गर्द सावली नि झऱ्या-पाटाचे निवळशंख बारमास वाहणारे पाणी, ही इथली वैशिष्ट्ये. कुडाळदेशकर आद्य गौड ब्राह्मण समाजाचे हे धर्मपीठ अशाच सुंदर सृष्टिवैभवाने नटलेल्या जागी आहे. बाजूला पूर्वाभिमुख वसलेली मठाची भव्य वास्तू डोळ्यात भरते. प्रथम नगारखाना लागतो. पुढे माडीची चिरेबंदी इमारत. बाहेर भव्य मंडप घातलेला. उन्हाळ्यात हा झापांचा मांडव हजारपाचशे माणसाना सावली देत असतो. आतमध्ये एका बाजूला मठाचे ऑफिस. मधल्या दालनात पुराण-प्रवचने होतात. समोरच मठाच्या स्वामींचे उच्चासन आहे. सभामंडपामध्ये श्री नारायणाची मूर्ती उभी आहे. या देवस्थाना-मागे खोल गाभाऱ्यामध्ये श्री पूर्णानंदस्वामींची मुख्य समाधी आहे. बाहेरच्या मोकळ्या भागात इतर स्वामींच्या समाध्या आहेत. या पीठाला पुरातन इतिहास आहे. अध्यात्माची पताका या मठात सतत फडकत राहिलेली आहे. हा मठ कुडाळ-देशकर ब्राह्मण ज्ञातीपुरता मर्यादित असला तरी त्याला एक असीम अशी सांस्कृतिक महत्ता आहे.

मठाच्या मागील भागी निवळशंख पाण्याची तीन कुंडे आहेत. त्यातील पाणी कधीही आटत नाही. जवळच गर्द नारळी-पोफळी, काजू-आंबे-रातांबे, केळी-कर्दळी यांनी गच्च भरलेली वनराई आहे. शेजारच्या डोंगरामधून पावसाळ्यात एक धबधबा खाली उडी घेतो आणि सर्व परिसराला एका घनगंभीर आवाजाने भारून टाकतो. त्याचे मठातर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या पुस्तिकेमध्ये केलेले वर्णन वाचून इथे आषाढ-श्रावणात एकदा मुद्दाम आले पाहिजे, असे वाटले. आम्ही गेलो ते दिवस उन्हाळ्याचे होते. धबधबा पाहता आला नसला तरी मठाचे पावित्र्य व भोवतालचे सृष्टिसौंदर्य मनावर खोल ठसा उमटवून गेले.

उभ्या महाराष्ट्रात ज्यानी काढलेली गणेशाची चित्रे लोकप्रिय झाली आहेत, ते अरुण दाभोळकर चित्रकार या गावी आपले सुंदर घर बांधून राहतात. आमचे मित्र

मुंबईचे ख्यातनाम चित्रकार श्याम जोशी याचाही या स्थळावर भारी लोभ. कुंचला नि रंग घेऊन ते येथे येतात. येथील निवांत वातावरणात चार दिवस घालवतात येथील निसर्गदृश्ये आपल्या कुंचल्याने फलकावर साकार करतात

कोणाही कलाकाराला भुरळ घालील असाच हा परिसर आहे.

वेंगुर्लें येथे जाताना कुडाळहून निघाले की पिंगुळी रस्त्याने पुढे जावे लागते. पिंगुळी गाव अलीकडे दोन गोष्टींमुळे प्रसिद्धीला आला आहे. तिथे उभे राहिलेले मोटमोठे कारखाने आणि श्री संत राऊळ महाराजांचा मठ, या त्या गोष्टी.

मी पिंगुळी गावी प्रथम गेलो त्याला पचविसाहून अधिक वर्षे लोटली. चिं. त्र्य. खानोलकराबरोबर मी गेलो होतो तेव्हाची पिंगुळी किती शांत आणि वेगळी होती ! दिवस पावसाळ्याचे होते. हिरव्या भातमळ्यात शेतकरी तिरोडी, इरली घेऊन लावणी करीत होते. कोंकणातला त्या काळचा पाऊसही वेगळा होता. ताशावर काठी तडतडावी, तसा पाऊस झाडाच्या माथ्यावर सरी वाजवीत यायचा. पिंगुळीला असाच पाऊस वाजत गाजत असताना मी गेलो होतो. आपल्या कामाधामात गुतलेली माणसे नि एकमेकांपासून बेतशीर अंतरे राखून बांधलेली खानदानी घरे. एकूणच सारा गाव कुटुंबवत्सल भासत होता.

आणि आता त्याच गावाचे पालटलेले रूप मी पाहत होतो. मुंबई–पुण्याच्या तोडीचा तो प्रचंड ' वायमन गॉर्डन ' कारखाना. त्याचे ते प्रचंड आवार. दगडी तारांचे लांबच लांब कुंपण. ते भव्य गेट. तेथे उभे असलेले पहारेकरी आणि पलीकडील आधुनिक बांधणीची सिमेंट–काँक्रीटची भली मोठी इमारत. आतील कार्यशाळेमध्ये वाजणारे यंत्रांचे, हत्यारांचे आवाज. सारे दृश्य वेगळे होते

रस्त्याने हातात जेवणाचे डबे घेऊन घाईघाईने जाणारे कामगार आणि हो, गेटच्या बाहेर कुठल्यातरी युनियनच्या नावाने उभारलेले ते लाल बावटेसुद्धा !

केवढा हा बदल !

खुद्द माझ्या गावी, करूळलासुद्धा असाच बदल झालेला नाही का ? हा बदल अपरिहार्यच आहे नव्या जमान्यानुसार, लोकांच्या नव्या गरजांनुसार जिथे तिथे नव्या गोष्टी घडतच राहणार. त्यांचे स्वागत करायलाच हवे !

हो. पण ते करताना माझे जुने, साधे, सरळ, भोळेभाबडे करूळ गाव हरवू नये असे मला वाटत असते नव्या पिंगुळीकडे पाहतानाही माझ्या मनात तोच विचार येत आहे. पूर्वी पाहिलेली शालीन, साधीभोळी पिंगुळी या एका कारखान्यामुळे आरपार बदलली आहे. हा बदल पचनी पाडणे माझ्यासारख्याला थोडे तरी अवघड वाटते आहे.

कुडाळ–वेंगुर्लें रस्ता नि कुडाळ–सावंतवाडी रस्ता यांना जोडणाऱ्या मधल्या

रस्त्यावर संत श्री राऊळ महाराजांची समाधी आहे. हे आधुनिक काळात वावरलेले आणि आपल्या अगाध्या आध्यात्मिक गुणांमुळे अनेक भक्तजनाना मन:शांती आणि दैवी प्रसाद यांचा लाभ करून देणारे सत्पुरुष! त्यानी केलेले चमत्कार पाहिलेली मडळी असख्य आहे. त्यांना वाचासिद्धी प्राप्त झालेली होती, असे सांगतात. त्यांचा संचार कुठेही होत असे. अवलियासारखा वागणारा हा सत्पुरुष अर्वाचीन काळातला स्वतःच एक चमत्कार होता त्यांचे भक्तजन असंख्य आहेत. त्यांच्या अनुग्रहाने ते पुनीत झालेले आहेत राऊळ महाराजांचा मठ रस्त्याशेजारीच रमणीय जागी वसलेला आहे व तिथे दूरदूरहून भाविक मडळी नित्य येत असतात.

पिंगुळीचे महत्त्व आजकाल जसे या दोन गोष्टींनी वाढवले; तसेच ते प्राचीन काळापासून येथील ठाकर जमातीच्या चित्रकथी मडळींनीही वाढवलेले होते. मूळचीच भटकी असलेली ही जमात आपल्या अंगची ' चित्रकथना ' ची कला सोबत घेऊन गावोगाव भटकत असे. चित्रकथन व कळसूत्री बाहुल्यांचा खेळ या कलानी ही जमात राजेरजवाड्यांच्या कृपाश्रयाला पात्र ठरली, त्याना या पिंगुळी गावात सस्थानिकांनी जमिनी इनाम दिल्या. गुप्तहेर पथकामध्येही इतिहासकाळात या ठाकर मडळींनी महत्त्वाची कामगिरी बजावली होती. जमिनी इनाम मिळाल्यानंतर गावोगाव भटक-णारे ठाकर पिंगुळी गावात स्थिर झाले. आणि चित्रकथी व कळसूत्री बाहुल्यांचे कारागीर म्हणून अधिकच प्रसिद्धी पावले.

मध्यंतरी पुन्हा ही कला निष्प्रभ झाली. हुषार ठाकर कारागीर मासेमारी करू लागले. पुन्हा गावोगाव भटकू लागले; पण त्यातील काही कुटुंबे काळाबरोबर बदलत होती. त्यांची मुले शिकून मोठी होत होती. आज घटकेला त्यांच्यातील काही तरुण शिकून इतके मोठे झाले आहेत की डॉक्टरी, प्राध्यापकी ही क्षेत्रे तर त्यानी ताब्यात घेतलीच, पण त्यांच्यातील एकजण थेट अमेरिकेपर्यंत जाऊन तेथे डॉक्टर झाला व पुन्हा भारतात आपल्या गावी आपल्या वस्तीवर येऊन त्यात आपल्या पारंपारिक कलेचा वारसा जपता येईल, अशा योजना त्याने हाती घेतल्या. सरकारदरबारी खटपटी करून भाईबंदाना बरे दिवस येतील, अशी व्यवस्था केली. एवढेच करून तो तरुण गप्प राहिला नाही.

कोंकणविकासासाठी ग्रामसुधारणेचे काही अभिनव प्रयोग त्याने हाती घेतले व त्यांचा पद्धतशीर पाठपुरावा सुरू केला. त्याच्याबरोबरीने तसेच काही उत्साही तरुण त्याला सहकारी लाभले आहेत. त्या धडपड्या, हुषार, उच्चविद्याविभूषित ठाकर तरुणाचे नाव डॉक्टर वसंत गगावणे!

वायमन गॉर्डनमधल्या यंत्राच्या उत्पादनाएवढेच मला या पुरातन चित्रकलेच्या पुनरुज्जीवनाचेही महत्त्व वाटते. पिंगुळी गावाला ही कला त्रिभुवनात घेऊन जाईल, यात मला शंका वाटत नाही.

पिंगुळी सोडून वेंगुर्ल्यांच्या दिशेने निघालो की आणखी एक विसरता न येण्याजोगे गाव आपल्याला भेटते. त्याचे नाव वेतोरे.

वेतोरे हे तसे मालवणी मुलखातल्या कोणत्याही इतर गावासारखेच साधे सरळ गाव. तशाच वाड्या, तशीच घरे, अगणे, झाडेपेडे, डोंगर नि झरे—

पण इथे निसर्गाने आणखी एक चमत्कार घडवून आणला आहे. या गावात देवी सातेरीचे एक पुरातन देवस्थान आहे. या देवळाच्या विहिरीतील पाण्यात एक अद्‌भुत गुण आहे. या पाण्याने आंघोळ केली म्हणजे कोणताही त्वचारोग समूळ नाहीसा होतो, असे अनुभवाने प्रचीतीस आलेले आहे. या विहिरीच्या पाण्याची आंघोळ करण्यासाठी दूरदूरचे लोक येतात आणि त्वचारोगातून मुक्त होतात. वेतोरे गाव आणि श्रीदेवी सातेरी याच्या कीर्तीबरोबर अंगाऱ्यासारखी वस्तू भक्तिभावाने घेऊन सर्व दुनियेत जातात.

या पाण्यात कोणती औषधी द्रव्ये असावी! आधुनिक विज्ञानाने त्याचे अवश्य पृथक्करण करावे; आमच्या भागातल्या लोकांना त्याची गरज भासत नाही. 'सातेरी-माऊलीचो तो प्रसाद!' असे मनोभावे म्हणत देवीला हात जोडणे, एवढेच त्याना ठाऊक असते—

मालवणी मुलखात गावोगाव ही जी देवस्थाने आहेत त्यावर येथल्या जनतेची अतूट अभंग अशी श्रद्धा असते. त्या श्रद्धेच्या बळावर येथली गरीब माणसे सगळ्या प्रतिकूलतेवर कशी हसत हसत मात करतात—

कुडाळहून आडेली रस्ता पुन्हा रेडी-रेवस रस्त्याला वेंगुर्ल्याच्या जवळपास भेटतो. मठ हा रावबहादुर खानोलकराचा गाव. एका जमान्यातील ही महान प्रसिद्ध व्यक्ती. त्याच्या नावे मठ गावी आता एक सुरेख हायस्कूल चालू आहे. तिकडील भागात या हायस्कूलची गुणवत्ता मोठी मानली जाते.

प्रसिद्ध मठ गावचा शिलालेख तो याच गावचा. गावाला इतिहासकालीन पार्श्वभूमी लाभली आहे. अनेक इतिहाससंशोधकांनी, पुरातत्त्वतज्ज्ञांनी या शिलालेखाचे परिष्करण केलेले आहे.

मठ गावची हद्द ओलांडली म्हणजे आपण वेंगुर्ल्याच्या हद्दीत शिरतो. एका बाजूने सावंतवाडीकडून आलेला रस्ता, दुसरीकडून आलेला कुडाळ रस्ता.

आता समोर दिसते ते वेंगुर्ले!

# वेंग मारून उरले ते वेंगुर्ले !

१९.

वेंगुर्ले हे गाव आटोपशीरपणे पसरलेले. पश्चिमेचा समुद्र सोडला तर गावाला अडवणारी एकही शक्ती नाही; पण एखाद्या शालीन गृहिणीप्रमाणे या गावाने आपला सगळा संसार आटोक्यात ठेवलेला आहे. उगाच भलता विस्तार नाही, कसलाही अस्ताव्यस्तपणा नाही, आहे तो एकसंध आटोपशीरपणा, बांदिस्तपणा. कोंकणपट्टीत असे आखीव, रेखीव, आटोपशीर (व आदबशीरही) गाव आणखी आढळणार नाही.

पूर्वेकडून आपण कुडाळ वा सावंतवाडी इकडून येणाऱ्या रस्त्यानी किंवा उभादांड्यावरून आरवली–शिरोड्याकडून दक्षिण दिशेने या गावात पाऊल टाकतो; बाणासारखी सरळ रेषा ओढीत मधला हमरस्ता थेट बंदरापर्यंत गेला आहे. या रस्त्याच्या दुतर्फा बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व गावातील महत्त्वाची माणसे भेटण्याच्या विविध जागाही रस्त्याच्या आसमतात. मग आणखी अनेक पोटरस्ते तसे गावात दक्षिण–उत्तरेला पसरलेले आहेत आणि त्यांच्या आधाराने माणसानी निवात घरे बांधली आहेत; पण वेंगुर्ल्याची शान राखलेली आहे ती दोन महत्त्वाच्या रस्त्यांनी– एक बॅरिस्टर नाथ पै रोड व दुसरा बॅरिस्टर खर्डेकर रोड. या दोन नामवंत बॅरिस्टरांची वेंगुर्ल्याने आपल्या या राजरस्त्यानी आठवण जागी ठेवली आहे. हे दोन्ही रस्ते म्हणजे वेंगुर्ल्याचे वैभव आहे.

तसे वेंगुर्ले गाव खानदानी. त्याने इतिहासकाळात मोठे वैभव उपभोगले. ब्रिटिश आणि डच या परकी, सातासमुद्रापलीकडल्या राजसत्तानीही या गावाचे महत्त्व ओळखले होते. भारतातल्या मुसलमानी अमलाने व शिवकालीन राजवटीनेही या गावाची समृद्धी पारखली होती. डचांनी बांधलेली भव्य गढीवजा वखार परवापरवापर्यंत वेंगुर्ल्याचे मोठे वैभव होते. पुरातत्त्व खात्याच्या हेळसांडीने ही ऐतिहासिक वखार काळाच्या पडद्याआड लोप पावली! खाली दक्षिणेला गोवा प्रांत, पूर्वेला रामघाटापलीकडे देशावरील कर्नाटकाकडील प्रदेश आणि उत्तरेला मुंबईपर्यंतची कोंकणपट्टी, या साऱ्या विस्तीर्ण भूभागाचे वेंगुर्ले एक महत्त्वाचे नाके म्हणून इतिहासात

वावरले. त्याने सुबत्ता अनुभवली; शांतता, समृद्धी उपभोगली; लढायांतील हाणामाऱ्या पाहिल्या, राजसत्तेची कटकारस्थाने न्याहाळली; अरबी समुद्रातून जाणारे फिरंगी डच जहाजांचे काफिले आणि आंग्रे धुळपांची गुराबे येथील किनाऱ्याने अवलोकिली, तशीच परकीयाची लष्करी चाकरीगिरीही—

इतिहासाला साक्षी होत या गावाने परवापरवापर्यंतचा अव्वल इंग्रजी अमदानीचा काळही त्याच तब्येतीने उपभोगला. ब्रिटिशांना या गावाचे हवापाणी मनापासून रुचलेले. त्यांनी उभ्या कोकणपट्टीमध्ये उत्तरेला दापोली व दक्षिणेला वेंगुर्ले येथेच त्यांचे 'तळ' (कॅप) उभारले. टाऊन प्लॅनिंगच्या सुधारलेल्या आराखड्याने या गावाला आकार दिला. मुंबईचे क्रॉफर्ड मार्केट त्रिखंडात गाजले; पण वेंगुर्ले येथेही क्रॉफर्डसाहेबांच्या नावाने बांधलेले शंभर वर्षांपूर्वीचे टुमदार मार्केट आज उभे आहे व त्यालाही गतेतिहासाची किनार आहे. मुंबईच्या क्रॉफर्ड मार्केटची छोटी प्रतिकृती म्हणजे हे वेंगुर्ल्याचे मार्केट! साहेबाने या चिमुकल्या गावात सर्व नागरी सुविधा निर्माण केल्या, मार्केट बांधलें, लायब्ररी उभारली, हायस्कूल आणि गर्ल्स स्कूल सुरू केले बंदर चालू केले आणि नगरपालिकाही स्थापन केली!

इंग्रजी अमदानीत गावात युनियन जॅक फडकत असला तरीही या गावाची राष्ट्रभक्ती लोपली नव्हती; किंबहुना कोकणपट्टीत वेंगुर्ल्यासारखे राष्ट्रभक्तीने रसरसलेले आणि राजकीय जागृतीने डोळस बनलेले तिसरे गाव नव्हते. रत्नागिरी, मालवण यांसारख्या गावांमध्ये ही परंपरा होती, पण त्याला वेंगुर्ल्याची सर नव्हती.

महात्मा गांधींचा मिठाचा सत्याग्रह सुरू झाला तो शिरोड्याला म्हणजे वेंगुर्ल्याला. १९२७ साली प्रत्यक्ष महात्माजी या गावाला धूळभेट देऊन गेले होते.

आणि त्या आधी फार फार वर्षांपूर्वी खुद्द स्वामी विवेकानंदांचेही पाय या गावाला लागलेले होते. ते अमेरिकेला गेले त्याआधी—

या साऱ्या आठवणी वेंगुर्ले गाव जुन्या दागिन्यासारख्या जपत असते. त्या सोन्यासारख्या परंपरेला साजेल असेच राष्ट्रीय चारित्र्य या लहानशा गावाने प्रगट केले आहे. मग तो तीस सालचा सत्याग्रह असो, बेचाळीसची चळवळ असो किंवा स्वातंत्र्योत्तर काळातील गोवामुक्तीसारखा किंवा सीमाप्रश्नासंबंधीचा लढा असो—वेंगुर्लेकर नागरिक त्यात अहमहमिकेने पुढे सरसावला आहे. बॅरिस्टर नाथ पै हे अलीकडील काळामध्ये वेंगुर्ल्याला लाभलेले दुर्मिळ रत्न! नाथ या गावच्या लाल मातीमध्ये वाढला, वावरला, इथल्या सागरेश्वराच्या देखण्या निसर्गरूपावर भाळला, इथल्या पुळणीवर बागडला आणि इथल्या सुंदर डाकबंगल्याचे वर्णन त्याने तो जगभर जेथे गेला तेथे केले! इथला सुका बांगडा नि सोलकढी यांची चव तो दुनियेत कुठेही विसरला नाही आणि इथल्या परिसरावर, इथल्या माणसावर त्याने केले तसे अकृत्रिम जिव्हाळ्याचे प्रेम दुसऱ्या कोणाही राजकारणी पुरुषाने केले नाही. वेंगुर्ल्यानेही नाथ

पैंवर जिवापाड माया केली. तसा इथला माणूस सदाचा सावध समोरची व्यक्ती कोणतीही असो, तिची पूर्ण पारख होईपर्यंत अंतर ठेवूनच वागणारा; पण नाथच्या बाबतीत मात्र उभ्या वेंगुर्ल्याने आपल्या या गुणाला मुरड घातली त्याला विद्यार्थि-दशेपासून तो राष्ट्रीय नेता होईपर्यंत, संसद सदस्य झाल्यानंतरही, वेंगुर्ल्याने पोटाशी धरून ऊबदार मायेने कुरवाळले. नाथ समाजवादी होता, पण वेंगुर्ल्यात तो काँग्रेस-वाल्यानाही घरच्यासारखा प्रिय असे. फणसाचा खडबडीतपणा नि रसाळपणा हे दोन्ही गुण वेंगुर्ल्याच्या माणसात आढळतात; पण नाथ पैंच्या बाबतीत वेंगुर्ले नित्य रसबाळेच राहिले !

गाव तसा रसिक. मोचेमाडकराचा उघड्यावरचा दशावतारी खेळ आणि मुंबईच्या कंपनीची झापाच्या थेट्रातली बंदिस्त नाटके सारख्याच रुचीने पाहण्याची प्रत्येकाला आवड. इथे सावंतवाडीशीच त्याची तुलना होईल. बरे दिसले का तोंडभर कौतुक नि अपेक्षाभंग झाला, रंगाचा बेरंग झाला की शेलक्या मालवणी शब्दामध्ये त्यावर खमचट मल्लिनाथी ! वाडकरासारखीच वेंगुर्लेकराची ही वैशिष्ट्ये. हातचे ठेवून वागणे इथे माहीत नाही. रोखठोक व्यवहार. बोलणे फटकळ, पण निष्कपटी. नाटकां-सारखेच संगीतावर गावाचे प्रेम. गावात शास्त्रोक्त गाणारी जशी जुनी माणसे आहेत तशी नवी तरुण मुलेही आढळतात. सुगम संगीताचेही वावडे नाही रामेश्वराच्या देवळातील सप्ताह म्हणजे उत्साहाची पर्वणी. भजनाचे मेळे हवे तेवढे सभा-समेलनांचीही हौस मोठी. राजकारणातही वेंगुर्ल्याला गोडी मोठी ! गावात शंभर वर्षांपूर्वीचे ग्रंथालय व्यवस्थित जोपासलेले आहे. त्याला बौद्धिक आनंदाची आवड असलेल्या नागरिकाचा उदंड आश्रय लाभतो. ' किरात ' हे गेली पासष्ट वर्षे नियमितपणे प्रसिद्ध होणारे दर्जेदार साप्ताहिक— या परिसराचे मुखपत्र म्हणून सुप्रसिद्ध आहे. सांस्कृतिक दृष्ट्या वेंगुर्ले हे एक पुढारलेले शहर म्हणून या साऱ्या वैशिष्ट्यांमुळे, मालवणी मुलखात नाणावले आहे.

सेंट लुकस हॉस्पिटल आणि कॅंप मैदान ही वेंगुर्ल्याची आणखी दोन खास वैशिष्ट्ये. पूर्वीच्या काळी बाटा नावाचा मोठा जर्मन डॉक्टर इथे होता. मालवणी मुलखात कोणत्याही गावी एखादा पेशंट सीरियस झाला की त्याला ' वेंगुर्ल्याक बाटाकडे न्हेल्यानी म्हनान बचावलो–' हे ऐकू यायचे. डॉ. बाटा, डॉक्टर गोहीन ह्या साहेबांनी वेंगुर्ल्याला वैद्यकीय क्षेत्रात मोठे नाव मिळवून दिले.

वेंगुर्ल्याचा माणूस मुळात फार भाविक गावात मारुतीची, विठोबाची, सातेरीची अशी अनेक देवळे नि या साऱ्या देवळांत भक्तांची सदैव गर्दी ! पण विशेष महत्त्व श्रीदेव रामेश्वर याचे ! रामेश्वर ही गावची ग्रामदेवता दसऱ्यादिवशी या देवळात शिलंगणाचे सोने लुटायला जमणारी गर्दी आणि सरकारी अमलदारामार्फत केली जाणारी ' मानाची पूजा ' पाहण्याजोगी असते.

वेंगुर्ले हे नाव जिच्यावरून पडले ती श्री सातेरी देवी फार पुरातन काळापासून इथल्या पाषाणी बांधणीच्या मंदिरात रहिवास करून आहे. या देवीचे पुजारी परब हे मूळ अणसूरचे. तेथे ते नेहमी मूळ स्थानाच्या पूजेला जात. म्हातारपणी त्याना अणसूरपर्यंत जाणे झेपेनासे झाले तेव्हा त्यानी देवीलाच साकडे घातले व तिला जवळ बोलावले! परब गावकाराना स्वप्नात आपल्या जागी देवीने एक वारूळ वाढत असलेले दर्शविले. हे वारूळ अतोनात वाढू लागले. त्याची अनिर्बंध वाढ पाहून म्हातारे गावकर देवीला मिठी (वेंग) मारून म्हणाले, 'बाये, तू वाढा नको!' त्यासरशी वारुळाची वाढ खुटली व देवी पूर्वीसारखीच राहिली; या 'वेंग' मारून 'उरलेल्या' त्या देवीवरून गावाला वेंगुर्ले हे नाव पडले, अशी आख्यायिका सांगतात.

वेंगुर्ले आता पूर्वीचे राहिलेले नाही. इतिहासकालातील समृद्धी कालांतराने लोप पावणे ठीक असले तरी, नव्या जमान्यात सगळीकडे नवनवीन साधनानी विकास होत असताना हे गाव उपेक्षित राहिल्यासारखे वाटते. पन्नास वर्षांपूर्वी बंदरात दिवसातून तीनदा मुंबई-गोव्याच्या बोटी उभ्या राहत बंदर भरभराटलेले म्हणून गावही भरभराटलेले होते. शिवाय बेळगावनंतरची कोंकणातली उतारपेठ म्हणून व्यापार-उदीमही चपचपीत होता, पण आता ही दोन्ही समृद्धीची दारे बंद झाली. गावोगावी कारखाने सुरू झाले; पण इथे कसलाही नाव घेण्याजोगा मोठा उद्योग अस्तित्वात नाही. पंधरा-वीस किलोमीटरवर रेडीला खाणव्यवसाय चालतो, त्याची थोडीफार नाणी इथल्या बाजारपेठेत येतात, बाकी काही नाही जुन्या काळची घरे सुखवस्तू माणसांनी येऊन रहावे यासाठी वाट पहात असतात. पेन्शनर मंडळी मात्र उतारवयात इथे राहायला येतात.

नाही म्हणायला गेल्या दहा-पंधरा वर्षांत इथल्या मेहनती लोकाचे काजू व आंबा लागवडीकडे फार लक्ष वेधले आहे. आंब्याच्या फळांमुळे या परिसरात उत्तम पैसा येऊ लागला आहे. उभ्यादांड्यावरचे जुने बागायतदार काकासाहेब चमणकर व त्यांची आंबा लागवड उभ्या कोंकणपट्टीला स्फूर्ती देण्याचे काम करीत आहे. जिथे सगळीकडचा आंबा अद्याप मोहरायचा असतो, तिथे काकासाहेब चमणकराच्या बागेतील फळ ऐन जानेवारी–फेब्रुवारीमध्ये मुंबईच्या क्रॉफर्ड मार्केटात दाखल होते आणि तेथून थेट परदेशी जाते.

पण असे तुरळक उदाहरण सोडले तर वेंगुर्ले अद्याप आर्थिक विकासाच्या बाबतीत मागासलेलेच आहे. माझा एक वेंगुर्लेकर मित्र म्हणतो, 'आमच्याकडे लक्ष जाणार कुणाचे? आम्ही मूळचेच विरोधी मतवाले! सरकारी पक्षापेक्षा इथे विरोधी पक्षाकडे जनमत झुकलेले. आम्हाला विकासाची फळे सरकार पक्षाकडून मिळणार कशी? नाथ पै असते तर . '

नाथ पै याची प्रत्येक वेळी आठवण या भागात निघते. विरोधी पक्षात असूनही नाथची सरकार पक्षाला दहशत होती !

वेंगुर्लेकराना आपल्या गावाचा आणि गावातील माणसाचा विलक्षण अभिमान. तसा तो गावोगावच्या सर्वच लोकांत असतो. वेंगुर्लेकर म्हणणार, ' सुनील गावस्कर, विजय माजरेकर, नाथ पै आणि रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर बी. एन. आडारकर अशी लाखमोलाची माणसे कोंकणातल्या दुसऱ्या कोणत्या गावाने देशाला दिली आहेत ? म्हणून आमचा गाव मोठा—'

आणि हे मोठेपण निर्विवादपणे कबूल करायलाच हवे ! वेंगुर्ल्याचे हे वैशिष्ट्य तेथील मोठ्या माणसांपुरतेच आहे, असे म्हणता येणार नाही; तर गावातील प्रत्येक भागाचे स्वतःचे असे एक वेगळे रूप आहे आणि ते वेंगुर्ल्याला जवळून ओळखणाऱ्यानाच माहीत असते. उदाहरणार्थ, बंदरावरील माणसे, दुकाने ( आता ती उरली नाहीत म्हणा ! ) आणि तेथील बोलणेचालणे तुम्हाला बाजारपेठेमध्ये आढळणार नाही; बाजारपेठेच्या वातावरणाची चव माडवी भागाला नाही आणि भटवाडीचा धुतलेपणा उभ्यादांड्याला नाही ! एकेकाळी साहेबी मिरास असलेला ' क्याप ' आणि मिशन हॉस्पिटलची हवा आणखीच वेगळी ! एका लहानशा गावात अशा वेगवेगळ्या चवी–रवी आपल्याला इतरत्र कुठेही आढळणार नाहीत.

' सागरेश्वर ' हे वेंगुर्लेकरांचे आवडीचे ठिकाण. प्राचीन काळापासूनचे भाविकांचे आणि आजच्या पिढीच्या सौंदर्योपासकांचे ' पिकनिक स्पॉट ! '

वेंगुर्ले बंदरातला डाकबंगला ही या गावाला ब्रिटिशांनी दिलेली अप्रतिम देणगी होय. बंदरालगतच्या एका खडकाळ टेकडीवर उत्तराभिमुख बांधलेला हा प्रशस्त डाकबंगला दक्षिण-पश्चिम–उत्तर या तीन दिशांना पसरलेला अरबी समुद्राचा अथांग विस्तार जणू आपल्या कवेत घेऊन उभा आहे. खालच्या काळ्या खडकावर अहोरात्र लाटा घुसळत असतात. खारा वारा अंगावर घेत व्हरांड्यातील आरामखुर्चीत समुद्राकडे पाहत निवांत बसावे. सुखाला पारावार उरत नाही.

वेंगुर्ल्याच्या डाकबंगल्यात मुक्काम करण्याचा मोह कितीही अनावर असला तरी तो टाळून आपण पुढे निघावे. डाकबंगल्यातून दक्षिणेकडे पाहिले की, उभ्यादांड्यापलीकडल्या सुरूच्या बागा नि माडांच्या घनगर्द झावळ्या यांनी आपली नजरबंदी केलेली असते. आता आपण त्याच रस्त्याने आरवली शिरोड्याकडे निघालेले असतो. उभ्यादांड्याची झाडावळीत लपलेली टुमदार घरे मागे टाकून पुढे निघालो की एक नवा कोरा छोटेखानी पूल लागतो. जवळच कसले तरी एक देवस्थान आहे. तिथे कितीतरी रंगीबेरंगी पताका लावलेल्या आहेत. बहुतेक नवस केलेल्या भक्तगणानी त्या फडकत ठेवल्या असाव्यात. हां हां म्हणता मोचेमाडचा वैराण सडा मागे टाकून गाडी टाकावरून आरवली गावात शिरली. आरवली म्हटले म्हणजे जयवंत दळवी

आठवतात आणि शिरोडे म्हटले की वि. स. खांडेकर. आरवली-शिरोडा या दोन गावांची जशी परस्पर जवळीक, तशीच ती या दोन साहित्यिकामध्येही होती. खांडेकरांचे दळवीवर फार प्रेम आणि दळवींची भाऊवर तशीच भक्ती. आरवलीत शिरल्याबरोबर प्रथम लागते ते श्री वेतोबा देवाचे भव्य देवालय. या देवालयाची रचना प्रशस्त आहे. सर्वत्र स्वच्छ प्रकाश, गुळगुळीत फरशा, सर्व खांबांना नि भिंतींना उंची ऑईल पेंट आणि बसण्यासाठी सुरेख कट्टे. सभामंडपातून पुढे जाताच वेतोबाची उग्र गंभीर, उंच आणि डोळ्यात भरणारी भव्य मूर्ती आपले मन वेधून घेते. वेतोबा हे येथील गावकऱ्यांचे जागृत दैवत. सर्वत्र आढळते तशी ही मूर्ती पाषाणाची नसून काळ्याभोर फणशी लाकडाची केलेली आहे. या काळ्या रूपारंगाच्या मूर्तीला शुभ्र धोतर नेसवले होते. मूर्ती उघडी होती चेहऱ्यावर गलमिश्या उठावदार दिसत होत्या नि या साऱ्या रूपवैशिष्ट्यामुळे वेतोबाची एक अविस्मरणीय अशी प्रतिमा मन:पटलात उमटत होती.

या वेतोबाला नवस म्हणून वहाणांचे जोड अर्पण केले जातात, तेही सव्वाहात लांबीचे. असे असंख्य जोडे बाजूला एक ठिकाणी जमा करून ठेवण्यात आलेले होते.

'महानंदा' कादंबरी याच देवालयाच्या परिसरावर जयवंत दळवींनी लिहिली आहे, असे कुणीतरी सांगितले आणि आम्ही तिथून जवळच असलेल्या दळवींच्या वडिलोपार्जित घराकडे वळलो. दळवींचे हे घर त्यांच्या 'धर्मानंद' किंवा 'सारे प्रवासी घडीचे' सारख्या कोंकणच्या पार्श्वभूमीवरील कादंबऱ्यातून वाचकाला भेटलेले असते. आरवलीमध्ये आपण ते माडीचे टुमदार घर प्रत्यक्ष पाहतो. खांडेकर ज्या घरात राहात होते ते घर व ज्या विहिरीवर दहाअकरा वर्षांचे जयवंत दळवी त्यांच्या अंगावर विहिरीतून काढलेल्या थंडगार पाण्याचे हंडे ओतीत, ती विहीर कुणीतरी आपल्याला दाखवते.

लोकप्रिय लेखकांच्या रहिवासाच्या जागा पाहिल्या की जो आनंद होतो, तोच आपल्याला आरवली गावात खांडेकर-दळवी राहिलेल्या घरांमुळे होतो खांडेकर ज्या टेकडीवर नित्य फिरायला जात ती मराठी साहित्यात सुप्रसिद्ध असलेली 'भिके-डोंगरी' जवळच आहे त्या टेकडीवरील एका दगडी बाकासारख्या शिलाखंडावर बसून खांडेकरांचे सूर्यास्त न्याहाळता न्याहाळता चिंतन चालू असे.

आरवली गावाला विस्तीर्ण किनारा लाभला आहे व त्या किनाऱ्यावर सुरूची घनदाट राई माजली आहे. 'व्हर्जिन बीच' म्हणता येईल असा हा सुंदर, मऊ पुळणीचा किनारा एक उत्कृष्ट पर्यटन स्थळ बनू शकेल आणि तेथील सूर्यकिरणांना मज्जाव करणारी ही सुरूची राई पर्यटकांसाठी आदर्श विश्रांतीची जागा.

आरवलीहून रस्ता सरळ शिरोड्याला जातो. वाटेत वि. स. खांडेकर जेथे शिक्षक होते ते ट्युटोरियल हायस्कूल लागते. या हायस्कूलने मराठीतील गेल्या पिढीतले

कितीतरी नामवंत साहित्यिक आपल्या इमारतीत येऊन गेलेले पाहिले वि. स. खांडेकरांचा हा प्रभाव.

आजही शिरोडेकर मंडळी खांडेकरांबद्दल कौटुंबिक जिव्हाळ्याने बोलतात.

शिरोड्याची अरुंद पण गजबजलेली बाजारपेठ नि जवळचे श्रीमाऊलीचे भव्य देवालय मागे टाकून आम्ही दक्षिणेला निघालो.

आरोंदा गाव आमची वाट पहात होते..

# किरणांच्या पाण्याचे स्वप्न : आरोंदे- रेडी-तेरेखोल

२०. गाडी आरोंद्याच्या परिसरात शिरली आणि त्या भागाची श्रीमंती डोळ्यांना जाणवू लागली. कोंकणात श्रीमती मोजायची फूटपट्टी एकच. गावात चिरेबंदी, माडीची आणि मगलोरी कौलाची झ्याकबाज घरे किती आहेत ! अलीकडे मात्र ही फूटपट्टी जुनी झाली आणि लोक नवे हिशेब मनाशी बाळगू लागले. गावात बागायत किती ? आंब्या-काजूची, नारळी-पोफळीची रसरसलेली लागवड किती ? सुदैवाने कोंकण प्राताला आता आपल्या या श्रीमंतीची ओळख उशिरा का होईना, पट्ट लागलेली आहे आणि गावोगाव, पाण्याची सोय पाहून लोक आबे, माड लावू लागले आहेत. पूर्वी चार गारफे म्हणजे मोठीच अपूर्वाई ! आता 'चारशे हापूस कलमाची बाग उठवतो आहे,' असे नवी पिढी सहजपणे म्हणते !

वेंगुर्ल्यापासून पुढे आजूबाजूला पहावे तिकडे हिरव्यागार बागायतीच्या या अब्दागिरी उभारलेल्या दिसतात. आरोंदा त्याला अपवाद नाही. मळेवाडचा तिठा ओलांडून आम्ही पुढे झालो आणि डोंगर टेकड्यावर सर्वत्र काजूची झाडे दिसू लागली. पौष महिना लागला होता. नि एकूण एक झाड मोहराने गजबजले होते. काजूबरोबरच आम्याचीही झाडे सर्वत्र मोहरलेली. डिसेंबरच्या थडीत या कोंकणी वृक्षांनी भरगच्च मोहराच्या शाली उबेसाठी पांघरल्या होत्या ! पलीकडे आरोंदे गावातील माडांची घनदाट राई उन्हात चमकत होती. आता गोव्यात ठायीठायी दिसतात तशी नारळी, पोफळी, केळी-कर्दळीची हिरवीगार कुळागरे दिसू लागली. गोमतकाची भूमी निकट आल्याच्या खुणा पटू लागल्या. दक्षिण कोंकणच्या टोकावरील या पाचूच्या प्रदेशातील निसर्गसौंदर्य डोळे खिळवू लागले.

पलीकडे तेरेखोलची खाडी. खाडीपैलाडी गोमतक. उजवीकडे खाडी समुद्राला मिळते, त्या नस्तावर तेरेखोलचा डुमदार किल्ला. पर्यटकाच्या आवडीचे एक सौंदर्य-स्थळ.

गाडीने वळण घेतले आणि डोंगरपठारावर उजवीकडे एक जुनी चिरेबंदी कौलारू इमारत दिसू लागली. हे आरोंद्याचे हायस्कूल ! फार जुनी शिक्षणसंस्था.

हायस्कूलच्या जुन्या बांधणीवरूनच त्याच्या इतिहासकाळाची कल्पना येत होती. ब्रिटिशाच्या काळात आरोंद्याच्या या इंग्रजी शाळेची कीर्ती पार गोव्यापर्यंत पसरली होती. गोव्यामध्ये इंग्रजी शाळा नव्हत्या. ब्रिटिश हद्दीत इंग्रजी शाळेसाठी जवळचे गाव म्हणजे आरोंदा त्यानंतर वेंगुर्ले किंवा सावंतवाडी. तेरेखोलची खाडी ओलांडून 'तरी'तून गोव्यातील कितीतरी विद्यार्थी आरोंद्याला शाळेसाठी येत पलीकडच्या पालये, केरी, हरमल गावच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी शिक्षण मिळे ते या आरोंद्याच्या शाळेमध्ये.

हा हा म्हणता गाडी आरोंदे गावात शिरली. छोटीशीच बाजारपेठ कोंकणातील कुठल्याही पेठेसारखीच अरुंद. दुकाने एकमेकांना खेटून बसलेली बाजारपेठेला एक वळसा दिला की प्रशस्त मोकळ्या जागा, अंगणे नि तुळशीवृंदावने असलेली, सभोवताली गर्द झाडावळ राखलेली जुनी माडीची चिरेबंदी कौलारू घरे दिसू लागतात. बहुतेक घरांचे मालक मुंबईसारख्या दूरदेशी मुक्काम करून असलेले आणि ही खानदानी घरे खिन्नपणे मागे राहिलेली रेगे, साखोळकर, सामंत अशी कित्येक नामवंत घराणी एकेकाळी आरोंद्यात नांदली. त्यापैकी बहुतेकांनी गाव सोडले आहे. पण त्यांची ही प्रेमळ, ऊबदारपणा मांजघरात जपणारी घरे अद्याप मालकाची वाट पहात उभी आहेत.

आरोंदा, रेडी, शिरोडा, वेंगुर्ला हा सारा परिसर नामवंत माणसांचा. येथील एकेका चिमुकल्या गावाने समाजाला लोकोत्तर माणसे दिली. वेंगुर्ले म्हटले की बॅरिस्टर नाथ पै आणि रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर आडारकर, उभादांडा म्हटले की क्रिकेटचा विक्रमादित्य सुनील गावस्कर, आरवली म्हणजे जयवंत दळवी, शिरोडा म्हणजे वि. स. खांडेकर आणि चं. वि. बावडेकर, आरोंदा म्हणजे आत्माराम भेंडे आणि मधुसूदन कालेलकर, जस्टिस रेगे.

याशिवाय अशीच आणखी मोठी नामावळ इथल्या अनेक मोठ्या माणसांची सांगता येईल.

आत्माराम भेंडे यांचे घर पाहिले. आता ते रिकामेच आहे. घराभोवती परसू आणि विहीर. सागवान, आंबे, फणस यांची जुनी झाडे. दारात एक लांबरुंद मळा. उन्हाळ्यात तो मोकळाच असतो, पावसाळ्यात भातशेती. या मळ्याच्या मध्यभागी एक पुरातन पिंपळ आहे. दशावतारी नाटके, गावातल्या हौशी मंडळीची सामाजिक, पौराणिक नाटके याच मैदानात मांडव घालून होतात आणि दिवसा क्रिकेटचा खेळही रंगतो. भेंडे, कालेलकरांचे बालपण या परिसरात गेले. दोघेही बालकलाकार म्हणून आरोंद्याच्या जनेत भेटले आणि मोठेपणी मुंबईच्या शिवाजी मंदिरात ! रंगभूमीच्या जन्मेमधले हे कलाकार ! जागा बदलली तरी, त्यांची भूमिका बदलली नव्हती—

आरोंदे गावाचे मूळ नाव ' अरविंदे ' असे होते. गावात अनादि काळापासून मोठी

तळी आणि त्यात बारमास फुलणारी कमळे म्हणजे ' अरविंदे–' त्यावरून आरोंदे हे नाव पडले असे जुने लोक सांगतात! आरोंद्यामध्ये श्री देवी सातेरी–भद्रकाली या ग्रामदेवता. प्राचीन काळापासून आरोंदेकर इथे विनम्र होत आले. जवळच ' देवतळे ' नावाचे एक सुंदर तळे आहे. त्याशिवाय आणखी एक तळे आहे ते आग्राळ वाडीतील श्री कुळाच्या देवालयाजवळ. शेकडो वर्षांपासून जपलेली जवळची हिरवी-गर्द ' देवराई ' म्हणजे या भागातील निसर्गरमणीय सौंदर्यस्थळ. आरोंदे गाव फक्त पुरातन देवालयांसाठी प्रसिद्ध नसून जवळच असलेल्या ' किरणपाणी ' या जुन्या-काळच्या बंदरानेही त्याला कीर्ती मिळवून दिली आहे. ' किरणपाणी ' हे सुंदर नाव कसे पडले असावे ? मी ' किरणपाणी ' बंदराजवळच्या धक्क्यावर उभे राहून पाहिले. पूर्वेकडून उगवत्या सूर्याची सकाळी पसरलेली सोनेरी किरणे, आरोंद्याच्या तेरेखालच्या त्या संथ खाडीच्या पाण्यावर अख्खा दिवस टिकून असतात, सोन्याचा वर्ख चढवावा तशी ! या सोनेरी किरणांमुळे खाडीतील पाणीही सोनेरी बनलेले दिसते. किरणांचे पाणी म्हणून किरणपाणी. अरविंदे आणि किरणपाणी ! किती काव्यमय नावे—

—आणि इथला तसाच काव्यात्म निसर्ग ! मला वाटते, निसर्गाला पडलेले किरणाचे आणि पाण्याचे मधुर स्वप्न म्हणजे आरोंदे, किरणपाणी आणि तेरेखोलचा परिसर !

आरोंदे हे महाराष्ट्राचे दक्षिण टोक. सीमेवरचे शेवटचे गाव इथून पश्चिमेला ' रेडी ' हे मँगनीजच्या खाणीचे गाव पलीकडे गोव्यात मँगनीजचा शोध लागला आणि तेथील खाणींचे लोण मग लगतच्या महाराष्ट्राच्या सीमाभागातही पोचले. तोपर्यंत ' रेडी ' गाव फक्त देवी ' माऊली ' आणि ' नवदुर्गा ' या देवस्थानासाठी सुप्रसिद्ध होते. पण भूगर्भातून मँगनीज पृष्ठभागावर येऊ लागले आणि साऱ्या परि-सराचा अक्षरशः कायापालट झाला. पैसा आणि माणसे यांचे प्रमाण अतोनात वाढले. कर्नाटक–आंध्रप्रदेशापासूनचे शेकडो मजूर खाणीतून राबू लागले. खाणींची खोदाई, डंपर्स आणि ट्रक्स याची रहदारी यांनी अहोरात्र गावाला जागे ठेवले. एकेकाळी झाडीने हिरवेगार असलेले हे किनाऱ्यावरचे सुंदर गाव लाल धुरोळ्याने नखशिखान्त माखून तांबडे लाल बनले. गावात खाणींतून निघालेली धूळ मायेनाशी झाली. गोडे पाणी आटले; आणि खाणींचे खोदकाम समुद्रपातळीच्याही खाली गेल्यामुळे, सागराचे पाणी गावातील खदकामध्ये घुसून तेथे दुसरे ' चासनाला ' होईल, अशी भीती लोकांना वाटू लागली.

तरीही पैशाचा, पैशातून येणाऱ्या श्रीमंतीचा लोभ माणसाना सुटत नाही. खाणी खोदल्या जातच आहेत. रेडीचा मुखवटा बदलतो आहे. चिरेबंदी नवी घरे उभी

रहात आहेत. नवी झाडे लावण्याचे मात्र कुणी मनावर घेत नाही. घराघरावर टीव्हीच्या अँटिना शोभताहेत आणि या एवढ्याशा गावात व्हीडिओ पार्लर्स सुद्धा निघाले आहेत. दारू आणि मटका याची प्रगती तर विचारता नये, एवढी बेसुमार!

नवे रेडी गाव असे सुधारत असले तरी जुन्या रहिवाशांची जुनी 'रेडी' मात्र अद्यापि पूर्वीच्या जमान्यात वावरताना दिसते. माऊली आणि नवदुर्गेच्या भरीला आणखी एका दैवताची जोड रेडीला आता मिळाली आहे, ती श्री गणपतीची. दहा-बारा वर्षांपूर्वी तेथील खाणींच्या परिसरात, भूगर्भात दडलेल्या एका सुरेख गणपतीच्या मूर्तीचा कुणाला शोध लागला आणि हां हा म्हणता भाविकानी तेथे मंदिर उभारले. जांभ्या दगडात कोरलेली सहा फूट उंचीची गजाननाची भव्य मूर्ती आणि तसाच भला मोठा उदीर! या गणपतीचे वैशिष्ट्य म्हणजे याला फक्त दोनच हात आहेत!

रेडी गावाला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. सोळाव्या शतकात विजापूरच्या आदिलशहाने येथील खाडीच्या मुखाशी एक भव्य आणि प्रचंड घेराचा बळकट किल्ला बांधला. श्री शिवाजी महाराजानी आपल्या राजवटीत तो १६६२ मध्ये ताब्यात घेतला आणि त्याला 'यशवतगड' हे नाव दिले.

हा ऐतिहासिक किल्ला रेडी-वेंगुर्ला परिसराच्या संरक्षणासाठी बांधला होता. त्याची बांधणी काहीशी ब्रिटिश-पुर्तुगीज धाटणीची वाटते. सिंधुदुर्ग-विजयदुर्गच्या किल्ल्या-पेक्षा याचे तट, बुरूज, आतील दालने निराळी दिसतात. कदाचित चारशे वर्षांपूर्वी हा किल्ला बांधला तेव्हा त्यासाठी लागणारे गवडी, स्थापत्यकार जवळच्या फिरंगी मुलखातूनही आणलेले असतील! मात्र या किल्ल्यातून हिंडताना महाराष्ट्रातील अनेक किल्ल्यांची आठवण होते. तीच उद्ध्वस्तता, पडझड, सर्वत्र वाढलेली झाडे आणि शासनाच्या पुरातत्त्व खात्याने केलेली हेळसांड—

यशवतगडाच्या पश्चिम तटाला उभे राहिल्यानंतर मात्र समोरच्या देखाव्याने मन ताजेतवाने व प्रफुल्लित होते. उजवीकडील सुरूच्या हिरव्यागार राई आणि त्यांच्या पाय-तळीचा शुभ्र पुळणीचा गालिचा उजवीकडे रेडी बंदराचा धक्का आणि समोर पसरलेली अरबी समुद्राची अथांग निळाई पाहताना चित्त हरखते. किल्ल्याच्या तटाला लागून उथळ पाण्याचा एक प्रशस्त तलाव नैसर्गिक रीत्या बनलेला आहे. तेथील संथ, आरस्पानी नितळ पाणी पाहिल्यानंतर पोहण्याची इच्छा मनावर न झाली तरच नवल! पर्यटकासाठी तर हे एक अद्भुत ठिकाण आहे. या किल्ल्यातही दोन हाताचा एक पश्चिमाभिमुख गणपती आहे! जवळच एक गोड्या पाण्याचा झरा आहे. पलीकडे हातभर अंतरावर अरबी समुद्राचे अथांग खारे पाणी नि इथे हा अमृता-सारखा गोड पाण्याचा झरा!

रेडीची हद्द सोडताच मालवणी मुलखाची दक्षिण सीमा-महाराष्ट्रापुरती संपते. महाराष्ट्रापुरती म्हणायचे कारण, मालवणी बोली महाराष्ट्राबाहेर गोव्यातही मोठ्या

तळी आणि त्यात बारमास फुलणारी कमळे म्हणजे 'अरविंदे–' त्यावरून आरोंदे हे नाव पडले असे जुने लोक सांगतात! आरोंद्यामध्ये श्री देवी सातेरी–भद्रकाली या ग्रामदेवता. प्राचीन काळापासून आरोंदेकर इथे विनम्र होत आले. जवळच 'देवतळे' नावाचे एक सुंदर तळे आहे त्याशिवाय आणखी एक तळे आहे ते आग्राळ वाडीतील श्री कुळाच्या देवालयाजवळ. शेकडो वर्षांपासून जपलेली जवळची हिरवी-गर्द 'देवराई' म्हणजे या भागातील निसर्गरमणीय सौंदर्यस्थळ. आरोंदे गाव फक्त पुरातन देवालयासाठी प्रसिद्ध नसून जवळच असलेल्या 'किरणपाणी' या जुन्या-काळच्या बंदरानेही त्याला कीर्ती मिळवून दिली आहे. 'किरणपाणी' हे सुंदर नाव कसे पडले असावे? मी 'किरणपाणी' बंदराजवळच्या धक्क्यावर उभे राहून पाहिले पूर्वेकडून उगवत्या सूर्याची सकाळी पसरलेली सोनेरी किरणे, आरोंद्याच्या तेरेखालच्या त्या सथ खाडीच्या पाण्यावर अख्खा दिवस टिकून असतात, सोन्याचा वर्ख चढवावा तशी! या सोनेरी किरणामुळे खाडीतील पाणीही सोनेरी बनलेले दिसते. किरणांचे पाणी म्हणून किरणपाणी. अरविंदे आणि किरणपाणी! किती काव्यमय नावे—

—आणि इथला तसाच काव्यात्म निसर्ग! मला वाटते, निसर्गाला पडलेले किरणाचे आणि पाण्याचे मधुर स्वप्न म्हणजे आरोंदे, किरणपाणी आणि तेरेखोलचा परिसर!

आरोंदे हे महाराष्ट्राचे दक्षिण टोक. सीमेवरचे शेवटचे गाव. इथून पश्चिमेला 'रेडी' हे मॅंगनीजच्या खाणीचे गाव. पलीकडे गोव्यात मॅंगनीजचा शोध लागला आणि तेथील खाणींचे लोण मग अलीकडच्या महाराष्ट्राच्या सीमाभागातही पोचले. तोपर्यंत 'रेडी' गाव फक्त देवी 'माऊली' आणि 'नवदुर्गा' या देवस्थानासाठी सुप्रसिद्ध होते. पण भूगर्भातून मॅंगनीज पृष्ठभागावर येऊ लागले आणि साऱ्या परि-सराचा अक्षरशः कायापालट झाला. पैसा आणि माणसे यांचे प्रमाण अतोनात वाढले. कर्नाटक–आंध्रप्रदेशापासूनचे शेकडो मजूर खाणीतून राबू लागले. खाणींची खोदाई, डंपर्स आणि ट्रक्स यांची रहदारी यांनी अहोरात्र गावाला जागे ठेवले. एकेकाळी झाडीने हिरवेगार असलेले हे किनाऱ्यावरचे सुंदर गाव लाल धुरोळ्याने नखशिखान्त माखून तांबडे लाल बनले. गावात खाणींतून निघालेली धूळ मावेनाशी झाली. गोडे पाणी आटले; आणि खाणींचे खोदकाम समुद्रपातळीच्याही खाली गेल्यामुळे, सागराचे पाणी गावातील खंदकांमध्ये घुसून तेथे दुसरे 'चासनाला' होईल, अशी भीती लोकांना वाटू लागली.

तरीही पैशाचा, पैशातून येणाऱ्या श्रीमंतीचा लोभ माणसांना सुटत नाही. खाणी खोदल्या जातच आहेत. रेडीचा मुखवटा बदलतो आहे. चिरेबंदी नवी घरे उभी

रहात आहेत नवीं झाडे लावण्याचे मात्र कुणी मनावर घेत नाही. घराघरांवर टीव्हीच्या अँटिना शोभताहेत आणि या एवढ्याशा गावात व्हीडिओ पार्लर्स सुद्धा निघाले आहेत. दारू आणि मटका याची प्रगती तर विचारता नये, एवढी बेसुमार!

नवे रेडी गाव असे सुधारत असले तरी जुन्या रहिवाशांची जुनी 'रेडी' मात्र अद्यापि पूर्वीच्या जमान्यात वावरताना दिसते माऊली आणि नवदुर्गेच्या भरीला आणखी एका दैवताची जोड रेडीला आता मिळाली आहे, ती श्री गणपतीची. दहा-बारा वर्षांपूर्वी तेथील खाणींच्या परिसरात, भूगर्भात दडलेल्या एका सुरेख गणपतीच्या मूर्तीचा कुणाला शोध लागला आणि हा हा म्हणता भाविकांनी तेथे मंदिर उभारले. जाम्या दगडात कोरलेली सहा फूट उंचीची गजाननाची भव्य मूर्ती आणि तसाच भला मोठा उंदीर! या गणपतीचे वैशिष्ट्य म्हणजे याला फक्त दोनच हात आहेत!

रेडी गावाला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. सोळाव्या शतकात विजापूरच्या आदिलशहाने येथील खाडीच्या मुखाशी एक भव्य आणि प्रचंड घेराचा बळकट किल्ला बांधला श्री शिवाजी महाराजांनी आपल्या राजवटीत तो १६६२ मध्ये ताब्यात घेतला आणि त्याला 'यशवंतगड' हे नाव दिले.

हा ऐतिहासिक किल्ला रेडी-वेंगुर्ला परिसराच्या संरक्षणासाठी बांधला होता. त्याची बांधणी काहीशी ब्रिटिश–पुर्तुगीज धाटणीची वाटते. सिंधुदुर्ग–विजयदुर्गच्या किल्ल्या-पेक्षा याचे तट, बुरूज, आतील दालने निराळी दिसतात. कदाचित चारशे वर्षांपूर्वी हा किल्ला बांधला तेव्हा त्यासाठी लागणारे गवंडी, स्थापत्यकार जवळच्या फिरंगी मुलखातूनही आणलेले असतील! मात्र या किल्ल्यातून हिंडताना महाराष्ट्रातील अनेक किल्ल्यांची आठवण होते. तीच उद्‌ध्वस्तता, पडझड, सर्वत्र वाढलेली झाडे आणि शासनाच्या पुरातत्त्व खात्याने केलेली हेळसांड—

यशवंतगडाच्या पश्चिम तटाला उभे राहिल्यानंतर मात्र समोरच्या देखाव्याने मन ताजेतवाने व प्रफुल्लित होते उजवीकडील सुरूच्या हिरव्यागार राई आणि त्यांच्या पाय-तळीचा शुभ्र पुळणीचा गालिचा उजवीकडे रेडी बंदराचा धक्का आणि समोर पसरलेली अरबी समुद्राची अथांग निळाई पाहताना चित्त हरखते. किल्ल्याच्या तटाला लागून उथळ पाण्याचा एक प्रशस्त तलाव नैसर्गिक रीत्या बनलेला आहे. तेथील संथ, आरस्पानी नितळ पाणी पाहिल्यानंतर पोहण्याची इच्छा मनावर न झाली तरच नवल! पर्यटकांसाठी तर हे एक अद्‌भुत ठिकाण आहे. या किल्ल्यातही दोन हाताचा एक पश्चिमाभिमुख गणपती आहे! जवळच एक गोड्या पाण्याचा झरा आहे. पलीकडे हातभर अंतरावर अरबी समुद्राचे अथांग खारे पाणी नि इथे हा अमृता-सारखा गोड पाण्याचा झरा!

रेडीची हद्द सोडताच मालवणी मुलखाची दक्षिण सीमा–महाराष्ट्रापुरती संपते. महाराष्ट्रापुरती म्हणायचे कारण, मालवणी बोली महाराष्ट्राबाहेर गोव्यातही मोठ्या

प्रमाणात बोलली जाते, किंबहुना गोव्याच्या उत्तरेकडील डिचोली–पेडणे–बारदेश भागात वाडी–वेंगुर्ल्याची मालवणी बोलीच सगळे बोलतात. रेडी सोडून पुढे सरकताच एका पठारावर एक लहानसा क्रूस आहे व मध्ये ' नो मॅन्स लॅंड ' असावी तसा एक चिंचोळा पट्टा, तो ओलांडताच गोव्याची हद्द नि तात्काळ किल्ले तेरेखोल–गोमंतकाचे उत्तरेकडील पर्यटन केंद्र.

मालवणी मुलखातली येथपर्यंतची अनेक निसर्गरमणीय स्थळे पाहिल्यानंतर तेरेखोल किल्ल्यावर आपण आलो की शासनाने मनात आणले की उपेक्षित, दुर्गम ठिकाणाचाही पर्यटन केंद्राच्या दृष्टीने किती उत्तम विकास होऊ शकतो, त्याचा प्रत्यय येतो आणि हे भाग्य मालवणी मुलखाच्या नशिबात नाही, या विचाराने दुःखही होते.

पोर्तुगीजाच्या काळी तेरेखोल हे कैद्यासाठी एक तुरुंगाची कोठडी असलेले ठिकाण एवढेच सर्वांना माहीत होते, पण गोवा स्वतंत्र होताच तेथील लोकनियुक्त शासनाने तेरेखोल किल्ल्याचा संपूर्ण कायापालट करून ते एक रमणीय पर्यटन केंद्र बनविले आहे. किल्ला तसा छोटेखानीच आहे एखादी गढी असावी तसा. अठराव्या शतकाच्या प्रारंभी मराठ्यांनी बांधलेला हा किल्ला अठराशे पंचेचाळीसात पुर्तुगीजांनी जिंकला. त्यानंतर तो गोवा मुक्त होईपर्यंत त्यांच्याच ताब्यात होता. दगडी पायऱ्या चढून आत गेले की बंदिस्त तटबंदीमध्ये एक लहानसे चर्च. पश्चिम तटावरून दिसणारा अमर्याद सागर विस्तार, आणि पूर्वेला तेरेखोलची सूर्यकिरणात चमकणारी खाडी त्या खाडीच्या पात्रातून होणारी बाफोरांची—होड्यांची येजा पलीकडे केरीचा स्वच्छ सागरकिनारा, नारळी–सुरूच्या घनदाट हिरव्या राया आणि सर्वत्र एक हवाहवासा वाटणारा निवांतपणा पूर्वेकडील तटाच्या नागमोडी अरुंद पायऱ्या उतरून खाली उतरताच खडकांवर फेसाळणारे पाणी, वाऱ्यावर झेपावणारे शुभ्र सागर–पक्षी आणि खाडीची–समुद्राची मद गाज.

गोमंतकाच्या स्वातंत्र्यलढ्यात याच किल्ल्यावर हिरवे गुरुजींनी प्राणार्पण केले होते

गढीचे पर्यटन केंद्र केल्यावर पर्यटकाला हव्या त्या ज्या सुविधा शासनाने तिथे उपलब्ध करायला हव्यात, त्या सर्व तिथे मौजूद आहेत ! ' गोवन फूड ' या नावाखाली मालवणी मुलखातलेच माशाचे झणझणीत कालवण, पादरा शुभ्र भात, खोबर भरपूर घालूनही तिखटपणा टिकवलेली ' सागोती ' आणि खास गोव्याचे म्हणता येईल असे ' उंडे ' नावाचे ताजे खुसखुशीत पाव, पर्यटकाना चाखायला मिळतात

आणि फेणी ! शिवाय सर्व तऱ्हेचे मद्य भरपूर असलेला छोटेखानी बार, तोही आहे.

मालवणी मुलखातून बाहेर आल्याच्या या सर्व खुणा, फक्त ' हयसर–थयसर 'ची मालवणी बोली अवती–भवतीच्या माणसांच्या मुखातील ' मालवणीपणा ' जागता ठेवत असलेली.

आरोंदे, रेडी, यशवंतगड आणि तेरेखोल या सर्वच परिसराला किरणांच्या पाण्याचे, ' किरणपाण्याचे ' स्वप्न पडल्यासारखे वाटते ! या स्वप्नभूमीवर पावले रेंगाळली नाहीत, तरच नवल.

# हिरवीगार आंबोली !

२१. मालवणी मुलखाला सह्याद्री आणि सागर यांची निसर्गतःच देणगी मिळालेली आहे. असे भाग्य फारच थोड्या प्रदेशाच्या वाट्याला येते. पूर्वेला सह्याद्रीच्या हिरव्या निळ्या रांगा आणि पश्चिमेला अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर झेपावणाऱ्या लाटा, हे या मुलखाचे चिरंतन वैभव आहे. सह्याद्रीची अनेक शिखरे आपल्याला खुणावीत असतात आणि सागराची गाज... ती अहोरात्र आपल्याला साद घालीत असते ! कुठे जावे आणि काय पहावे, असे नवख्या माणसालाच नव्हे, तर वर्षानुवर्षे या मुलखात रहिवास करणा ऱ्यांनाही होऊन जात असते.

त्यातही ' आंबोली ' ला पाय लावले नाहीत तर काहीच पाहिले नाही, ही खरी गोष्ट असते ! आंबोली म्हणजे मालवणी मुलखाचे महाबळेश्वर ! चोवीसशे फूट उंचीवरचे टुमदार आणि हिरवेगार हिलस्टेशन. तशी दक्षिण कोंकणात आणखीही बरीच गिरिशिखरे आहेत. रामघाटापासून फोंडाघाटापर्यंत किमान चार तरी रमणीय आणि उत्तुंग अशा जागा सह्याद्रीवर आढळून येतील. पूर्वीच्या काळी धनगरांनी पायवाटा काढून अवघा सह्याद्री आरपार ओलांडला होता, त्यांतल्याच महत्त्वाच्या पायवाटांचे त्या त्या वेळच्या सरकारने वाहतुकीसाठी घाट बांधले. देशावरून कोंकणात उतरण्याचे ते मग राजमार्ग ठरले. तरीही एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत या घाटातून बैलाच्या पाठीवरूनच मालाची ने-आण चालायची. त्यानंतर बैलगाड्या आपले घुंगुर खुळखुळावू लागल्या. आंबोली घाट यापैकीच एक घाट. या घाटातून पहिली मोटार आणली ती सावंतवाडीच्या राजेसाहेबानी ! आंबोली घाट हा दळणवळणाचा रस्ता म्हणून लोकाना माहीत झाला. बेळगाव–चंदगडकडील घाटावरच्या लोकांना वेंगुर्ले–सावंतवाडीला यायचा मार्ग म्हणजे हा घाट, निपाणी–कोल्हापूरकराना फोंडा घाट; मुरगुड-गारगोटी येथील रहिवाशांसाठी रांगणा घाट नि पाटगावकरासाठी घोटगे घाट, असे सह्याद्रीला पालाण घालणारे हे पुरातन घाट. पण त्यातही राजाचा मान आंबोली घाटाला. एक तर तो सर्वांपेक्षा उत्तुंग आणि त्याचे संधान थेट सावंतवाडीच्या राजघराण्याशी ! सावंतवाडीकरानी या घाटाला प्रतिष्ठा मिळवून दिली.

घाट प्रसिद्धीला पावला ब्रिआणि टिश अमदानीत गोऱ्यासाहेबाला घाटमाथ्यावरची थडगार आणि बारमाही हिरवीकच्च असणारी ‘ आंबोली ’ म्हणजे वरदान लाभले. महाबळेश्वर सोडल्यानंतर वाटेत कोल्हापूरजवळचे पन्हाळा सोडले तर सायबाने पथारी टाकावी अशी थडगार जागा दुसरी नव्हती साहेब बेळगाववरून सावंतवाडीला जायला निघाला नि त्याचे पाय आंबोलीपाशी अडखळू लागले. तिथून त्याचे पाऊल पुढेच पडेना उतरून खाली कोकणात जायचे म्हणजे ऊन आणि घाम याचा मारा, पण आंबोलीच्या हवेत ऊनही शीतल भासते. घाटमाथ्यावर हवा कोरडी. घाम मुळीच येत नाही; शिवाय हिरवी घनदाट झाडी. उंच कडे. तिथून दिसणारे विहंगम तळकोंकण. पावसाळ्यात इंग्लंडसारखी हवा, धुके आणि चेरापुंजीसारखा धुवांधार पाऊस ! तरीही हवेतला गोड गारवा कायमच ! एवढ्या पावसात खरे तर हाडे फोडून टाकणारी तीक्ष्ण थंडी हवी; पण आंबोलीचे वैशिष्ट्य म्हणजे भर डिसेंबर–जानेवारीतही अशी चावरी थंडी तिथे पडत नाही थंडीत उबदारपणा आणि उन्हाळ्यात गारवा. पावसाळ्यात ऊब आणि गारवा दोन्हीही ! अशी मजेशीर हवा साहेबमजकुरांनी पाहिली, अंगावर घेतली आणि तेथे त्याचे पाऊल रेंगाळले. त्याने चौकशी केली तेव्हा त्याला कळले की या डोंगरमाथ्यावर या आधीच कुणीतरी रहिवास केलेला आहे. या जागेचे सौंदर्य इथल्या कुणीतरी नेटिव्ह माणसाने आपल्या आधीच न्याहाळले आहे आणि त्याने तिथे उन्हाळी हंगामात वस्तीही केली आहे.

साहेबाला कळले, की घाटमाथ्याखाली तळकोंकणात असलेल्या सावंतवाडी या चिमुकल्या संस्थानच्या रसिक राजाने ‘ आंबोली ’ येथे आधीच पाऊल टाकले आहे. त्या राजाची उन्हाळी राजधानी म्हणजेच हे थंड हवेचे गाव !

सावंतवाडीच्या लखमसावंतांनी आंबोलीला प्रथम नावारूपाला आणले विसाव्या शतकाच्या प्रारंभी त्यांनी तेथे एक टुमदार बंगला बांधला. तिथून मावळतीचे कोंकण आणि स्वच्छ उन्हे असली तर संस्थान हद्दीपल्याकडले वेंगुर्लें बंदर आणि निवतीची बत्ती असलेली डोंगरीसुद्धा साध्या डोळ्यांनी दिसायची.

ब्रिटिश सरकारने आपला डाकबंगलाही नंतर जवळच एक मोक्याची जागा पकडून उभा केला. ब्रिटिश साहेबाचे एक लक्षात ठेवण्याजोगे वैशिष्ट्य म्हणजे ते जातील तेथील निसर्गरमणीय स्थळ सर्वांत प्रथम त्यांच्या नजरेत भरलेले असायचे. निवांत समुद्रकिनारे. उंच, रमणीय, घनदाट झाडीने भरलेली गिरिशिखरे अथवा साध्या रस्त्यावरचे एखादे सुंदर वळण अशा मोक्याच्या ठिकाणी त्यांनी डाकबंगले उभारलेले दिसतात. दक्षिण कोंकणात तर त्यांच्या सौंदर्याच्या दृष्टीला कितीतरी जागा दिसल्या ! वेंगुर्लें, मालवण, विजयदुर्ग या ठिकाणचे सागरतीर आणि फोंडा घाट, कसाल, खारेपाटण, आकेरी यासारख्या रुक्ष रस्त्यावरील सुंदर ठिकाणे त्यांनी नेमकी हेरली आणि तेथे आपले पडाव टाकले !

आंबोलीही त्यातलीच एक जागा. एकोणीसशे सत्तावीस साली महात्मा गांधी बेळगावमार्गे पहिल्यांदा व अखेरचेच कोंकणात आले तेव्हा आंबोलीला त्यांनी गाडी क्षणभर थांबविली आणि तेथली सृष्टिशोभा डोळे भरून पाहिली. त्रेपन्न साली पंडित जवाहरलाल नेहरूसुद्धा कोंकणात प्रथमच आणि शेवटचेच त्याच वाटेने आले तेव्हाही त्यांची तशीच गत झाली! ही थोरामोठ्यांची अवस्था, तर लहानांचे काय? ते तर आंबोलीच्या पहिल्याच भेटीत तिच्या दाट प्रेमात पडतात.

बॅ. नाथ पै यांच्या कोंकणातल्या दोन जागा विलक्षण प्रीतीच्या. वेंगुर्ल्याचा समुद्रावरचा डाकबंगला आणि बेळगावच्या वाटेवरची स्वप्नासारखी भासणारी आंबोली!

बेळगावहून निघाले की तासा दीड तासात आंबोली येते. तसे तिचे प्रथमदर्शन काही सर्वांनाच मोहात पाडील असे नाही. एक लहानशी बाजारपेठ, जवळचे ग्रामदेवतेचे दगडी बांधणीचे मंदिर, अगदीच टुकार बसस्टँड आणि डावीकडील टेकडीवर बसलेला हॉलिडे कॅंप. तेथील वीसपंचवीस छोटेखानी बंगले, अंगाला जाणवणारी थंड हवा आणि जवळपासची हिरवीगार वृक्षराजी, तुरळक फिरणारी माणसे याशिवाय नव्या माणसाला प्रथम काही कळत नाही. पण तिथे दोनचार दिवस मुक्कामाला राहिले की नंतरच 'आंबोली' म्हणजे काय चीज आहे, त्याचा अनुभव येतो.

इथल्या हॉलिडे कॅंपमध्ये उन्हाळ्याचा हंगाम सोडला तर कधीही ऐन वेळी राहण्याची सोय होऊ शकते. पूर्वी उन्हाळ्यातही चारदोन खोल्या रिकाम्या असायच्या. पण अलीकडे आंबोलीची प्रसिद्धी खूपच झाली आहे, त्यामुळे इथले सर्व बंगले आधी रिझर्व करून सगळीकडचे पर्यटक अडवून ठेवतात. इथल्या पर्यटनगृहाची खरी प्रसिद्धी पर्यटन खात्याने केलेली नसून येथे येऊन गेलेल्या पर्यटकांनीच बहुशः केलेली आहे; पण आपल्याला रहायला जागा तिथे मिळाली नाही तर शेजारीच सरकारी डाकबंगला आहे. तिथेही जमले नाही, तर रस्त्याकडेच्या एखाद्या घराच्या पडवीत कुणीही गाववाला आनंदाने रहायची परवानगी देतो.

पण गाववाल्याला 'इथं पाहण्याजोगं काय आहे?' म्हणून विचारलेत, तर तो एवढेच सांगेल, 'हिरण्यकेशी!' आणखी काही त्याला सांगता यायचे नाही. इथे एवढे बाहेरचे लोक कशासाठी येतात, याचे अजूनही लोकांना नवलच वाटते.

हिरण्यकेशी मात्र प्रेक्षणीय आहे. तीन साडेतीन किलोमीटर्सवर हिरण्यकेशी नदीचे हे उगमस्थान आहे. तेथील पुरातन शिवमंदिर हे भाविकांचे श्रद्धास्थान! पण तेथील सृष्टिसौंदर्य हे कुणालाही मोहित करणारे. महाशिवरात्रीला हिरण्यकेशीला मोठी यात्रा भरते. एरवी हे अतिशय निवांत असे ठिकाण आहे.

आंबोलीला फारसे 'पॉइंट्स्' नाहीत. पण जे आहेत, त्यांचे सौंदर्य केवळ

' अनुपमेय ' याच शब्दांत व्यक्त करावे लागेल. पश्चिम तटावरील ' महादेव पॉइंट ' हा सर्वांत महत्त्वाचा. तेथून खालील तळकोंकणची शोभा पहावी. क्षितिजापर्यंत अथांग मालवणी मुलुख. शेतेभाते. नागमोडी जाणाऱ्या नद्या आणि त्यावरून पळणाऱ्या ढगांच्या सावल्या ! कितीही वेळ हे दृश्य पहात बसले तरी मनाची तृप्ती होत नाही. इथून पाटगावजवळचा ' मनसंतोषगड ' हा शिवकालीन पुरातन किल्ला नजरेला पडतो. महादेवगडाच्या उलट दिशेला शिरगावकर पॉइंट आहे. तेथून सूर्यास्त पाहण्यासाठी पर्यटक गर्दी करतात. खरे तर तो ' सनसेट पॉइंटच 'च आहे.

मी मात्र ज्या एका पॉइंटबद्दल सांगणार आहे त्याचे नाव मला तरी माहीत नाही.

हॉलिडे कॅंप आणि वनखात्याचा बंगला याच्या मागे जाणारी एक खडकाळ, निरुंद पाणंद मी पकडली आणि दक्षिण दिशेने चालू लागलो. मे महिन्याचे दिवस होते. आंबोलीची हवा सुखद होती. चालण्याचे श्रम जाणवत नव्हते. त्या वाटेने सुमारे तासभर मी चालत गेलो. वाट निर्जन होती. चुकार धनगर बाजी मेंढरे चरवीत, काठीवर हनुवटी टेकून उभे होते. माझ्या उजव्या हाताला दरी आणि डावीकडे उंच कडा. आणि चालता चालता अकस्मात एके ठिकाणी उजवीकडे तो कडा सपशेल तुटलेला दिसला. पुढे जाण्यासाठी जेमतेम एखादी शेळी जाऊ शकेल, अशी निरुंद पायवाट मी तिथेच उभा राहिलो नि उजवीकडे वळून पाहू लागलो. सोसाट्याचा वारा सुटला होता. मी जर शेजारच्या झाडाला घट्ट पकडले नसते, तर त्या वाऱ्याच्या झोतासरशी अडीच हजार फूट खाली कोसळलो असतो. मग सुरक्षित-पणे आधी घट्ट पाय रोवून उभा राहिलो आणि पश्चिमेकड ल भव्य देखावा डोळ्यात साठवू लागलो.

ओहो ऽऽ ! देवाच्या दरबारातला तो भव्य देखावा याचि देही, याचि डोळा पाहण्याचे भाग्य मला लाभले होते ! अथांग पसरलेले तळकोंकण तर सह्याद्रीच्या इतर शिखरावरूनही पूर्वी पाहिले होते. आंबोलीच्याच महादेवगड पॉइंटवरूनही ते मला दिसले होते: पण या अनामिक कड्यावरून ऊन–सावल्यांचा जो [illegible] दिसत होता तो यापूर्वी कुठेच पाहिला नव्हता. सायकाळची तिरपी उन्हे ढगाच्या फटीतून बाहेर फाकली होती त्या काळ्या ढगातून बाहेर पडलेले ते किरणाचे लख-लखीत झोत आकाशाच्या विस्तीर्ण पटलावर छायाप्रकाशाचे एक मनमोहक, विस्मित करणारे गारुड उभे करीत होते आणि त्यातही रंगत आणली होती त्या पूर्ण वर्तुळाकार इंद्रधनुष्याने ! असे इंद्रधनुष्य मी एकदा विमानातून प्रवास करताना पाहिले होते. त्यानंतर आंबोलीच्या शिखरावरूनच ते मला पुन्हा दिसले होते. किरणाचा तो मोरपखी विभ्रम पाहता पाहता अंतर्धान पावला आणि मी भानावर आलो.

सूर्य अस्ताला भिडला होता. सावल्या दाट होत होत्या आणि मी डोळ्यांत साठ-वलेला देखावा पुन्हा पुन्हा आठवीत परतीची वाट चालत होतो.

आंबोलीला मी त्यानंतर अनेकदा गेलो; परंतु चौकुळच्या डोंगरावरून (येताना त्या कळ्याचे नाव त्या शेरडे हाकणाऱ्या धनगरानेच मला सांगितले तो चौकुळचा डोंगर होता!) परतताना दिसलेले दृश्य मला पुन्हा कधीही आढळले नाही.

आंबोलीला मी वरचेवर जातो वर्षाच्या साऱ्या ऋतूत मी आंबोलीला मुक्काम केला आहे. पावसाळ्यामध्ये दुधासारख्या शुभ्र धुक्यात गुरफटलेली आंबोली मी पाहिली आहे तिथल्या बारीक पानांच्या झाडाच्या शेंड्यावर ताशे वाजवीत घोंघावणारा छडीदार पाऊस मी अनुभवला आहे तिथल्या डोंगरातल्या धबधब्याखाली, ओझरामध्ये, यथेच्छ डुबलो आहे हिवाळ्यातल्या शिरशिरणाऱ्या गारव्यात शाल लपेटून आंबोलीच्या जुन्या लाल मातीच्या रस्त्यावरून भटकलो आहे. या थंडीच्या दिवसात एसटी स्टँडवरच्या हॉटेलात किंवा रस्त्यावरच्या एका बाकड्याच्या कावणात मिळणारा कढत, लाल चहा तिखट भज्याबरोबर घशाखाली ढोसताना येणारी मजा चाखली आहे आणि ऐन चैत्र-वैशाखाच्या हंगामातली शीतलताही मनमुराद अनुभवली आहे.

पावसाळ्यामध्ये जवळचा 'नागरतास' धबधबा हे तर मोठेच आकर्षण! तेही मी पाहिले आहे. हॉलिडे कँपजवळच सरकारच्या वनविभागाने एक सुंदर उपवन तयार केले आहे आणि त्यात हरणासारखे पशू पाळले आहेत थोडे दूर जाताच रेशमाचे किडे पाळण्याचा एक सुरेख उद्योग खादी ग्रामोद्योग मंडळाने सुरू केलेला पहायला मिळतो. तुतीची हिरवीगार कोवळी झाडे आणि त्याच्या पानावर पोसणारे ते रेशमाचे किडे, त्यांचे कोष आणि त्यातून निघणारे तलम रेशीम हे सारे पाहताना वेळ पुरत नाही.

हे सारे पाहण्यासाठी थोडी फुरसद मिळाली आणि मूड लागला की मी आंबोलीला जातो, एकदोन दिवस राहतो आणि सकाळची एसटी पकडून सावंतवाडीच्या दिशेने प्रवास सुरू करतो.

सावंतवाडीच्या महाराजांच्या बंगल्याजवळ घाटरस्त्याला सुरुवात होते. एक डौलदार वळण घेऊन एसटी सावधपणे आंबोली घाट उतरू लागते हळूहळू एकेक वळण पार होऊ लागते. डावीकडे उंच कडा आणि उजवीकडे खोल दरी असा प्रवास सुरू होतो मालवणी मुलखाच्या लाल मातीच्या ओढीने गाडी धावत असते. हळूहळू हवेतला गारवा कमी कमी होऊ लागतो. या घाटातले काळ्या तोंडाचे हुप्ये वादर वळणावळणावर वाकुल्या दाखवितात एस.टी. खाली उतरत असते हळूहळू झाडी विरळ होऊ लागते. घाटाच्या पायथ्याशी घरे दिसू लागतात. आंबोली आपला हळूच निरोप घेते.

...ालय ठाणे

# असा हा मालवणी मुलूख !

२२.

मुंबईच्या परेल एस टी. स्टँडवरून किंवा बाँबे सेंट्रलहून संध्याकाळी सुटलेल्या एस टी. गाड्या पहाटेपासून मालवणी मुलखात शिरू लागतात. लांजा, राजापूर सोडून गाडी खारेपाटणच्या हद्दीत शिरली की, ' माकां-तुका ' आणि ' हयसर-खंयसर 'ची बोली कानी पडू लागते. हवेला एक निराळाच वास येऊ लागतो, माती अधिकच लाल भासू लागते, झाडे फारच हिरवी दिसू लागतात आणि रस्त्याच्या कडेने जाणारी अनोळखी माणसे ओळखीची वाटू लागतात. त्यांच्या तोंडचे हेल काढून बाहेर पडणारे शब्द कानावर पडताच अंगावर रोमांच उठतात. मालवणी मुलखात आपले पाऊल पडलेले असते लहानपणापासून याच मातीत जाणतेपणापर्यंतची वर्षे गेलेली असतात हीच मालवणी बोली मुखात घेऊन आपण इथे वावरलेले असतो.

आणि इथल्या परंपरेप्रमाणेच अंगात थोडे बळ येताच पोटापाण्यासाठी थेट ' मुंबै ' गाठलेली असते. तिथली भोंगील-बटाटी नि पाव-चपाती खात असताही मुलखातल्या पिठी-भाताची, मासळीच्या झणझणीत कालवणाची नि नाचणीच्या भाकरीची चव आपण विसरलेले नसतो कधी एकदा रजा मिळते नि मुलखात जातो, अशी ओढ आपल्या चाकरमानी मनाला नित्य लागलेली असते. चवथ, देव-दीपावली, होळी नि जत्रा-धैकाले यांचे दिवस आले की मन हुरहुरू लागते गिरणी-कारखान्यात नाही तर कुठल्याही मोठ्या हापिसात नोकरी करीत असलो, तरी डोळ्या-समोर ' मुलूख ' तरळू लागतो. निदार चार दिवस तरी मुलखात जाऊन यावे, म्हणून आपण एस. टी. चं तिकीट काढतो नि वाडवडिलांच्या परंपरेनुसार, गावी आलो नि रजा संपत आली की मुबईला तार ठोकतो— ' जीवास बरेपणा नाही, मेहरबानी करून आठ दिवस रजा वाढवावी— ' ( मुंबईतून गावी यायचे असले की तिकडून तार मागवायची—' मदर सीरीयस, स्टार्ट इमिजिएटली ' आणि ती साहेबांच्या तोंडावर फेकून थेट एसटीत बसायचे, ही जशी आपली वंशपरपरा, तसेच गावी आल्यानतर ' सफरिंग फ्रॉम फीवर, ' ही तार पाठवून रजा वाढवायची ही सुद्धा वाडवडिलापासूनची जुनी रीत ! )

आणि वाढवलेली रजा संपली की मनाविरुद्ध, नाईलाजानेच जणू काही आपण पुन्हा मुंबैला जाणाऱ्या एसटीत बसतो. पोचवायला आलेल्या घरच्या नि आवाठातल्या माणसांच्या चेहऱ्यावरचे दु:ख नि डोळ्यात तरळणारे पाणी आपल्याच डोळ्यात साठवून आपण पुन्हा मुंबैच्या वाटेला लागतो.

शरीराने मुंबईत वावरत असलो तरी मन सारे याच मुलखात भिरभिरत असते. इथले कौलारू घर, तुळशीचे अंगण, इथली माणसे, म्हातारी आई, भाऊ, वहिणी, त्यांची मुले-लेकरे, थकलेले वडील, इथल्याच कुठल्या कुठल्या गावातून दिलेल्या बहिणी, भाचरे, गुरे-वासरे, शेतीवाडी, पाऊसपाणी नि जत्रा-दहिकाले, देवदेवळे, नाटके नि भजने. या साऱ्यात पंचप्राण अडकलेले असतात.

आणि एक दिवशी आपण पुन्हा या जीवाभावाच्या मुलखात येण्यासाठी एसटीत बसतो.

रात्रभर रातराणी काळोखातून मुंबई-गोवा रस्त्याने धावत असते. तुटपुंज्या बाकड्यावर आपण शरीर आखडून बसलेले. वरील रॅकवर आपली पिशवी किंवा रेक्झीनची ऑफिस बॅग. टपावर एखाददुसरा बोजा. पेंगत पेंगत आपण सकाळ होण्याची वाट पहात अंगाला बसणारे हादरे सोशीत वेळ काढीत असतो. भिणभिणताना एसटी कणकवलीच्या, नाहीतर मालवण-वेंगुर्ल्याच्या किंवा कालावलीच्या किंवा मसुऱ्याच्या स्टॅंडवर येऊन उभी राहते; तिथून मग दुसरी एसटी गाठून किंवा चालतच घरी पोचायचे.

जीव नुसता अधीर झालेला असतो!

आता गावोगावचे रस्ते डांबरी झाले आहेत. पूर्वी एसटी गावात शिरली की धुरळ्याचे लोट उठायचे. आता एसटी अलगद येऊन पिंपळाखाली उभी राहते. तेथले रावळाचे नाहीतर पागमाचे हॉटेल नुकते हालचाल करू लागलेले असते. सकाळच्या पहिल्या च्यायची किटली चुलीवर चढलेली असते. आजूबाजूची नेहमीची गिऱ्हाइके बाकड्यावर येऊन थारवलेली असतात. एखादा सलगीतला कुणीतरी थेट चुलीच्या पुढ्यात विडी पेटवून बसलेला असतो. चहाला उकळी येईपर्यंत बाबू राऊळ पेटीतल्या लाडू-चिवड्याच्या बरण्या आणून बाहेरच्या डगमगत्या टेबलावर मांडतो. शेवकांड्याचे नि चण्याच्या पिठाचे लाडू, फरसाण नि चिवडा, झालेच तर बटर नि खारी बिस्किटे-पूर्वी हे पदार्थ नसत, पण हल्ली फरसाण नि बटरखारींच्या शहरगावच्या गाड्या गावोगावी येऊन उभ्या राहातात. अगोदरच्या जमान्यात फक्त बाजारगावी दिसणारे हे पदार्थ आता पिंपळाखालच्या रावळाच्या हॉटेलात सुद्धा सहजी मिळू लागले आहेत.

तोवर उजाडत्या दिवसाची किरणे सर्वत्र फाकत असतात. एसटीतून उतरलेला चाकरमानी बॅग सावरीत हॉटेलच्याच दिशेने येत असतो. बाकड्यावर बसलेले

गावकरी कुतूहलाने, डोळे चोळीत निरखून पाहू लागतात.

'सावताचो बबनो काय रे ह्यो ?'

'पण आज बागलाचो चंद्रकांत येवचो होतो– तेच्या घरच्यांका पत्र इलाहा—'

'रे, ह्यो बांदेकराचो दिलपो—'

तोपर्यंत दिलीप बांदेकर हॉटेलात येऊन दाखल होतो. मुलखात दिलीपचा दिलप्या, सदाशिवचा सदश्या नि बाबूचा बाबल्या अशी नावे बदलतात. पण तोंडावर मात्र त्याचे असेल तेच नाव घेतले जाते—

'अरे वा, दिलीप तू तो ? आमका वाटला की दुसरोच कोण ! अवस्तूकचसो इलस ?'

दिलीप हातातली बॅग खाली ठेवतो नि चाकरमान्याच्या थाटात बोलू लागतो —

'त्याचं काय झाले ! घराकडसून अर्जंट लेटर आलं–आसशीत तसो निघान ये– म्हणान् अर्जंटमधी इस्टार्ट झालो. काल इव्हनिंगला बसलो नि हा आज मॉर्निंगला इथे पोचलो. साला होल नाईट गाडीमधी.'

'दिलीप, मच्छींद्र कांबळ्याचा चाकरमानी नाटक इकडे येवन गेला ! आमी पाच पाच रुपयाची तिकिटा काढून बगितला ! तां नाटक म्हणजे जीत तुजो नमुनो ! तू आता ह्या बोलतहस तसोच तो चाकरमानी पण बोलता. इतका वेळ चुलीच्या पुढ्यात बसलेला बापू कुबल बाहेर येऊन म्हणाला, त्याबरोबर दिलीपचा चेहरा एकदम उतरला चाकरमानी नाटक त्याने पण 'रवींद्र'ला पाहिले होते. कंपनीतल्या लोकानी वार्षिक स्नेहसंमेलनाला ते कन्त्राटाने घेतले होते. बापू कुबलने आपणास टोला मारला हे त्याला कळून चुकले तो काहीतरी बोलणार तोच बाबू राऊळच म्हणाला—

'तां मरांदे ! तुका च्याय होयी ? ताजी असा. नि त्याने हातातला कप दिलीपच्या समोर धरला. सगळेजण आतुरतेने दिलीपकडे पहात होते. त्याची मनो-भावना ओळखल्यासारखी दाखवीतच तो म्हणाला,

'बाबू, ह्येंकां सगळ्याका माझ्यातर्फे च्याय दी नि बापू कुबलाक चिवडो पण दी—'

'चिवडो आमी पण खाव ! काय रे रामग्या ?'

'त काय झाला ? आमका पण साग.'

'बरा बोवा, सगळ्यांकाच चिवडो दी.'

'आता मातर चाकरमानी सोबतस हां.' बापू कुबल संतुष्टपणे म्हणाला.

सगळे जण खुशीनं च्याय पिऊ लागतात चिवड्याच्या फक्या मारतात. चाकर-मान्याला आल्याबरोबर 'चहाला लावणे' ही मोठीच मर्दुमकी असते !

सकाळी उजाडताना एसटीतून उतरलेला चाकरमानी दिलीप वादेकर घरी जाऊन जुनापुराणा होतो. त्याने हॉटेलात सांगितले तसे त्याला घरून अर्जंट पत्र गेलेलेच नव्हते. त्याला अकस्मात 'मागारणी'ची आठवण आली नि मागचा पुढचा विचार न करता तो एसटीत बसला होता गेल्याच मार्गशीर्षात त्याचे लग्न झाले होते नि 'पाचपर्तवान' होताक्षणीच त्याला मुंबईला जावे लागले होते. त्या दिवसापासून तो गावी जाण्यासाठी तळमळत होता. लग्नात त्याने नव्या नवरीला फक्त चुटपुटतेच पाहिले होते. तिचा हळदीने पिवळा झालेला हसरा चेहरा नि रसरशीत बांधा, तिरपी नजर, सारे काही त्याला आठवत होते नि तो अधीर बनला होता

त्याने खळ्यात पाऊल टाकताच त्याचा बायकोने त्याला वळईतूनच पाहिले नि तिच्याही अंगावर रोमांच उमटले. ती धावत पळतच आत गेली. आणि — 'अग्ये माजे बाय! चाकरमानी इले ऽ! करीत घोवाला पाय धुण्यासाठी पाण्याचा तांब्या आणायला सरसावली नि तिची म्हातारी सासू नि खासेसुद्धा धडपडत बाहेर आले—

'दिलन्या, तू इलस? म्हणत म्हातारा बापूस मिशीतल्या मिशीत हसला नि वाकलेली आये थोडी ताठ होऊन खांबाला ओठंगून उभी राहिली. कौतुकाने लेकाकडे नि चानीसारख्या भिरभिरणाऱ्या सुनेकडे बघत राहिली. मग म्हणाली, 'बरा झाला इलस तो! गाय इयाली हा परवाच आयलो खर्वस तरी खाशीत वाटीभर–'

'आता इल्यासारखो र्‍हवशीत ना रे म्हैनोभर?'

यावर चाकरमानी काय उत्तर देतो, त्याकडे त्याची 'मागारीण आतल्या खोलीतून लक्ष लावून असते. तिची हालचाल न्याहाळीत तो गालातल्या गालात हसत उत्तर देतो–'बगूया किती दिस र्‍हवाक गावता ता —'

'र्‍हव बाबा होये तितके दिस. बायकोच्या हातचा रांधाप जेव मियां आता थकलंय.' म्हातारी संतुष्टपणे म्हणते.

घरोघरचे चाकरमानी मुलखात येतात, तेव्हा कमीअधिक प्रमाणात असेच वातावरण दरेक घरी असते. एसटीतून उतरल्यावर गाववाल्यांकडून तेच स्वागत. तोच चहा-लाडूचा आग्रह. तीच भगल-मस्करी, तीच कुचेष्टा, पाठ फिरताच तशीच थोडीफार निंदानालस्ती आणि तोंडात तीच मध भरलेल्या म्होवासारखी खुषामत.

चाकरमानी हॉटेलातून चाय–लाडू खाऊन नि इतरांना खिलवून बाहेर पडतो, तोच पाठीमागे चर्चा सुरू होते—

'मधीचसो इलो रे!'

'काय तरी भानगड आसतली. घरची नाय तर थकडची नोकरेची—'

'संप होतो ना तेच्या कंपनीचो?'

'तो मिटलो! मायझयाक तीनतीन म्हैन्याचो बोनस गावतलो—'

'पण हकडच्या आवशी-बापाशीचे हाल काय कमती होयत नाय—'

'आता इलेहा तेचा कारण मियां सांगतय.'

'काय तां—'

'मागारीण! तिची आठवण इली.' आणि एकच खुदखुदाट सुरू झाला.

बाबू रावळाच्या चुलीवरील किटलीला अशी उकळी फुटते, तसतशा बाकड्यावर जागा धरून बसलेल्या रिकामटेकड्या चायकरूच्या गजालींना बहर येत जातो. घटका-घटका तिथे माणसे नुसती बसून 'गजाली' छाटीत असतात अधूनमधून कुणाच्या तरी खर्चाने परस्पर चहाची सोय झाली तर उत्तमच. आणि तशी ती होतेही. आल्यागेल्याची कुकट फौजदारी. गावातल्या सगळ्या घटनाची उजळणी त्यावर मसालेदार फोडणीसारखे बाबू रावळाचे भाष्य.

मग दहाअकराच्या सुमाराला डोक्यावर मासळीची टोपली घेऊन रुजाय किरिस्तावीण नाहीतर बाया गावतीण येते. काहीजण तेवढी वेळ साधूनच तेथे हजर झालेले असतात. म्हावरेवाली आली की सगळ्यांचीच धावपळ उडते. प्रत्येकालाच मासळी कसली आहे ते नजरेने पहायचे असते. काहीजण नुसतेच न्याहाळणारे तर बाकीचे कनवटीचे पैसे खर्चून खरेदी करणारे—

'बांगडे ताजे आसत ना गेऽ—'

'आजच वेतहस का काय माज्याकडसून?' बाया गावतिणीच्या आवाजात पुरेपूर बोचरेपणा.

'तसां न्हय गे. पण बाशेसे दिसतत—'

'बाशे!' बाया गावतीण बांगड्याच्या गळ्याजवळचा भाग नखाने उघडते. लालभडक शेकराड दाखवीत म्हणते—

'फाटपटी मालवणाच्या रांपणीतसून भायर पडलेले ताजे फडफडीत बांगडे हे—'

साहजिकच आता तिचा दर वधारलेला असतो. रुपयाचे पाच असा दर मनात धरून ती आली होती; पण आता ती चारावर अडून बसते नि गिऱ्हाइके निमूटपणे रुपया दोन रुपयाची खरेदी घासाघीस न करता पार पाडतात.

पाठोपाठ रुजाय किरिस्तावीणः येते. घट्ट कासोट्याचे, फुलाफुलाचे तंग नेसलेले लाल लुगडे आणि त्यातून उतू जाणारा तरणाताठा देह, भरघोस अंबाड्यावर त्याहून भरघोस अबोलीचा वळेसर नि टोपलीत बाया गावतिणीच्या मालापेक्षा सरस माल. मुठ्या हाताएवढे रसरशीत हिरवेनिळे, चकचकीत, भरलेले बांगडे रुपयाला पाच!

तोवर बाया गावतीण दुसऱ्या आवाठात गायब झालेली असते. तिला गाळी घालीत पुन्हा रुपया रुपयाचे बांगडे घेतल्याशिवाय कुणीच रहात नाही.

'रुजय्या, वायच तिरफळां आसली तर दी'

'कित्याक? तुज्या घरातली सोपली!'

'रे दररोज बांगडे नि तारले. तिरफळा पुरतली कशी? औंदा दुसरी मासळी कशी ती मराकच नाय.'

हा, बागडे, तारले यासारख्या हिंवस मासळीला तिरफळाचा मारा पाहिजेच. त्याशिवाय त्याची 'रुच' वाढत नाही. तिरफळे नि हळदीची पाने घातलेले बागड्याचे 'सुके' म्हणजे मालवणी मुलखातल्या मत्स्याहारी लोकाच्या जिभेचा उत्सवच! ही तिरफळेसुद्धा या मुलखात हवी तेवढी होतात. राजापूरपासून उत्तरेला तिरफळे नि सोलकढी या दोन वस्तू अभावानेच आढळतात.

मग दुपार होते. बाबू रावळाच्या हॉटेलातील गर्दी विरळ होते जो तो हातातली मासळी सांभाळीत घरोघर दिसेनासा होतो. घरोघरच्या घरकारणी वाटप करण्यात गर्क होतात. दुपारी मासळीचे कालवण नि ढीगभर भात ताटात दिसला की मालवणी मुलखातल्या माणसाचे पोट जेवण्याआधीच तुडुंब होते

मालवणी मुलखातल्या माणसाच्या सुखाच्या कल्पना अगदीच मर्यादित असतात. दुपारी, सध्याकाळी मनपसंत मासळीचे जेवण, रात्री वाडीतल्या भजनात गळाभर समरसून म्हणायला गौळण किंवा अभग, जत्रा दहिकाल्याच्या थडीच्या दिवसात रात्ररात्र जागून पहायला मिळणारी दशावतारी नाटके, गौरी-गणपतीच्या दिवसातली गणपतीच्या निमित्ताने दहा दिवस चालणारी आरास नि हौसमौज, शिमग्यातली रोमटे नि शबय. कुठे गोमूचा नाच, नाहीतर (जुन्या जमान्यातल्या लोकाचे कोतवालाचे सोंग); गावच्या देवळातली वार्षिके, तिथे वदणारे अवसर, वाजणारे ढोल-ताशे, देवाच्या नावाने होणाऱ्या रानडुकराच्या पारधी नि त्याची चांदवडाच्या किंवा कुंभ्याच्या पानावरून घरी येणारी प्रसादाची 'कोटी,' कुठे गवातली पारपारिक भाडणे, मानापानाचे रुसवे-फुगवे, क्वचित् कोणी बाधावरील आंब्यासाठी नाहीतर वईतल्या सागवानासाठी केलेल्या फिर्यादी नि खटले; भाद्रपदात विणाऱ्या म्हशी नि चैत्रातल्या गायी; मांगरात बाधावलीला घातलेले घरचे पाडे; वेळच्यावेळी होणारी कवळतोड; मिरगाला रोहिणीतच सुरू होणारा मनाजोगता पाऊस नि त्यानतर वेळेवर आटोपलेली शेतीभातीची कामे; मार्गशीर्षात कुडणातल्या कलमांना नि काजींना आलेला तुडुंब मोहर; दारातल्या फणसावर फुटलेल्या कुवऱ्या; परसवातल्या बावीचे मिरगापर्यंत टिकणारे पाणी; मुबैला सुक्षेम असलेला नि 'मन्यार्डर' धाडणारा, शब्दाबाहेर न जाणारा चाकरमानी, कणकवली-कुडाळवाडच्या आठवड्याच्या बाजारासाठी हातासरशी असलेले पाचीस रुपये, जाणत्या झालेल्या चेडवासाठी मनपसत 'सोरगत', पाव्हण्यासाठी 'रातचे न्हवा नि सकाळी जावा' असे हक्काने म्हणता येईल एवढी सुबत्ता; त्यांच्यासाठी वडे-सागोतीचे नाहीतर वावणे-रसाचे अपूर्वाईचे जेवण वाढता येईल अशी परिस्थिती; वर्षातून एकदा सत्यनारायण दणक्यात घालता

यावा, एवढी ताकद, म्हाळवसातला म्हाळ; पिंपळाखालच्या ब्राह्मणाला एकदा 'भट वाढणे '

परसवातल्या केळी पोसवून लेकुरवाळ्या व्हाव्या, पाटाकडेच्या कर्दळी–अबोलींनी फुलून तोंडभर हसावे, घरातल्या पोरग्यांनी वेळेवर शाळेत जावे नि नेहमी पैला नंबर काढावा—

अशा सगळ्या गोष्टी घरोघरी, गावोगावी झुस्त पार पडल्या म्हणजे मालवणी माणूस तृप्त असतो त्याला दुनियेत चालणाऱ्या राजकारणाचे पक्के भान असते. कॉंग्रेसची राजवट कशी होती नि जनतावाले कसे आहेत, हे त्याला नेमके कळते नि त्यावर तो हॉटेलात बसून चर्चा करतो. सगळेजण काही पेपर वाचत नाहीत. पण घरोघरी मुंबैवाल्याने आणून ठेवलेले 'ट्रान्झीष्टर' आहेत. ते पहाटेपासून वाजत असतात. त्यावरच्या बातम्या इथली माणसे बिनचूक ऐकतात. मोरारजी देसाईपासून इंदिरा गांधीपर्यंत साऱ्यांच्या गुणदोषांची चर्चा निर्भीडपणे होते, पण मनातल्या गाठीचा पत्ता कुणालाच लागत नसतो. नाथ पैंचे नाव अशा चर्चेत हमखास एकदा तरी निघतेच, आणि नाथ पै आपल्या गावी एकदा आले असता ते कसे दिसत होते, कसे बोलत होते त्यांच्या आठवणी निघतात. स. का. पाटील आणि नाथ पै यांची नावे राजकारणाचा विषय निघाला की घेतल्याशिवाय मालवणी माणसाचे बोलणे पुरे होतच नाही. 'आज नाथ पै होयो होतो–' असे हळहळत म्हणणारी म्हातारीकोतारी माणसे या मुलखात गावोगाव आढळतात. हल्ली शिवसेनेचे वाघवाले बोर्ड गावोगाव आढळतात.

गावची शाळा, ग्रामपंचायत, सोसायटी नि तलाठी–ग्रामसेवक; झालंच तर मलेरिया-वाला साहेब, शेती मदतनीस या सगळ्यांवर गावातल्यांचे बारीक लक्ष असते. पूर्वीचाच हुषार असलेला इथला माणूस गेल्या पाच–पंचवीस वर्षांतल्या हवेने अधिकच बेरकी आणि तरबेज झाला आहे सरकारी अमलदार गावी आला तर त्याला चार–दोन आडवे–उभे सवाल विचारायला तो मुळीच कचरत नाही. सात–बाराच्या उताऱ्यावरील आपल्या जमिनीच्या नोंदी तो वरचेवर तपासून पाहतो. सोसायटीकडून पावसाळ्यात खताचे पोते घेतल्यशिवाय राहात नाही. दारातल्या तुळशीला नि दर्शनी खिडक्या–दरवाज्यांना तो आता तांबडा–निळा ऑईल पेंट देतो नि शोभा वाढवतो.

मालवणी मुलखातल्या प्रत्येक गावचे मुंबैला 'ग्रामविकास मंडळ' असते. त्याच्या नियमित सभा वगैरे होतात. वर्गणी जमवली जाते. गावात एसटी नसल्यास ती यावी, नदीवर पूल बांधून व्हावा, हायस्कूल मंजूर व्हावे, यासाठी हे मंडळ मुंबईहून जोराचे प्रयत्न करीत असते. नवशक्ती–नवाकाळ किंवा मुंबई सकाळसारख्या खास कोंकणी आवडीच्या वृत्तपत्रातून या ग्रामविकास मंडळाचे लोक पत्रे प्रसिद्ध करतात. गावी

आले की तालुक्याला जाऊन बीडीओ, तहसीलदाराला भेटतात. सारे काही सनदशीर मार्गाने चाललेले असते—

सनदशीरपणा हा एकूणच या मातीचा मोठा गुण आहे.

इथे सहसा खून, दरोडेखोरी आढळणार नाही. (अगदी अलीकडे यात थोडाफार फरक पडू लागलेला आहे. मुंबईचा वाढता प्रभाव असे कुणी म्हणतात!) इथला माणूस फौजदारीऐवजी दिवाणी दावा करील नि सुप्रीम कोर्टापर्यंत लढण्याची भाषा करील. एकूणच इथला माणूस कायदा पाळणारा. हल्ली हातभट्ट्यांचे प्रमाण वाढू लागल्यामुळे दारूबंदी कायदा फारसा कुणी पाळत नाही, ही गोष्ट अलाहिदा. परंतु स्वतः कायदा हाती घेण्याऐवजी तो वकिलाच्या हातून राबवण्याकडे कल अधिक.

वर्षानुवर्षे पत्रव्यवहार करूनही एखादा पूल वा गावाचे विद्युतीकरण सरकारने मंजूर केले नाही तर ग्रामविकास मंडळाची गोवालिया टँकच्या किंवा नरेपार्कच्या मैदानात (मैदानात सभा घेतल्या की हॉलचे पैसे वाचतात!) सभा होते व येत्या निवडणुकीत आम्ही मतदानावर बहिष्कार घालण्याचे ठरविले आहे, अशा आशयाची पत्रे वृत्तपत्रांतून प्रसिद्ध केली जातात. मतदान, लोकशाही, हक्क आणि आपली तसेच सरकारची कर्तव्ये याबाबत येथल्या माणसांची नेमकी आणि सनदशीर अशी वृत्ती दिसून येते. महाराष्ट्राच्या आणखी कोणत्या मुलखात ही प्रवृत्ती एवढ्या प्रकर्षाने आढळत असेल असे वाटत नाही.

मालवणी मुलखातल्या गावोगावच्या चालीरीती परंपरेने चालत आलेल्या आहेत. गावच्या देवावर पराकाष्ठेची भक्ती. त्याचा 'कौलप्रसाद' घेतल्याशिवाय या मुलखात कोणतीही गोष्ट पार पडत नाही. देवदेवस्की हवीच. 'बारापाचाचे' गाऱ्हाणे नि 'चौघचारी जाबसाल.' म्हणजे रामबाण! बारापाचाचे गाऱ्हाणे घालणारा वाडी, गुरव किंवा मानकरी ग्रामदेवतेसमोर उभा राहतो नि गंभीर मुद्रेने गाऱ्हाणे घालतो—

जै देवा म्हाराज्या गांगो घाडवसा,
बाराच्या पूर्वसा–
जैना रामेश्वरा–
सातेरी कमरादेवी, भावय बिरामन,
चौरेच्या चाळ्या, शिम्या म्हारथळा–
आटकाऱ्या, पिटकाऱ्या, काठीकारा, गाडीकारा–
तर देवा! आज बारा पाच जमान
तुका आज जाबसाल करतंव!

खलेल्या सगळ्याच्या नावान्
समजेचा पान ठेवलंव !
रामेश्वराच्या नावान् अक्षरी नजार ठेवलंव
या नजरेर नजार खरी करूची—
आसलली बारा थळा समजेक् येवची—
आज तूं खऱ्या बऱ्याच्या सामीलनाम्याक येवूचा
इतक्याव करून खय खोटी कलमदारी
चळात—चुकात, मागे व्हवात्
तर चांद सूर्याक चुकात !
धरित्री मातेक चुकात !
अशी आज बारा पाच भावणूक करतव्
तर म्हाराज्या ! यश दी- सगळ्यांचा, गावगाव्याचा,
रयत रोंबावळीचा, बरा कर रे म्हाराज्याऽऽ

आणि यातील प्रत्येक कडव्याच्या शेवटी मागे उभे राहून सगळे गावकरी 'होय म्हाराज्याऽऽ' असे जोरसात म्हणतात.

हा जावसाल केला की कसलेही संकट असो, त्याचे निराकरण ग्रामदेवता करणारच, ही साऱ्याची परमश्रद्धा—त्यात काडीमात्र चूक नाही. अशिक्षित, सुशिक्षित सारेजण ह्या गाऱ्हाण्यात भक्तिभावाने सामील होतात—देवाचा अंगारा (विभूत) म्हणजे वज्रलेप औषध मानले जाते—

मालवणी मुलूख विलक्षण श्रद्धाळू आहे.

त्याचा गावगाडा गावच्या देवळाभोवती आणि पिढीजाद परंपरेभोवती फिरत असतो.

गावच्या देवळातली वार्षिक समाराधना तो न चुकता घालतो. समाराधनेचे जेवण करायचे ते भटानी (ब्राह्मणानी !) मालवणी मुलखातील भट म्हणजे चित्पावन किंवा कऱ्हाडे ब्राह्मण नि बामण म्हणजे मासे खाणारे सारस्वत आणि कुडाळदेशकर ! गावकऱ्यांनी आणलेली लाल भोपळ्याची भाजी, तांदळाची किंवा गव्हाची खीर (सोजी) आणि वरणभात हा समाराधनेचा मेनू ! देवळाच्या ओवऱ्यात बसून संध्याकाळी पाच वाजता वडाच्या पत्रावळीवर जेवलेले हे प्रसादाचे जेवण पंचामृताची चव देते.

समाराधनेसारखीच 'भट वाढणे' ही पद्धत गावोगाव रूढ असलेली. पावसाळ्या-

नतर गोठ्यातील गुरे बाहेर ‘ कावणात ’ बाधायची. हे ‘ कावण तयार झाले की त्यात ‘ भट वाढायचा. ’ म्हणजे भटाला शिधा देऊन त्याच्या हातचे जेवण राधून भटासकट साऱ्यानी जेवायचे ! त्याआधी चतुःसीमेवरच्या ब्राह्मणाला, महापुरुषाला, घरादाराची, गुराढोराची ‘ रखवाली ’ कर म्हणून नारळ ठेवून गाऱ्हाणे करायचे

देवदिवाळी आटोपली की मालवणी मुलखात सर्वत्र रानावनातून ‘ गवळदेव ’ पुजायची, त्याच्यासाठी जेवण करायची पद्धत आहे. ‘ गवळदेव ’ म्हणजे गवळ्याचा, राखण्यांचा देव. त्याची वसती रानात. त्याचा प्रसादही रानामाळावर बनवायचा. पण त्यासाठी भट हवाच असे नाही. गावाबाहेरच्या वडाचादवडाखाली चार गुळगुळीत धोंडे असतात, तोच गवळदेव. वर्षांतून एकदा त्याच्यावर गधाक्षता पडतात. पण तो वर्षभर गुराढोराची रखवाली करत असतो.

मालवणी मुलखात अशा अनेक रूढी गावोगाव चालू असतात. ‘देसरूढ’ हीसुद्धा त्यातीलच एक प्रथा. पावसाळ्यात, बहुधा आषाढ–श्रावणातील एका विशिष्ट वारी गावातील क्लेश, अरिष्टे, किरीवारी यांचे निर्मूलन होण्यासाठी गावकरी ही फेरी काढतात. एका परडीत विशिष्ट सामान घेऊन देसरूढीचा मानकरी—पूर्वी हा बहुधा महार असे—पुढे धावत असे नि पाठीमागून ‘ चल, चल, चल ’ म्हणत वाद्ये वाजवीत गावकरी धावत, गावाबाहेरच्या विशिष्ट ठिकाणापर्यंत जाऊन त्या ‘ परडी ’चे विसर्जन करीत. ही परडी आणि भेसुर वाजणारी वाद्ये दारातून जाताना घराची दारे लावली जात !

‘ देसरूढ ’ निघाली की गाव अरिष्टमुक्त झाला, ही समजूत.

गणपती, शिमगा, शिवरात्र, रामनवमी, श्रावणी सोमवार हे उत्सव या मुलखात धूमधडाक्याने साजरे होतात. शिमग्यातली ‘ रोमटे ’ गावोगाव निघतात. इथली ‘ होळी ’ उच असते. होळीचा ‘ माड ’ पाच दिवस असतो. निशाण घरोघर फिरते, ‘ शबय ’ मागत पोरेसोरे सोंगे काढत आवाठातून फिरत असतात. गूळखोबऱ्याचा तोबरा भरतात. दशावतार, दहिकाले याची एक निराळी रगत असते. एकूणच हा मुलख उत्सवप्रिय, सणाचा शोकीन, परपरेत गुरफटलेला.

आपल्या मुलखाबद्दल जातिवत अभिमान, हे इथले आणखी एक वैशिष्ट्य. ‘ आम्ही मालवणी ’ असे पूर्वी सांगताना, माणसाना लाज वाटे मुबईत मालवणी माणूस गडी, चाकर, गिरणीकामगार, शेठीयाच्या बगल्यावरचा माळी, मशालजी म्हणून अनेक पिढ्या गरीबपणे वावरला. बाणकोटी बाल्या म्हणजे घरगडी ‘ रामा ’ आणि मालवणी माणूस म्हणजे पोलिसातला ‘ सखाराम ’ किंवा गिरणीतला तुकाराम ! सगळी चतुर्थश्रेणी– या चतुर्थश्रेणीच्या गरीबपणाने वर्षानुवर्षे आमच्या या मुलखाला

न्यूनगंड दिला– मालवणी बोली आणि मालवणी मुलखाचे नाते उच्चारताना इथली माणसे लाजत.

आता हे बदलते आहे

आमचे लोक 'मालवणी स्नेहसंमेलने' उत्साहाने आणि अभिमानाने भरवू-लागले आहेत. त्यातून सगळी भाषणे चक्क मालवणीतून होतात. एका मालवणी संमेलनात तर महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव, एक राष्ट्रीय पातळीवरील वरिष्ठ सनदी अधिकारी कुडाळचे द. म. सुकथनकरसाहेब सुद्धा चक्क मालवणीमध्ये बोलले! मुंबईमध्ये आता मालवणी बोली आम्ही लोक सर्वत्र आदराने, अगत्याने बोलतो, ती बोलताना कमीपणा पूर्वी वाटे, तो आता वाटत नाही. आमची मालवणी नाटके [illegible] तुडुंब गर्दीत चालतात.

एकेका मुलखाचे भाग्य उजाडावे लागते.

मालवणी मुलखाचेही ते उजाडते आहे.

## मालवणी माणूस—

२३.

खारेपाटणच्या खाडीपासून खाली तेरेखोलपर्यंतचा हा चिमुकला भूप्रदेश म्हणजे परमेश्वराने घडविलेले अद्‌भुत रसायन आहे. आणि इथे रहिवास करणारा माणूस तर त्याहून अजब म्हटला पाहिजे. तसं पाहिलं तर हा मुलूख, कोंकण प्रांताचाच एक तुकडा. कोंकणी लोकवैशिष्ट्याचे सर्व नमुने इथे आढळतात. पण हाताची सर्व बोटे सारखी नसतात. तसे कोंकण प्रांताचेही चार जिल्हे एकमेकापासून अनेक परींनी भिन्न आढळतात. मालवणी मुलूख म्हणजे आताचा सिंधुदुर्ग जिल्हा. या चारही कोंकणी जिल्ह्यामध्ये स्वतःचे वेगळेपण टिकवून आणि जोपासून आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे इथला माणूस !

मालवणी माणूस आहे तरी कसा ?

आमच्या या मुलुखातील तीन गोष्टी अशा विलक्षण आहेत, त्यांना जगात कोठे तोड नसते.

एक म्हणजे हापूस आंबा.

रत्नागिरीच्या हापूसची जगभर ख्याती आहे, असे रत्नागिरीकर म्हणतात. पण मोत्याचा पारखी जसा काल्वाच्या पोटात सापडलेले अस्सल मोती कोणते हे एका दृष्टिक्षेपात ओळखतो, तसा आंब्याचा दर्दी, देवगडच्या कातळावरच्या आंब्याचे रत्नागिरीच्या आंब्यापेक्षा असलेले निराळेपण क्षणात पारखतो ! हापूस हा देवगडचाच. तीच गोष्ट इथल्या मासळीची ! कर्लीची काटेरी मासळी कोंकण किनाऱ्यावर सर्वत्र मिळते, पण आचऱ्याच्या खाडीतल्या कर्लीची चव दाभोळच्या खाडीत मिळणार नाही. आणि या मासळीसाठी मालवणी मुलुखात नारळाबरोबर जी एक स्वादिष्ट चीज वापरतात, तीही हा मुलूख सोडला तर कोंकणात इतरत्र आढळणार नाही. (गोवा—कारवारचा अपवाद.) ती चीज म्हणजे तिरफळे !

हापूस, कर्ली नि तिरफळे या अव्वल चिजा केवळ या भूप्रदेशाच्याच—

हो, आणखी एक.

हा प्रकार जीवघेणा, विषारी आहे.

त्याला ‘ फुरसे ’ म्हणतात. जेमतेम वीतभर लांबीचे हे जिवाणू चावले तर हा हां

म्हणला माणसाचा जीव घेते!

मालवणी मुलुखातल्या माणसाजवळ या सर्व चिजांचे चमचा चमचा मिश्रण असते. हापूसचा स्वादिष्ट गोडवा आमच्यामध्ये खासच आहे. कर्लीचा काटेरीपणा भरपूर आहे आणि तिरफळाचा मिरमिरीत, झोंबरेपणाही असावा तितका आहे. शिवाय फुरशातला विखारही आमच्या वागण्या-बोलण्यात तरी अधिक प्रमाणात आढळतो—

त्याशिवाय अडसराचा कोवळेपणा, गोडपणा,

फणसाचा रसाळपणा ..

कातळाचा खडबडीतपणा

आणि अबोली सुरंगीचा रसिकपणा

या साऱ्या गुणादुर्गुणांनी मालवणी माणूस बनला आहे. पुन्हा या मुलुखातल्या प्रत्येक गावचे वैशिष्ट्य आहेच. सावंतवाडी आणि वेंगुर्ले [illegible]

भाडभीड न बाळगणारी. वाडीची वाडकर माणसे फक्त उभादांडेकरांनाच तोंड देऊ शकतील! पण वागण्या बोलण्यात फटकळ वाटणारी, तिरफळासारखे झणझणीत शब्द सहज वापरणारी, कर्लीचा काटेरीपणा ठायीठायी दाखवणारी इथली माणसे अंतःकरणात केवळ अडसराचीच आढळतील. मनस्वीपणा हा इथल्या मातीचाच गुण. बोलतील तेही टिपेत नि चालतील तेही झोकात—

.कावेबाजपणाही तसाच—

पूर्वी एकेकाळी कुणा एकाची खाणावळ वेंगुर्ले बंदरात होती. खाणावळ चवदार जेवणासाठी प्रसिद्ध. विशेषत' माशाची आमटी तर मालकीणबाई स्वतः बनवायच्या. ती 'सुरबुस' आमटी चाखण्यासाठीच लोक पुन्हा पुन्हा त्या खाणावळीत जात घरचे जेवण झाले तरी त्या आमटीसाठी लोक हपापल्यासारखे जात—

या मालवणी खाणावळवाल्याने बोटीच्या पॅसेंजरांना ठकवण्याची एक मुलखा-वेगळी शक्कल शोधून काढली. खाणावळीत पॅसेंजर जेवायला आले की तो अखेर-पर्यंत त्यांना ताटकळत ठेवी, आतून इसवणाचे, सरंग्याचे तुकडे तळल्याचा खमंग वास बाहेर दरवळू लागे आमटीला दिलेली खोबरेलाची फोडणी जेवणाची वाट पाहणाऱ्यांच्या नाकात घुसे नि त्यांचा जीव जेवणासाठी अधीर होई—

'मामानू! जेवण झाला?'

'झालाच तर काय! वांयच थांबा, मार्किटात ताजे तुळे नि पापलेटा आलीसत, मुद्दाम माणूस पाठवलसंय आणूक—तो आयलो की ताजो बाजार तुमच्या ताटात वाढतलंय. वांयच धीर धरा—'

ताज्या पापलेटासाठी थोडी कळ काढायलाच हवी, असे म्हणत पॅसेंजर बापडे वाट बघत. तोच गोव्याकडून येणारी बोट बंदरात येऊ लागे नि तिचा भोंगा वाजू लागे—

'मामा, जेवण वाढा. बोट इली!'

'बसा बसा, आणा ता वाढतंय—' म्हणत खाणावळवाला मामा गरम गरम भात नि उकळती आमटी ताटात ठेवून पॅसेंजराना जेवायला बोलवी. तिकडे बोट बंदरात आलेली, इकडे आधणातून काढलेला खतखतीत भात. जेवणाचा रुपया मामाने आधीच वसूल केलेला! पॅसेंजर घासभरसुद्धा न जेवता बोटीचे खपाटे सुटतील म्हणून धावत सुटत. असे सांगतात, की शेवटी, या लब्बाड माणसाला धडा शिकवला तो एका वाडकराने! सावंतवाडीचा तो पासिंजर बोट सुटायला आली तरी पानावरून उठेना! खाणावळवाला मामा घाई करू लागला– 'अवो, आटपा बेगीन. बोट सुटली.'

'सुटली तर सुटांदे, मियां उद्या जायन–पण आज प्वॉटभर जेवतलय. तरग्याचे दोन तुकडे हाडा–'

मामाच्या पातेल्यातला सगळा भात, सगळी आमटी नि तव्यावरचे सगळे मासळीचे तुकडे संपवूनच गडी हात धुवायला उठला.

मामाने मग गाशा गुडाळला नि वेंगुर्ल्याची खानावळ थेट देवगड बंदरात सुरू केली.

देवगड सावंतवाडीपासून खूप दूर ..!

असा इरसालपणा आमच्या मुलखात वेगवेगळ्या रूपांत गावोगाव आढळेल. कारण इथला माणूस मूळचाच तिरका चालणारा!

पण जेव्हा तो सरळ मार्गाने चालतो तेव्हा जगावेगळे मोठे गुण दाखवतो! पिढ्यन्पिढ्याच्या दारिद्र्यातून अंगी बाणलेले हे तिरकसपण सोडले तर इथला मूळ पुरुष डोंगराएवढ्या सद्गुणाचा. राष्ट्रभक्ती, समाजसेवा, स्वातंत्र्यप्रेम, समता, आणि पुरोगामित्व प्रकट व्हावे ते प्रकर्षाने इथेच! माझा एक मालवणी मुलखाचा जरा अधिकच अभिमानी असलेला मित्र मला म्हणाला,

'आम्ही जेवढे हुतात्मे स्वातंत्र्ययुद्धात दिले तेवढे दुसऱ्या कुठल्या प्रदेशाने दिले आहेत? एका सिंधुदुर्ग जिल्ह्यात ज्ञात हुतात्म्यांची चार स्मारके आहेत, करूळला कर्णिक, आचऱ्याला कोयंडे, मालवणला रेगे नि आरोंद्याला घुर्ये! झालंच तर संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील एकशे पाच हुतात्म्यांपैकी सिंधुदुर्ग जिल्ह्यात त्यांची संख्या सगळ्यात अधिक आहे! गोवा लढ्यात आमच्या बांदेकर सावंतवाडीकर मंडळींनी किती कष्ट उपसले! शिरोड्याच्या मिठाच्या सत्याग्रहात आमचे किती लोक तुरुंगात गेले! आम्हाला कोणी देशप्रेमाच्या गोष्टी सांगू नयेत!'

आणि ते खरंच आहे, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये ध्येयवादी माणसांचे एक पीक एकेकाळी येऊन गेले. शिरोड्याने मीठसत्याग्रहाच्या निमित्ताने अवघा वेंगुर्ले तालुका

चेतवला, त्यानंतरच्या काळात तेथे नाथ पै, सावंतवाडीला आबा शिरोडकर, बाप्पा धारणकर, कुडाळला पाटणकर, कणकवलीला उचले, कोदे, तपकीरकर, आप्पा पटवर्धन, मालवणला दादा महाजन, भाडारकर, करमळकर, देवगडला मुज, विजयदुर्गाला परुळेकर, फोंड्याला दाजी सबनीस, डॉक्टर आपटे अशी कितीतरी कार्यकर्ती मंडळी स्वातंत्र्यपूर्वकाळात समाजासाठी, देशासाठी झटत होती. हे सर्व मालवणी मुलखाचे वैभव. गाव सोडून मुंबई–पुण्याला जाऊन गुणवत्ता प्रकट करणाऱ्याची संख्या तर अफाटच क्रीडा, साहित्य, शिक्षण, राजकारण, नाटक, चित्रपट, शिल्पकला, संगीत, कारखानदारी, व्यापार या सर्व क्षेत्रामध्ये अग्रेसर असलेली कित्येक नावे मालवणी मुलखाने दिलेली. गावी राहूनही शेती बागायतीमध्ये चमत्कार करून दाखवणारे कुबल, चमणकर, गोगटे हे याच मातीचे वारस—सनदी नोकरीमध्ये या मुलखाने रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी भास्करराव आडारकरांच्या रूपाने आपला माणूस पाठवला नि आजच्या घडीला महाराष्ट्रासारख्या देशातल्या अव्वल दर्जाच्या राज्याच्या मुख्य सचिवपदीही द. म सुकथनकराच्या रूपाचे तोच वारसा पुढे चालू ठेवला !

या प्रदेशाला राजकारणाचे, नाटकाचे आणि गजालींचे फार वेड. इथली माणसे वृत्तपत्रे फार काळजीपूर्वक आणि नियमाने वाचतात मुंबईची वर्तमानपत्रे तर त्यांना वाचायला हवीतच. पण पणजी, बेळगाव-कोल्हापूर, रत्नागिरी, चिपळूण या लगतच्या भागातले पेपरही इथला वाचक कटाक्षाने वाचतो शिवाय स्थानिक वृत्तपत्रे आहेतच. कणकवली, सावंतवाडी येथे दैनिके आहेत, तर देवगड, मालवण, कुडाळ, सावंतवाडी, वेंगुर्ले या प्रत्येक तालुक्याच्या गावी साप्ताहिके आहेत. वाचकांच्या पत्रव्यवहारात मालवणी माणसाची पत्रे नेहमीच प्रसिद्ध होतात, एस. टी. पासून तो जागतिक प्रश्नापर्यंत इथला माणूस अहमहमिकेने चर्चा करू शकतो. इथल्या गावोगावची वाचनालये, ग्रंथालये समृद्ध आहेत वेंगुर्ले, सावंतवाडी येथे तर शंभर वर्षांपूर्वीच्या लायब्ररी आहेत मुळातच इथला माणूस बुद्धिजीवी, विद्याप्रेमी–ग्रंथप्रेमी—

त्यातूनच राजकारणाचे वेड जन्माला आले. स्वभावाचा मनस्वीपणा राजकारणातही पुरेपूर उतरलेला. सर्व राष्ट्रीय व प्रांतिक पक्ष इथे आहेत. निवडणुका जवळ आल्या की प्रचाराची सर्वत्र उडते तशी इथेही धमाल उडते. पण इथला मतदार भावनेच्या भरात वाहून जात नाही. सगळ्याचे ऐकून स्वतःचे मत पक्के करतो. त्याचा मनस्वीपणा यावेळी बाजूला राहतो नि सावध व्यवहारी मन जागे होते—

राज्यकर्त्या पक्षाचा विरोध हे येथील मतदाराचे वैशिष्ट्य गेल्या कित्येक निवडणुकांतून तो विरोध प्रकट होताना आढळतो. विविध राजकीय पक्षांतील कित्येक राजकीय नेते या जिल्ह्याने पुरवले. मुंबईच्या कामगार चळवळीत, कॉर्पोरेशनमध्ये मालवणी माणसे नेहमीच चमकली कामगार चळवळीतले सर्वांत गाजलेले प्रदीर्घ संप कॉमरेड डांग्याच्या नेतृत्वाखाली एकेकाळी यशस्वी करण्यात मालवणी गिरणी-

कामगार—त्यात बायाही आत्या–आघाडीवर असत. ‘ डांगो इलो ’ म्हणताच घराघरातले मालवणी कामगार बाहेर पडत. संप करायचा कोंकणी कामगारानी नि तो फोडायचा घाटावरच्या लोकांनी, असे पूर्वी चालायचे कोंकणचा मालवणी कामगार कधीही द्रोह करणारा नव्हता. आजही त्याचे हे वैशिष्ट्य उठून दिसते!

राजकारणाइतकेच नाटकाचेही इथल्या माणसाला वेड! तो स्वतः नाटके पाहणार (तिकिटे काढून) नि नाटके बसवणार मुंबईच्या व्यावसायिक रंगभूमीचे गाजलेले नाटक येथे आवर्जून येते. मालवण—वेंगुर्ल्याच्या रसिकाची मान्यतेची पावती मोलाची मानली जाते. पण कंपनीच्या नाटकाचा प्रयोग गचाळ होऊ लागला तर पहिल्या रांगेत भारी तिकीट काढून बसलेले प्रेक्षक न बोलता निघून गेलेले मी पाहिले आहेत! ‘ तुमचे नाटक भिकार आहे ’ हे सांगण्याचा याहून अधिक परिणामकारक मार्ग दुसरा कोणता? थिएटरे झापांची असतात, तरी इथे नाट्यप्रयोग रंगतात–या भूमीलाच रंगदेवता प्रसन्न आहे. रांगणेकर, कालेलकर, वरेरकर, आत्माराम भेंडे, जयवंत दळवी, मतकरी, खानोलकर, कमलाकर सारंग अशी जुनी–नवी नावे किती सांगावीत! कामगार रंगभूमी गाजवलेले वसंत जाधव, दुदवडकर इथलेच. ‘ ललाटलेख ’ कर्ते कदमही याच भूमीतले! दशावतार तर इथल्या नाट्यक्षेत्राचा प्राणवायू! दशावतारी खेळ झाला नाही असा एकही गाव या मुलखात सापडणार नाही.

इथला माणूस नाटकाइतकाच गजालीत रंगतो! ‘ गजाली ’ म्हणजे रिकामटेकड्या गप्पा त्या हॉटेलातील बाकड्यावर चायचा घोट नि विड्याचे झुरके यासोबत चांगल्या रंगतात. गजाली छाटणाऱ्यामध्ये कुणीतरी नाटकी असतोच. तो सांगताना भरपूर नाट्य निर्माण करतो. एखादी गजाल मग अशी रंगते की ऐकणाऱ्याला वेळेचे भान उरत नाही

पण रिकामटेकड्या गजालकरांना वेळेचे भान कशाला हवे? मुंबैवाला ‘ मन्यार्डर ’ महिनामहाल पाठवतो; पावसाळ्यात चार महिने जी धडपड केली त्याचे पाच–दहा मण भात कणगीत असते. कष्ट करायला हवेत कशाला! मुंबैवाल्याने हवे तर गिरणीत राबावे! आपण गावी राहून मजेत गजाली छाटाव्या! कित्येक पिढ्या ही विचारसरणी राहिल्यामुळे इथला माणूस परिस्थितीने गरीब राहिला. आळशीही बनला. त्याची हेटाळणी सुरू झाली गरिबीने त्याचा घात केला. या गरिबीला कंटाळलेला इथला माणूस एक दिवशी उठला नि बोटीत बसला. भाऊच्या धक्क्यावर उतरला तेव्हा मुंबैच्या नवलाईने, श्रीमंतीने, हुषारीने त्याचे डोळे दिपले—त्याच क्षणी त्याने ठरवले; इथे भरपूर कष्ट करून पैसा कमवायचा, नाव कमवायचे—मुंबईला येऊन मोठा असामी व्हायचे. मग कितीही घाम गाळावा लागला तरी हरकत नाही—

या जिद्दीवर या मुलखातली हजारो माणसे मुंबईला जाऊन मोठी बनली. महाराष्ट्र

देशाच्या नकाशावर त्यानी आपले नाव कोरले. ' माका तुका ' बोलत त्याने ' मला तुला 'च्या मराठी भाषेला, मराठी प्रदेशाला समृद्ध केले.

पण गावी राहिले ते तसेच धडपडत, चाचपडत राहिले. कालपरवापर्यंत गावी वाईट परिस्थिती होती. माणसे हुषार होती, पण रस्ता सापडत नव्हता. इथे कारखाने नव्हते, शेतीबागायतीबद्दल मार्गदर्शन होत नव्हते. व्यापारउदीम नव्हता-बोट बंद झाल्यामुळे बंदरपट्टी ओस पडली होती. गरिबी होती तशीच पुढे वाट चालत होती.

मग मनू पालटू लागला, मालवणी मुलुखात कारखाने आले, जिल्हा स्वतंत्र झाल्यामुळे सरकारी कचेऱ्या वाढल्या. नोकऱ्या गावीच मिळू लागल्या. चमणकर, कुबल यांनी खडकातून हापूसच्या बागा उठविलेल्या बघून सामान्य शेतकऱ्यानाही सुरसुरी आली. सरकारी योजनाची सबसिडी मिळू लागली. आंबा, काजू या धनवान पिकाचा ध्यास इथल्या शेतकऱ्याने घेतला आणि गेल्या पाचदहा वर्षांत बागायतीवर इथला माणूस पैसा कमावू लागला आंबा-काजूची उलाढाल नगद पस्तीसचाळीस कोटींची होऊ लागली !

इथला माणूस वीरश्री आली, म्हणजे असा कोणताही चमत्कार करून दाखवतो. त्या वीरश्रीसाठी त्याला कोणीतरी प्रेरणा द्यायला हवी. ती ठिणगी एकदा कुणीतरी त्याच्या डोक्यात टाकली की तो त्याचा उरत नाही ! या मुलखातून सामान्य परिस्थितीची बीजे अंगाखांद्यावर वागवीत बाहेरच्या प्रांतात गेलेल्या कैक माणसानी हा चमत्कार घडवून दाखवला ! ब्रिटिशांच्या काळात इथल्या कुडाळ सावंतवाडीकडील लोक थेट कराचीला गेले नि तिथे परमुलखात मोठे झाले. पैसेवाले, नावलौकिकवाले बनले. त्याही आधीच्या काळात तर मजूर म्हणून मॉरिशसला गेलेली नि आज तेथे सत्ताधीश बनलेली मराठी मंडळी मालवणी मुलखातलीच ! ' पलटणवाले ' नि ' पोलीसवाले ' अशी मिरासदारी बाळगणारी इथली कित्येक गावे ! त्या गावच्या मंडळींनी पलटणीत शिरून लढाया गाजवल्या ! पोलिसातला साधा हवालदारही गुन्हे शोधून काढण्यात विलक्षण तरबेज ! तल्लख-शूरत्वाबरोबरच इथे भाविक अध्यात्मही खूप आहे. इथल्या इन्सुली-बांद्याचे संत सोहिरोबा आंबिये ग्वाल्हेर दरबारात गेले नि आपल्या श्रेष्ठ साधुत्वाची पताका त्यानी तिथे फडकवली ! इथल्या माणगावचे संत वासुदेवानंद सरस्वती गुजरात प्रांती जाऊन भक्तिमार्गावरील दिव्य नंदादीप बनले ! वेंगुर्ल्याचे टाकी महाराज, पिंगुळीचे संत राऊळ महाराज, कणकवलीचे भालचंद्र महाराज, दाणोलीचे साटम महाराज, मसुऱ्याचे बागवेबुवा, ही या मुलखातील उज्ज्वल संतपरंपरा !

कर्तृत्वाने विलक्षण संपन्न असलेली येथील माणसे आणि या माणसाना जन्म देणारी ही लाल माती. खडकाळ, वरकस जमीन ! या जमिनीचे सारे बरेवाईट गुण इथल्या माणसात प्रगट होतात. इथला माणूस मानी, काहीसा दुराभिमानी, मोडेन

पण वाकणार नाही, या अहंकारी बाण्याचा. मिस्किल, फटकळ, उघड्या मनाचा, स्वच्छ अंतःकरणाचा, कलाप्रेमी, रसिक, भाविक, हट्टी, भांडखोर, तिरके बोलणारा, तिरके वागणारा, पण आतून सरळ, कनवाळू, मायाळू. अप्रामाणिकपणा त्याला सहन होत नाही. गरिबीतही मागीलदाराने शेजाऱ्याकडून चहापुरते दूध मागून आणून तो पाहुण्याचे आतिथ्य करील आणि पाहुणा नकोसा वाटणारा असला तर त्याला खुबीने बाहेर घालवील. अशा वेळी तो मानभावीपणाने म्हणेल—

'पाव्हन्यानू, इलास!

बसा, बसा–

बसतलास तर डाळी आसा–

खातलास तर पान आसा–

जेवतलास तर पेज आसा–

जातलास तर सकळ आसा–

पिपळाखुडसून वाट आसा!'

भाऊबदकीची भांडणे तो तावातावाने लढवील, वाटण्या मागेल— सात बाराला आपले नाव आहे ना, याची तो सतत दक्षता बाळगील. 'तुझे मला नको, माझे तुला देणार नाही' हा बाणा. भांडण झालेच तर तो कायद्याला धरून भांडेल बेसनदशीर वागणे त्याला माहीत नसते. त्याचे दुसऱ्याशी सतत मतभेद होत असतात. कुठलीही गोष्ट तो सुखासुखी मान्य करीत नसतो. त्याच्या जिल्ह्याचे केंद्र कोठे असावे, त्यावरही त्याचे एकमत होत नव्हते! ओरोस, कुडाळ की सावंतवाडी, या वादाने त्याची सातआठ वर्षे खाल्ली! त्यासाठी इथला माणूस थेट सुप्रीम कोर्टापर्यंत गेला! त्याचा कायद्यावर, कोर्टावर, कायदेशीर वागण्यावर अजून विश्वास आहे तो कोर्टकचेऱ्या करील, गुंठाभर जमिनीसाठी किंवा हद्दीवरील आंब्याच्या न धरत्या झाडासाठीही त्याचे पूर्वज प्रीव्ही कौन्सिलपर्यंत लढलेले आहेत. अशी त्याची लढाऊ परंपरा असली तरी केवळ सनदशीर लढाईपुरती. मालवणी माणूस बुद्धीने भांडेल, कज्जेदलाली करील; पण कायदा हातात घेणार नाही. मारामारीच्या किंवा खुनाच्या प्रकरणात तो कधीच सापडणार नाही.

रक्ताच्या लाल रंगापेक्षा अबोलीच्या बळेसराच्या लाल रंगात इथला माणूस अधिक रंगतो, अधिक खुलतो!

जगातल्या घडामोडींवर त्यांचे बारीक लक्ष असते. त्यावर त्याची अस्सल मालवणीतून खमंग टीकाटिप्पणी चालू असते. सोल्कढी एवढीच त्याला ही टीकाटिप्पणी प्रिय असते. कोणत्याही गंभीर विषयाचा पंचनामा इथे खिल्ली उडवण्याच्या आविर्भावात पार पाडला जातो. हल्ली तो मालवणी स्नेहसमेलन भरवतो, पण तिथेही 'काय चुकले' याचीच चर्चा संमेलनानंतर कित्येक दिवस चालू असते! मालवणी

माणसाला एकूणच जगात ' कुणाचे काय चुकले ' ते शोधण्यात आणि त्यावर चर्चा करण्यात फार रस--

पण तरीही हा माणूस लोभस आहे, ज्यावर प्रेम करावे, असाच तो अंतर्बाह्य आहे, त्याला राग येऊ शकत नाही. आला तरी फार काळ टिकू शकत नाही.

हापूस आंब्याचा गोडवा आणि स्वाद, कर्लीचा काटेरीपणा, तिरफळाचा झोंबरेपणा आणि फुरशाचा विखार जवळ असलेला माझ्या मुलखातला हा जगावेगळा माणूस मला फार फार प्रिय आहे तो माझा आहे आणि मीही त्याचाच, त्याच्यातलाच एक आहे, हेच याचे एकमेव कारण असावे !

# २४. आणि बाईमाणूस !

पूर्वी गावाजवळच्या मालवण किंवा देवगड बंदरात बोट अगदी पहाटे पोचायची आणि मुंबैहून आलेल्या चाकरमान्यांना घेऊन पहिली एस्टी अगदी मिणमिणताना गावातील रस्त्यावर येऊन उभी रहायची. नुक्त्या उठलेल्या सासुरवाशिणीची आशाळभूत नजर त्या एस्टीकडे नि उतरणाऱ्या पासिंजराकडे जायची. आपलाही ' चाकरमानी ' आला असेल का या एस्टीतून ! किती महिने झाले त्याला जाऊन ? पत्र तरी वेळेवर पाठवाव ? किती वाट पहायची माणसानं ? देवी सातेरी, सुक्षेम ठेव् गे बाय माझ्या घोवाक् आसात थंयसर...

मालवणी मुलुखातल्या घराघरातील बायकांची ही अवस्था अटळ असते. बहुतेकजणींचे ' घोव ' पोटापाण्यासाठी मुंबैला गेलेले असतात आणि गावी त्या एकट्याने सासूसासरे, दीरनणंदा आणि त्यांच्याबरोबर शेतीभाती, घरदार, परडे, परसू, गुरेढोरे सांभाळीत दिवस काढीत असतात. मग रस्त्यावर उभी राहणारी मुंबईची एस्टी ही पुन्हापुन्हा भेटावीशी वाटणारी मैत्रीण बनते–ती थेट मुंबैहून–' त्यांच्या ' गावाहून आलेली असते. जणू त्यानाच भेटून आलेली असते. आणि त्या एसटीतून उतरलेला कुणीही चाकरमानी तिला जवळचा वाटू लागतो. लाजभीड गुंडाळून ठेवीत ती दुपारी वेळ काढून त्याच्या घरी जाते. चाकरमान्याच्या घराला मुंबईचा वास येत असतो. नवे कपडे, बोंबील, बटाटे याची त्या घरात रेलचेल झालेली असते. मुंबईच्या मिठाईचा एखादा तुकडा चघळत पोरे दारात खेळत असतात. चाकरमान्याचा बनियन नि पट्ट्यापट्ट्याचा पायजमा बाहेरच्या दोरीवर वाळत असतो. तिला भरून येते. त्या पायजम्याकडे ती ओढाळपणे बघते. तिचा घोव आला की तीही अशीच त्याचे कपडे घेऊन अपूर्वाईने व्हाळावर नेऊन लख्ख धुणार असते, असेच दोरीवर टांगणार असते– त्याने आणलेला चावी छाप साबू तिने जपून वापरलेला असतो. स्वतःच्या कपड्यांसाठी घरची ' रिंगी ' भिजत घातलेली असतात–शेजारच्या घरचा चाकरमानी मध्येच गावी आलेला पाहून तिच्या घशात हुंदका येतो. आपलाही चाकरमानी असा मध्येच, अवेळचा येईल तर ! त्यालाच कशी रजा गावत नाही ?

की तिकडे कुणा बाईच्या मोहात पडला असेल ? पत्रसुद्धा कसं नाही ? मनिऑर्डर-सुद्धा या महिन्याला आली नाही ! सुखरूप तर असेल ? नोकरीपाणी तर धड चालू असेल ?

अशा नाना शंकांनी कुरतडणारे मन सावरीत ती शेजारच्या चाकरमान्याच्या दारी जाऊन उभी रहाते. परशुराम म्हसकर नुक्ता चहा पिऊन माच्यावर बसलेला असतो नि त्याच्या अंगाखांद्यावर पोरेबाळे खेळत असतात. तेही दृश्य तिच्या मनाला डसून जाते– तिची कूस अद्याप उजवलेली नसते. लग्नाला आता तीन वर्षे पार पडलेली असतात—

'आमचे चाकरमानी गमलेले ?' ती सरळ मुद्द्यालाच हात घालते

पर्शा म्हसकर तिला पायापासून माथ्यापर्यंत न्याहाळतो. तिला त्याची ती नजर आवडलेली नसते. पण ती तशीच कोडग्यासारखी उभी असते.

'तुजा घोव हाल्ली खूब दिसात कुठे भेट पडला नाय् ! हाल्ली तो कुठे भायूर गावी ऱ्हातो म्हनून पांडू इस्वलकर सांगत हुता– कुठे भांडूपच्या झोपडपट्टीत ऱ्हातो, ठावक नाय्– कारखान्यात इस्ट्राईक हाय त्याच्या– दत्ता सामतचा–'

तिला काही कळत नाही. फक्त घोवाची नि म्हसकराची भेटगाठ झालेली नाही, एवढे तिच्या ध्यानात येते. ती कळवळून विचारते–'गमले तेव्हा तब्येतीन् कशे हुते ?'

'त्येला काय झालं हाय ? तब्येतपाणी ब्येस हाय– पण हाल्ली लय् पितो असा चिचपोकळीचा तातू बेळणेकर सांगत हुता– तो नि तुझा घोव येका कारखान्यात ना– घाटकोपरला !'

अग्ये बाये ! म्हंजे हेसुद्धा सुरू झालं ? तिचे पाय लटपटतात. तो कधीमधी दारू घेतो, हे तिला ठाऊक होते. अलीकडे सगळेच ती घेतात. पण त्याचे प्रमाण एवढे वाढले असेल ? पत्र नाही. मनिऑर्डर नाही—गावी कसे दिवस काढावे माणसाने ! म्हातारे सासूसासरे– घरात एक वाढलेली नणद. एक शेतात खपणारा भाऊ–त्यांना खर्च कमी येतो ? त्यांनी तिकडे दारूत पैशाची खराबी करायची नि आम्ही इकडे तळमळायचं–हाल काढायचे.

'नोकरी तरी येवस्थित करतात ?' ती कसेबसे विचारते.

'सांगितला ना–तेच्या कारखान्यात दत्ता सामंतचा इस्ट्राइक हाय् म्हणान्–'

'म्हंजे काय ?'

'त्ये तो सागताहा, तुज्या घोवाच्या कारखान्यात संप आसा—' जवळ उभे असलेले कुणी तरी फोड करून सांगते.

'आणि दत्ता सामत कोन ?'

पर्शुराम म्हसकरची बायको आता बाहेर आलेली असते. घोवाने आणलेले नवे

मुबईचे लुगडे नेसून . ती मोकळेपणी हसते. तिला सगळे ठाऊक असते–ती गेल्या वर्षीपर्यंत मुबईला होती–उलट, हिला मुंबईचे दर्शनही अद्याप झालेले नसते–पशुरामाची बायको मग तिला समजावून सांगते–'ग्ये गावकरणी ! तुज्या चाकरमान्याच्या कारखान्यात संप हा– दत्ता सामंत फुडारी ! आमच्या हर्षेच्या कारखान्यात पण तेचीच युनियन हुती पैल्यादा ! मागे तेणी ती बदलल्यानी ! वशाडी इली नाय् ती संप करणारांक—'

ही अधिकच घाबरते. सप म्हणजे पगार बंद. काय करीत असेल ो मुबईला– कुठे खात असेल, कुठे रहात असेल– ती व्याकुळ होते. तशीच खिन्न होऊन परत फिरते. खळ्यातल्या दोरीवर वाळत घातलेला बनियन आता वाऱ्याने खाली पडलेला असतो. तो ती हलकेच उचलते नि पुन्हा दोरीवर घालते. त्या पुरुषी कपड्याचा स्पर्श तिच्या सर्वांगावर काटा उठवतो काळजात फार फार सलते

ही कहाणी कोंकणातल्या घरोघरच्या बायका स्वत' अनुभवीत असतात. घरटिपी एकेक बाप्या मुबैला चाकरमानी होण्यासाठी गेलेला असतो आणि त्याच्या काळजीने कोंकणात गावी त्याची 'माघारीण' झुरत, खगत दिवस काढीत असते. कधी पत्र येते, कधी कुणाबरोबर तोंडी निरोप येतो नि खुशाली कळते– कुणी येणारा असला तर 'भेट' पाठवली जाते. चाकरमानी मिरगाच्या हगामाला हटकून येतो. गणपती नि शिमगा हेही सण चाकरमानी गावी येण्याचे. त्याच्यासाठी घरातली एखादी वस्तू अपूर्वाईने जपून ठेवली जाते. तो आल्यावर वडे, घावणे किंवा वडे–सागोती हा बेत त्याची बायको न चुकता घडवून आणते.

ज्यांचे घोव चाकरमानी नसतात, त्या कोंकणातील बायकांचे जिणे अधिकच खडतर असते. कोंकणातील शेती तुटपुंजी– भात, नाचणी, कुळीथ नि वरी असली भरपूर कष्ट मागणारी नि ते करूनही पुरेसा गल्ला न देणारी पिके त्यासाठी वर्षाचे बाराही महिने रणरणीत उन्हात नि मुसळधार पावसात धडपडावे लागते, तेव्हा कुठे चार महिने दोन वेळ पेजेपुरते धान्य येणार– मग उरलेल्या तुटीची भर करण्यासाठी नाना तऱ्हेची कामे करावी लागतात. दुसऱ्याच्या कामासाठी 'पैरे' म्हणून तर नेहमीच जावे लागते. सातआठ रुपये मजुरी मिळाली तर मिळाली. नेहमीच काम मिळते असेही नाही. घरोघरच्या बायका आपापली कामे 'पैरी' न लावताच करतात. पण खोत, बामण किंवा एखादा पैसेवाला शेतकरी यांच्या घरी नेहमी मजुरी उपलब्ध असते. ती मिळवून तेलपाण्यापुरती नाणी घरी आणायची–

पैऱ्या कामेऱ्याला जायचे नसते तेव्हाही मालवणी स्त्रीला घरी चार घटका निवात बसता येत नाही. शेतात उकरड (शेणखत) नेऊन टाकणे, कवळकाडीतून कवळाचे भारे शेतात नेणे, पातेरा गोळा करणे, शेणी थापणे नि रानातून जळणासाठी

' कुरपुटे ' आणणे ही कामे बाराही महिने न संपणारी असतात. ती करता करता हाडाची काडे होऊन जातात. रात्री अंथरुणावर पडले की नीज कधी घेरते ते समजत नाही.

कोंकणातील कामकरी स्त्रीचे मूळचे सुरेख रूप ही परिस्थिती विद्रूप करून टाकते. आणि काळीसावळी, उन्हात रापलेली, केसाना तेल नसलेली, अंगावरील गोंडसपणा हरवलेली एक ओबडधोबड स्त्री आपल्या डोळ्यांसमोर प्रातिनिधिक स्वरूपात उभी राहते.

पण कष्टकरी वर्गातील बायका इथून तिथून सगळीकडेच अशा रापलेल्या आणि पिचलेल्या आढळतात. कोंकणात त्याचे प्रमाण काहीसे अधिक एवढेच

पण मुळात ही कोंकणकन्या कशी आहे ? तिचे रूप, तिची आवडनिवड, तिचे विभ्रम आणि तिची वागणूक– थोडी सुस्थिती लाभलेली कोंकणकन्या, मग ती कुळवाड्याची लेक असो, भाविणीची पोर असो, गावतिणीचे ' चेडू ' असो वा भटाबामणाची मुलगी असो– कशी आहे !

कोंकणात एखाद्या घरी मुलगी उपवर असेल व तिला पाहण्यासाठी, मागणी घालण्यासाठी, ' सोरगत ' ठरवण्यासाठी ' कुळाने ' आलेले असतील तर ते रोखठोक विचारणार नाहीत, की तुमची मुलगी पहायला आलोय तिला घेऊन या ! तर त्यांच्यातील एखादा वडीलधारा गृहस्थ आजवाने म्हणेल, ' तुमच्या परसावात यक सोनचाफ्यां फुला असा ऐकलां– तेचो वास घमघमत आमच्या घरातागत इलो ! म्हटलां–जावून बगूंया तरी फूल कसां हा ता ! '

उपवर मुलीला सोनचाफ्याच्या घमघमणाऱ्या फुलाची उपमा देणारा हा मुलूख जेवढा रसिक, तेवढ्या येथल्या मुलीबाळीही कोंकणातील विशेषत. दक्षिण कोंकणातील मुलगी कधीही माथ्यात फूल माळल्याशिवाय बाहेर पडणार नाही. अंगावर धड कपडा नसेल, पण माथ्यात भरघोस फुलांचा गजरा हवाच. सुरंगीचे वळेसर आंबाड्यावर सर्पाच्या वेटोळ्यासारखे माळून–डोकीवर लाकडाच्या भाऱ्या किंवा गवताच्या ' वरडी ' घेऊन मालवण– वेंगुर्ल्याच्या बाजारात हिंडणाऱ्या बायका विसरता येणार नाहीत. फुलांच्या हंगामात घरोघरच्या बायका अबोली, सुरंगी, चाफी, केगदी, मोगरी, यांची लयलूट केल्याशिवाय राहणार नाहीत इथली स्त्री जात्याच हौशी आणि रसिक. जत्रांच्या नि दहीकाल्याच्या दिवसांत दिवसभर राबराब राबणारी एखादी सखू किंवा भीमा तिन्हीसांजेबरोबर चिल्लापिल्लांना घेऊन गावातल्या देवळासमोरच्या पटांगणात होणाऱ्या दशावतारी नाटकासाठी गोणपाट टाकून जागा अडवताना जिवाचा आटापिटा करील आणि नाटक पाहण्यासाठी अख्खी रात्र जागेल नाटकातल्या प्रत्येक प्रसंगाशी तन्मय होईल चागुणा चिलया बाळाला उखळात घालून कांडू लागली की तिला हुंदका अनावर होईल. आणि ' शकासुर ' मालवणी भाषेतील कोट्या

नि विनोद करून रंगमंचावर गमती करू लागला की, ती हसताहसता जमिनीवर लोळण घेईल.

इथल्या स्त्रीचा स्वभावही विलक्षण भावनाप्रधान. हिला हासू लपवता येणार नाही, रडू आवरता येणार नाही. चाकरमानी घोव किंवा भाऊ–बाप मुंबईला जाण्यासाठी एसटीत बसला की हिच्या दुःखाचा बांध फुटून ती भर रस्त्यावर हमसाहमशी रडू लागेल– जावा हां– गेल्यासरशी पत्र घाला हां असे पुन्हापुन्हा म्हणता म्हणता तिला काही सुचणार नाही.

देशातील इतर सर्व ग्रामीण भागातील स्त्रियांसारखीच कोंकणातील स्त्रीही विनयशील, मर्यादा पाळणारी आणि आतिथ्याची आवड असणारी आहे. पण ती अधिक बुद्धिमान आहे असे म्हटले तर चूक ठरू नये. प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीशी मुकाबला करीत इभ्रतीने जगायचे असल्यास कष्टांबरोबर बुद्धीचीही आवश्यकता असते. इथली नवी स्त्री सातवीपर्यंत तरी शाळा शिकलेली असते पुस्तक हाती मिळाल्यास ती वेळात वेळ काढून वाचून संपवल्याशिवाय राहणार नाही उत्सवाची, गोष्टी, गाणी, नाटके, जत्रा याची तिला हौस. या साऱ्या गोष्टींचा चवीने आस्वाद घेण्याइतपत रसिकता आणि बुद्धिमत्ता तिला उपजत लाभलेली आहे गेल्या खेपेला पाहिलेल्या दशावतारी नाटकातील राजाचे पात्र जे संवाद बोलले होते, ते पुढील प्रयोगात त्याच्या तोंडी आढळले नाहीत, तर ती चूक इथली स्त्री पटकन शेजारच्या बाईला सांगेल राजकारणात तिला फारसे कळत नाही म्हणावे, तर नाथ पै कसे भाषण करीत ते तिच्या अजून आठवणीत आहे. निवडणुकीच्या वेळी ती मतदान करण्यासाठी सकाळीच न चुकता बूथवर जाऊन येईल. आपल्या हक्कामध्ये व कर्तव्यामध्ये कुचराई करणार नाही.

ठेंगणाठुसका बांधा, बव्हंशी सावळा वर्ण नि चमकदार लकाकणारे डोळे हे या मुलुखातील स्त्रीचे वैशिष्ट्य सांगता येईल. पण सारस्वत ब्राह्मण, दैवज्ञ, कुडाळदेशकर, वैश्य या ज्ञातीतील स्त्रिया रंगाने उजळ, पुष्कळदा गोऱ्यापान, देखण्या आणि रेखीव, शरीरसौष्ठवाने समृद्ध असतात. सुखासीन, हौशी वृत्ती, गोष्टीवेल्हाळपणा (गजाल्डीन घोव खाल्लो!) आणि सुगरणपणा यात या नायका कुणाला शरण जाणार नाहीत. मासळीचे नाना रुचकर प्रकार आणि तांदळाचे घावने, वडे, धोंडस नि सांदणे, सोलकढी नि सांगोती यात तिचे सारे कसब दिसून येते. साधी कुळथाची पिठी नि सुक्या बांगड्याची 'कुसवीर जरी तिने ताटात वाढली तरी त्या घासाला अमृताची चव येईल.

आता बदलत्या काळानुसार कोंकणातील स्त्रीही बदलते आहे मुंबईचे साहचर्य फार जाणवू लागले आहे. मुंबईची जणू पडछायाच कोंकणातील प्रत्येक गावी पडलेली

आहे. मुंबईत घडलेल्या प्रत्येक बऱ्यावाईट घटनेची प्रतिक्रिया तात्काळ कोंकणात घडून येते. या साऱ्यामुळे तेथील स्त्रीजीवनही डहुळले आहे. जात्यावरील ओव्या गेल्या नि ट्रान्झीस्टरवरील फिल्मी गाणी आली. पण हे सगळीकडेच कमीअधिक प्रमाणात घडते आहे. कोंकणात मुंबई नि मुंबईत कोंकण सामावल्यामुळे तिथे त्याचे पडसाद अधिक तीव्र-अधिक गडद. नि या पडसादाची पहिली साक्षीदार-साथीदार तेथली घरकरीण-मग ती कोणत्याही थरातील असो—

पण तरीही कोंकणी वस्तीतील स्त्रीचा गहिरा रंग, गहिरे रूप आणि सरळ चाल अद्याप बदललेली नाही. कोंकणाच्या सान्निध्यातील सागराच्या लाटांचे विभ्रम आणि सह्याद्रीच्या कडेकपारींचा कणखरपणा अद्यापीही तिथे टिकून आहे.

## माझ्या मुलखाचे ऋतुचक्र

---

२५. पाऊस सगळीकडेच पडतो. उन्हेही सगळीकडे सारखी. पण ऊन-पावसाचा खेळ आमच्या मालवणी मुलखात जसा रंगतो, तसा इतर कुठे रंगणार नाही. मालवणी मुलुख हा कोंकणचाच एक भाग. पण सगळीकडे सारखे कुठे आहे! नाही तर सावंतवाडीला दीडशे, आंबोलीला अडीचशे नि कणकवली–वैभववाडीला किमान सव्वाशे इंच पडणारा पाऊस रत्नागिरीला पाऊणशे नि डहाणूला त्याहून कमी पडला नसता!

पावसाची मिजास पहावी माझ्या मुलखात आणि तीही मान्सूनच्या सुरुवातीपासून आश्विन संपेपर्यंत.

रोहिणी नक्षत्र दिवसभर तापलेले असले तरी सायंकाळी थंड वारे सुटतात. ही वैशाखाची अखेर. शेतकरी दरवेळी आकाशाकडे पाहतो. सायंकाळी गाज लागले की म्हणतो, 'आज पडतलो रे बाबा!' पण तसे काहीच होत नाही. गरजणारा नेहमीच पडत नसतो. याच दिवसात सकाळी उजाडतानासुद्धा जोवते! पण हे जोवणेही निष्फळ असते. मग एखाद्या दिवशी सकाळपासूनच विलक्षण तापू लागते. गदमदून जीव नकोसा होतो. अंगावर फडकाही नकोसा वाटतो. शेतकऱ्याने धूळ-वाफेची पेरणी केलेली असते. भाजावळी कधीच आटोपलेल्या असतात. उकरड, गोवर, कावणांचा, माडवांचा राब जाळून झालेला असतो. मसवा पुजावलेला असतो. बांधावरच्या चिंचेला एवढी गच्च पालवी फुटलेली असते की, आत बसलेला कावळा नजरेला पडेनासा होतो. चिंचेतला कावळा दिसेनासा झाला की, पाऊस जवळ आला ही शेतकऱ्यांची खूण. 'खाराकोका' पक्षी रोज सायंकाळी पूर्वेकडून पश्चिमेकडे समुद्राच्या दिशेने मीठ मागण्यासाठी क्रॅक क्रॅक करीत उडू लागतो. कणग्याकरांद्याचे लालुस कोवळे कोंब वर येतात. शेरवा पालवतो. रात्री दिव्यांवर पंख फुटलेली वाळवी गर्दी करते. सुक्या विहिरीतून बेडूक डराँव डराँव् करतात. आणि दरोवस्त झाडे रात्री काजव्यांनी झगमगू लागतात.

ही सारी शुभलक्षणे पावसाची. रोहिणी–मृगाच्या थंड सरींची. पावसाळ्याची.

रोहिणीत 'दिवा' सात दिवस. या सात दिवसांत कसला वावर करायचा नसतो.

पण पावसाची शितडी पडली की, घरात थांबायचेही नसते. मग एके सायंकाळी सोसाट्याचा वारा सुटतो, गाजू जोवू लागते आणि ओथंबलेल्या ढगाच्या पखाली माझ्या मुलखावर एकीमागून एक रिकाम्या होऊ लागतात. मृद्गंधाच्या लाटा नाकात साठवीत लाल पाण्याचे पायातले पाट तुडवीत शेतकरी कुणग्यात जोत बैलासह उतरतो.

पेरणी जोरात सुरू होते.

सात जूनला रीतसर मिरग. त्या दिवशी वरण, भात, खीर, या निवेदाची वाडी मिरगाला दाखवायची नि हात जोडायचे– 'बाबा मिरगा! बरोसो पड. चार म्हैने पावस पडांदे शेताभाता पिकादे. ढॉरपॉर सतुष्ट होवदे.'

मृगनक्षत्र मालवणी मुलुखात असे झोकात उतरते. मग पावसाला खळ रहात नाही. सकाळ, दुपार, संध्याकाळ पाऊस नुसता रिपरीप पडत राहतो. पेरणी मागे पडते, जोते माळावर जातात. वरकस जमिनीची उखळ, दूड, ताग व्हायची असते. मळ्यात भात तर माळावर नाचणी, वरी, कुळीथ कुळवाड्याला कुले पुसण्याएवढीही फुरसद मावत नाही. पावसाबरोबर जणू त्याची काँपिटिशन सुरू असते. कोण कुणाला हरवतो, त्याची!

पहिल्या चारआठ दिवसांत खळाळून पडणारा पाऊस मग हळूहळू स्थिर होतो. दरम्यान नदीव्हाळ हौराने भरतात. गोड्या पाण्यातली मासळी अंडी लावण्यासाठी प्रवाहाच्या उलट दिशेने, धार पकडून धावू लागते. हे चढणीचे मासे मारायला रात्री पेट्रोमॅक्स घेऊन लोक बाहेर पडतात खवळे, वाळय, टिगूर, शेंगट्या ही मासळी प्रत्येकाला टोपली टोपलीभर मिळते याच हगामात कुर्ल्या मिळतात त्या वेगळ्याच. उजेडाने दिपलेल्या कुर्ल्यांचे दुसऱ्या दिवशी पावसाळी सर्द हवेत मसालेदार कालवण होते.

नक्षत्रे बदलू लागतात. ज्येष्ठ संपतो आणि आषाढाला सुरुवात होते. आता आकाशात घनगर्द काळे मेघ दाटी करतात विजांचे चाबूक आणि गाजण्याचे ढोल आता थांबलेले असतात. पण पावसाला जोर याच हगामात चढतो रात्रभर पाऊस कौलारावर वाजत राहतो त्या आवाजाला बेडकांच्या डराँव डराँवची अखंड साथ 'मुर्कुट' भयानक माजते. मुर्कुट म्हणजे मच्छर त्याना काबूत आणण्यासाठी तिन्हीसाजेबरोबर सुक्या गोवऱ्याची धुरी करावी लागते. पडवीतला परसा रात्रभर ढणढणत असतो त्यावर टांगलेल्या घोंगड्या रातोरात त्या धगीवर सुकवल्या जातात.

आर्द्रा, पुनर्वसु, पुष्य ही पावसाची नक्षत्रे मागे पडली की, आश्लेषाचा कहर आणि पावसाचा कहर सुरु होतो हे नक्षत्र सळउळणाऱ्या पर्जन्यधारा घेऊन येते. छडीसारखी एकेक सर पाचदहा मिनिटांत चांदीच्या नाण्यानी भरलेली थैली मोकळी करावी, तशी एकेक सळसळ वाजणारी सर पडते. श्रावणातली सोनेरी उन्हे त्या

सरीचा डोळा चुकवून पृथ्वीवर येतात. घटकेपूर्वी भरदार सरीचा पाऊस पडला होता की नव्हता, असे वाटते. सर्वत्र लख्ख ऊन पसरते. पुन्हा आकाशात ढग गोळा होतात. पुन्हा आश्लेषा नक्षत्र सडसडत, थडथडत, सळसळत कोसळू लागते. उंच उंच सायाची ( सागवानाची ) कठोर झाडे याच पावसाळी हंगामात शुभ्र, नाजूक फुलांच्या तुऱ्यानी विलक्षण कोवळी आणि सुंदर दिसू लागतात. सायाची फुले हे आमच्या भागाचे एक सौंदर्यलक्षण.

श्रावण सर्वत्र हिरवा असला तरी मालवणी मुलखातला त्याचा पोपटीकंच रंग पहावा ! हिरव्या राव्यांच्या पखांनी श्रावण इथे वावरतो. आता भातशेते पोपटी होतात. हळव्या भातात दूध भरते. पसवलेल्या केसरांचा गंध वाऱ्यावरोबर पसरतो. माळावर पोपटी गालिचे उलगडलेले असतात. ' हरणे ' सर्वत्र दाटी करतात. त्याची चिट्ठकली पिवळी पाने हिरव्या पाचूला हळदिवी झाक देतात. श्रावणात कुळवाडी थोडा मोकळा होतो टाळ, मृदुंग, चक्की, नाली याच हंगामातल्या रात्री गाजवतात. ' अलकापुरी पुण्यभूमी ऽऽ पवित्र ऽऽ' ही भजनाची ललकारी कानी पडली आणि मृदुंगाची थाप, वाजाच्या पेटीचे सूर आणि टाळांचा झनझनाट कानी आल्यावर घरात राहणारा ' झिलगा ' दुर्मिळ ..

भजनाच्या भरतवाक्याला कुरमुऱ्या, चाय, लाडू असे काहीतरी असतेच.

कुणाच्या घरी श्रावणात ग्रंथ वाचतात. हरिविजय, पांडवप्रताप, नवनाथकथासार. ग्रंथ ऐकण्यासाठीही गर्दी उसळते. गोकुळाष्टमीचा मांडही असाच रंगतो. श्रावण सरता सरता गणपतीची चाहूल लागते. गणपतीच्या ' शाळांतून ' मूर्तिकाम आधीच सुरू झालेले असते ऑर्डरीप्रमाणे गणपती गावोगावचे मूर्तिकार बनवीत असतात. भजनीमेळ रंगात येत असतानाच रेखणी, रंगरंगोटीही भराला येत असते.

मग चवथ येते. गौरीगणपतीचे वेड साऱ्या कोंकणमुलखाला असते. पण गणपतीच्या सुंदर भव्य मूर्ती पहाव्या मालवण, सावंतवाडीला. मूर्तीसमोरचे देखावेही तसेच. ' रामायण, महाभारतातील ' प्रसंग मूर्तिकार साक्षात साकार करतो. सारंग, कांबळी, मयेकर हे परंपरा गाजवणारे जुने मूर्तिकार. त्यांच्यापाठोपाठ कितीतरी जण नव्याने पुढे येत आहेत.

चवथीचा सण न्हेवऱ्या, मोदकांनी साजरा होतो. मुंबैवाले चाकरमानी एस्ट्या भरभरून मुलखात उतरतात. सर्वत्र आरत्या निनादत असतात. ' येई हो विठ्ठलेऽऽ माझे माऊली येऽ 'चा घोष बेंबीच्या देठापासून केला जातो. मंडपीची कांगणे-कौंडळे कडू असली तरी रंगाने गोड असतात.

भाद्रपदात शेती पिकू लागते. भाते सोनेरी होतात. नाचणीच्या दळ्यात कणसे उचावू लागतात. बांधावर गुलाबी कुर्डू लाजत उभी असते. भारंग फुलून येते. माळावर करड, कर्पिल हे रान भराला येते. श्रावणातला पोपटी रंग गडद काळसर

होऊ लागतो वारुळामध्ये चितळी अळंबी जाईजुईच्या नाजुक फुलासारखी फुलतात. नदीम्हाळाचे डोह संथ बनतात. गायीम्हशी आता व्यायला येतात. बैलपाडे खाऊन पिऊन मस्तीला येतात. शिंगांनी माती उकरू लागतात.

पाऊस अजून थांबत नसतो पण उत्तरा नक्षत्र सरते नि हस्ताचे ऊन पडले की, पावसाळा काढता पाय घेतो. नवरात्रीच्या पहिल्या माळेला पाऊस पडला नाही तर दसऱ्यापर्यंत तो फुरसद देतो पण पहिल्या माळेचा पाऊस नवरात्रीचे दहाही दिवस गाजवतो सकाळी लख्ख ऊन नि संध्याकाळी मुसळधार पाऊस! असा पाऊस माझ्या मुलखातली पिकलेली भातशेती जमिनीवर लोळवतोही. शेतकरी हताशपणे ते पाहत राहतो. जो पाऊस शेती पिकवतो तोच कधी कधी त्या शेतीचा शत्रूही बनतो!

नवरात्रात रानमाळावरचे गवत भराभरा वाढू लागते. नऊ रात्रीत नवांगुळे त्याची वाढ होते असे म्हणतात. देवीसमोर कुंवार मुलींनी नि सौभाग्यवती बायकांनी घटस्थापनेदिवशी घातलेल ' रुजवण ' नऊ दिवसांत उचउच वाढते. दसऱ्यादिवशी देवळात सोने लुटायला जाताना हे रुजवण बायकांच्या माथ्यात फुलांपेक्षा शोभिवत दिसते.

दसऱ्या–दिवाळीतच भातकापणीचा हंगाम सुरू होतो. दिवसा कार्तिकातील कडक ऊन आणि रात्री कोजागिरीचे शीतळ चांदणे, सृष्टीचे कौतुक सकाळसंध्याकाळ, दिवस-रात्र पहावे.

यावेळी माझ्या मुलखातील आभाळाची शोभा अद्वितीय भासते. असे निरभ्र, निळेभोर एखाद्या अथांग सरोवरासारखे आकाश इतरत्र कुठे असेल का? मला नेहमी वाटत असते. कदाचित तो आपल्या जन्मभूमीवरील वेड्या प्रेमाचाही परिणाम असेल पण माझ्या गावच्या तांबड्या मातीचा रंग हा जगातल्या कोणत्याही सम-वर्णाला मागे टाकणार आणि माझ्या घरासभोवतालची झाडे म्हणजे हिरव्या रंगाची केवळ श्रीमती!

तसेच हे साजरे आभाळ.

दिवाळीला आमच्या भागात ' धाकली दिवाळी ' म्हणतात. ' धाकली दिवाळी ' नि ' थोरली दिवाळी. ' धाकल्या दिवाळीला आम्ही मुंबई, पुणेकरासारखे फराळाचे शंभर पदार्थ बनवीत नसतो. आमचा मुख्य पदार्थ म्हणजे ताज्या भाताचे, मुसळात काडलेले कुरकुरीत पातळ पोहे! या पोह्यानीच दिवाळी साजरी करायची! गोडपोहे, तिखटपोहे, दहीपोहे असे पोह्याचे प्रकार नि काळ्या वाटाण्याची मसालेदार उसळ. हा आमचा दिवाळीचा फराळ! वर कुठे करजी किंवा रव्याचा लाडू. पण दिवाळीची हवा मोठी तेजीची असते. घरामध्ये, खळ्यामध्ये भाताच्या राशी येऊन पडत असतात. ती वर्षभराची बेगमी पाहून दिवाळीचे दिवे अधिकच उजळलेले दिसतात

हळूहळू थंडीचे दिवस सामोरे येतात. कापणी–मळणीच्या व्यापातून शेतकरी थोडा

मोकळा होतो नि दहिकाल्याचा हंगाम येतो! तुळशीच्या लग्नानतर लगेच 'त्रिपुरी पूर्णिमा!' या त्रिपुरी पूर्णिमेनंतरच दहिकाल्यांना जोर चढतो. पण त्याआधी टिपर पाजळण्याचा नि समाराधनेचा कार्यक्रम व्हायलाच हवा. राईतल्या रामेश्वराचे देऊळ तिळाच्या तेलवातींनी पायरीपासून शिखरापर्यंत पाजळले जाते. शिखरावर कोहळा अर्धा कापून त्यात तेल भरायचे नि भलमोठा काकडा पेटवायचा. त्याला 'त्रिपराचे टवळे' म्हणतात. त्रिपर पाजळला की, गावाबाहेरचे ते देवराईमधले पुरातन मंदिर रोषणाईने एकदम देदीप्यमान दिसू लागते. काही ठिकाणी त्रिपरादिवशीच समाराधना असते. काही ठिकाणी दुसऱ्या दिवशी. समाराधनेदिवशी चार गावचे भटजी पडशा खांद्यावर घेऊन सकाळीच देवळात जमतात. त्यांच्याबरोबर त्यांची कुटुंबेही येतात. एकजण एकादष्णीच्या अभिषेकासाठी गाभाऱ्यात रामेश्वरासमोर बसतो. बाकीचे समाराधनेच्या तयारीला लागतात. तोपर्यंत गावातून तांदूळ, डाळ, गूळ असा शिधा आणि भाजीसाठी, लाल भोपळ्यांचा ढीग येऊन पडलेला असतो.

गावकरी सभामंडपात वडा-चादवडाच्या पानांच्या पत्रावळी (इस्ताऱ्या) लावायला बसतात नि देवळाच्या पाठीमागे तीन धोंड्यांच्या मोठाल्या चुली ढणढणू लागतात. देवाची भलीमोठी भांडी गुरव काढून देतो. भट लोक पाकसिद्धीला लागतात. नि सायंकाळी चारच्या सुमारास पहिली पंगत बसते. 'पार्वतीपते हरहर महादेव' च्या गजरात नि श्लोकांच्या चढाओढीत समाराधनेचे जेवण सुरू होते. भात, खीर, उडदाचे वरण, लाल भोपळ्याची भाजी, लाल सोलांची कढी!

समाराधनेच्या प्रसादासारखे रुचकर जेवण आणखी कुठे गावणार!

थोरली दिवाळी म्हणजेच पंचांगातली 'देव दीपावली.' मालवणी मुलखात हिचे महत्त्व फार. कार्तिक महिना संपलेला असतो. मार्गशीर्षाच्या पहिल्या पावलाबरोबर देव दीपावली येते. गावोगावी दहिकाले, दशावतारी जत्रा यांचा जल्लोष सुरू होतो. थंडीला चांगलीच सुरुवात होते. परसवातल्या फणसावर कोवळ्या कुयऱ्या लटकू लागतात. शेवगा फुलांनी डवरतो. क्वचित आंब्याची कलमे कोवळ्या मोहराने तुरबुरू लागतात. रात्री थंडीच्या कडाक्यात गावच्या देवळासमोर होणाऱ्या पार्सेकराच्या दशावतारी नाटकासाठी घरोघरची माणसे दिवेलागणीपासूनच जागा धरून बसतात. आता गावोगाव वीज आली. पूर्वी गॅसच्या बत्त्यांच्या किंवा मशालींच्या उजेडात ही नाटके रात्रभर चालायची. आता टीव्हीने आपलं प्रभुत्व दाखवायला सुरुवात केली आहे. तरीही मध्यरात्रीच्या ठेक्याला जेव्हा देवदानवांचे तुंबळ युद्ध दशावताराच्या पहिल्या प्रवेशामध्ये होते, तेव्हा सगळे आवार प्रेक्षकांनी तुडुंब भरलेले असते. देवळाभोवती जत्रा गजबजते. मालवणी खाजा, भजी, उसळ-पुरी यांची 'कावणे', गोसावण्यांची दुकाने, भांडी-खेळणीवाले, मिठाईवाले यांनी पाय ठेवायला

जागा उरत नाही. पलीकडे अंधारात मेणबत्त्या लावून चोरटा 'पट' चालू असतो. जुगारी नादी लोक तेथे पैसे लावतात. जिंकतात थोडे, हरतात अधिक.

पहाटेपर्यंत ही जत्रा, दशावतारी नाटक चालू असते. मग 'काला' होतो नि जागरणाने पेंगणाऱ्या डोळ्यांनी मंडळी घरोघरी परतू लागतात मालवणी मुलखामध्ये या जत्रा नि दशावतार यांना माणसाच्या श्वासोच्छ्वासाइतके महत्त्व आहे!

कोंकणातील साऱ्याच गावांचे व्यवहार ग्रामदेवतेभोवती गुंतलेले असतात. गावचा देव किंवा देवी सर्वांत महत्त्वाची शक्ती. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ग्रामदैवते आणि त्यांचे उत्सव, वार्षिक सण हे गावकरी मोठ्या भक्तिभावाने साजरे करतात. श्रीदेव रामेश्वर, गांगोबा, रवळनाथ, वेताळ, वेतोबा, सातेरी, माऊली, भवानी, भद्रकाली, लिंगेश्वर, भावई, पावणाई अशा देवदेवता गावोगाव वसलेल्या. ऋतुचक्राप्रमाणे गावगाडा आणि गावगाड्यानुसार देवदेवता, हे मालवणी मुलुखाचे वैशिष्ट्य. देवाचा कौल, प्रसाद प्रत्येक कामासाठी हवाच. गाऱ्हाणे नि विनंती, जाबसाल नि बारापाच, अवसर, खांब, वदणे या साऱ्या देवदेवस्कीच्या गोष्टी वर्षभर चालू असतात. महाशिवरात्र नि होळी जवळ येऊ लागली की, देवस्थानातून चैतन्य संचारते.

मार्गशीर्ष, पौषात एक दत्तजयंतीचा उत्सव सोडला तर गावोगाव 'गवळदेवा'चे नैवेद्यच चालू असतात. दत्तजयंती' माणगाव, पाटगाव, कोळोशी, तोंडवळी या गावी धूमधडाक्याने पार पडते; तर 'गवळदेव' प्रत्येक गावी होतो. राखण्यांचा, गवळ्याचा देव तो गवळदेव. गावाबाहेरच्या एखाद्या झाडाखाली पाच किंवा सात गुळगुळीत गोटे देवासारखे मांडून ठेवलेले असतात त्याची पूजा आणि राखण्यांनी केलेला खीर–भाताचा 'निवेद!' रात्री टाळ मृदंगाचे जोरदार भजन.

मग थंडा वाढू लागते. प्रत्येक आंबा मोहरू लागतो. काजूच्या झाडावर पानांपेक्षा मोहर अधिक फुलतो. फणसाच्या कुवऱ्या पोपटी मखमल सोडून काटेरी रूप दाखवू लागतात, आणि त्याच वेळी अरबी समुद्रावरून वेगाने धावत येऊन सह्याद्रीवर आदळणारे नि पुन्हा परत फिरणारे 'तडवे वारे रोज पहाटे आमच्या मुलखात सुरू होतात! मकर संक्रांतीच्या आगेमागे सुरू होणारे हे वारे पहाटेपासून दोन प्रहरपर्यंतच फक्त टिकतात. पण तेवढ्या वेळात निसर्गाची अद्भुत करणी दृष्टीला पडते. या वाऱ्यांनी जमिनीला तडे पडतात. (म्हणूनच हे 'तडवे' वारे!) नदीव्हाळाच्या कोंडी (डोह) आटतात. आश्विनात व्यालेल्या नि ऐन दुभत्यावर असलेल्या गायी-म्हशींचे पान्हे आटतात नि तीन शेर दूध देणारी म्हैस अर्ध्या शेरावर येते! हे वारे म्हणजे मालवणी मुलखातला एक ऋतुचक्राचा चमत्कार म्हणायला हवा. महाशिवरात्रीला हे वारे नाहीसे होतात. पण तोपर्यंत शिवरात्रीच्या वाटा देवासाठी झाडणारे हे तडवे वारे माझ्या मूळगावी खूप नुकसानी करून जातात

याच हंगामात कवळे तोडण्याचे काम सुरू होते. राबासाठी ऐन, किंजळ या रानातल्या झाडाची 'कवळे' तोडणे ही शेतकऱ्यांची मोठीच कामगिरी असते. तडव्या वाऱ्यानी झाडझाडोरा आधीच मुळापासून हल्वलेला असतो. आता कवळे तोडली की सारे रान उघडे बोडके दिसू लागते. निष्पर्ण वृक्ष कळाहीन भासू लागतात. वास्तविक ही कवळतोड वर्षानुवर्षे चालू आहे शास्त्रीयदृष्ट्या पाहिले तर त्या राबाचा जमिनीला फारसा फायदा होत नाही कारण राखेपेक्षा अधिक पौष्टिक खते आता विकत मिळतात. शिवाय दरवर्षीच्या या कवळतोडीच्या कार्यक्रमाने झाडाची ताकद कमी होते पर्यावरणाचा तोल ढासळतो. पण मुलखातल्या शेतकऱ्याला कवळ तोडून झाडे उघडी बोडकी करणे, याला दुसरा पर्याय सुचत नाही कवळतोडीने रान उजाड उघडे झाले की, गावकरी 'पारधी' ला बाहेर पडतात. देवाच्या नावाने शिकारीचा बेत आखला जातो. कौल, प्रसाद होतात देव अनुकूल होतो नि एके दिवशी सकाळी गावकरी 'रानकाढे' बनून रानात शिरतात गावातली धनगरी कुत्री दऱ्याखोऱ्यातून घुसतात. गावकरी हाका घालतात. बरकदाज बदुका सावरीत मोक्याच्या जागा धरून बसतात नि रानात हाकेकऱ्याचा एकच हलकल्लोळ माजतो निवडुगा–उक्षीच्या जाळीत झोपलेली रानडुक्करे, विश्रांती घेणारी भेकरे, कुरुंद पटापट उड्या मारीत उघड्यावर येतात. धडाधड बार होऊ लागतात एखादा रानडुक्कर कोसळतो. हरहर महादेवचा गजर करीत हाकारे त्याला घेरतात. भाले, कुऱ्हाडी चालवतात. पुन्हा एखादा बार होतो नि देवाची 'पारध' हातात येते. हे 'सावज' बाशाला उलटे बाधून, त्याला पांढऱ्या चाफ्याच्या माळा घालून देवळात मिरवणुकीने, ढोल, ताशे वाजवीत घेऊन येतात आणि दुसऱ्या दिवशी, भटांची शाकाहारी घरे सोडून अख्खा गाव त्या मेजवानीवर तुटून पडतो!

ही गावपारध देवाच्या नावाने करावयाची असली तरी त्या निमित्ताने गावचे एकत्रित शौर्य, एकोपा प्रगट होतो. शेतीभातीचे वन्य पशूपासून रक्षण होते. मांसाहाराची गरजही भागते गावगाड्यामध्ये ही देवाची पारध पूर्वीच्या लोकानी फिट्ट बसवली होती. ती परंपरा आजही मालवणी मुलखात सर्वत्र चालू आहे

हा पानगळीचा, कवळतोडीचा मोसम म्हणजे बिनफुलाचा, बिनफळाचा पण आमच्या मुलखामध्ये हिरवी मालीची केसरे, (मुंबईला तिला पाचू म्हणतात.) नि अबोली, रतन अबोली याच दिवसात बहरतात ओवळी (बकुळी) चे बारमाही झाडसुद्धा या थंडीच्या दिवसांत अधिक सुवासिक बनते त्यापेक्षाही आणखी एक रानझाड उत्कट सुगधाने न्हाऊन पादीत उभे असते. ते झाड असते कऱ्याचे! हा 'करा' नखशिखान्त नाजूक, बारीक फुलांच्या तुऱ्यानी काठोकाठ डवरतो आणि त्याचा काहीसा कडसर पण विलक्षण उन्मादक सुगध दिवसरात्र दरवळत असतो. एका पधरवड्यातच तो येतो तसा ओसरतो. करा आणि कुसर या वनस्पती देवाने

आमच्या मुलखालाच बहुधा बहाल केलेल्या असाव्यात. मी त्या इतरत्र कुठे पाहिल्या नाहीत.

संक्रांतीला बायका सुघटांची ( सुगड ! ) वाणे वाटतात. पाठोपाठ शिवरात्रीचा ढोल वाजतो. आता रानात काजीची झाडे फळभारानी लगडू लागतात. हिरवी 'फके' बोल बोल म्हणता लालपिवळी, शेंदरी बनतात. त्याचे मोहक बोंडू फांद्यांवर लोंबू लागतात ओल्या काजूगरांचा 'मौला' घरोघर येतो. बलुचिस्तानातल्या पठाणानी बदाम, पिस्ते खावेत, तसे माझे गाववाले काजू खातात. ( कुणी दर्दी इसम काजूच्या बोंडाची सुरस 'फेणी' ही गाळतो ! )

याच हंगामात सुरंगीला बहर येतो !

सुरंगीचे झाड ही खास मालवणी मुलखाची मिरासदारी. गर्द पानांनी भरलेल्या या रासवट झाडाच्या खोडाला, फांद्याना सर्वत्र सुरंगीचे कळे फुटतात आणि पिवळ्या केशरी, घमघमणाऱ्या मादक सुवासाच्या वळेसरांनी कणकवली, कुडाळ, मालवण, वाडी, कुडाळ, वेंगुर्ल्याच्या बाजारपेठा गजबजून जातात.

माघ फाल्गुनात सुरंगीचा वळेसर माथ्यात न माळलेली बाई आमच्या मुलखात सापडणार नाही.

सुरंगी तसे नागचाफे ! ही चाफीही महाशिवरात्रीपासून शिमग्यापर्यंतच हाती येतात. त्यांचा सुगंध अलौकिक असतो. ही चीज अन्यत्र तशी दुर्मिळच.

होळीचा माड, पाच दिवसांची 'रोंबटे,' तमाशे, नाटके धुळवडीपर्यंत टिकतात. शबय् शबय्वाली पोरे आणि 'खेळे' घरोघर फिरतात गणपतीच्या दिवसांत जी हौस-मौज तीच होळीच्याही दिवसांत. शिमग्याला मुंबेहून येणाऱ्या चाकरमान्यानी गाव भरून जातो. कोंकणात रत्नागिरी–रायगडकडे शिमग्यात खेळवल्या जाणाऱ्या पालख्या सिंधुदुर्ग भागात दिसणार नाहीत. इथे असतात ते खांब, तळीचे निशाण आणि जबरदस्त रोंबटे !

फाल्गुनाची तल्खली वाढत असतानाच चैत्र पालवीचे दिवस येतात. कवळे तोडलेल्या झाडांवर पुन्हा पालवी येते. काटेसावर लालबुंद फुले माथ्यात माळून उभी असते. संध्याकाळी वसंत ऋतूच्या मदशीतल झुळका वाहू लागतात. आंब्याच्या टोकावर बसलेली कोकिळा उंच साद घालते,

मग आंब्या–फणसाचे दिवस येतात. करवंदा–जांभळांचे दिवस येतात. फणसाचे रसाळ गरे नि रायवळ आंब्याच्या आढ्या, गारफी आंबे करंड्या भरून, पेट्या भरून मुंबईच्या क्रॉफर्ड मार्केटात पाठवण्याचे हेच दिवस. रातांबीची झाडे लाल फळांनी ओथंबतात. काजूची झाडे आता उलगतात. पण आंबा भराला येतो. पिकून रस गळू लागतो. मुंबईवाल्या मंडळींची आंबे, गरे, करवंदे हा कोकणचा मेवा खाण्यासाठी मुलखात झिंबड उडते.

दारातला कदंब पोपटी गोल फुलांनी रोज सायंकाळी फुलू लागतो. भुईचाफा जमिनीतून हलकेच वर मान काढतो. रानात बाहवा पिवळ्या, फिक्या फुलाच्या घोसानी आणि ताम्हना जांभळट रंगाच्या पुष्पसजावटीने वसत ऋतूचे रंग सर्वत्र खुलवतो त्यातच सबंध दिवस उन्हाळ्याची तगमग नि रात्री शीतल वाऱ्याची बहार ..

खळ्यात डाळ्या ( चटया ) टाकून झोपण्याचे हेच दिवस. माठातल्या पाण्यात चार नागरमोथ्याचे तुकडे टाकले की पाणी थंडगार सुगंधी बनते. वाळाही कुठेकुठे उपलब्ध असतो

पुन्हा मृग नक्षत्राचे दिवस जवळ येतात. पुन्हा रोहिणी नक्षत्राचे वेध लागतात. जमीन तापून निघते माणसे, गुरेढोरे भाजून निघतात. घामाने जीव नकोसा होतो. विहिरींचे पाणी तळाला जाते. नदीन्हाळ तर कधीच कोरडे पडलेले असतात.

अरबी समुद्रावरून मतलई वारे घोंघावत उगवतीला येऊ लागतात. मालवण–वेंगुर्ल्याजवळचे ' कोंडुरे ' घुमू लागतात. समुद्राची गाज थेट सह्याद्रीपर्यंत पोचते.

आणि एक दिवस जोवू लागते, गाजू लागते. शेतकऱ्यांची माधारीण जात्यावर दळता दळता गाणे गाऊ लागते :

> मिरग जोवता, मिरग गाजता ऽ
> भाव माजो माका माघारी येता !
> माघाऱ्या, माह्यारा येवू मी कशी ?
> मिरगाची गाज पाडता फशी
> मिरग जोवता, मिरग गाजता ऽ

पुन्हा मृगाची सर खाली येते. मातीचे अत्तर दशदिशांत उधळते.
मालवणी मुलूख पुन्हा एकवार नव्या ऋतुचक्रासाठी सज्ज होतो.

# आम्ही आणि मासे

२६. मालवणी मुलखाला मासळीचे वरदान आहे इथले आम्ही लोक पक्के मासेखाऊ आहो. समुद्रातली मासळी जशी आम्ही चवीने खातो, तशीच गोड्या पाण्यातली—नदीतली 'सावी' मासळीही आम्हाला चालते. विजयदुर्गापासून रेडीपर्यंत प्रत्येक लहानमोठ्या बंदरात ऋतु-मानानुसार विविध प्रकारची चवदार मासळी कमीअधिक प्रमाणात मिळते. अलिकडे गोव्यातील रापणकर मालवणी समुद्रकिनाऱ्यावर येऊन रापणी लावतात नि आमची मासळी गोव्यात घेऊन जातात. केंड माशांसारखे राक्षसी मासे ( खाण्याच्या दृष्टीने निरुपयोगी ) आमच्या मच्छीमाराची जाळी तोडून टाकतात. अधूनमधून शेतीला दुष्काळ भोवतो, तसा समुद्रशेतीलाही दुष्काळ सोसावा लागतो; तरीही आमची हौस भागण्याइतपत मासळी सदैव आम्हाला मिळते—

मी जन्मल्यापासून मासळीचे टॉनिक खातखात वाढलो समुद्राची खारी, नदीतली सावी आणि सुकवलेली; अशी सर्व जातीची मासळी मी उदरस्थ केलेली आहे.

आमच्या गावाला समुद्र नाही आणि खाडीही नाही. कणकवलीला माहीत आहेत त्या दोन बाजूनी वाहणाऱ्या दोन नद्या. गड नदी आणि जानवलीची नदी. यातीलच एक नदी करूळच्या वाट्याला आलेली. ती जानवलीची नंतर झाली त्याआधी ती फोंडा घाटात उगम पावून कोंडये, करूळ, साकेडी करीत जानवलीवरून कणकवलीला येते

लहानपणी आम्ही मासे खाल्ले ते या दोन नद्यांतील. समुद्रातल्या खाऱ्या माशाची चव लागण्यापूर्वी आमच्या जिभेने गोड्या पाण्यातील रुचकर मासळी चाखली होती. समुद्राचे मासे खाणाऱ्यांना गोड्या मासळीची चव माहीत नाही. त्या मासळीला ते तुच्छतेनेच लेखतात. त्यांच्या दृष्टीने मत्स्यकुलातील उच्चवर्णीय म्हणजे समुद्र किंवा खाडी येथे सापडणारी मासळी. बांगडे, तारल्या, कोळवी, पापलेट, रावस, सरगा, सुरमई आणि कर्ली त्यांच्या लेखी गोड्या पाण्यातील मरळ, खरचे, मळवे, ठिगूर, वाळय, खवळे, काडवी किंवा शेंगट्या म्हणजे शीऽऽ बेचव मासळी !

पण आम्ही याच 'बेचव' मासळीवर वाढलो. परमेश्वराच्या या प्रथमावताराला

आम्ही नदी–तळ्याच्या गोड्या पाण्यातच प्रथम पाहिले आणि उदरस्थ केले.

मृग नक्षत्राचा पहिला पाऊस पडला की सुकलेले नदी, व्हाळ हळूहळू भरू लागतात आणि एक दिवस नदीला प्रचंड ' हौर ' येतो. हौराचे पाणी आजूबाजूच्या शेताभातातून पसरते आणि त्या पाण्याबरोबर नदीतले मासे ' चढू लागतात ' हे चढणीचे मासे मारण्यासाठी गावकऱ्यांची एकच धांदल उडते. रात्री गॅसच्या बत्त्या, मशाली घेऊन नि हातात ' शेलूक ' किंवा ' भाले ', कोयते घेऊन मासे मारणाऱ्यांची झिम्मड मळ्यामळ्यांत दिसू लागते. पाण्याच्या धारेला लागलेला मासा अचूक हेरून त्यावर शेलूकाचा घाव घालायचा की क्षणार्धात तो मासा पोटवळ वर करीत तरंगायला लागतो. ' आखे ' किंवा वेंड ( जाळी ) घेऊन मासे मारण्यासाठी हीच संधी ! पहाटे प्रत्येकजण पायली, कुडवाच्या हिशोबात माशाची मोटली घेऊन परततो. या हंगामात अधिक सापडतात ते खवळे. हा मासा फारसा चवदार नसतो, पण दिसण्यात शुभ्र रुपेरी–अगदी भटाबामणासारखा ! गोडया पाण्यातला चवदार मासा म्हणजे मळवा. वितीएवढया लांबीचा हा काळसर रंगाचा मासा नदीत वर्षभर मिळतो भोरपी आणि ठाकूर त्याला जाळयात पकडतात मळव्याइतकाच दुसरा चविष्ट मासा म्हणजे खर्चा. त्यामानाने शेगटी सपक आणि सुटी करायला कठीण. बुळबुळीत अंगाची ही बोटाएवढी मासळी तव्यावर पडेपर्यंत जिवंत राहते. ठिगूर, वाळय आणि मरळ हे मोठे मासे. मासल, कमी काटेरी आणि रुचिक. काडवी दिसण्यात विचित्र, पण चवीला एकदम बेस्ट. मृगाच्या आगेमागे गोडया पाण्याच्या कोंडीत ' ल्हार ' नावाची नाजूक, काळसर रुपेरी मासळी मिळते. ती पकडणे ( पागणे ) आणि ताजीच्या ताजी राधणे, या दोन गोष्टी विशेष कसबाच्या. ' ल्हार ' जिभेला लागलेला मत्स्यप्रेमी तिच्यासाठी काय वाटेल ते धाडस करील !

गोडया पाण्यातील मासळी मुबईच्या मासळी मार्केटातही मिळते. खास बंगाल्यांसाठी ती ' गीतांजली ' एक्स्प्रेसने कलकत्त्याहून येते. रोहू, हिलसा हे त्यातले महत्त्वाचे नग. रोहू म्हणजे आमचा मरळ नि हिल्सा म्हणजे खर्चा. मोहरीच्या तेलात राधलेली ही मासळी फक्त बंगालीबाबूच खाऊ शकतील. आम्ही कोंकणी लोक त्या वासानेच, म्हणजे तेलाच्या, मासळीच्या नव्हे ! दूर पळून जाऊ.

गोडया पाण्यातील कुर्ल्या आणि खुबे यांची चव समुद्राची मासळी खाणाऱ्याना उमगणार नाही नदी–व्हाळाच्या पाथरीखाली पंजाच्या आकाराचे काळेकभिन्न खेकडे एकामागून एक सापडू लागले की, ते पकडणाराचे काळीज संतुष्ट होऊन जाते. अशा खेकडयाचा मसालेदार रस्सा ओरपल्यानंतर कितीही दुखणेकरी असो, तो खडखडीत बरा झालाच पाहिजे ! काळ्या खुब्यांचे मटणासारखे कालवणही तसेच !

बांगडयाच्या हंगामात मालवणहून ट्रक भरून ताजे बांगडे आमच्या गावी यायचे. सुके बांगडे आणि सुकी दोडये नि मोरी तर आमच्या पाचवीला पुजलेली. निखाऱ्या-

वर खमग भाजलेला सुका बांगडा नि त्याला लावलेले थेंबभर खोबरेल तेल म्हणजे आमचा जीव की प्राण! सुक्या बांगड्याची, कांदा घातलेली ' कुसमीर ' तोंडी लावायला असली की जेवणाची रगत विचारायला नको! पण ही कुसमीर डाळीच्या आमटीबरोबर असायला हवी. तिचे गोत्र वरणाशी किंवा दहीभाताशी जमत नसते. डाळीचे सांबारे नि सुका बांगडा, बस्स . आणखी काही एक नको. सुके दोडी किंवा मोरी ही पण खोबरेलाच्या वासाने सुगंधित झाली की भलतीच चवदार बनते. पण त्याच्याबरोबर सांबारे हवे ते मसाल्याचे! काळे वाटाणे, मसूर किंवा सोललेल्या चण्याचे काजूकातळ्या घातलेले मसालेदार सांबारे नि सोबत सुकी मोरी– अमृताहुनी गोऽडऽ नाम तुझे देवा ऽऽ

गणपतीचे दिवस मागे पडले की, आभाळ संध्याकाळी वेगवेगळ्या रंगाच्या ढगानी भरून येते त्या ढगाच्या रंगावर समुद्रात कोणती मासळी नि ती किती सापडेल याचा अंदाज अनुभवी मच्छिमार बांधु लागतात. पण आम्हाला मात्र सप्टेंबरनंतर बाजारात येणारी मासळी कोणती ते विचारा–प्रथम बांगड्याना सुरुवात होते. या लहानसर बांगडुल्यांची गोव्यात मोठ्या अपूर्वाईने ' उडदामेथी ' करतात. ऑक्टोबरपर्यंत बांगडुल्यांचा आकार बदलतो आणि ऐन दिवाळीच्या हंगामात फूटभर लांबीचे ' घव-घवीत ' बांगडे बाजारात येऊ लागतात. बांगडे तसेच पेडवे नि तारल्या. या बहीण-भावाची जोडी पानात असेल तर एक वेळ बांगडासुद्धा मागे पाहील. बांगडे, पेडवे, तारल्या ही इतर मासळीच्या मानाने ' हिंवुस ' मासळी. त्याना त्यांचा असा खास मत्स्यगंध असतो, तो पापलेट, रावसाच्या नशिबी नाही ! पण बांगड्या–पेडव्याना तिरफळाची नि हळदीच्या पानांची जोड हवी. तिरफळ नावाचा वनस्पती प्रकार परमेश्वराने फक्त कोंकण–गोवा प्रांतालाच बहाल केलेला आहे आणि त्याचे मूल्य वाढावे म्हणूनच की काय या किनारपट्टीला तशीच हिंवुस मासळी जन्माला घातली आहे. पण तिरफळ, हळदीचे पान घातलेले ' पेडव्याचे ' आंबटतिखट ' सुके ' जो चाखील त्यालाच त्याचा स्वाद कळेल. त्यातही ' बोटपेडवे नावाची एक बारकी जात असते ती तर विलक्षणच चवदार. मुंबईला तिला ' कान्टे ' म्हणतात. नाव काहीही असले तरी चव तीच !

मासळीचेही ठरलेले मुलूख असतात मुंबईचा बोंबील वेंगुर्ल्या–मालवणला सापड-णार नाही सापडला तरी तुरळक. आणि वेंगुर्ल्याचे ' सुळे ' मुंबईला दृष्टीला पडणार नाहीत. गोव्याच्या सोनेरी ' सुंदुश्या ' ना वेरावळच्या चंदेरी गुजल्याची सर नाही आणि रत्नागिरी–पूर्णगडची ' सुरमय ' मुंबईला सापडणार नाही. कर्ली खावी ती गोव्यातल्या शिवोलीची किंवा आचऱ्याची ! ' मांदयाळी ' वरसोवा–अंधेरीची ! मांदयाळ्याना गोव्यात सोनयाळी म्हणतात. केवळ जंजिरा–मुरुडला मिळणारा काळ्या

पाठीचा सरगा सर्वत्र दिसला तरी मुरुडचा सरगा तो मुरुडचाच! पापलेटचेही तसेच. ही शुभ्रवर्णीय नखशिखान्त स्वच्छ मासळी वेरावळपासून रत्नागिरीपर्यंत जेवढी मिळते, तेवढी मालवण–वेंगुर्ल्याला नाही आणि कारवारपासून रत्नागिरीपर्यंत जसे बांगड्याचे ' म्हामूर ' पीक येते, तसे ते सातपाटी केळव्याला येत नाही. सातपाटीच्या पापलेटची मिजासच वेगळी. तेथली मेहेर मंडळी मच्छिमारीत महावस्ताद. एकेकजण आठआठ दिवस दर्यावर तरगत राहतो नि थेट कच्छ वेरावळपर्यंत जाऊन चांदीच्या ताटासारखी भली मोठी पापलेटे घेऊन येतो! पापलेट आणि हलवा यांच्या संकरातून आणखी एक ' खाप्री ' जातीचा पापलेट तयार होतो करड्या, भुऱ्या रंगाचे हे पापलेट आकाराने भारी आणि चवीला विलक्षण रुचकर. जातीचा मासेखाऊ सरगा–पापलेटपेक्षा खाप्रीसाठी जीव टाकील. सरगा, पापलेट हे मासल, कमी काटेरी आणि कमी वासाचे म्हणून सर्व थरात त्याचा वावर. तीच गत रावसानीही. सुरमईसुद्धा त्यांच्या गटात हक्काने बसेल पण कर्ली मात्र आपली वाकडी आणि काटेरी वाट सोडणार नाही. पापलेट सहजपणे खाणाऱ्याला कर्लीशी मुकाबला करणे कठीण. पण एकदा तिच्या तिरक्या सुईसारख्या तीक्ष्ण काट्यांशी सलगी झाली की, तिला तुम्ही हातातून सोडणार नाही. कर्ली कशी कापावी त्याचे शास्त्र आहे आणि ती कशी खावी ही एक कला आहे. व्यवस्थित कापलेल्या कर्लीचे तुकडे अलगद खाता येतात. आणि ज्याला ही कला अवगत झाली आहे त्याला जगातील कुठल्याही जातीचा ' मत्स्यावतार ' सहज वश होईल, यात संशयच नाही! कर्लीच्या धाकट्या बहिणी म्हणजे भिंग, पाला, काटेरी नि खवळी. मासळी जेवढी काटेरी तेवढी ती रुचकर, हे मला लहानपणीच पटले. एकदा चवदार कर्लीचा तुकडा गिळताना एक अणकुचीदार काटा घशात असा अडकला की, ' कर्ली नको, काटा आवर ' अशी गत झाली. मग पावशेराचा सुका भात बकाबका गिळला. तेव्हा कुठल्यातरी घासाबरोबर तो ' कटक ' सुखेनैव खाली गेला. ' रटमटता बांगडे खाता, काटा गळा लागला! ' हे ' परवशता पाश दैवे 'चे विडंबन त्याच बालवयात केलेले!

बारीक मासळीत गुजल्या, तारल्या, पेडवे, मांदयाळी, मोतयाळी आणि वेरल्या यांची गर्दी असते. त्यालच मुडदुश्या नि सुळे घालायला हवे. मादयाळाचा शेंदरी सोनेरी वर्ण नि मोतयाळाचा रुपेरी वर्ख म्हणजे बहारच! पण त्यांची चवही बहारदार. वेरल्या ( गोव्यात ' वेल्ल्या ' ) तर आजारी माणसानेही ढीगभर खाल्ल्या तरी बाधणाऱ्या नाहीत. ही सगळी नाजूक साजूक मासळी फुलांसारखी जपायला हवी. ' मुडदुश्या ' या चमत्कारिक नावाची वीतभर लांबीची देखणी मासळी तर साक्षात चंद्रज्योतच! अस्सल गोवेकराला तिची चमकदार ' गाथण ' दिसली तर तिच्यासाठी बोटातील सोन्याची आंगठी द्यावी लागली तर ता मागेपुढे बघणार नाही! अशी या रसबाळ, राजस, मत्स्यकन्येची मिरासदारी!

या नाजूक नखरेल मासळीच्या तुलनेने दुसरे महाकाय मासे म्हणजे मोरी, घोळ नि शेंगाळे पैकी शेंगाळे इथे कुणी तालेवार खात नाही. मोरी म्हणजे सुशी. तिला कोंकणचे लोक फार आदरे खतात. कोणत्याही मालवणी वा गोमतकीय खाणावळीत जा, 'मोरी'चे मटण तिथे नाही, असे होणारच नाही खोबरे नि खास मटण-मसाला वापरून केलेली लुसलुशीत मोरी म्हणजे मालवण्यांचे केवढे पक्वान्न! पण ती काळ्या पाखाची, बेतशीर वाढलेली मिळायला हवी पांढऱ्या पाखाचा वातड 'नालवा' मोरी म्हणून विकतात. पण त्याचे काही खरे नसते मुंबईकर पाठारे प्रभू, चौकळशी, पाचकळशी आणि कायस्थ मंडळी 'मोरी' म्हटले की नाक मुरडतात. त्याना 'घोळ' प्रिय पाठारे प्रभूना तर घोळीचा काटा हवाच. घोळ कोंकणी माणसे खाणार नाहीत. पण घोळीलाही एक टेस असते. मुंबईच्या मोठमोठ्या हॉटेलातून फिश फिलेट्स म्हणून घोळीचे कापच खायला घालतात

मत्स्यकुलोत्पन्न आणखी एक ऐपतदार जमात म्हणजे कोळंबी. खाडीची सफेद कोळंबी म्हणजे कुलवंत नार. समुद्रातली तांबडी कोळंबी म्हणजे 'वगैरे वगैरे'. मुंबई बंदरात वर्षाचे बाराही महिने मिळणारी कोळंबी म्हणजे त्या बंदराचे एक वैशिष्ट्यच होय. मनगटाएवढी मजबूत, काळपट रंगाची पण टपोरी 'वाघी' कोळंबी सोन्याच्या भावाने खपते. परदेशी साहेब त्यासाठी वाटेल ती किंमत मोजतो. परिणामी तुमच्या आमच्या वाट्याला ती येतच नाही. खाडीतल्या ताज्या पाण्याच्या कोळंबीचे हिरवी मिरची, कोथिंबीर, आले, लसूण घातलेले 'बुजणे' म्हणजे जिभेची चंगळ. असे बुजणे आणखी होते ते ताज्या, गटगटीत बोंबलांचे! सारस्वत गोंयकाराची वांगड्याची उडदामेथी, मालवण्याची मोरी नि कायस्थाचे बुजणे, पापलेटाची कळपुटी, पेडव्याचे आंबटतिखट, कर्लीची गाभोळी, तारल्याचे सार, करजावले शिरशिराचणे, मोटला या किनारपट्टीवरील नाना जातीजमातींच्या मंडळींनी आपापल्या आवडीनिवडीनुसार मासळीच्या बनवलेल्या पाकक्रिया! अवघ्या मत्स्या-वताराला धन्य धन्य करणाऱ्या या जातीवंत चिजा! त्यातच मालवण कणकवलीकडल्या सारस्वतानी केलेले कोळंबीचे 'घबघबे' म्हणजे पराकाष्ठाच– बरोबर मात्र अरळशा आंबोळ्या हव्यात.

कोळंबी वाळवून 'सोडे' करतात. पूर्वी टपोरे काजूगरांसारखे सोडे बाजारात सहज मिळायचे. पण आता ते दुर्मिळ झालेयत. तरीही महाड–श्रीवर्धनला गेलात तर ऐंशी रुपये किलोप्रमाणे तांबूस, काळपट सोडे मिळतील. हे सोडे म्हणजे कायस्थाचे परब्रह्म वांग्याच्या भाजीपासून पलॉवरपर्यंत नि फोडणीच्या पोह्यापासून कशातही ही मंडळी सोडे घालतील नि तो पदार्थ चवदार बनवतील.

हे मत्स्यपुराण शेवंडे, चिंबोऱ्या, तिसऱ्या नि कालवे याचा उल्लेख केल्याशिवाय पूर्ण होऊ शकणार नाही. भीतिप्रद दिसणारे शेवंडे 'लॉबस्टर' म्हणताच कुणालाही

समजून येतात. त्यांची कवचांतून मुक्तता करणे म्हणजे मोत्याची खडकांतून मोकळीक करण्यासारखे दुष्कर असते. पण त्यानंतर त्यांच्या मासाची चव काय वर्णावी ! पण मला स्वत ला शेवड्यापेक्षा जैतापूरच्या खडकातील ताडगोळ्यासारखी लुसलुशीत कालवेच अधिक प्रिय आहेत. महाराष्ट्राच्या सबंध पश्चिम किनाऱ्यावर जैतापूर–मुसाकाजी या एकाच बंदराला देवाने या कालवखडकाची देणगी बहाल केलेली आहे. त्यानंतर थेट गोव्यातील ' बेतूल ' या किनाऱ्याला. च्चिबोऱ्या नावाच्या खाऱ्या कुल्र्या सगळीकडे हव्या तेवढ्या मिळतात. अमावास्येला संपणारा काळा पंधरवडा धरून त्या घेतल्या पाहिजेत तरच त्या लाखेने भरलेल्या गावतील. नाहीतर फुसक्या, पोकळ. अनुभवी 'बाजारकरी' शुक्लपक्षात चिंबोऱ्या विकणाऱ्या कोळणीला पाहणारसुद्धा नाही आणि तिसऱ्या ? वाः एकेकाळी मुंबईच्या मासळी बाजारात काय सुरेख तिसऱ्या मिळायच्या ! गेले ते दिवस. आता कारवारच्या तिसऱ्या सावंतवाडीला येतात ! सोन्याच्या भावाने विकल्या जातात. मुंबईत पार्ल्याच्या नि सांताक्रूझच्या मार्केटात अजूनही तिसऱ्यांचे वाटे तुरळक दिसतात मसालेदार ' एकशिपी 'साठी बरीक तिसऱ्याच हव्या. सोन्याचांदीची नाणी वाजावी, तशा या तिसऱ्याचा सुखद नाद जेवताना ताटातून येतो परक्याला तर तो चमत्कारच वाटतो. तिसऱ्याना शिंपले म्हटले की त्यांची लज्जतच कमी होते ! तिसऱ्या म्हणजे तिसऱ्याच. त्याना दुसरे कोणतेही नाव नाही.

महाराष्ट्राच्या उभ्या किनारपट्टीवर मिळणारी ही विविध प्रकारची मासळी पाहिल्यानतर, खाल्ल्यानंतर आमच्या मालवण–वेंगुर्ले–देवगडच्या किनाऱ्यावरील मासळीबद्दल वेगळे काय सागावे ?

पण तसे नाही—

सागण्यासारखे खूप आहे–

विजयदुर्गचे गोबरे, ( पावसाळ्यात गरवलेले ) सोवरी, देवगडचे सरगे, चिंगळे, आचऱ्याची कर्ली आणि इसवण, मालवणचे सवनाळे, बागडे, सरगे, पापलेटे, सुळे, तांबोशा, निवती कोचऱ्याची सर्व तऱ्हेची बारीकमोठी मासळी नि वेंगुर्ल्याची सुळ्यांची गाथण, पापलेटे, मुडदुशा, सरगे, इसवणी, कर्ल्या– पेडवे, तारल्या !

खाडीत गरवलेली बारीक मासळी–

पागबलेली चंदेरी हलकी, चपळ बारीक मासळी.

आणि ट्रॉलरवरून आणलेली बर्फात थिजलेली मासळी.

आम्हाला हा परमेश्वरी मत्स्यावतार वश आहे. आमच्या मुलखाला जोवर समुद्रकिनारा आहे तोवर आम्हाला मासे संगत करणार आहेत नि आम्ही त्यांना.

# दहिकाले आणि दशावतार

२७. सराई ऐन भरात असते. भाते कापून मळण्या पडतात. नाचणी–वरी आणि कुळीथ यांच्याही राशी शेतकऱ्याच्या खळ्यात उभ्या असतात थडी नुक्ती कुठे शिरशिरू लागलेली असते नि मालवणी मुलखात दहि-काल्याचा हगाम सुरू होतो.

तसा तो कार्तिक शुद्ध द्वादशीलाच सुरू झालेला असतो. तुळशीचे लग्न लागले की, गावोगावचे लोक आपापले 'दहिकाले' सालाबादच्या तिथीनुसार ठरवतात. पण पहिला श्रीगणेशा होतो तो वालावलच्या 'श्रीदेव नारायण मंदिरातील' दहिकाल्याने. आणि मग दक्षिण कोंकणातील दशावतारी मंडळ्या आपापल्या सामानाचे पेटारे माथ्यावर घेऊन गावोगाव हिंडू लागतात. 'दशावतारी इले' ही बातमी देवळाच्या परिसरात आधी पसरते नि ती वाऱ्यावर परमळणाऱ्या चाफ्याच्या सुवासासारखी मग अख्ख्या गावात फिरू लागते 'वयल्या वाडीवरले' आवाटकरी 'खायल्या वाडीवर-' च्याना विचारतात, 'दशावतारी इले ?'

आणि उत्तर मिळते, 'इले, इले–'

आमच्या मुलखामध्ये वार्षिक दहिकाला नि त्यात होणारे दशावतारी नाटक ही एक रात्रभर पुरणारी, पोटभर बाटणारी, निखळ करमणूक. त्यासाठी तिकीट काढावे लागत नाही रिझर्वेशन करावे लागत नाही. दिवसाउजेडी, काळोख पडण्याआधी जाऊन 'जागा धरली' म्हणजे पुरे– तेच रिझर्वेशन !

दहिकाल्याचा दिवस जवळ आला की उभ्या गावात उत्साहाचे वारे सचारते. नदीकाठावर घरोघरच्या बायका पूर्वी रिंगी रिठे ख्रत्रून कपडे लखलखीत करीत. आता 'पाचशेएक' किंवा चावी छाप साबण वहाळातल्या पायरीवर झिजतो. कपडे धुऊन जत्रेच्या दिवसासाठी तयार केले जातात कुणी पैसेवाला तेवढ्या दिवसासाठी नवे कपडेही शिवतो. मुंबैकर चाकरमान्यानी भरलेल्या एसटी येऊ लागतात. बायका-पोरे सजून थटून तयार होतात. गावचे देऊळ सारवले, सजवले जाते. कारण दहिकाला नि दशावतार तिथेच व्हायचा असतो.

आणि मग एके दिवशी सकाळीच दशावतारी मंडळी येऊन गावात उतरते.

मुक्काम देवळातच असतो. दिवसभर गावकरी देवळाच्या आवारात रात्रीच्या खेळासाठी स्टेज उभारण्याच्या उद्योगात गर्क असतात. स्टेज म्हणजे चार बाजूंना चार मेढी, त्यावर नारळाची झावळे किंवा तट्टे. ते नसतील तर साधे ऐनाचे टहाळे. पाठीमागे एक चादरीसारखा पडदा. पेट्रोमॅक्स लावण्यासाठी एक लोखंडी शीग, आता गावोगाव वीज आली. त्यामुळे गावातलाच कुणी 'वायरमन' शेजारच्या घरातून करंट घेऊन दिव्यांची कनेक्शने देतो नि 'लाईट'ची 'ॲरेंजमेन्ट' करतो—(पूर्वी दशावतारी मंडळी गावोगाव चालतच जात, आता एस्टी मिळते. बाबी नालंगसारख्यांच्या आता मालकीच्या मोटारी आहेत.)

प्रत्येक ग्रामदेवतेची दशावतारी मंडळी ठरलेली असते. मोचेमाडकर, पार्सेकर, हिवाळेकर, वालावलकर अशा या मंडळ्या. त्यांचा संसारही एकसारखा. सगळी प्रॉपर्टी, नेपथ्य, कपडे, एका पेटाऱ्यात सामावलेले असते. हा पेटारा डोक्यावर घेऊन ही दशावतारी मंडळी उत्सवाच्या गावी पोचते. दुपारचे आणि रात्रीचे जेवण गावकऱ्यांनी दिलेल्या शिध्यातून तयार होते. दुपारचे जेवण झाले की, सारी मंडळी देवळाच्या आवारात किंवा शेजारच्या झाडाखाली ताणून देतात. कारण आदल्या रात्रीचे जागरण निवळायचे असते. तिन्हीसांजेबरोबर देवळाचा परिसर माणसांनी गजबजू लागतो. फुगे नि पिपाण्यांनी माणसांची डोकी सुन्न होतात. दरवर्षीचे दुकानदार आपापली दुकाने ठरल्या ठिकाणी थाटतात. खेळणी, कपडे, मिठाई, भांडीकुंडी इत्यादी मालाचे दुकानदार ठरलेल्या वार्षिक जागेवर धंद्यासाठी आलेले असतात. त्यात हॉटेलांचा भरणा मोठा. 'च्याय', 'लाडू' एकमेकांना द्यायलाच हवेत. पण मालवणी खाजे नि खटखटे लाडू आणि 'गोळ्याची भजी' ह्या चीजा अस्सल तिकडच्याच. इतरत्र त्या होणार नाहीत नि झाल्या तरी त्यांना इथली चव येणार नाही. भज्याचा खमंग वास सर्वत्र दरवळत असतो. खेड्यापाड्यांतून आलेल्या बायका परसात पिकलेली पपनसे, तोरजने विकायला बसतात. माली, शेवंती, अबोलीचे वळेसर तर सर्वत्रच असतात नि ते केसांत माळून उमेदीने सर्व जत्रेत मुलांबाळांसह हिंडणाऱ्या बायका, 'गोसावणी'च्या बैठकीपुढे गर्दी करीत असतात.

बाहेर जत्रेची अशी गजबज उडते नि तिकडे देवळात नवस फेडण्यासाठी भक्तांची झुंबड उडते. गुरव, घाडी नि बाकीचे मानकरी भक्तांची 'गाऱ्हाणी' देवीच्या समोर सनातन पद्धतीने घालीत असतात नि 'होय महाराजा ऽऽ'चे घोष सभामंडपात घुमत असतात. देवीसमोर ओटीचे नारळ नि खण याचा ढीग साचतो. मग देवीची पालखी निघते. ढोल, ताशे, वाजंत्र्याच्या गजरात देवाचे 'तरंग' देवळाभोवती प्रदक्षिणा घालतात. जत्रेतली गर्दी त्या पालखीबरोबर फिरू लागते. आता पंचक्रोशीतली तमाम गावकरी मंडळी जत्रेत सामील झालेली असते. माणसाचा हौद चारी बाजूनी खळाळत असतो. रात्र तसूतसूने चढत असते.

पलीकडे राईतल्या झाडकळीत जुगारी नादिष्टांनी आपापले 'पट' माडलेले असतात. गर्दीपासून थोडे दूर पेट्रोमॅक्स लावून किंवा मेणबत्त्यांच्या पलित्यांच्या उजेडात छुपा जुगार रगतो. मग मध्येच कुणीतरी ओरडते–'रे, पोलीस इले!' आणि जो तो काळोखातून जीव घेऊन पळत सुटतो.

कोंकणी माणसाला बेअब्रूसारखे दुःख नसते. पोलिसांची भीती वाटत असतानाच जुगाराचेही त्यातल्या हौशी लोकांना आकर्षण स्वस्थ बसू देत नसते—

आता रात्रीचे बारा वाजून गेलेले असतात. देवळाच्या मुख्य दारासमोरच मोकळ्या जागेत दशावतारी खेळ आता सुरू होणार असतो. दरम्यान पोरेसोरे चादरी, सतरज्या, गोणपाटावर पेंगुळलेली असतात. जत्रेत भटकून दमलेले जतरकरी आपापल्या जागा धरून खेळ कधी सुरू होतो त्याची वाट पहात असतात.

दुपारपासून झोपलेले दशावतारी कलावंत आता एकेक उठू लागतात. विडीकाडी, चहापाणी, थोडेफार जेवणखाण होऊन एकेकजण 'रंगायला' बसतो. त्यांच्यातीलच एकजण 'रगभूषा' आणि 'नेपथ्य' साभाळणारा असतो. शकासुराचे काळे तांबडे कपडे, सरस्वतीचा पिसारा, गणपतीची सोंड, राजाची तरवार नि झगमगीत कपडे स्त्रीपार्टीची दाढी सफाचाट करून त्याला रगरगोटी करून 'कापाड न्हेसवले' की संपले–मग मडळीचा म्होरक्या नाईक आज कोणता खेळ लावायचा ते सागतो– सती चागुणा, सुभद्राहरण, इद्रजित वध किंवा 'राजा हरिश्चद्र' यांसारखा एखादा खेळ ठरतो नि तिकडे चादरीच्या पडद्यापलीकडे उभा राहिलेला झाजवाला (चकीवाला) आवेशाने झांजेचा झणत्कार सुरू करतो. मृदुगी हात फडफडावतो, पेटीवाला सूर धरतो आणि समोरचा पेंगणारा, ताटकळणारा प्रेक्षक समुदाय सावध होतो. 'उठा गो पोरग्यान्! नाटक सुरू झाला!' पोरीबाळींची आई सागते नि त्या भर्रकन उठून बसतात. एकादी जख्ख म्हातारी मिटलेला डोळा उघडून हळूच बघते तिच्या डोळ्यानी फारसे दिसत नसले तरी कान शाबूत असतात. मृदुग, नाल, चकी यांचा चिरपरिचित नाद कानावर येताच म्हातारी क्षणात तरणी होते नि सावरून बसते.

तोच रगमचावरील चादरीमागे हालचाल होते नि वाद्यांच्या तालावर श्री गणेशाचे रगमचावर आगमन होते. सोंडेचा लाकडी मुखवटा या गणरायाने एका हाताने सावरून धरलेला असतो. गणरायाबरोबर दोन्ही बाजूंनी रिद्धीसिद्धी नृत्य करीत असतात. भटजीचे सोंग घेतलेले पात्र गमतीदारपणे गजाननपूजा पार पाडते. जवळच लाडू–खाज्याची दुकाने असतात. त्यातील एखाद्याचे नाव तो घेतो. 'पाडू पिळण-कराच्या दुकानातल्या बुंदी लाडवान् समरपयामी!' लाडूचा नैवेद्य दाखवतो आणि प्रेक्षक हसायला सुरुवात करतात. त्याबरोबर झांजवाला नाईक पुकारतो, 'आता

कोणी यावे गा ? नि तो सरस्वतीचे नाव घेतो. पाठोपाठ सरस्वतीचे स्मरण होते नि मोरावर बसून श्री सरस्वती स्टेजवर प्रकट होते. मोराचा पिसारा लावून केलेले सरस्वतीचे नृत्य प्रेक्षक डोळे भरून पाहतात. सरस्वतीचे नृत्य विलक्षण तालबद्ध असते. झांजमृदुंगाला आता प्रेक्षकही नकळत टाळ्याची साथ देऊ लागतात. तबला, मृदुंग, झांज नि पेटी यांच्या साथीला ' हे जिताम् था ऽऽ यय्य यय्य था ऽऽ ' ची आवर्तने नाईक तोंडाने एका विशिष्ट लयीत घेत असतो. त्या पाचदहा मिनिटात वाजपाचा एक अद्‌भुत प्रत्यय त्या रंगमंचावर प्रेक्षकांना येतो.

आणि पाठोपाठ ज्याची आबालवृद्ध वाट पहात असतात तो ' शकासुर ' उड्या मारीत, हातातील सोटा सरसावीत प्रवेश करतो नि प्रेक्षकात एकच गलका होतो— ' शकासुर इलो ! ' शकासुर म्हणजे दशावतारी खेळाचे मोठेच आकर्षण असते. त्याचा नखशिखान्त काळा पोशाख ( जुन्या छत्रीच्या कापडाचा ! ) लांब आणि लवलवती लालभडक जीभ नि इरसाल बोलणे—शकासुर हा कोंकणी पद्धतीने समोर दिसेल त्या दृश्यावर मार्मिक भाष्य करून प्रेक्षकाना मनमुराद हसवतो त्याच्या साऱ्या हालचाली लयबद्ध आणि सुसंगत असतात सर्कशीतला विदूषक जसा उत्तम कसलेला कसरतपटू असावा लागतो, तसाच दशावतारातला शकासुर ! तो क्षणात मालवणी बोलेल, तर क्षणात शुद्ध बाळबोध मराठी ' उत्कृष्ट उच्चारासह त्याचवेळी देवाचे वेद तो चोरून नेतो नि रंगमंचावर त्यामुळे मोठाच पेचप्रसंग निर्माण होतो. शेवटी शकासुराचे पारिपत्य करून त्याने पाताळात नेलेले वेद परत आणण्यासाठी ब्रह्मदेव श्री विष्णूला पाचारण करतो. श्रीविष्णू येऊन शकासुराचा वध करतो व वेद ब्रह्मदेवाला परत देतो. या सर्व प्रकारात विनोद, वीर, रौद्र या रसांचा जो परिपोष होतो, तो नजरेनेच पहायला पाहिजे. प्रेक्षक तर डोळे विस्फारून सारे पहात असतात नि प्रत्येक दशावतारी पात्र जणू तो प्रसंग त्या टीचभर रंगमंचावर प्रत्यक्षच जगत असते.

एवढे होईपर्यंत दोन वाजून जातात नि मुख्य आख्यानाला सुरुवात होते झांजवाला, नाल—चक्कीवाला मधला काळ अप्रतिम वाजप करून प्रेक्षकांचे मनोरंजन करतात. आणि मुख्य कथानकाला सुरुवात होते—

' सती चांगुणा ' हा खेळ सुरू करण्यात आला तर चिल्याबाळाचे शिर उखळात घालून कांडताना चांगुणा रडत रडत गाणे गाऊ लागली की अवघा प्रेक्षकवृंद व्याकुळ होतो. बायका हमसाहमशी रडू लागतात आणि पोरे आईच्या कुशीला बिलगतात. हरिश्चंद्र तारामतीच्या खेळात हरिश्चंद्राचे हाल पाहून लोक गलबलतात आणि राम वनवासाला गेल्यानंतर जेव्हा हनुमान प्रेक्षकांत हिंडून ' हे वृक्षांनो, माझ्या रामासाठी तुमची सावली द्या, तुमची फळे द्या, ' म्हणून हात पसरतो, तेव्हा डोळ्यातील अश्रू पुशीत सारे प्रेक्षक त्याच्या हातावर आपल्या चिल्लापिल्लासाठी घेतलेले ' खडके ' वा

' बुंदीचे लाडू ' ठेवतात. ते दृश्य केवळ प्रत्यक्ष पाहण्यासारखेच असते. कलावंतांचा असा जिता-जागता अभिनय आणि तो पाहणाऱ्या प्रेक्षकांची अशी अष्टांगी समरसता मालवणी मुलुखातील दशावतारातच आजच्या घटकेला दिसून येते. जमलेला हजारो स्त्रीपुरुषांचा समुदाय समोर चाललेल्या खेळामध्ये सर्व संवेदनानिशी सहभागी होतो. त्या पात्राबरोबर हसतो, त्या पात्राबरोबर रडतो आणि स्वतःच तो एक कलावंतच बनतो –

दशावतारी खेळ उजाडेपर्यंत चालतो. कुणालाही तो पाहताना डुलकी येत नाही. मग पूर्वेला दिवसाचा लाल प्रकाश उजळू लागतो. आणि दशावतारी खेळाचे भरत-वाक्य होते.

उजाडेपर्यंत चालला नाही तर तो दशावतारी खेळच नव्हे! खेळ संपताना आरती होते. एक स्त्रीपात्र हातात आरती घेऊन प्रेक्षकातून फिरते. त्याला ' तळी फिरवणे ' म्हणतात. या तळीतील निरांजनावर हाताचा तळवा फिरवण्यासाठी प्रेक्षक गर्दी करतात. चवली–पावलीची नाणी तळीत जमा होतात नि देवळासमोरच्या प्रांगणात शेवटचा दहिकाला पार पडतो. श्रीकृष्णाचे सोंग घेऊन एक पात्र दह्याचे मडके फोडून दह्याचा प्रसाद सर्वांना देते. हा ' दहीकाला ' झाला की दशावताराची खऱ्या अर्थाने सांगता होते.

हळूहळू गर्दी ओसरू लागते बऱ्या मालवल्या जातात. देवळापुढील भाग रिकामा होऊ लागतो. तिथल्या जत्रा भरलेल्या कुणग्यात जतरकरांनी फेकलेले कागदाचे, पानांचे बोळे, उसाच्या चोयट्या तेवढ्या उरतात. दुकानदार आपापली ' कावणे ' उतरू लागतात. हां हां म्हणता सारा परिसर ओसाड दिसू लागतो. रात्री झगमगणारे कपडे घालून राजा, राणी बनलेले दशावतारी कलाकार आता पेटारे भरू लागतात. सारा दशावतार पेटाऱ्यात बंदिस्त होतो. गावकऱ्यांनी दिलेली बिदागीची अल्पस्वल्प रक्कम आपसांत वाटून घेऊन सारे जण उठतात. अंगात नेहमीचे फाटके शर्ट, ठिगळे लावलेली धोतरे किंवा पुगळी झालेल्या पॅन्टी घालून नि पेटारे डोक्यावर घेऊन ते देऊळ सोडतात.

त्या रात्री होणाऱ्या खेळाचे नवे गाव गाठण्यासाठी थकलेल्या पावलांनी, नि संतुष्ट मनाने ते चालू लागतात.

२८.

# गौरी-गणपतीचे दिवस

आमच्या मुलखात गणपतीचे दिवस म्हणजे मंतरलेले दिवस. या दिवसांना एक वेगळे रूप असते. या दिवसांना सुवास असतो; नाद असतो, रंग असतो. मळ्यामळ्यांतून हळवी भाते पिकू लागतात— त्यांच्या केसरांचा सुगंध दशदिशांत भरून राहिलेला असतो. रात्र होताच टाळमृदुंगाच्या गजरात 'अलकापुरी पुण्यभूमी पवित्र' सुरू होते नि सारी रात्र त्या नादात डोलत राहते. हिरवीगार शेते, हिरवेपिवळे माळ, स्फटिकासारखे प्रवाह, लाल-पांढरी आणि निळी-पिवळी फुले, यांनी वातावरण गजबजून जाते. मग हलकेच 'गणेशचतुर्थी'चा दिवस उजाडतो, 'सुखकर्ता' मोरयाच्या आगमनाबरोबर सगळीकडे जादू पसरू लागते आणि दिवस 'मंतरलेले' होतात. माणसांना भूल पडते आणि त्यांना भुकेचा विसर पडतो. माणसे एका तंद्रीतून वावरू लागतात. आरत्या आणि भजने, अभंग आणि गवळणी, टाळ आणि मृदुंग, आवाज आणि आलाप याशिवाय त्यांना काही सुचत नाही की समजत नाही.

श्रावण महिना संपतो आणि कोंकणी शेतकरी कामाधामातून मोकळा होतो. लावणी कधीच संपलेली असते. वरकस जमिनीची कामेही आटोपलेली असतात. शेवटचा कुळथाचा पेरा हातावेगळा झालेला असतो. नडणी, वेणणीची कामे फार जोखमीची असत नाहीत. घरची बायलमाणसे ती जबाबदारी उचलतात नि कोंकणातील 'बापये' गणपतीच्या दिवसासाठी मोकळे होतात. त्यांचे अड्डे आता दिवसा 'गणपतीच्या शाळेत' आणि रात्रीच्या वेळी वाडीतल्या भजनी मंडळीत पडू लागतात.

'गणपतीची शाळा' हे या दिवसाचे मोठे प्रेक्षणीय ठिकाण. अनंत मिस्त्रीला बोलायला फुरसद नसते. त्याच्या 'शाळेत' गावच्या मराठी शाळेची मुले दाटी करतात नि मग शाळेत रिकामे बसलेल्या मास्तरांनाही वाटू लागते की जावे 'गणपतीच्या शाळेत' नि तासन् तास बघत बसावे रंगलेले गणपती. पाच रुपयावाले, दहा रुपयावाले नि त्याहून भारी असे गणपतीच्या मूर्तींचे गट असतात. भारी गणपतींना अनंत स्वतः रंगकाम करतो. गणपतींचे मूर्तिकाम नि रंगकाम ही त्याची प्रतिष्ठा

असते. गणपतीचे दिवस जवळ आले म्हणजे तो बेहोष होतो दिवसरात्र सतत श्रम करतो. माती कुटण्यात, साचे भरण्यात, रंग कालवण्यात आणि गणपतीच्या पिवळ्या पितांबरावर नाजूक सोनेरी नक्षी काढण्यात गढून जातो. कुंचल्याने गणपतीचे ' डोळे उघडण्यात ' जागरणाने डोळे कधी मिटतात याची शुद्ध त्याला राहत नाही. सतरा जणांच्या सतरा प्रश्नांना उत्तरे देताना तो वैतागून जातो– शिरी खोताचा मुलगा सुरेश विचारतो– ' मिस्तरी, आमचो गणपती खय ? ' ' तो बग थंयसर–' हातातला ब्रश तसाच पुढे चालवीत अनंत उत्तर देतो—

' तो फेटेवालो ? '

' न्हय– गांधी टोपीवालो– '

' तुका बाहुलीवालो गणपती सांगितल्लो ना ? आमका टोपीवालो गणपती नको हा. ' शिरी खोताचा पोरगा तावातावाने म्हणतो—

अनंत बोलत नाही काम चालू ठेवतो. तोच दुसरा एक जण विचारतो– ' अनू, आमचो गणपती खयचो बुवा– यदांतरी वाघाच्या पाठीवर बसलेलो गणपती केलंस का नाय ? '

कुणाला पांढऱ्या टोपीचा, कुणाला फेटेवाला, कुणाला शेजारी बाई बसवलेला, कुणाला सिंहाच्या जबड्यात भाला खुपसणारा असे नाना प्रकारचे गणपती लोकांना हवे असतात एखादा हौशी गावकर मुंबईहून आणवलेले लालबाग- चिंचपोकळीच्या सार्वजनिक गणपतीचे मोठे चित्र दाखवतो नि त्याबरहुकूम मूर्ती बनवायला सांगतो– हौशी अनंत तेही काम उत्साहाने पत्करतो. मग त्याच्या हालचालींवर उभ्या गावाचे लक्ष वेधून राहते. हळूहळू मूर्ती आकार घेऊ लागते, आज बैठक तयार झाली. उद्या बाहुली उभी झाली. परवा गणपतीजवळचा सिंह तयार झाला, असे रिपोर्ट दिले घेतले जातात. माणसाच्या नजरा अनंत मेस्त्रीच्या हातावर खिळून राहतात. चतुर्थीला दहाबारा दिवस राहिले म्हणजे रंगकाम सुरू होते. सफेदा, हरमक, नीळ, कुसुंबी, चायना असे नानातऱ्हेचे एरवी अपरिचित शब्द लोकांच्या कानी पडतात. एखादे हुशार पोरगे याच शाळेत उमेदवारीला सुरुवात करते नि वर्षा-दोन वर्षांत स्वतंत्र ' शाळा ' सुरू करते.

चतुर्थीच्या आधी आठ दिवस घरोघर गणपतीच्या आराशीची तयारी चालते. भिंती शुभ्र खडीने रंगवल्या जातात. त्यावर ' कमळाचे ' चित्र काढून हवे असते. शाळेतलाच एखादा उमेदवार हाताशी धरला जातो. कपाशाने तो भिंतीवर भले मोठे शंभर-दीडशे पाकळ्याचे ' कमळ ' काढतो. त्यात सत्रा जातीचे रंग भरतो नि खाली एक सुबकशी कुंडी नि दोन अळवाच्या पानासारखी पाने चितारतो. एवढे झाले की गणपतीच्या पाठीमागची भिंत सजून निघाली. एखादा मुंबैवाला ह्या

भानगडीत पडत नाही. तो भिंतीला केबरे मारतो. ' केबरे ' म्हणजे शिळा प्रेसवर छापलेली, पुराणातले प्रसग दाखवणारी भडक रंगातली चित्रे अलिकडे ही ' केबरे ' दुर्मिळ होत चालली आहेत. त्याऐवजी ' हनुमान–पातालविजय ' किंवा ' वनकेसरी ' यासारख्या सिनेम्यांचे मुंबईहून आणलेले भलेमोठे पोस्टर भिंतीवर टेकसांच्या साहाय्याने अथवा करवंदीच्या ओल्या काड्यानी मारले जातात अशा एकदोन पोस्टरात भिंत ' भरगच्च ' होते. ( हेमामालिनीपासून श्रीदेवीपर्यंत साऱ्या नट्यांची चित्रे भिंती शोभिवत करतात ! ) भिंत रंगवून झाली म्हणजे ' मडपी 'ची तयारी करायची मडपीचे सामान चतुर्थीच्या आदल्या दिवशीच आणून ठेवायला हवे. गणपतीच्या मस्तकावर छतासारखी टांगलेली गावच्या सुताराने बनवलेली ही रगीत मडपी, नुसतीच बांधून चालत नाही. तिला फळाफुलानी शोभिवत केले पाहिजे. मंडपीचे सामान आणायचे काम घरातील पोराच्या वाट्णीला येते. ती ते हौसेने उचलतात मग लालभडक रंगाची किंवा पिवळीजर्द ' कौंडळे ', घोसदार पोपटी ' कागणे ', शेरणीची शुभ्र पाने, पिवळीधमक फुलाची हरणे, तेरडे, नागखडीची फुले असा नानाप्रकारचा फळाफुलांचा साज घरात येऊन पडतो. शेंदरी रगाची पोफळे, दोनचार कोवळ्या काकड्या, एखादा असोला नारळ यांच्या जोडीने हा सारा साज अत्यत कलात्मक पद्धतीने या मडपीला बाधून लटकू लागला म्हणजे शोभा पहावी. अवघ्या घरालाच एक सौंदर्य प्राप्त होते.

चतुर्थीच्या आधी दोन दिवस येते ' आवरणे. ' त्याच्या दुसऱ्या दिवशी ' हरितालिका '– हे दोन्ही दिवस घरातल्या बायकांचे. पुरुषांना त्या भानगडीकडे लक्ष द्यायला नको. त्यांचे डोळे भिडलेले असतात चतुर्थीवर. सकाळीच स्नान वगैरे आटोपून मुलाबाळांसह ' गणपतीच्या शाळेत ' जायचे. ' गणपती बाप्पा मोरया 'चा गजर नि फटाके नि पिटनळ्या यांचे फटफटे आवाज, यात अनत मेस्त्रीचा आवाज एकूच येत नाही. पण त्याचा म्हातारा चुलता डोळ्यांत तेल घालून सगळीकडे लक्ष देत असतो– ' अरे, बाबल्या परबाचो गणपती खंयचो ? ' ' पाच रुपयावाली रांग बग—' ' बाबल्या, पैसे काड, नि नारळ खय ! ' अशी त्याची सारखी बडबड चाललेली असते. पैसे नि नारळ हातात आल्याशिवाय गणपतीची मूर्ती उचलायला म्हातारा मेस्त्री कुणाला देत नाही. अनू मेस्त्रीची अवस्था मोठी केविलवाणी झालेली असते. तीन महिने सतत खपून त्याने तयार केलेले ते सुदर ' गणराज ' एकेक, एकेक असे त्याच्या डोळ्यासमोर निघून जाऊ लागतात. सगळा कारभार चुलत्याकडे सोपवून तो उदास चेहरा करून एकीकडे गप्प बसलेला असतो. त्याचे सगळे बळ, बेहोषी उतरत असते.

घरोघरचे गणपती पाटावर जाऊन बसतात. पूजाअर्चा होते नि गणपतीच्या

दिवसांना खरा ' नाद ' ज्यामुळे प्राप्त होतो, त्या आरत्या घरोघर सुरू होतात. प्रत्येक वाडीत आरत्या म्हणणारी मंडळी दुपार, संध्याकाळ या घराकडून त्या घराकडे अशी फिरत असते. टाळ नि नाल किंवा मृदुग घेऊन, ' आरतकरी ' आल्याशिवाय घरच्या एकट्या माणसाने आरती म्हणायची नाही, हा संकेत कटाक्षाने पाळला जातो– मग जेवणास कितीही उशीर झाला तरी बेहत्तर !

' आरतकरी ' येतात, त्यांच्याबरोबर वाडीतली बहुतेक सर्व मंडळी असते. आरती सामुदायिक झाल्याशिवाय तिला रंगत येत नाही. ' हां– म्हणा–' असे कोणीतरी म्हणतो नि सुरुवात करतो–' सुखकर्ता दुःखहर्ता– वार्ता विघ्नाची ! ' असल्या बारीक-सारीक आरत्या एकटोन होतात. घरचा मालक हाताने आरतीचे ताम्हन घेऊन गणपतीसमोर उभा असतो नि मग कोणीतरी सुरू करते, ' येई हो विठ्ठले, माझे माऊली ये—'

नि मग रंग चढू लागतो. नादाला कैफ येतो. नाल आणि टाळ, चक्की आणि झांज यांची चुरस लागते. पण म्हणणाऱ्यांच्या बेंबीचे देठ दुखत नाहीत. ' गरुडावरी बैसोनि माझा कैवारी आला ऽऽ ' आणि ' विठोबाचे राज्य आम्हा दसरा दिपवाळीऽऽ ' असली गहिंवर आणणारी कडवी, भक्तिरसात घोळून पुन्हा पुन्हा आळवली जातात. वेळेचे भान राहत नाही. समोरच्या ' चंदनाची उटी नि कुंकुम केशर ' ल्यायलेल्या गोजिऱ्या मूर्तीवर ध्यान ठेवून सारे एका विलक्षण भक्तिमय वातावरणात डुबत असतात. आरत्या अशा एकामागोमाग रंगू फुलू लागल्या म्हणजे त्या थाववण्याचे भान कुणाला राहत नाही. एकापेक्षा एक गोड चालीच्या आरत्या नुसत्या कुठूनतरी उतरत जातात नि ' आरतकरी ' मंडळी त्यांना वरच्यावर झेलून धरते. ' आरती ओवाळू मदनगोपाळा–शामसुंदर गळा ! वैजयंतीमाळा ' ही नितांत लावण्यसुंदर आरती सुरू झाली नि मृदुगाच्या संथ चालीवर चकव्याने मंद किणकीण सुरू केली म्हणजे म्हणणाऱ्यांचे गळे भरून येतात. ऐकणाऱ्यांचे डोळे पाण्याने चिंब होतात.

असे हे आरत्यांचे वेड. अक्षरशः वेड. एकट्या दुकट्याने कोंकणात कोणी आरती म्हणत नाही. टाळमृदुंग, निदान चक्की किंवा झांज असल्याशिवाय नुसत्या हाताच्या टाळीची आरती जशी या मुलुखात मंजूर नाही, तशी गडबडघाईने, वाघ पाठीला लागल्यासारखी कडवी ओलांडीत, ' आरती ज्ञानराजा– महाकैवल्यतेजा ! ' किंवा ' जयजय दीनदयाळा सत्यनारायण देवा–' असली भारदस्त, वजनदार आरती म्हणण्याचे कोणी इथे धाडस करीत नाही. गणपतीच्या या दिवसाचे या संगीत आरत्या हे एक मोठे सामर्थ्य मानले जाते.

आरत्या तशी भजने. गणपतीच्या दिवसात भजनांना ऊत येतो. घरोघर नवसाच्या श्रीसत्यनारायणाच्या महापूजा झडतात. पूजा आटोपली म्हणजे–' अलंकापुरी ' ने सुरवात होणारे भजन नसले की संपलेच. सत्यनारायणाच्या पूजेला भजनाचे मुद्दाम

आमन्त्रण द्यावे लागत नाही. ज्या भाविकतेने पूजेला जायचे, त्याच भाविकतेने तेथे सगळा 'मांड' नेऊन भजन करायचे, हा संकेत. काळ्या-पांढऱ्या पट्ट्यांची सुरेख बाज्याची पेटी डोकीवर घेऊन दत्तू परब आपोआप पूजेच्या घरची वाट चालू लागणार, नि त्याच्या पाठोपाठ गळ्याभोवती टाळ गुंडाळून सगळी भजन मंडळी तेथे उपस्थित होणार. यात काही चुकणार नाही भजनी मंडळीला बिदागी काही नाही. घरवाल्याने एकदा गूळसाखर 'मिक्स' करून बनविलेली 'च्याय कप कप दिली म्हणजे झाले. सोबत गुळाच्या 'न्हेवऱ्या' असणारच, त्या मागाव्या लागत नाहीत आरतीच्या वेळी जशी गूळखोबऱ्याची नि काकडीच्या फोडीची 'शिरणी' तशी भजनाच्या वेळी 'च्याय नि न्हेवरी!' केव्हातरी 'घुगऱ्या' सुद्धा!

बाप्ये असे भजनात गुतलेले असतात नि घरातली बायलमाणसे 'फुगड्या खेळण्यात! मळ्यात वेणणी करून नि नाचणीच्या मळ्यात दिवसभर नडणी करून भागलेल्या या बायका रात्र होताच अंथरुणाला पाठ लावीत नाहीत फुगड्यांचा हैदोस सुरू करतात. तरण्यांच्या जोडीने म्हाताऱ्यादेखील अंग वाकवीत घुमू लागल्या म्हणजे पिढ्यान्-पिढ्यांचे जुने घर एकदम तरणेताठे होते, 'आकाबाईचा कोंबडा-आला माझ्या दारी' इथपासून सुरुवात होते, नि 'कित्याक गो बसलस टेकून? न्हेसनात शिरलो ढेकून!' असल्या बाष्कळ फुगड्याही 'फुय् फुय्' करीत खेळल्या जातात. मग दूर कोपऱ्यात बसून हे सारे अलिप्तपणे न्याहाळणारी एखादी अनुभवी सखूबाई मध्येच उठते नि म्हणते—'लय झाल्यो ह्यो फुगड्यो, आता कसलीतरी 'कायनी' सांगा—'

'तूच सांग, ती सरावन बाळाची.' सखूबाईला साऱ्यांचा आग्रह होतो नि सखूबाई पालथी मांडी घालून शिस्तवार बसते. नि किनऱ्या आवाजात सांगू लागते, 'आयका गेऽ, आयका गेऽ, सरावन बाळाऽऽ-सरावन बाळाऽऽ-'

पाठोपाठ साऱ्या जणी एका सुरात कहाणी गाऊ लागतात. आजूबाजूला धडपड-णाऱ्या चिमुरड्या पोरी अध्येमध्ये येऊन बसतात, 'ने बाळा, ने बाळा, काशी तीर्थाला—' कहाणी पुढे सरकू लागते. रात्र संपून पहाट कधी होते ते कळत नाही—

हे मंतरलेले दिवस जसे लवकर येतात तसे लवकर संपतात. पाच दिवसांचे, सात दिवसांचे गणपती जाऊ लागले म्हणजे मनाला कसा हलकेपणा येतो. एखादी प्रिय वस्तू हरवावी तसे वाटते. पाचसात दिवस कसे आनंदात जातात घर भरल्यासारखे असते पोरटोर टवटवीत असतात. म्हातारेकोतारे खुषीत असतात. पण गणपती पोचवण्याचा दिवस नको म्हटले तरी उजाडतोच. सकाळपासूनच मन उदास होऊन जाते. दुपारची आरती नेहमीपेक्षा अधिक वेळ आपोआप लांबते. संध्याकाळी

'उत्तरपूजा' जड हातानी पार पडते. गणपतीच्या सोंडेवर घरातील बाई दही सोडते. तोपर्यंत शेजारचा एखादा गणपती बाहेर पडतोच. त्याचा 'गणपती बाप्पा मोरया' आवाज कानी येताच, घुटमळणारी पावले पुढे होतात. नमस्कार करून गणपतीच्या पाटाला हात घालतात. आधी किंचित हलवल्यासारखे करून पाट हलकेच बाहेर घेतला जातो. विणलेला रुमाल गणपतीच्या मुगुटावर घातला जातो. हिरमुसल्या चेहऱ्याची मुले उरले सुरले फटाके वाजवून चेहरा उजळ ठेवण्याचा निष्फळ प्रयत्न करीत चालू लागतात. पाचसात दिवस घराला शोभिवत बनवणारी उत्सवमूर्ती घराबाहेर पडते हलके हलके तळ्याच्या दिशेने चालू लागते—

तळ्यावरून दिवेलागणीला मंडळी परत येतात. रिकामा पाट नि त्यावर चार फुले घेऊन परत येतात. अद्याप सतेज असलेली मंडपी आता कोमेजू लागते. अद्याप तेवत असलेली समई आता थरथरू लागते. इतके दिवस आरत्या, भजने नि फुगड्या यानी दणाणून जाणारे घर आता स्तब्ध झालेले असते. एक विषण्ण किणकीण सगळीकडे भरून राहते नि मुले घरातला आवंढा गिळीत हलकेच घरात शिरतात—गणपतीचे मतरलेले दिवस उंबऱ्याबाहेर राहतात

# आंब्या-फणसाचे दिवस

२९. मालवणी मुलुखामध्ये चैत्र–वैशाखाची दारे उघडून आंब्या–फणसाचे दिवस येतात व नुसतेच येत नाहीत, जांभळाना आणि करवदानाही बोटाशी धरून येतात आणि आमचे चित्त शाळेतून उडते या दिवसांची आम्ही वर्षभर वाट पहात असतो, आणि हे दिवस जवळपास दिसू लागताच आम्ही आनदाने वेडे होऊन जातो. आमच्या शाळेला उन्हाळ्याची सुटी नसते. कोंकणातील आमच्या शाळा ऐन पावसाळ्यात बद असतात. पण आम्हाला सुटी नसली तरी चालते. परीक्षा झालेल्या असतात. पास–नापास कळलेले असते नि नवी पुस्तके जूनशिवाय मिळत नसतात. तेव्हा हे दिवस हुदडण्याला मोकळे असतात. आंब्याफणसाचे दिवस म्हणजे आम्हाला सणाचे दिवस. नाना तऱ्हेचे नवे रग, सुवास आणि नाद अनुभवीत हुंदडण्याचे. नाना तऱ्हेच्या फळांनी पोट यथेच्छ भरण्याचे आणि नदीच्या कोंडीत तासन्‌तास डुबण्याचे. हे दिवस कधी येतात असे आम्हाला झालेले असते.

पौष महिन्यापासून आंब्याच्या झाडावर लटकू लागलेल्या कैऱ्यावर दगडफेक करून आम्ही कटाळलेले असतो. नि अचानक कुणीतरी बातमी आणते, अमक्या अमक्याच्या दारातला आंबा पिकू लागला आणि आमची तमाम वानरसेना त्या मंतरलेल्या झाडाच्या दिशेने जीव तोडून धावू लागते. आणि खरेच, त्या झाडावर पिकलेल्या आंब्यांचे पिवळे शेंदरी घड लोंबताना दिसतात.

एक चिटुकली खार शेपटीचा गोंडा उभारून या आंब्यावर तुरूतुरू पळताना दिसते. नि आम्ही सगळे आशाळभूतपणे तिच्या हालचालीकडे नजरा लावून बसतो. मग ती एखाद्या पिकलेल्या आंब्याला अडखळते नि ते पिवळसर फळ पटकन खाली पडते. पोरांचा घोळका त्या पडलेल्या आंब्यावर तुटून पडतो. पण एकाद्याच्याच हाती ते फळ लागते नि बाकीचे पुन्हा ‘ पड पड आंब्या गोडांब्या ’–करीत वर डोळे लावून राहतात.

पण ही नवलाई लवकरच संपते नि गावातली एकूण एक आंब्यांची झाडे एकामागून एक पिकू लागतात. आमची वानरसेना मुठीतल्या लाह्या उधळाव्या तशी

गावभर उधळते. अगभर आम्याच्या रसाचे ओघळ दिसू लागतात. गावात शंभर नावाची नि दोनशे जातींची आम्याची झाडे असतात. मिरमिरीत वासाचा मिरमिऱ्या, भरपूर चीक असणारा काजाळ्या, साखरेसारखा गोड साखऱ्या, पोपटाच्या चोचीसारखे टोक असलेला टोकेरा, धष्टपुष्ट मांसल देहाचा घोण्या आणि सुपारीएवढ्या बारीक आकाराची बिटकी असे नाना जातीचे आंबे चोखता चोखता तोंड दुखू लागते. मग घरोघर आम्याच्या आढ्या पडतात. भा णात लपून बसलेले ते गरम गरम आंबे सातआठ दिवसात पिकून दरवळू लागतात आणि आबरसाची लयलूट होते. आंबा कोणी कापून खाऊ लागला की आम्ही हसतो. या दिवसात आंबा खायचा तो चोखून–आख्खा. त्याला चाकू लावणे आम्हाला खुळेपणाचे वाटते

रात्री चुडीच्या प्रकाशात हातात रोवळ्या घेऊन पडीचे आंबे निवडताना आमच्यात हमरीतुमरी होते. एखाद्या रुचकर आंब्यावर वाघळे फडफडतात नि हलऱ्या देठाने ते आंबे धबाधब खाली कोसळतात. घराच्या पायरीवर मालक रात्रभर टपून जागत बसलेला असतो त्याचा डोळा चुकवून पडलेले आंबे पळवण्यातली गमत वर्षभर पुन्हा कधी हाशीला पडत नाही.

आंबे तसेच फणस वैशाखाच्या मध्याला फणसाना पिकल्याशिवाय राहवतच नाही. दारातल्या फणसावर रोज एकदोन तरी फणस टिचक्या मारताच डबडब वाजतात नि आम्ही समजतो फणस पिकला! सगळी फणसाची झाडे हिंडून त्यावरची फळे टिचक्या मारून वाजवून बघणे हा आमचा या दिवसातला एक धंदा झालेला असतो. घरात एक खोली फणसांसाठी खास मोकळी ठेवलेली असते. पिकाऊ जून फणसाच्या ढेली या खोलीत आणून ठेवायच्या नि रोज किती फणस पिकतात ते पहावयाचे. फणसाच्या वासाने घर घमघमून जाते. पाहुणा आला रे आला की त्याच्यासमोर ताजा फणस फोडून ठेवायचा. कापा असला की, त्याच्यासमोर खोबऱ्याच्या कातळ्या पण! कापे गरे नि ओले खोबरे यासारखा मेवा दुनियेत दुसरा कुठला नसेल. पण पहाणाऱ्याचे डोळे नि पोट तृप्त करावे ते रसाळ (बरक्या) फणसानेच सोन्यासारख्या रसरशीत पिवळ्या वर्णाचे ते मधाने भरलेले टपोरे गरे बघून माणसाचे डोळे निवले पाहिजेत आणि जीभ खवळली पाहिजे. पण रसाळ फणसावर गार पाण्याचा तांब्या ओठाला लावायला मात्र विसरता कामा नये. आम्ही रसाळ फणस ओरपायला बसलो म्हणजे कुणीतरी म्हातारी जवळ पाळत ठेवून बसलेली असायची नि आम्ही वर पाणी पितो की नाही यावर खास नजर ठेवायची. रसाळ गऱ्यावर पाणी प्याले नाही तर अजीर्ण होते. आम्हाला त्याचे खरे म्हणजे भानच नसते.

या दिवसात सकाळच्या पेजेबरोबर भाजी असते तीही फणसाच्या गऱ्याची नि आठळांची. कांदा नि मिरी वाटून घातलेली ही भाजी आम्ही दीगभर खातो. पावसाळा सुरू होईपर्यंत कोंकणात फणसाच्या भाजीखेरीज दुसरी भाजीच नसते आणि

कुणाला तिचा वीट येत नसतो

आंब्या–फणसाची नवलाई संपली म्हणजे जांभळे आठवतात कुठल्या जांभळीवर जांभळाचे घोस लटकलेले असतात, हे आम्ही जांभळे हिरवी असतानाच पाहून ठेवलेले असते त्यामुळे शोधाशोध करण्यात वेळ जात नाही. पावले आपोआप जांभळीच्या झाडाखाली वळतात. घनदाट छायेचा तो उंच वृक्ष जणू आमची वाटच बघत असतो तशी कैक जातीची पाखरे त्याच्या पिकलेल्या डहाळ्यांवर बसून पाहुण-चार खाऊन गेलेली असतात; पण तरीही त्याचे समाधान झालेले नसते गावची पोरे दिवसातून एकदातरी आपल्या सावलीत जमली नाहीत तर जांभळीचे झाड ह्या दिवसात हिरमुसले होते. आम्ही आवाटातली सगळी पोरे खाली जमताच त्याला स्फुरण येते नि एखादी फांदी वारा नसला तरी हलते, डुलते, आणि पिकलेली रसाळ जांभळे टपाटप खाली कोसळतात.

पण तशी चारसहा जांभळे खाऊन आमची तृप्ती होत नाही. जीभ गर्द जांभळी झाल्याशिवाय आम्हाला चैन पडत नसते. मग आम्ही भराभर वर चढतो हिरव्या-गार गच्च पानातून काळेभोर जांभळाचे घड लोंबत असतात नि आम्ही माजघरातून स्वैंपाकघरात जावे एवढ्या सहजपणे एकामागून एक फांद्या ओलांडीत असतो. थोड्याच वेळात आमचे पोट तुडुंब भरते. जांभळाच्या रसाने अंग रंगते. जीभ जांभळ्या शाईच्या रंगाची होते नि मग आम्हाला खाली राहिलेल्या, झाडावर चढता न येणाऱ्या पोरांची मस्करी करायची हुक्की येते. पिकलेल्या जांभळाचे घडामागून घड आम्ही त्यांच्या अंगावर फेकू लागतो ती पोरे बुभुक्षितासारखी ती जांभळे टिपतात नि मग लवकरच त्यांचे कपडे निळेजांभळे होतात. घरी मार बसेल या भीतीने एकेक पोर पळ काढते. आम्ही मग जांभळीच्या झाडाचा जड मनाने निरोप घेतो, उद्या पुन्हा यायचे वचन देऊन.

कुणीतरी म्हणते करवंदांना चला. आणि तेवढे आम्हांला पुरते. आडवणीची घाटी चढून तळ्यावर जायचं नि व्हाळ ओलांडून चिरेखाणीच्या पलीकडे असलेल्या कावणाच्या सखलात गेले की सगळे रान करवंदीचेच! कंबरभर उंचीच्या या झाळी अंगभर काळीभोर करवंदे दागिन्यासारखी लेवून उभ्या असतात. प्रथम आम्ही खूपशी करवंदे नुसतीच खाऊन घेतो. मग चोखंदळपणा सुरू होतो. एखादी करवंद आंबट जातीची असते. एकच करवंद तोडून जिभेवर टाकले की तिची जात कळते. ती झाळ तशीच मागे टाकून आम्ही दुसऱ्या करवंदाकडे वळतो. एखादीवर मधा-सारख्या रसाची करवंदे सापडतात. नि मग ती झाळ अक्षरशः लुटली जाते. आजू-बाजूच्या झाळी बापड्या निमूटपणे बघत बसतात.

मग कोंबड्याचा खेळ सुरू होतो. आत लालबुंद रंग असलेले करवंद म्हणजे कोंबडा. बाकीची पांढुरक्या गुलाबी रंगाची करवंदे कोंबड्या ठरतात.

हा खेळ थोडासा चालतो नि मग कुणाची तरी नजर हेळूच्या झाडावर जाते. चिकूच्या रंगाच्या पण सालीवर पातळ सोनेरी लव असलेल्या ह्या लाडवाएवढ्या फळाची चव विलक्षण मधुर असते. चिकूची निव्वळ गोडी आणि पेरूचा आंबट-गोडपणा एक केला म्हणजे जी चव होईल ती ह्या रानात जन्मणाऱ्या फळाची असते मग तोरणाच्या झाळी शोधल्या जातात. हेळू तोरणे, भोकरे आणि शेवटी रातांबे. लालबुंद आणि रसाने टुडुंब भरलेली ही अमृतफळे पोटभर खाऊन आम्ही घरी परतू लागतो.

उन्हाचा ताप असह्य झालेला असतो. अनवाणी पाय लाल धुळीवर होरपळत असतात, अंग घामाने निथळत असते नि एकाएकी नदीचा डोह समोर दिसू लागतो. आरशासारखा लखलखीत, शांत असा तो डोह पाहून आमची पावले घरची वाट विसरतात. अंगावरचे तोकडे कपडे भराभर दूर होतात नि आम्ही एकापाठो-पाठ एकेकजण धबाक्कन उड्या टोकतो क्षणभर सगळा डोह डहुळतो नि मग आम्हाला सोबतीला घेऊन खुशाल रमूगमू लागतो पाण्यातले लपडाव, सुरसुरी, पाताळाचा शोध असले खेळ लवकरच संपतात. सारं अंग मऊसूत होतं मग आम्ही काठावर येतो. हाताचे तळवे लख्ख शुभ्र होतात. त्यांच्यावर मजेदार सुरकुत्या पडतात मग गुळगुळीत दगड घेऊन साल्टी जाईपर्यंत एकमेकांच्या पाठी चोळायच्या नि पुन्हा पाण्यात उतरायचे .

एवढे होईपर्यंत दुपार कलंडलेली असते. सगळा रानमेवा एव्हाना जिरून गेलेला असतो नि घरची पुन्हा आठवण होऊ लागते.

आंब्या-फणसाच्या नि जांभळाच्या या दिवसात एरवी उघड्याबोडक्या दिसणाऱ्या रानानासुद्धा एक शोभिवत रूप येते. ठायीठायींची झाडे वसंतऋतूची नव्हाळी अंगावर लेवून उभी असतात. बकुळीला बहर येतो. सुरगीवरही शे-दोनशे फुले शिल्लक असतात. मोगरा तडाखेबद फुलतो. बायलीच्या दारातला मोगरा पान न् पान झडून सागाडा राहिलेल्या शेवरीवर चढून असा बेबंद फुलतो की ते शेवरीचे एरवी नग्न वाटणारे झाड शुभ्र वस्त्रात गुरफटल्यासारखे वाटते. तसाच राठ काळपट पानांच्या पारिजातालाही वेडा बहर येतो, पारिजातकाचा श्रावणातला बहर किती वेगळा नि हा वैशाखातला बहर किती विलक्षण!

आणि भुईचाफा! बिनपानांचं हे नाजूक जांभळे फूल जमिनीतून हलकेच वर येते. अवघी बागशाई भारून टाकते.

रानात आंब्यावर कोकिळा साद घालू लागते. अगदी ऐन पहाटेपासून तिच्या हाका सुरू होतात नि दिवसभर थांबतच नाहीत दयाळ पक्ष्याला तर या दिवसात एवढा गोड कंठ फुटतो की काही विचारू नका. शेपटी ऐटीने वरखाली करत हा

बाकदार पक्षी जास्वदीच्या झुकलेल्या फादीवर बसून अगदी सकाळी जे मंजुळ सूर काढतो ते सनईतूनही उमटणार नाहीत. रानातील यच्चयावत् वृक्षाना पालवी फुटते, पांगारा नि पळस लालबुंद फुलाच्या ज्योती ठायीठायी फुलवतात. कुडा पांढराशुभ्र होतो. आणि कदंबाची गोल चेंडूच्या आकाराची पोपटी फळे इतकी फुलतात की त्याच्या पानाची संख्या कमी वाटावी एक मद सुवास कदंब सगळीकडे पसरवीत असतो

वैशाख संपता संपता जमिनीतून एकेक कोंब वर येऊ लागतो मृगाच्या चाहुलीने आतुर झालेले करांद्याचे, चिन्याचे आणि कणग्याचे तांबडेलाल कोमल अंकुर तरारत वर माना काढतात. सुरणाच्या जमिनीत दडलेल्या कदावर एक सुरेख फूल उगवत. अळवाच्या मुंडल्या हळूच वर बोटे उचलतात. एकूण एक वनस्पती वसंतोत्सवात आपापल्यापरीने भाग घेते. तल्लीन होऊन, तन्मय होऊन. उन्हाळी भातशेती, वायंगण आणि लव्ही वाऱ्याने सळसळत असते, हिरव्या वस्त्रांचा पदर फलकावीत

असे हे रसाने भरलेले, रगाने रंगलेले नि वासांनी भारलेले जादूचे दिवस

REFBK-0026322